महाराष्ट्रकाव्यग्रंथ.

७.

रंगनाथ मोगरेकरकृत

पंचरत्न.

जुन्या हस्तलिखित प्रतींच्या आधारें

विनायक लक्ष्मण भावे, बी. एस्सी.,

यांनीं

'महाराष्ट्रकवि' या मासिक पुस्तकांत छापून प्रसिद्ध केला.

शके १८२७.

प्रस्तावना.

१. या ग्रंथाच्या आम्हांस तीन प्रती मिळाल्या. एक रा. रा. **महादेव वामन सा**पटणेकर, वस्ती **माढें**, यांजकडून, दुसरी कै. रा. रा. **नारायण चिंतामण केळकर**, माजी '**काव्यसंग्रह**' कर्ते यांजकडून व तिसरी आमचे स्नेही '**महाराष्ट्रकवि**'चे एक हितचिंतक यांजकडून.

यांपैकीं पहिली म्हणजे रा. **सा**पटणेकरांकडील प्रत ही ८ इंच लांब व ६॥ इंच रुंद अशा पुस्तकवजा चोपडीवर आंत एक इंच समोंवार समास सोडून लिहिली आहे व हींत ३९१ पृष्ठें आहेत. चोपडीवर ग्रंथाचा समाप्तिकाल वगैरे कांहीं एक दिला नाहीं. कागद व अक्षर दोन्ही अगदीं अलीकडीलच आहेत. ही प्रत फार फार तर पांचपंचवीस वर्षांपेक्षां जास्त जुनी असेल असें दिसत नाहीं. सदर्हू चोपडी रा. **सा**पटणेकर यांस **माढें**, जि. **सो**लापुर, येथें कांहीं वर्षांपूर्वी एका संन्याशाजवळून मिळाली असें ते म्हणतात.

दुसरी म्हणजे रा. **के**ळकरांकडील प्रत ही पोथीवजा सुट्या पानांवर लिहिलेली आहे. हिचीं ९॥ इंच लांब व ४ इंच रुंद अशा आकाराचीं ८७ पानें असून दरएक पृष्ठावर सुमारें १० ओळी आल्या आहेत. हीवरदेखील प्रत केव्हां केली हें कळण्यास कांहीं एक साधन नाहीं. तथापि आम्हांस मिळालेल्या तिन्ही प्रतींत ही सर्वांत जुनी व शुद्ध आहे. हींत शद्बांचीं उकारान्तरूपें कायम ठेविलीं असून हिचें अक्षरही जुन्या वळणाचें आहे. अदमासानें ही प्रत दीडशें वर्षांपलीकडे केली गेली असावी.

तिसरी प्रत पोथीवजा सुट्या पानांवरच लिहिलेली आहे. हिचीं ८। इंच लांब व ४ इंच रुंद अशा आकाराचीं १८९ पानें आहेत. प्रत्येक पृष्ठावर सरासरीनें ९ ओळी आल्या आहेत.

२. पंचरत्नटीका ही **आचार्यांच्या** '**सोपानपंचक**' नामक पांच श्लोकांवरील टीका आहे, हें उघड आहे. '**सो**पानपंचका'चे श्लोक वर सांगिलेल्या तिन्ही प्रतींपैकीं कोणत्याही प्रतीचे प्रारंभीं दिलेले नाहींत. सदर्हू श्लोक आम्हीं आपल्या संग्रहांतल्या एका संस्कृत पोथीवरून या ग्रंथाचे प्रारंभीं उतरून घेतले आहेत.

३. 'पंचरत्नटीके'चा कर्ता रंगनाथ हा सोळाव्या शतकाच्या द्वितीय पादांत विद्यमान होता. हा गोदावरीनदीच्या तीरीं मोगरें या नांवाचें एक गांव आहे, तेथला राहणारा. याच्या आजाचें नांव 'अनंत' व बापाचें नांव 'आपेराज' अथवा 'आप्पाराव' असें होतें. हा कपिगोत्रोत्पन्न ब्राह्मण. या कुटुंबाचें कुलदैवत नृसिंह होय. मोगरें येथें नृसिंहाचें सुंदर देवालय व प्रसिद्ध क्षेत्र असल्याबद्दल कवीनें लिहिलें आहे.

४. रंगनाथाची गुरुपरंपरा पुढीलप्रमाणें आढळते:—

वासुदेवानंद ऊर्फ सिद्धानंद. ....समाधि वाराणशीस.
।
परमानंद.... ....समाधि गंगातीरीं.
।
वैकुंठानंद.... ....समाधि बदरीकेदारीं.
।
कृष्णानंद.
।
रंगनाथ.

५. या रंगनाथाचा पुत्र व शिष्य जो काशिराज त्याच्या विश्वनाथ नामक शिष्यानें 'उपदेशरहस्य' या नांवाचा एक ग्रंथ लिहिला आहे. यांत आपली परंपरा सांगताना विश्वनाथ म्हणतो, 'कृष्णानंदाचा अनुग्रहीत । तो महाप्रसिद्ध रंगनाथ, । कपिलगोत्रोत्पन्न, विख्यात, । नाशिकीं वसत निजसुखें. ॥' यावरून या रंगनाथाचें वसतिस्थान अथवा समाधिस्थान श्रीक्षेत्रनाशिक असावें असें होतें. रंगानाथास कृष्णानंदाचा उपदेश गोदावरीचे दक्षिणेस धारानगरीजवळील एका गिरिगुहेंत झाला असें रंगनाथ म्हणतो.

६. या एके वेळच्या 'महाप्रसिद्ध' रंगनाथाचे (१) 'योगवासिष्ठसार' (२) 'चित्सदानंदलहरी' व (३) 'पंचरत्न' असे तीन ग्रंथ हल्लीं प्रसिद्ध आहेत. पहिले दोन पूर्वींच छापले गेले असून पंचरत्नही हल्लीं छापला आहे. यांपैकीं 'चित्सदानंदलहरी' ही गीतेवरील टीका रंगनाथ निगडीकराची म्हणून फार दिवस समजली जात असे. परंतु या टीकेशीं निगडीकर रंगनाथाचा बिलकुल संबंध नाहीं हें नव्यानें सांगण्याची गरज नाहीं.

७. रंगनाथाचे शिष्य अथवा वंशज हल्लीं कोठें असल्याचें माहीत नाहीं.

श्रीमच्छंकराचार्यकृत.

सोपानपंचक.

वेदो नित्यमधीयतां, तदुदितं कर्म स्वनुष्ठीयतां,
तेनेशस्य विधीयतामपचितिः, काम्ये मतिस्त्यज्यताम्, ।
पापौघः परिधूयतां, भवसुखे दोषोऽनुसंधीयता-
मात्मेच्छा व्यवसीयतां, निजगृहात्तूर्णं विनिर्गम्यताम्. ॥ १ ॥
संगः सत्सु विधीयतां, भगवतो भक्तिर्दृढा धीयतां,
शांत्यादिः परिचीयतां, दृढतरं कर्माशु संत्यज्यताम्, ।
सद्विद्वानुपसृप्यतामनुदिनं, तत्पादुके सेव्यतां,
ब्रह्मैकाक्षरमर्थ्यतां, श्रुतिशिरोवाक्यं समाकर्ण्यताम्.. ॥ २ ॥
वाक्यार्थश्च विचार्यतां, श्रुतिशिरः पक्षः समाश्रीयतां,
दुस्तर्कात्सुविरम्यतां, श्रुतिमतस्तर्कोऽनुसंधीयताम्, ।
ब्रह्मास्मीति विभाव्यतामहरहर्गर्वः परित्यज्यतां,
देहेऽहं मतिरुज्झ्यतां, बुधजनैर्वादः परित्यज्यताम्. ॥ ३ ॥
क्षुद्व्याधिश्च चिकित्स्यतां, प्रतिदिनं भिक्षौषधं भुज्यताम्,
स्वाद्वन्नं न तु याच्यतां, विधिवशात्प्राप्तेन संतुष्यताम्. ।
औदासीन्यमभीप्स्यतां, जनकृपानैष्ठुर्यमुत्सृज्यतां,
शीतोष्णादि विषह्यतां, न तु वृथा वाक्यं समुच्चार्यताम्. ॥ ४ ॥
एकांते सुखमास्यतां, परतरे चेतः समाधीयतां,
पूर्णात्मा सुसमीक्ष्यतां, जगदिदं तद्बाधितं दृश्यताम्, ।
प्राक्कर्म प्रविलाप्यतां, चितिबलान्नाप्युत्तरैः श्लिष्यतां,
प्रारब्धं त्विह भुज्यतामथ परब्रह्मात्मना³ स्थीयताम्. ॥ ५ ॥
यः श्लोकपंचकमिदं पठते मनुष्यः संचिंतयत्यनुदिनं स्थिरतामुपेत्य ।
तस्याशु संसृतिदवानलतीव्रघोरतापः प्रशांतिमुपयाति चितिप्रसादात्. ॥६॥

पाठ—१ प्रतिदिनम्. २ ब्रह्मैवास्मि. ३ परब्रह्मात्मनि.

पंचरत्न.*

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ [1]नमोस्तु श्रीगुरुराजवर्या ! । नमो सुगीतनिगमविचार्या ! । नमोस्तु आचार्या ! । चिद्घनैकरसा ! ॥ १ ॥ नमो सुरसरसिकरसना ! । नमो अदमदंभदमनीयघना ! । नमो मानसमानआयतना ! । नमोस्तु तुभ्यं. ॥ २ ॥ नमोस्तु परमानंदैकघना ! । नमोस्तु व्याप्यव्यापकविहीना ! । नमो अज्ञानतमविध्वंसैकभाना ! । सद्गुरुवर्या ! ॥ ३ ॥ नमोस्तु ध्वांतनिरसनैकतमारी ! । परमानंदै[2]कंदरश्मिकरी । अविद्यावंता नैयनसुख करी । सुखस्वरूपत्वें ! ॥४॥ नमोस्तु परावरैकपरमा ! । गुणागुणविरहित उपमैक ! अनुपमा ! । अगम्य तूं निगमागमा । निरवेद्यपणें. ॥ ५ ॥ पंचश्लोकैकस्तोत्रगुणें । स्तवन केलें स्तव्याभाव[3]पणें, । तें कृपाळुत्वें उपसाहणें, । स्तव्यविहीना. ॥ ६ ॥ स्तवन, स्तुति, स्तोता; । वक्तव्य, वेद्य, वक्ता; । श्रोतव्य, श्रुत, श्रोता; । तूंचि म्हणवूनि. ॥ ७ ॥ तेथें वेगळेपणें काय स्तवावें ? । जें जें बोलिजे तें तूं स्वभावें, । म्हणूनि उगियाचि नमन करावें । हेंचि भलें. ॥८॥ भजनेवीण तूं भजनीय, । निरूपणेवीण तूं निरूपेय, । प्रमाणाविरहित अप्रमेय (?)। आराध्यलिंगा. ॥ ९ ॥ तुज स्तवावया हेंचि कारण, । जेणें जिव्हा सारस्वत बोले आपण, । जेणें निरूपणें संतसज्जन । सुखिया होय. ॥ १० ॥ तुझें ऐश्वर्य वर्णणें । तैसें जिव्हेसि करी परगुणें । जेणें संतवृंदांचीं मनें । परमानंदें डुळती. ॥ ११ ॥ हे आयकोनि विनवणी । सद्गुरु स्नेहाळू जननी । बोलिली परमानंदें दाटूनि । अस्मच्छिष्यवत्सासि. ॥ १२ ॥ तें स्तन्य सेवूनि परमामृत । धालों परमानंदें ढेंकर देत । तेचि उद्गार शब्दांत । प्रकट जाहले. ॥ १३ ॥ त्या शब्दसुमनांची माळा । घालीन विपश्चितांच्या गळां । जेणं त्यांचे कृपेचा येकवळा । मजचिवरि होय. ॥ १४ ॥ त्या संतांसि करूनि नमन । ग्रंथव्याख्यान मी करीन । जें बोलिला श्रीभगवान्। शंकराचार्य. ॥१५॥ जो कीं सच्चिदानंदमूर्ति । तोचि मूर्तिमंतु जाला कैलासपति । जेचि ज्ञानोद्धारार्थ मूर्ति । आचार्यरूपें जाहली. ॥ १६ ॥ अनेक शिष्य प्रबोधिले, ।

---

* '**सोपानपंचक**' टीका. १. अ. जय जय. २. अ. नंदानंदकंदरश्मि. ३. अ. भावनें. ४. ब. बोलती.

आत्मज्ञानाचे आकर केले, । वेदांतादि वाग्बाणिले । अनेक ग्रंथ. ॥ १७ ॥ ते एकैक बोलतां । गिरा बोलों न शके सर्वथा. । असो. जनतारणार्थी । अनेक उपाय केले. ॥ १८ ॥ तयांमाजी 'पंचरत्न,' । तें पंचश्लोकैकानिरूपण. । उपदेशक्रमें आयतन । ज्ञानाचें जें. ॥ १९ ॥ द्विजा द्विजपण आलिया । प्रथमाश्रमापासूनियां । ज्ञानप्राप्तीचिया उपाया । जें कीं बोलिलें. ॥ २० ॥ अज्ञानापासूनि सिद्धावस्था, । स्थितप्रज्ञभूमिका सत्ता, । तंव परियंत व्यवस्था । केली जे कीं. ॥ २१ ॥ अल्पचि निरूपणेंकरूनि । सिद्धावस्था साधनापासूनि । निरूपण केलें जनीं । तरावयालागीं. ॥ २२ ॥ तया नांव बोलिजे 'पंचरत्न', । जें अमौल्य, मौल्यविहीन । सर्वां वस्तूंसि जें श्रेष्ठपण । तया रत्न बोलिजे. ॥ २३ ॥ सर्वा वस्तु सुलभपणें । सहस्रांत मौल्यें पावणें; । अमौल्य रत्न दुर्लभपणें । श्रेष्ठ जाहलें. ॥ २४ ॥ तें सामान्य जनां नाहीं प्राप्त । अल्प मौल्यें; अति दूरस्त; । तें येकचि पावती श्रीमंत । जे भाग्याथिले. ॥ २५ ॥ तें पावलियाही भाग्यवत । श्रेष्ठ करिती अलंकारांत । सकळां अलंकारां शोभविंत । अपूर्वपणें. ॥ २६ ॥ तया नांव 'रत्न' बोलिजे । जें सर्व अलंकारांवरि साजे; । जयाहूनि अपूर्व नाहीं दुजें । बरवेपणें पैं. ॥ २७ ॥ तैसें ब्रह्मचर्यादि आश्रमां । अलंकारपण आश्रमधर्मीं । त्यासही अलंकारसीमा । पंचरत्नाची. ॥ २८ ॥ सौभाग्य आणि सौंदर्य । श्रेष्ठपणें सकळां वर्य । जेथें ज्ञानधर्मनिरूपणवर्य । पंचरत्न हें. ॥ २९ ॥ अज्ञानभूमिकेपासाव । उपदेशक्रम स्वमेव । सप्तमी भूमिका पर्यवसाव । तंववरि जें करणें. ॥ ३० ॥ साधनक्रमु वेदोक्त । स्थितीपर्यंत यथोचित । बोलिला तो दत्तचित्त । होऊनि आयका. ॥ ३१ ॥ गुरुत्वें आचार्य बोलिजे, । हितोपदेष्टा गुरु, ऐसें म्हणिजे । याचें व्याख्यान परिसिजे । कृपाकरूनि. ॥ ३२ ॥ हितोपदेष्टा ऐसें बोलिलें । तरि 'हित' काय तें पाहिजे कळलें, । तरि सांगेन, ऐका निर्मळें । मानसेंकरूनि ॥ ३३ ॥ तरि 'हित' शब्दें बोलिजे जें सुखोत्तम । जेथें भयदुःखादि नाहीं विषम, । ऐसें लोकिकहीं बोलती लोकोत्तम । 'हित'शब्दें सुख. ॥ ३४ ॥ तरि सकळां हितांचें हित । तें परब्रह्म जाण निश्चित, । जें निरातिशय सुख अद्भुत । सुखरूपत्वें ॥ ३५ ॥ सहजें जें जें सुख ऐसें बोलिजे । तें तें ब्रह्मसुखेंचि जाणिजे. । ब्रह्मावेगळें सहजें । सुखनामचि नाहीं. ॥ ३६ ॥ म्हणूनि ब्रह्मासि सुख बोलिजेति; । 'हित' शब्दें सुखप्राप्ति । आणि ब्रह्मावेगळी सुखस्थिति । असेचिना. ॥ ३७ ॥

१. अ. भावार. २. अ. तंव जें. ३. ब. केलें.

म्हणोनि ‘ हित ’ शब्दें ब्रह्म बोलिजे. । त्याचा उपदेष्टा तो गुरु म्हणिजे. । गुरु आचार्य सहजें । पर्याय शब्द. ॥ ३८ ॥ तो आचार्यवर्यपणें । शोभे शंकराभिधानें । श्रीशंकराचार्य येणें । व्याख्यान होय. ॥ ३९ ॥ तयाचीं जीं शब्दरत्नें । तयां नाम बोलिजे ‘ पंचरत्नें ’. । तेणें निरूपिलें तें यत्नें । अधिष्ठिजो. ॥ ४० ॥ तें अधिष्ठिलियाचीसाठीं । संसारस्वप्नायासाव उठी; । स्वयें ब्रह्मचि उठाउठीं । असोनीचि होय. ॥ ४१ ॥ तयाची यथामति टीका. । महाराष्ट्र करिजेल, आयका, । विज्ञापना करूनि सकाळिका । संतवृंदासि. ॥ ४२ ॥ तुम्हीं संस्कृताचे ज्ञाते, । तथापि विनोदार्थ बोलिजेतें; । संस्कृतीं अप्रवेशु तयांतें । सोपान हें. ॥ ४३ ॥ तेंचि सद्गुरुराजें बोलविलेपणें । बोलिजेल, तें घेइजे श्रवणें; । मनन करणें शुद्धांतःकरणें । स्वहितालागीं. ॥ ४४ ॥ तेंचि प्रथमारंभीं आतां । ब्रह्मचर्य जालें असतां, । प्रारंभींचें कर्तव्यता । ते आचार्य बोलती. ॥ ४५ ॥ ते श्लोक कृपेकरोनि । बोलिले संस्कृता वाणी । ते ऐकावे श्रोतेजनीं । महानुभावीं. ॥ ४६ ॥

वेदो नित्यमधीयतां तदुदितं कर्म स्वनुष्ठीयताम् ।

बेदशब्दें बोलिजे ज्ञान; । कीं, जो सर्व ज्ञानसाधनाचें कारण, । जेणें ब्रह्मप्राप्ती संपूर्ण, । त्यातें वेद बोलिजे. ॥ ४७ ॥ त्या वेदाचें नित्य अध्ययन । करावें गुरुगृहीं संपूर्ण. । येथें आशंकती एकजण । तें ऐका पां ॥ ४८ ॥ ना हो वेदें कैसी ब्रह्मप्राप्ती ? । ऐसें एक आक्षेपिती, । शब्दातीत ऐसें बोलती । ब्रह्मासि पैं. ॥ ४९ ॥ वेदु, शब्द; ऐसा मथितार्थ; । शब्दातीत ब्रह्म हा फलितार्थ; । तरि वेदेंचि प्राप्त्यर्थ । कैसा घडे ? ॥ ५० ॥ तरि येही विषयीं प्रमाण सर्वथा वेद; । तेथें करणें नलगे विवाद; । वेदें नमनी तो मंद । वेदबाह्य. ॥ ५१ ॥ कां जो अनादिब्रह्मरूपें वेदु; । येथ विषयीं नाहीं विसंवादु; । शब्दब्रह्म अगाधु । शब्दाब्धि हा. ॥ ५२ ॥ म्हणोनि जें कीं वेदानिर्णीत । तेंचि मानावें निश्चित; । येर ते अर्थवादांत । शब्द जाणावे. ॥ ५३ ॥ उपनिषदें प्राप्त ब्रह्म । म्हणोनि त्यातें औपनिषद बोले निगम । औपनिषद पुरुष हें आडनाम । यास्तवचि पडिलें. ॥ ५४ ॥ आणि ‘ **शब्दादेव अपरोक्षसिद्धि** ’ ऐसें । सर्वशास्त्रीं बोलिलें असे, । म्हणोनि हेंचि जाणिजे तसे । शब्दही जरी; [५] ॥ ५५ ॥ तेचि ऐका उपनिषद । जे संमति बोलिजेल विशद । ते ऐकोनि; शंकावाद । सांडावा कीं. ॥ ५६ ॥

---

१. कीजे. ब. २. आशंका करिती. ब. ३. वेदशब्दें. ब. ४. वेद ना मानी तो वेदमंद. ५. ही ओंवी अ प्रतींत नाहीं.

'तं त्वौपनिषदं पुरुषं पृच्छामि' ऐसी श्रुति । ऐसें वाहे उभोनि बोलती; । उपनिषदें होय प्राप्ति । आत्मयाची. ॥ ५७ ॥ जेणें जें निकट प्राप्त होय । तें तेंचि वस्तु स्वयें आहे, । यालागीं वेदुचि ब्रह्म होय । अनादिपणें. ॥ ५८ ॥ यालागीं वेदेंचि होय ब्रह्मप्राप्ति । येथविषयीं नाहीं विप्रतिपत्ति; । यालागीं औपनिषद बोलती । आदिपुरुषातें. ॥ ५९ ॥ जें परब्रह्माचें निःश्वसन । तोचि बोलिजे वेदु संपूर्ण, [1] जयापासाव निर्माण । नाम रूप हें. ॥ ६० ॥ वेदाक्षर पडतांचि कानीं । वर्णहीनासि ब्रह्मत्व आणी, । यालागीं ब्रह्मपर्णीं, । वेदुचि शोभे. ॥ ६१ ॥ वेदें कर्मधर्म यज्ञादिक, । वेदें तीर्थव्रतादि सार्थक । वेदें ब्रह्मप्राप्ति सम्यक । सर्वा परी. ॥ ६२ ॥ ऐसा वेदु सर्वां मूळभूत । तो करावा नित्य अधीत । आचार्यसेवायुक्त । व्रतचारीं. ॥ ६३ ॥ वेदवेदांग संपूर्ण, । उपनिषदां परिपूर्ण, । सांग करावें अध्ययन । सद्गुरुमुखें. ॥ ६४ ॥ सार्थ वेदाचें अध्ययन । करावें मननपूर्वक, जाण; । जेणें स्वयें लाभे परिपूर्ण । परब्रह्म जें. ॥ ६५ ॥ पारायणें चित्तशुद्धि होय, । अर्थश्रवणें ज्ञान लाहे, । मननें आत्मप्राप्ति होय, । वेदाचेनि. ॥ ६६ ॥ अध्ययनें नियम वाचेचा । अनायासेंचि घडे साचा, । यदर्थीं हि वेदाचा । संवादु आहे. ॥ ६७ ॥ जे बहु वक्तृत्वें अर्थशून्यता, [2] । सज्ञाना स्वरूपीं दुश्चित्तता, । अज्ञानासि संग्रह पुरता । पापाचा होय. ॥ ६८ ॥ ऐसे वाचालपणें अनर्थकोटी । ज्ञानींही स्वरूपापासाव उठी; । ययालागीं व्यर्थ चावटी । न करावी कोणीं. ॥ ६९ ॥ यालागीं सर्वदा मौनेंचि असावें. । स्वस्वरूपींच स्थितीस पावावें. । शब्द बोलोनि न यावें । बाहीर केहीं. ॥ ७० ॥ जे जे इंद्रियांचे व्यापार, । ते ते स्वरूपच्युतीचे प्रकार; । यालागीं तूष्णींभूत निर्विकार । असा वेदु बोले ॥ ७१ ॥

नानुध्यायाद्बहून् शब्दान् वाचो विग्लापनं हि तत् ॥ (श्रुतिः ।)

याचिलागीं वाचा नियमार्थ जाण । नित्य करावें वेदाध्ययन; । तेणें मननादि साधन । अनायासेंचि होय; ॥ ७२ ॥ करावें सर्वे इंद्रियांचें नियमन । वाचा हें उपलक्षण जाण; । ययालागीं वेदाध्ययन । सर्वदा करावें. ॥ ७३ ॥ बहु शब्दाचें नानुध्ययन । होवावया करावें वेदाध्ययन. । नाहो शब्द रूप ना हो आपण; । करावें नानुध्ययन कैसें ? ॥ ७४ ॥ नानुध्ययनें तूष्णींभूतता [3] । द्योतिली वेदें अपूर्वता; । सर्वथा ब्रह्मप्राप्ति तत्वता । तेंचि ते कीं. ॥ ७५ ॥

---

१. परायणें. अ. २. वेद आपण अ. ३. तूष्णीता. अ.

ना वेदासि बहुवाचकपणें। निरर्थक तों नाहीं होणें; । पारायणादि अध्ययनें । फळश्रुति सांगीतली. ॥ ७६ ॥ वेदाचें नव्हे अन्य बोलणें; । ब्रह्मीं तात्पर्य सर्वस्वपणें; । यालागीं सार्थक अध्ययनें; । ब्रह्मत्वें वेदु. ॥७७॥ यदर्थी ऐका संमति। जे कीं स्वयें शास्त्रें बोलतीं, । तेचि ते संमति । अवधारिजे. ॥७८॥

'सर्वेषां वेदानां ब्रह्मणि तात्पर्यम्'

सकळ वेदांचें तात्पर्य ब्रह्मीं । ऐसें बोलती सर्वागमीं; । ज्ञातया अर्थु अवगमी । नेणवे अज्ञानासि[1] ॥ ७९ ॥ वेदु हा शब्दु होय; । परि त्याचा विषयो ब्रह्म तें साच आहे. । इतर शब्दांचा विषयो व्यर्थ होय; । अनित्य म्हणोनि. ॥ ८० ॥ तेथें एक ऐसें म्हणती । वेदेंचि सर्वा निरोपणीं शक्ति; । प्रवृत्ति आणि निवृत्ति । बोलिला असे. ॥ ८१ ॥ तेथें ब्रह्मपरचि म्हणतां । हें तंव न घडे तत्वता. । प्रवृत्तिपरही बोलत असतां । वेद ब्रह्मपरचि केंवि[3]? ॥८२॥ श्रुति बोले प्रवृत्तिपर। तें वाक्य ऐका सविस्तर; । याचा करूनि विचार। सांगा, स्वामी॥८३॥ **यावज्जीवमग्निहोत्रं जुहुयात्** । ऐसें प्रवृत्तिवाक्य असे बोलत; । तरि ब्रह्मीं तात्पर्यार्थ । कैसा येथें? ॥ ८४ ॥ तरि येथें ऐका उत्तर; । अर्थ घेइजो पूर्वापर; । येणें वाक्यें चित्तशुद्धि होय थोर । ब्रह्मप्राप्त्यर्थ बोलिली. ॥ ८५ ॥ जें जें कर्मादिक साधन। वेदें बोलिलें अति प्रमाण, । तें चित्तशुद्धिद्वारा प्राप्तीकारण । परब्रह्माचें. ॥ ८६ ॥ परि प्रपंचु जो अनात्मा। तेथें प्रवृत्ति न करी हा महात्मा; । प्रवृत्तीचिपरी उपरमा। नेतु असे. ॥ ८७ ॥ ऐसीं आहेति वेदवचनें। तीं बोलिजेती कवणें? । परि उदाहरणार्थ दावणें। येकदोनि. ॥ ८८ ॥

न कर्मणा न प्रजया धनेन त्यागेनैके अमृतत्वमानशुः ।

सर्वत्यागें ब्रह्मप्राप्ति। ऐसें बोले स्वयें श्रुति;। यालागीं वेद बोले कर्मप्रवृत्ति। ब्रह्मप्राप्तिचलागीं. ॥८९॥ चित्तशुद्धीलागीं कर्मप्रवृत्ति । स्वयें बोधितसे श्रुती। चित्तशुद्धि जालिया असे करविती । कर्मादित्यागु. ॥ ९० ॥ यालागीं वेदाचें बोलणें। तें ब्रह्मप्राप्तीचकारणें. । तयाचीं जीं साधनें । तीं कर्मादि निरोपिलीं. ॥ ९१ ॥ परि प्रवृत्तिपर श्रुति । एकही नाहीं त्रिजगतीं; । यालागीं वेदाध्ययनें निश्चिति । बहुवाचकता नव्हे. ॥ ९२ ॥ आणि यावज्जीव अग्निहोत्र करावें; । तेणें चित्तशुध्दिच होय स्वभावें. । चित्त शुध्दिनंतरें पहावें । गुरुद्वारा ब्रह्म. ॥९३॥ यालागीं जें जें कर्म प्रवृत्तिपर । बोलिला जो श्रुतिविचार, । तो चित्तशुद्धीचा

१ अ. सज्ञानासि. २. अ. वेद श्रेष्ठ शब्द. ३. ही ओंवी अ प्रतींत नाहीं.

प्रकार । ब्रह्मप्राप्तीलागीं. ॥ ९४ ॥ म्हणोनि इयेविषयीं संदेह न धरा. । वेद प्रवृत्तिपर नव्हे खरा. । हा नेतसे स्वस्वरूपाच्या घरा । रोचनामिषें. ॥ ९५ ॥ चित्तशुद्धीवीण ब्रह्मप्राप्ति, । हें तंव न घडे कदा कल्पांतीं; । यालागीं चित्तशुद्ध्यर्थ श्रुति । कर्म बोधी. ॥ ९६ ॥ म्हणोनि अग्निहोत्रादि अवश्य करणें. । तेणें चित्तशुद्धिद्वारा ब्रह्म पावणें. । न मानावें अन्यथा बोलणें । वेदाचें तुम्हीं. ॥९७॥ येथें आशंका असे थोर, । वेदु बोलिला सर्व प्रवृत्तिपर; । येथें ऐका श्रुतीचा निर्धार । सांगेन तुम्हां. ॥ ९८ ॥ वेदवचन नव्हे अप्रमाण; । वेद नित्यत्वें सर्वदा प्रमाण; । ब्रह्मप्रतिपादनीं जाण । श्रेष्ठत्व यासि. ॥ ९९ ॥ महावाक्यें ब्रह्मप्राप्ति; । म्हणोनि वेद प्रमाण सर्वार्थी । ऐसें तुम्हींच पूर्वग्रंथीं । प्रतिपादिलें. ॥ १०० ॥ तरि वेदवचन ऐका; । जें कीं प्रवृत्तिपर वाक्या । ऐकोनियां, निका । परिहार देणें. ॥ १ ॥ पूर्वश्रुतीनें सत्कर्म बोधिलें । ह्मणोनि चित्तशुद्धीचे हेतु ह्मणितलें. । विषयसुखेंचि[1] जें बोलिलें । तेणें चित्तशुद्धि तों नव्हे. ॥ २ ॥ तोंवि प्रवृत्तिपर श्रुति । चित्त देवोनि आयकावी संतीं । परिहारु यथानिगुती । द्यावयालागीं. ॥ ३ ॥

[ऋतौ भार्यामुपेयात्]

ऐसें बोले वेदु निश्चित. । ऋतुकाळीं पुत्रार्थ । पुरुषासि जाहलें प्राप्त । स्त्रियेप्रती जाणें. ॥ ४ ॥ पुत्रेंकरूनि[2] ब्रह्मप्राप्ति । नसे; 'न कर्मणा न प्रजया' हे श्रुति. । निषेधीं तरि या वचनाची गति । कैसी असे ? ॥ ५ ॥ येथें ऐका उत्तर. । हें नव्हे वेदतात्पर्यसार । येणें निषेधुचि महाथोर । उपपादिला. ॥ ६ ॥ वेदाचें मनोगत, निवृत्ति । सर्वदा करावी सर्व भूतीं; । जेणें होय स्वस्वरूपप्राप्ति । तेंचि आचरावें. ॥७॥ अन्य कांहीं न करावें; । सर्वदा निवृत्तिपरचि व्हावें; । निरंतर अनीह असावें । कायवाङ्मानसें. ॥ ८ ॥ तरीच स्वस्वरूपीं राहिजे, । अन्यथा स्वस्वरूपच्युत होइजे; । यालागीं सत्साधनेंचि कीजे । निवृत्त्यादिक. ॥ ९ ॥ ऋतुकाळीं योषितागमन । हें वेदें केलें जनासि नियमन. । सर्वदा आहारादि स्त्रीगमन । अति प्रिय भूतांसि. ॥ १० ॥ जो उत्पन्न जाला प्राणी । त्यासि आहारव्यवायादिक मनीं; । त्याच्या नियमनालागूनि । वेदें बोलिजे. ॥ ११ ॥ यदर्थी श्रीव्यासोक्ति । श्रीभागवतीं असे संमति; । वेदगुह्य असें बोलती । श्लोकार्थें ऐसें. ॥ १२ ॥

---

१. अ. सुख जें. २. अ. ते करूनि. ३. हा चरण प्रतीत नाहीं. श्रुतिवाक्य हाच राहिला चरण धरून ओवी पुरी केली आहे.

लोके व्यवायामिषमद्यसेवा नित्यास्तु जंतोर्न हि तत्र चोदना ।
व्यवस्थितिस्तेषु विवाहयज्ञसुराग्रहैरासुनिवृत्तिरिष्टा ।

यया लोकाच्या ठायीं । मैथुन आमिषमद्यादि पाही । सेवावें, हे प्राणिमात्रासहीं । प्रवृत्तिच असे. ॥१३॥ येथें वेदाची प्रेरणा नाहीं; । हें मुख्यार्थें ठेविलें ठायीं, । येथ मर्यादा बोलिली पाहीं । निवृत्तीचलागीं. ॥१४॥ सर्वदा जे पदार्थत्रयीं प्रवृत्ति, । ते 'परिसंख्या'विधीनें बोलिली निवृत्ति; । तेंही सांगिजेल यथानिगुती, । ते परिसिजे, ॥ १५ ॥ येथें एक म्हणती, परियेसा । तुम्हीं 'परिसंख्याविधि' बोलिला कैसा; । हा अपूर्व विधि भरंवसा । आन नाहीं. ॥ १६ ॥ जें हें अपूर्व मैथुनादिक । तें वेदें बोलिलें आवश्यक । तें न आचरतां सम्यक । दोषकोटी. ॥ १७ ॥ यदर्थीं स्मृतिवचनें । बोलिलीं असती; विधिपणें । तें परियेसा अंतःकरणें । सावधानें. ॥ १८ ॥

ऋतुस्नातां तु यो भार्यां सन्निधौ नोपगच्छति ।
घोरायां भ्रूणहत्यायां पच्यते नात्र संशयः ॥

ऐसियाचेंही उत्तर । देइजेल सविस्तर. । करूनि मन एकाग्र । ऐकावें तुम्हीं. ॥१९॥ आधीं विधि ते कोण, किती ? । त्यांची कैसी स्वरूपस्थिति ? । तेंही सांगों यथानिगुती, । हा विधिही सांगों. ॥ २० ॥ विधीची गणना, स्वरूप । कळलें बरवें उमप, । मग हा विधि कोण, तोंही सांक्षेप[1] । सांगिजेल. ॥ २१ ॥ हे शास्त्रविचारणा निर्दोष । सर्वथा न कळे अज्ञानास; । ज्ञातया अतिशय हरुष । ऊहापूह[2] करितां. ॥ २२ ॥ तथापि कृपा करूनि ज्ञाते जनीं । निरूपण ऐकावें श्रवणीं. । सांगेन प्रांजळा वाणी, । जें इतरांही कळे. ॥२३॥ तरि विधीची संख्या त्रिप्रकार; । विधित्रय हें मनोहर । अपूर्व, नियम, परिसंख्या; प्रकार । जाणावे कीं. ॥ २४ ॥ एक तो 'अपूर्व' विधि । दुसरा 'नियम' विधि । 'परिसंख्या' विधि । तिसराचि ॥ २५ ॥ विधित्रयें निगमरावो । करी सकळ आज्ञाप्रस्तावो; । यया व्यतिरिक्त भावो । चौथा नाहीं. ॥ २६ ॥ आतां सांगों यांचीं लक्षणें. । ऐका सावधान अंतः-करणें. । अपूर्व विधि हा कोणें । प्रकारें बोलिला. ॥ २७ ॥ तरि कोणाही कळलें नाहीं, । नाहीं रागेंकरूनि प्राप्तिही । तें सांगिजे तो अपूर्व विधि पाहीं; । वेदु बोले ॥ २८ ॥ ऐसें तें काय, आतां । तें सांगिजेल तत्त्वता; । तरि रागें प्राप्त विषय असतां । ते अपूर्व नव्हेति. ॥२९॥ आणि ठाउकें आहे सकळांसी ।

---

१. अ. संक्षेपें २. उहपूह करितां. ब.

विषयीं प्रीति समग्रांसि, । म्हणोनि अपूर्व नव्हे निश्चयेसीं । जाण सत्य ।। १३० ।। " ज्योतिष्टोमेन स्वर्गकामो यजेत " । ऐसें श्रुति अपूर्वार्थ असे बोधित. । स्वर्गयज्ञ कोण्हा नाहीं ज्ञात । म्हणूनि अपूर्व. ।। ३१ ।। आणि ज्योतिष्टोमें-करून । अपूर्व पुण्य उपजे, जाण; । तेणें अदृष्टही स्वर्गभोग पूर्ण । प्राप्त होती. ।। ३२ ।। ज्योतिष्टोमादि विधान सरलें । परि अपूर्व, अविनाश, पुण्य उपजलें; । तेणें अलौकिक सुख लाधलें । स्वर्गादिक. ।। ३३ ।। तरि हा बोलिजे अपूर्वविधि; । हा तंव नव्हे त्रिशुद्धि । " ऋतौ भार्यादि " विधि । अपूर्व नव्हे. ।। ३४ ।। मनुष्यपशुपक्ष्यादिकासि । हें क्लृप्तेंचि आहे सर्वांसि, । म्हणूनि अपूर्वता यासि । न घडे वास्तव. ।। ३५ ।। आतां नियमविधि बोलि-जेल । तरि त्याचें लक्षण परिसा सकळ, । नियम बोले प्रांजळ । स्वयें वेद. ।। ३६ ।। तरि निषिद्ध तें गाळूनि । नियम जो बोलिला जनीं, । ज्या नियमावांचूनि । वस्तु शुद्ध नव्हे. ।। ३७ ।। शुद्धवस्तूवांचून । सर्वथा नाहीं कर्म करणें, । आणि प्राप्त नाहीं रागेंकरून । तो नियम जाणावा. ।। ३८ ।। तेही ऐका श्रुति, । ते स्वयें नियम असे बोलती । तव्द्यतिरिक्त कर्मस्थिति । अधिकार नाहीं. ।। ३९ ।। " व्रीहीनवहन्यात् " । ऐसें श्रुतिनियामित । व्रीहींचें अवहनन निश्चित । करावें[१] यागीं. ।। १४० ।। तेथें त्रिविध अवहनन । प्राप्त जालें असे जाण, । एक नखें निकृंतन, । दुसरें दळणें. ।। ४१ ।। ते दोन्ही प्रकार टाकूनि । अवहनन करावें मुसळेंकरूनि । शुद्ध नाहीं तों-वांचूनि । होमद्रव्य. ।। ४२ ।। अवहनन करावें हा नियम, । अमुकेन करावें हा संभ्रम, । रागें प्राप्त तोही धर्म । असेचिना. ।। ४३ ।। यालागीं हा नियमविधि, । हाही तो नव्हे त्रिशुद्धि ।। मैथुनादि सुखसंवृद्धि । पश्वादिकां. ।। ४४ ।। जे रागेंचकरुनि प्राप्त । तयासि नियम नाहीं बोलिजेत ;।। उत्पन्नवत्स स्तनासि झोंबत । रागेंकरूनि. ।। ४५ ।। तैसेंचि व्यवायादिक । रागेंचि प्राप्त सम्यक । त्यासि काय नियम लोक । बोलतील? ।। ४६ ।। म्हणूनि व्यवायादिकांच्या ठायीं । नियमविधि सर्वथा नाहीं; । निषेधमुखें सर्वही । परिसंख्या जाणावा. ।।४७ ।। रागेंकरूनि जे प्राप्ति, । रागशब्दें अतिप्रीति, । तेथें परिसंख्याविधि श्रुति । स्वयें बोले. ।। ४८ ।। ते परिसंख्येचें[२] लक्षण । सांग तुम्हांप्रति सांगेन । करूनि सावधान मन । परियेसा. ।। ४९ ।। रागें[३] आमिष जालें प्राप्त । तें सर्वप्राणिमात्र भक्षित; । तेथें संख्या जे करि-जेत । तो परिसंख्याविधि. ।। १५० ।।

---

१. ख. अलोलाक. २. ख अपूर्व नव्हे सर्वांसि. ३. ख. यागें.

पंच पंचनखा भक्ष्या न भक्ष्या ग्रामकुक्कुटाः ॥

प्राणी सर्वत्र सर्वदा । जीवहिंसा करूनि आपदा, । आमिषभक्षण सदा । काळीं करील; ॥ ९१ ॥ तेथें न करावें प्राणिभक्षण, । सर्वदा असावें शुद्धांतःकरण, । म्हणूनियां आपण । निषेधु करी. ॥ ९२ ॥ निषेधितां अकस्मात्, । प्राणी सर्वथा न राहे निवांत; । रागें जो विषय प्राप्त । तो केंवि सांडी? ॥ ९३ ॥ म्हणूनि परिसंख्याविधिकरूनि । त्यागुचि उपदेशिला जनीं, । मग हळू हळू तेणेंकरूनि । सर्वत्यागु होय. ॥ ९४ ॥ म्हणूनि त्यागु करावयालागूनि, । संख्या करी वेद वचनीं, । पांचा नखांचे प्राणी । पांच भक्षावे. ॥ ९५ ॥ त्याचाही काळ नेमिला, । सर्वदा भक्षणाचा निषेध केला, । येर ग्रामपक्षी सांडविला । येणें वचनें. ॥ ९६ ॥ इतुकेनि सर्वदा सर्व प्राणियांचा । निषेधु केला भक्षणाचा, । ऐसा हळू हळू त्यागाचा । ठावो पाववी. ॥ ९७ ॥ तैसें व्यवायादिक सर्वदा रागें । प्राप्त आहे जनांसि आंगें, । तें त्यजावया संख्या सांगे । निगमरावो. ॥ ९८ ॥ " ऋतौ भार्यामुपेयात् " । येणें वचनें संख्या असे करित, । स्वभार्येप्रतिच ऋतुगत[१] । असावें म्हणूनि. ॥ ९९ ॥ अन्य स्त्री आणि इतर काळ । निषेधिला हा सर्व मेळ, । तोही अति कठीण, परि प्रांजळ । न करीच. ॥ १६० ॥ सर्वत्र इच्छा व्यवायाविषयीं, । तोचि देवें नेमिला पाहीं, । स्वस्त्रीवांचूनि कहीं । विचरावें ना. ॥ ६१ ॥ विचरतां दोषकोटि, । तैसी दंडाची परिपाठी; । यमहस्तें यातना मोठी । नियमिली देवें. ॥ ६२ ॥ तेही स्वस्त्री विवाहप्रणीत, । जो शुद्ध " ब्राह्मविवाह " बोलिजेत, । तो दुर्घट, अति अघटित । कठिणपणें. ॥ ६३ ॥ तोही जाहलियावरि, । सर्वदा गमनाचा निषेधु करी, । ऋतुकाळीं प्रहरभरि । रात्रौ गमन. ॥ ६४ ॥ विरुद्ध दिवस, वार, नक्षत्र, । वर्जूनि पुण्यकाळ सर्वत्र, । स्वयें होऊनि पवित्र । गमन करावें. ॥ ६५ ॥ हेंही बोलावया कारण, । प्राणियांसि न राहवे मैथुनावांचून, । ययालागीं वेदें संख्यानियमन । ऐसें केलें. ॥ ६६ ॥ तैसेंचि मद्यसुरापान; । त्याचेंही केलें असे परिसंख्ययन, । याग करूनि, शेषभक्षण । सोमवल्लीचें[२]. ॥ ६७ ॥ यदर्थींही श्रुति बोलत, । तेही ऐकावी दत्तचित्त, । तयाचाही मुख्यार्थ । ध्यावा तुम्हीं. ॥ ६८ ॥

सौत्रामण्यान् सुराग्रहान् गृह्णातीति श्रुतेः ।

---

१. ब. प्रति ऋतुगत २. ब होमवल्लीचें.

सौत्रामण्यादि यागीं । सुरासोमपानालागीं । परिसंख्यारूपें आज्ञा विनियोगी । निगमरावो. ॥ ६९ ॥ ज्योतिष्टोमादि यागीं, जाण, । शेषमांस[1], पुरोडाश, भक्षण । करावें, ऐसे आज्ञापनें । निषेध केला. ॥ १७० ॥ तेंही यागद्रव्य; मूळ । द्रव्य अति असाध्य, सकामफळ, । तेंही अप्राप्त केवळ । उदरार्थ जेथें, ॥ ७१ ॥ तेथें यागासि कैचें मिळेल ? । सामग्री पाहिजे द्रव्य, देश, काळ, । तो दुर्लभ सर्व मेळ । सर्वार्थीं दैं; ॥ ७२ ॥ आणि हिंसा न करावी, हें विशेष वचन, । यागादि करावे हें सामान्य[1], । स्वयें वेद बोले आपण । तें परियेसिजे. ॥ ७३ ॥ " अहिंसा परमो धर्मः " ऐसें । वेदें बोलिलें सावकाशें, । 'परम'शब्दें व्यावृत्ति सर्वांशें । सर्व धर्मांची केली. ॥ ७४ ॥ " न हिंस्यात् सर्वभूतानि " ॥ ऐसें बोले श्रुति वचनीं; । हिंसा न करणें हें पूर्ण मनीं । वेदाचिये. ॥ ७५ ॥ म्हणोनि कठिणपणें यागाचें मिस । करूनि, म्हणे सेवावें आमिष, । हे परिसंख्याविधि सावकाश । बोलिली असे. ॥ ७६ ॥ 'परम'शब्दें अति उत्कंठता[2] । अहिंसेसि बोलिली सर्वथा, । यागादि धर्म सामान्यता । न बोलतां लाभे. ॥ ७७ ॥ आणि " न हिंस्यात्सर्वभूतानि[3] " येणें । निषेधुचि केला वचनें. । हिंसा सर्वथा न करणें । कदाचित् कोण्हाची कोणीं. ॥ ७८ ॥ यालागीं हिंसा न करणें । ऐसें, उत्कट[4] वेदाचें बोलणें. । " अनीह " असावें ऐसें ह्मणे । तेथें क्रिया कैंची ? ॥ ७९ ॥ क्रिया ते ईश्वरपूजा ऐसें नव्हे, । ऐसी योगवासिष्ठीं संमति आहे, । ते परिसावी म्हणताहें । सर्वज्ञ तुम्हीं. ॥ १८० ॥

अक्रियैव परा पूजा, मौनमेव परो जपः ॥
अचिंतनं परं ध्यानं, नैराश्यं परमं सुखम्. ॥

सकल वाक्याचा मथितार्थ, । तो हा बोलिजे श्लोकार्थ, । याहूनि बोलिजे तो आग्रहार्थ । निश्चयेसीं. ॥ ८१ ॥ तरी कांहीं क्रिया न करणें । तेचि ईश्वरपूजा सर्वस्वपणें, । याहूनि क्रिया जे करणें । तो काळक्षेप. ॥ ८२ ॥ सर्वदा मौनें असणें । तोचि जपु सर्वस्वपणें, । मनें कांहींच न चिंतणें । तें ध्यान आत्मयाचें. ॥ ८३ ॥ सर्वा वस्तूंची नैराश्यता, । ब्रह्मादिलोकव्यवस्था । तेथें अनपेक्षता, ते पूर्णता । परमसुखाची. ॥ ८४ ॥

---

१. अ. सामान्य वचन. २. अ. उत्कटता. ३. ब. अहिंस्यात्. ४. ब. उत्कंठ.

येनकेनाप्युपायेन यस्यकस्यापि देहिनः ।
संतोषं जनयेत् प्राज्ञस्तदेवेश्वरपूजनम्. ॥

आणि भलतेणें प्रकारेंकरून । भलतयाचि जीवालागून । संतोष द्यावा, हेंचि पूजन । ईश्वराचें. ॥ ८५ ॥ यालागीं मुख्य वेदाचें मनोगत, । तें परोक्षवादें असे बोलत, । सर्व कामीं होआवें निवृत्त । तेंचि इष्ट. ॥ ८६ ॥ सर्व कर्ममात्राची जे निवृत्ति । तेचि भूमिका ब्रह्मप्राप्ति, । यालागीं व्यवायादिकांची प्रवृत्ति । संख्या करूनि सांडविली. ॥ ८७ ॥ कृपाळू मायबाप हा वेदु । सकळांसही उपजवी निर्वेदु, । स्वस्वरूपीं होय बोधु । तेंचि बोधी. ॥ ८८ ॥ " **ऋतौ भार्यामुपेयात्** " । या श्रुतीचा सांगितला यथार्थ, । यालागीं वेद-तात्पर्यार्थ । प्रवृत्तिपर नाहीं. ॥ ८९ ॥ मुख्य ब्रह्मीं तात्पर्य वेदाचें, । यालागीं निवृत्तिच बोधी साचें, । शब्देंचि परब्रह्माचें । अपरोक्षत्व करी. ॥ १९० ॥ आणि वाचादिकांचें नियमन । होय, करितां वेदाध्ययन, । महावाक्यें ब्रह्मत्व पूर्ण । अनायासेंचि होय. ॥ ९१ ॥ पठणें चित्त शुद्ध करी, । सर्व कर्मांची मूळ भूमिका पुरी, । ऐसा सुरवाड सर्वांपरी । म्हणोनि सेव्य सदा. ॥ ९२ ॥ याचा उपसंहारु ऐसा, । ब्रह्मचर्यें वेदाभ्यासा । साक्षेप करावा सहसा । अनन्यपणें. ॥ ९३ ॥ सद्गुरुमुखापासोन । नित्य करावें सांग वेदाध्ययन, । तेणें बोलिलें जें कर्मशासन । तें सादरें अनुष्ठावें. ॥ ९४ ॥ कर्मांची विवंचना बोलतां, । अगाध गति याची तत्वता, । कर्माकर्मविकर्मता । वेदें बोलिली. ॥ ९५ ॥

कर्मणो ह्यपि बोद्धव्यं, बोद्धव्यं च विकर्मणः ।
अकर्मणश्च बोद्धव्यं, गहना कर्मणो गतिः ॥

जो कीं यादवकुळटिळकु । जो कीं त्रैलोक्याचा नायकु, । तो अर्जुनाप्रति विवेकु । कर्माचा बोलिला. ॥ ९६ ॥ एक कर्म, एक अकर्म, । तिसरें जाणा विकर्म, । हें कर्मत्रयाचें वर्म । ऐसें असे. ॥ ९७ ॥ या कर्मत्रयाची विवंचना । सांगों, देइजे अवधाना, । प्रस्तुत ' कर्म ' तें सज्ञाना । सांगों आधीं. ॥ ९८ ॥ नित्यनैमित्तिकात्मक । निपजे जे क्रिया सम्यक, । तें कर्म आवश्यक । ओळखावें. ॥ ९९ ॥ तरि जें कीं प्रतिदिनीं करिजे, । न कारितां प्रत्यवाय उपजे, । तें " नित्यकर्म " बोलिजे, । आश्रमालंकार. ॥ २०० ॥ जें कर्म केलियावांचून । नातिक्रमे रजनीदिन, । न करितांचि प्रत्यवाय

---

१. ब. सांडिली.

पूर्ण । होय स्वभावें. ॥ १ ॥ तें गा " नित्यकर्म " जाण. । " नैमित्तिक " तें निमित्तकरण, । राहूपरागादि संपूर्ण । निमित्तें जें करणें. ॥ २ ॥ नित्य-कर्माहूनि अधिक, । जें केलें पाहिजे आवश्यक, । जें न करितां सम्यक । प्रत्यवाय होय, ॥ ३ ॥ तेंचि तें " नैमित्तिक " कर्म; । या दोहींचें नाम बोलिजे " कर्म. " । विरुद्धाचरण तें " अकर्म, " । प्रायश्चित्तीं जें. ॥ ४ ॥ निःशेष सत्कर्म न करणें, । तें "विकर्म "ऐसें जाणणें. । कर्माकर्मविकर्म येणें । रूपें जाणिजे ॥ ५ ॥ यामध्यें वर्णाश्रमासि उचित । तें तें कर्म आवश्यक कृत । यासि करितां विपरीत । महादोषु. ॥ ६ ॥ त्याहीमध्यें त्रिगुण, । सत्वरजतमात्मक जाण, । त्यांचें करितां विवरण । विस्तारु असे. ॥ ७ ॥ तेंही कर्म त्रिप्रकार । काय-वाङ्मानसिक साचार, । त्याचाही सांगिजेल विचार, । एकाग्र ऐका. ॥ ८ ॥ मनें कांहीं न कल्पितां, । वाचा कांहीं न बोलतां, । जे शरीरचेष्टा तत्वता । तें कायिक कर्म. ॥ ९ ॥ निद्रा केलियानंतरें । सकळ लय पावे निर्धारें, । शरीरचि चळे; तें शरीरें । कीजे कर्म. ॥ २१० ॥ हातपाय पसरी । चळण उपजे जें शरीरीं, । तें कर्म गा निर्धारीं । कायिक जाण. ॥ ११ ॥ अथवा जागृतदशे । मन आणिके व्यापारीं असे, । वाचेसि मौन्य असे, । तेव्हां जे चेष्टा, ॥ १२ ॥ हातपाय हाल्वी, । सकळ इंद्रियीं चेष्टा दावी, । तें कायि-क कर्म स्वभावीं । निर्धारेसीं. ॥ १३ ॥ शरीर, मन निर्मळ असे, । आणि वाचाचि शब्दीं प्रकाशे । तें वाचिक कर्म अनारिसें । ह्मणणें नलगे. ॥ १४ ॥ जे कर्मीं मन सादर, । तें समुच्चयकर्म निर्धारें, । तेणेंविरहित तें एक प्रकार । एका इंद्रियाचें. ॥ १५ ॥ यालागीं मन जेथें दुश्चित, । आणि शरीर चेष्टा-विरहित. । वाचा शब्देंचि बोलत, । तें वाचिक कर्म. ॥ १६ ॥ वाचा मौन, शरीर निश्चळ, । एकलें मनचि करी संकल्पजाळ, । तें मानसिक कर्म केवळ । जाण निश्चयेसीं. ॥ १७ ॥ या कर्मत्रयाविरहित । भूतीं व्हावें रागातीत, । म्हणोनि असे बोधित । सत्कर्मानुष्ठान. ॥ १८ ॥ ना हो कर्में कर्म कैसें तुटेल ? । यालागीं वेदु कर्म उपदेशील. । कर्मेंचि कर्म विस्तारेल । निश्चयेसीं. ॥ १९ ॥ कर्मीं अधिकचि गुंफैल, । तेणें कर्मजडचि होईल, । पुण्यपापाचें फळ । सुखदुःखें भोगी. ॥ २२० ॥ सुखदुःख भोगावयाकारणें, । नाना योनि पावणें; । येणें न चुकती जन्ममरणें । कदा काळीं. ॥ २१ ॥ तरी येथें ऐका उत्तर. । कर्मेंचि होय कर्मांचा निहार,

यालागीं वेद चतुर । कर्म बोधी.१ ॥ २२ ॥ जरि अकर्मी होऊनि असणें, । तरि अधिकचि गुंफिजे तेणें, । उफराटें प्रायश्चित्ती होणें । नरकांत-वन्ही. ॥ २३ ॥ आणि सत्वरजतमाच्या वृत्ति । उगें कां राहों देती ? । निश्चयें कर्म करविती । बळात्कारें. ॥ २४ ॥ जो यंत्रारूढ होय, । तो " न चलें म्हणे, तरी चालताहे; । निश्चळ रथीं बैसे, तरी पाहें । ग्रामांतर लंघी. ॥ २५ ॥ तैसा इंद्रियमेळु जें हें शरीर, । तेथें राहिला जो स्थिर२ । तो "न करीं" म्हणे, तरी सविस्तर३ । करील कर्मे. ॥ २६ ॥ यदर्थीं भगवद्वचन । स्मृति बोले स्वयें आपण, । कोणी न राहे कर्मेंविण । ज्ञाता जरी. ॥ २७ ॥

" न हि कश्चित् क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत् " इत्यादि

जरि सत्कर्मे न करि । तरि असत्कर्मांची प्रवृत्ति धरी, । निवारिलियाही न धरी । उपरमु कदा. ॥ २८ ॥ काय नेत्र पाहों राहती ? । कीं श्रवण कांहीं नाथिकती ? । इत्यादि इंद्रियें करिती । उपरमु काये ? ॥ २९ ॥ यालागीं सर्वही कर्मे करिती, । परि उगीं कोणी न राहतीं, । तेंही रजतमात्मकें निश्चिति । करिती कर्मे. ॥ २३० ॥ आणिकहीं काम्य, निषिद्धें । कर्मे करिती विरुद्धें, । यालागीं सर्वात्मकें कर्मे वेदें । उपदेशिलीं. ॥ ३१ ॥ सांडूनि रजतम, काम्य, निषिद्ध, । करावें कर्म सात्विक, शुद्ध, । तेणेंचि कर्माचा कर्मे सिद्ध । निर्हार होय. ॥ ३२ ॥ कर्मेचि कर्माचा निर्हार । होय निवृत्तिमुखें साचार, । मग परब्रह्म निर्विकार । स्वयेंचि लाभे. ॥ ३३ ॥ यालागीं कर्मेंचि कर्म निस्तरावें, । कर्मेचि कर्म निरसावें, । ऐसेंचि बोलिलें असे देवें । श्रीभागवतीं. ॥ ३४ ॥ " कर्मणा कर्मनिर्हारः " । इत्यादि वाक्यप्रकार, । कर्मेचि कर्म निरसे हा निर्धार । देवें केला असे. ॥ ३५ ॥ म्हणोनि असत्कर्मनिरसनार्थ । सत्कर्मचि करावें यथोचित, । तेणेंचि अकर्मी निश्चित । होइजेत असे. ॥ ३६ ॥ जैसा मळेंचि मळु काढिजे, । रजेंचि दर्पण उजळिजे, । तैसें सत्कर्मेचि कर्म निरसिजे । मुमुक्षुजनीं. ॥ ३७ ॥ यालागीं जें वेदें बोलिलें । तें कर्मचि करावें उगलें, । तेणें निवृत्तिच येणें बोलें । पावती जीव. ॥ ३८ ॥ जें कीं कर्म वेदोदित, । तें करावें दत्तचित्त; । करूनियां ईश्वरार्पित, । करावें भावें. ॥ ३९ ॥ कर्म न करितां अति बाध, । करितां अवश्य होय भवबंध, । यालागीं ईश्वरार्पण सिद्ध । करावें कीं. ॥ २४० ॥ ईश्वरीं अर्पिलिया कर्म । अनायासें होइजे

१. अ. प्रबोधी. २. अ. धीर. ३. ब. सविस्तार.

नष्कर्म्य; । नैष्कर्म्य तें परब्रह्म । वेदसिद्ध; ॥ ४१ ॥ याकारणें जे सुबुद्धि, । तिहीं कर्म करावें ईश्वरबुद्धी, । तें निवेदावें निरवधि[1] । ईश्वरासिचि. ॥ ४२ ॥ जें कर्म ईश्वरार्पण न करणें, । तें फळभोगाचें घेतसे धरणें, । बलात्कारें भोगूं देणें । बांधोनियां. ॥ ४३ ॥ जरि काम्यकर्म करितां, । कामनाचि पुरे तत्वता, । कर्म करी कामना न करितां । तेंही फळ देत. ॥ ४४ ॥ कर्माचें सामर्थ्य ऐसें, । फळभोगाचें धरणें बैसे, । न करितांही आपैसें । देतसे फळ. ॥ ४५ ॥ तया फळभोगाकारणें । पुन्हा संसृति पावणें, । जन्मांतरें[2] मरणें । अनुक्रमेंचि ये. ॥ ४६ ॥ जरी स्वर्गादि लोक पावती, । तरी पुण्यांतीं[3] होय पदच्युति, । ते आयागमनाची गति । अति क्लेशरूप. ॥ ४७ ॥ ते कष्ट जरि बोलणें, । तरि सर्व लोकीं अनुभवलेपणें । श्रुत सकळां, विस्तारें येणें । चाड नाहीं. ॥ ४८ ॥ यालागीं सात्विक कर्म करावें, । तें विनियोगें ईश्वरीं निवेदावें, । तेंही सांगिजेल, ऐकावें । एकाग्रचित्तें. ॥ ४९ ॥ तो निवेदनप्रकार । भगवंतें बोलिला सविस्तर, । तो कांहींएक निर्धार । प्रकट कीजेल. ॥ २५० ॥ कर्म करिती सकळ, । परि कर्मेंचि पावती तळमळ, । न जाणतां वर्म प्रांजळ, । बंधुचि होय. ॥ ५१ ॥ स्वहस्तें निगड करूनि । जोडिजे जैसा स्वचरणीं, । आपणासिच बंधन करूनि । वर्ते जैसा. ॥ ५२ ॥ कोशकारांचिये परी । स्वयेंचि आपणा बंधन करी, । तैसें स्वयें कर्में करूनियां, करी । स्वयें कर्मबंध. ॥ ५३ ॥ तैसें स्वयेंचि कर्म करिती, । तेणें कर्मेंचि गुंफती, । यमयातना पावती, । पुढती योनि. ॥ ५४ ॥ जरी कल्पकोटि गेलिया, । तरी न सुटे भवबंधापासूनियां, । यालागीं कर्मेंचि भवभया । पावे प्राणी. ॥ ५५ ॥ म्हणोनि करितें कर्म ओळखावें, । तेणें कर्मेंचि ईश्वरार्पण करावें, । तें कैसें, हेंही नेणवे । सद्गुरूवांचोनि. ॥ ५६ ॥ सकळांसि गुरुगम्य खूण । पाविजे, तरिच उकलूं जाण, । अन्यथा भवबंधन । न तुटे कल्पांतीं. ॥ ५७ ॥ यालागीं कर्म ईश्वरीं निवेदावें, । ईशातें संतोषवावें, । तरिच ज्ञान पावावें । तत्प्रसादें. ॥ ५८ ॥ तेंही निवेदन द्विप्रकार, । तें परियसा सादर, । तरी कर्म करणें हा निर्धार । मुळाचिपासूनि. ॥ ५९ ॥ आधीं कर्म कोणतें ओळखावें, । ईश्वरातें बरवें जाणावें, । निवेदनप्रकारही बरवे । जाणावे कीं. ॥ ६० ॥ तरी कर्म जें

१. अ. निर्वाधि. २. ब. जन्मानंतरें. ३ ब. पुण्यासि होय च्युति.

ज्ञानेंद्रियांचें । तें ज्ञातृत्वपदार्थ साचें, । आणि कर्मेंद्रियांचे । पायु-व्यतिरिक्त. ॥ ६१ ॥ अर्पणविषयीं पायुव्यतिरिक्त । तो सगुण प्रकार बोलिजेत, । स्वरूपस्थिती जें करिजेत । तेथें व्यतिरिक्त नाहीं. ॥ ६२ ॥ या एकादश इंद्रियांचें कर्म, । ज्या ज्या इंद्रियाचे जे जे धर्म,। तोचि तें मुख्य कर्म[1] । ओळखावें. ॥ ६३ ॥ आणि सत्वरजतमात्मक । करी जें जें सत्कर्म सम्यक, । तेंही कर्मचि आणिक । आन नाहीं. ॥ ६४ ॥ ऐसें हें द्विविधकर्म । संक्षेपें सांगितलें कर्म, । आतां ईशाचे मुख्य कोण धर्म । तेंही सांगों. ॥६५॥ तरी जो साक्षी कर्मी इंद्रियांचा, । तोचि ईश जाण साचा । जो बुद्ध्यादि इंद्रियकर्मांचा प्रवर्तकु. ॥६६॥ तोही साक्षी विचारितां, । भिन्न न दिसे तत्वता। तो आपणचि वस्तुता । आन नाहीं. ॥६७॥ कोणी ऐसें म्हणताती। सकळ इंद्रियें आणि कर्मगति । हे मनेंचि प्रकाशिजेती। सर्वाध्यक्षपणें. ॥ ६८ ॥ जे[3] सर्वेंद्रियें विषय सेविती, । त्यांतें भोगीं प्रकाशी चित्तवृत्ति, । साक्षी कैंचा ? कोण स्थिति । बोलणियाची ? ॥ ६९ ॥ विषयापासाव जें सुखदुःख, । त्यातें जाणे मनचि एक, । हा अनुभव सम्यक सर्वां जनां. ॥ २७० ॥ तरि आयका याचें उत्तर,[4] । जें बोलिजेल परिकर, । जेणें संदेहाचे पार । पाविजेति सुखें. ॥ ७१ ॥ तरी विश्वप्रपंच सर्वथा असत्य, । हें शास्त्रसिद्ध इदमित्थ, । अनुभवेंही सत्य । प्रत्ययासि ये. ॥ ७२ ॥ मनःकल्पित विश्वरचना । हें शास्त्रसिद्ध तुम्ही काय नेणा ? । आणि अनुभवाचिया खुणा । त्याही परियेसा. ॥ ७३॥ मनोलयीं जरि विश्व दिसे,। मनोनाशें जरि विश्वप्रकाशे, । तरि यथार्थचि हें अनारिसें । कदा नव्हे. ॥ ७४ ॥ सुषुप्तीसि मनोलय होय । तेव्हां हें विश्व कोठें आहे ? । एकला साक्षीच आहे । साक्ष्येंविण. ॥ ७५ ॥ साक्ष्यअपेक्षा साक्षीपणा । तरि तेव्हां साक्ष्य नाहीं जाणा, । यालागीं साक्षीपणावीण । एकला एकू. ॥ ७६ ॥ तोचि मनोदय जाहालिया । जागृति होय अपैसैया । तेव्हां प्रपंचु भरोनियां । कोंदला असे. ॥ ७७ ॥ यालागीं मनोलयें लयो होतु, । मनोदयें उदय पावतु, । म्हणूनि मनःकल्पितु । प्रपंच हें सिद्ध. ॥७८॥ कां समाधीचिये वेळे । मन सहेतुक मावळे, । तेव्हां प्रपंचाचें टवाळें । कैचें तेथें ? ॥७९॥ अतएव मनःकल्पित प्रपंचजात । प्रपंचाकार मनचि परिणमत, । तेणें मनेंचि सुखदुःख जाणिजेत । हें कैसें घडे ? ॥ २८० ॥

१. ब. कर्म. २. ब. ईश कोण मुख्य धर्म; ३. अ. ऐसें सर्व इंद्रियविषय सेविती. ४. अ. आपसया.

पदार्थाकारें परिणमोनि । मन वेंचलें भरंवसेंनि । तेथ विषयांतें प्रकाशावयालागूनि । कैसें उरे ? ॥ ८१ ॥ जे साक्षियातें नेणती, । ते बाहिर्मुखत्वें सर्वथा नेणती, । तेचि मनातें प्रकाशक म्हणविती। विषयेंद्रियांचें. ॥ ८२ ॥ जरि मनचि प्रकाशक होय, । तरि मनातें कोण जाणताहे ? । हेंचि अनुभवेंकरूनि पाहें । सांगावया जोगें. ॥ ८३ ॥ मनासहित विषयेंद्रियांसि । सांग पां कवण प्रकाशी ? । मन वेंचलियाही मनासि । ज्ञातृत्व कैंचें ? ॥ ८४ ॥ मनाच्या ठायीं चैतन्याभासु । बिंबला जो शुद्धांशु, । तोचि जाणा ईश्वरांशु । जीव बोलिजे. ॥ ८५ ॥ याची स्पष्ट विवंचना । सांगोनि देवों सज्ञाना, । दृष्टांतमुखें खुणा । शास्त्रसिद्ध. ॥ ८६ ॥ एक मुख्य महदाकाश, । त्याचेंचि उपाधिवशें अंशांश । बिंबलें तें सावकाश, । परियेसा तुम्ही. ॥ ८७ ॥ तेंचि आकाश अभ्रीं बिंबलें । तें अभ्राकाश ईश्वर जाहलें, । महदाकाश संचलें । पूर्णब्रह्म. ॥ ८८ ॥ घटामाजी स्वतःसिद्ध । आकाश अकृत्रिम, प्रसिद्ध, । तो कूटस्थ पूर्णेसि भेद । असेचिना. ॥ ८९ ॥ तोचि घट जळें भरिला, । त्यामाजी अभ्राकाश बिंबला, । तोचि जीवरूपें जाहला । ईश्वरांशु. ॥ २९० ॥ जें स्वतःसिद्ध घटाकाश, । तें जळ चांचल्यादि धर्मी उदास, । व्याकुळ होतसे जळाकाश । उपाधीकरूनि. ॥ ९१ ॥ आतां दार्ष्टांतिकीं ऐसें, । अभ्रस्थानीं अविद्या असे, । तेथें ईश्वरु पूर्णांशें भासे । मुख्य ब्रह्म. ॥ ९२ ॥ अविद्योपाधि तो ईश्वरु, । परिपूर्ण तो निर्विकारु, । घटशब्दें देहभारु । लिंगोपाधि. ॥ ९३ ॥ तेथें जें सहज व्यापूनि चैतन्य, । तेंचि तें राहे कूटस्थपणें, । जळ तें अंतःकरण जाणणें । लिंगदेहामाजी. ॥ ९४ ॥ जैसा जो जो घटादि निपजे, । तो आधींच आकाशें व्यापिजे, । तैसें जें जें तत्त्व उपजे, । तें व्यापिजे चैतन्यें. ॥ ९५ ॥ आकाश असंगी परिपूर्ण, । तेणें व्यापिजे पदार्थमात्र जाण, । तैसें चैतन्य परिपूर्ण । सर्वां व्यापी. ॥ ९६ ॥ चैतन्येंवीण रितें । कोणा न देखिजे पदार्थातें, । परि कोणाचेनि कर्में तेथें । लिंपेचिना. ॥ ९७ ॥ यालागीं पूर्वींच देहातें व्यापिलें, । चैतन्य उदासपणें राहिलें, । कूटस्थ तयातें बोलिलें । देहादि साक्षी. ॥ ९८ ॥ तयामाजी[1] देहघटादि स्थानीं । बुद्धि बोलिली जळपणीं, । तेथें अभ्राकाश बिंबोनि । जीव जाहला. ॥ ९९ ॥ अंतःकरणामाजी बिंबला, । तोचि जीवरूपें बोलिला, । तेणें प्रकाशु केला । घटपटादिकां. ॥ ३०० ॥

---

१. अ. तया देहघटामाजीं जळस्थानीं । बुद्धि बोलिली जडपणीं ।

केवळ जड अंतःकरणवृत्ति । त्या काय घटपट प्रकाशिती ? । चैतन्यांशें अजड स्थिति । प्रकाशकु होय. ॥ १ ॥ चित्तचैतन्यांचें एकपण । तेंचि चिदचिद्ग्रंथि बोलिजे जाण, । तोचि प्रमाता आपण । जीवही बोलिजे. ॥ २ ॥ यालागीं केवळ मनाची वृत्ति । तिसीं नाहीं प्रकाशकशक्ति, । चैतन्यांशें चिच्छक्ति । प्रकाशरूप होय. ॥ ३ ॥ ते देहादि घटपटांचा । प्रकाश करितसे साचा, । परि मनबुद्ध्यादि जीवाचा । प्रकाश कूटस्थीं. ॥ ४ ॥ या सकळांचाही प्रकाशु । करी कूटस्थ साक्षी पूर्णांशु, । हा महावाक्यार्थ सुरसु । प्रकाशिला. ॥ ५ ॥ शुद्ध आणि अभ्राकाश । तें तत्पदार्थीचें शबल शुद्धांश, । जळाकाश घटाकाश । हें त्वंपदद्वय. ॥ ६ ॥ बुद्धिगत जो प्रमाता, । तो शोधिलिया कूटस्थ तत्वता, । उपाधिधर्म वेगळे करितां । स्वतःसिद्ध परिपूर्ण. ॥ ७ ॥ तैसाचि अविद्योपाधि जो ईश्वरु, । तो शोधिलिया तोचि निर्विकारु, । उपाधिधर्मप्रचुरु । निरसोनियां. ॥ ८ ॥ मग कूटस्थ आणि पूर्णब्रह्म । उपाधिनिरासें ऐक्य अकृत्रिम, । हें महावाक्याचें वर्म । प्रसंगें सांगितलें. ॥ ९ ॥ यालागीं मनाचि प्रकाशक म्हणती, । ते सर्वथा कांहीं नेणती, । प्रकाशत्रयाची स्थिति । समूळ सांगितली. ॥ ३१० ॥ यालागीं मनादि इंद्रियांसि । एकला साक्षीच प्रकाशी, । हेंचि शास्त्रानुभवासि । प्रत्यक्ष सिद्ध. ॥ ११ ॥ यालागीं मन प्रकाशक म्हणणें, । हें सर्वथा शुद्ध नेणणें । हें जल्पती अज्ञानें, । जीं[1] स्वरूप नेणती. ॥ १२ ॥ यालागीं मनादि विषयेंद्रियांचा । साक्षीच प्रकाशकु साचा, । नेणते[2] व्यापारु साक्षीचा । मनासि मानिती. ॥ १३ ॥ याचें स्पष्ट विवरण । दृष्टांतमुखें सांगेन, । श्रोतीं करूनि एकाग्र मन । परिसावें जी. ॥ १४ ॥ जैसा राजसभेचा दीपकु । सकळांसि एकचि प्रकाशकु । राजा[3], सभ्यसभा, नर्तकी, नर्तकु, । नृत्य करविती. ॥ १५ ॥ एकु राजा, एकु सभासद, । एकु नर्तकी नृत्यकारें प्रसिद्ध, । टाळमृदंगादि विशद । नाचवणारे, ॥ १६ ॥ आणि ते सकळही सभा, । सकळां प्रकाशी दीपप्रभा, । आपण तरि स्वयें वोथंबा । अढळपणें. ॥ १७ ॥ तैसेंचि दार्ष्टांतिकीं जाणणें । सर्वांसि साक्षीपणेंचि प्रकाशणें, । कोणे स्थानीं कोणें । तें परियसा पैं. ॥ १८ ॥ सभा ते मूळ अविद्या, । राजा तो अहंकारविशिष्ट जीव प्रसिद्ध, । नर्तकी बुद्धि प्रबुद्धा । जाणावी कीं; ॥ १९ ॥

---

१. अ. जे. जं. स्वरूप नेणती; २. ब. नेणती तीं; ३. ब. राजा, राजसभा, नर्तकी, अक्षकु.

तालादिधर ते इंद्रियें, । जे बुद्धीसि नाचविती सान्वयें, । सुख देती विषयान्वयें । अहंप्रभूसि; ॥ ३२० ॥ सभासद ते विषयजात, । ते तंव प्रसिद्ध तटस्थ भूत, । इंद्रियेंचि प्रवर्तवित । बुद्धीसि पैं; ॥ २१ ॥ बुद्धि आणि मन । हें तंव प्रसिद्ध अभिन्न, । अंतःकरणचतुष्टय जाण । वृत्तिभेदें; ॥ २२ ॥ दीपस्थानीं साक्षी कूटस्थ, । तो सकळां प्रकाशकु तटस्थ । अलिप्त आणि अंतस्थ । सर्वेंद्रियांसि; ॥ २३ ॥ कोणी ऐसें म्हणती, । बुद्धिच इंद्रियांतें प्रवर्तविती, । परि इंद्रियें बुद्धीस नाचविती । हें कैसें घडे ? ॥ २४ ॥ आधीं बुद्धि निवाडा करी, । विहित, निषिद्ध विवरी, । बरें आणि वाईट परि । दोनी सुजे; ॥ २५ ॥ मग बरवे पदार्थीं इंद्रियें धांवती, । ऐशीच असे यांची प्रवृत्ति, । तुम्ही बोलतां विपरीत गति । हें कैसें घडे ? ॥ २६ ॥ तरि येथें ऐका उत्तर, । ऐसा नव्हे याचा निर्धार, । आधीं इंद्रियें घेती विषयभार, । मग बुद्धि प्रवर्ते; ॥ २७ ॥ प्रथम इंद्रियें विषय घेती, । मग बुद्धि उत्तम, अधम निवडिती, । अहंकारु ध्यावया निश्चिती । निश्चय करी; ॥ २८ ॥ आधीं चक्षुरिंद्रिय घटातें प्रकाशी, । तेथें घटत्वें बुद्धि घे निश्चयेंसि, । ऐसेंचि सर्वेंद्रियांसि । जाणावें कीं; ॥ २९ ॥ तैसेंचि श्रवणेंद्रिय शब्दासि । घेतसे अविचारें त्यासि, । मग बुद्धि बरेंवाइटासि । निवाड करी; ॥ ३३० ॥ परि आधीं इंद्रियें विषय घेइजे, । मग बुद्धीनें दृढ निश्चयो कीजे, । अहंकारें घेवेपणें दीजे । भोक्तृत्व जीवांसि; ॥ ३१ ॥ परि जो विषय[१] इंद्रियें घेती, । तेथें बुद्धि पावे अवचितीं, । ऐसी परस्परें व्याप्ति । अढळ असे; ॥ ३२ ॥ यालागीं बुद्धि कर्मी प्रवर्ताया कारण । निश्चयें हीं इंद्रियेंचि जाण, । हीं ओढूनि नेती मन । विषयांवरि; ॥ ३३ ॥ सुंदर वनिता दृष्टीस पडतां, । मन धांवे तेथें तत्वता, । शोभनाध्यासें पुरता । रतिभोग इच्छी; ॥ ३४ ॥ कर्दळीफळें पडतांचि दृष्टी, । मन तयांमागेंचि उठी, । ध्यावया कल्पना लाठी । वेगें करी; ॥ ३५ ॥ दृष्टी विषयो न पडतां, । सांचलु न घेड बुद्धीचिया माथां, । कांहीं विषयो इंद्रियीं घेतां । बुद्धिही चळे; ॥ ३६ ॥ स्वर्गासि बुद्धि नाहीं गेली, । ना स्वर्गसुखें कधीं भोगिलीं, । श्रवणेंद्रियें आयकिलीं, । मग तेथें प्रवृत्ति धरी; ॥ ३७ ॥ श्रवणेंद्रियें विषयो घेतला, । मग ध्यावया बुद्धीनें निश्चयो केला. । यदर्थीं स्वयें अनुवादला । श्रीभगवंतु आपण; ॥ ३८ ॥

इंद्रियाणि प्रमाथीनि हरंति प्रसभं मनः ।

---

१. ब. परि भोगु.

इत्यादि वाक्येंकरून । अर्जुनासि बोधी नारायण, । प्रमाथि इंद्रियें बळात्कारें मन । आकर्षिती; ॥ ३९ ॥ आपणे विषयांतें प्रकाशिती, । विषयाकार मनातें करिती, । बळात्कारें आणूनि घालिती । विषयांवरी; ॥ ३४० ॥ ऐसा इंद्रियांचा बळात्कारु । बुद्धीसि होतसे थोरु, । जैसी नाचविती स्वच्छंदाकारु । तैसी नाचे; ॥ ४१ ॥ जैसे तालादिधर नर्तकीतें । नाचविती स्वच्छंदाविर्भूतें, । तैसीं इंद्रियें हीं समस्तें । बुद्धीसि नाचविती; ॥ ४२ ॥ जैसी जैसी बुद्धि नाचे, । तैसा अधिपति तोषे साचे, । नृत्यासि भुलोनि तिचे । [2]प्रेमपढिये; ॥ ४३ ॥ तिच्या नृत्यासि भुलोनि । नानाकर्मे करी तियेचेनि, । मग पावे नाना योनी । कर्मानुसार; ॥ ४४ ॥ असो हें तिचें भुलविणें, । या समस्तांसि दीपेंचि प्रकाशणें, । तैसी बुद्धींद्रियविषयां साक्षीनें । प्रकाशिजे; ॥ ४५ ॥ अहंकारविशिष्ट प्रमाता । ज्याची सर्वेंद्रियांवरि सत्ता, । तो आदिकरूनि समस्तां । साक्षी प्रकाशी. ॥ ४६ ॥ तया साक्षियाची प्रकाशता । आरोपिती मनाचे माथां, । साक्षीस्वरूप तत्वता । नेणोनियां. ॥ ४७ ॥ नेणोनि साक्षियाचें स्वरूप । मनाच्या माथां करिती आरोप, । येन्हवीं तोचि प्रकाशदीप । मनादिकांचा. ॥ ४८ ॥ हें अनुभवें जाणावें, । नलगे फाडोवाडी सांगावें, । एकाचें एका न लवावें । विवेकेंविण. ॥ ४९ ॥ जैसें आत्मयाची सत्तादि निश्चित । देहाच्या ठायीं मानित । कां बुद्धि अहंकारीं सुनिश्चित । मानिती एक. ॥३५०॥ जे आत्मयातें नेणती, । ते आत्मधर्म देहीं मानिती । आत्मा निर्धर्मक परि स्थिति । बुझावया बोलिली. ॥ ५१ ॥ आत्मयाचा प्रकाशु मनीं । मनाची छाया आत्मस्थानीं । ऐसे परस्परें एकपणीं । सहवासु दोघां. ॥ ५२ ॥ परस्परानुध्यासें । येरांचे धर्म येरीं प्रकाशे, । पिसे लोक साच ऐसें । यथार्थ मानिती. ॥ ५३ ॥ तें मानणें विवेकेंविण । सर्वथा कल्पांतीं न जाय जाण, । सद्गुरुकृपा विवेकें पूर्ण । नाहींच होय. ॥ ५४ ॥ यालागीं आत्मयाचे सत्तादिक, । मनबुद्ध्यादिकांसि मानिती अचुक, । मनबुद्ध्यादिकांचें जडत्व सम्यक । आत्मयाच्या ठायीं. ॥ ५५ ॥ जो देश स्वामीस नोळखे । तो सचिवीं मानी सत्तादिकें, । आणि परतंत्रता अविवेकें । नृपासि मानी. ॥ ५६ ॥ ययाचा विवेक कीजे । तरीच ज्याचे धर्म त्यासिच

१. ब. आपण आपुलिया; २. अ. प्रेमीं पडिये. ३. अ. सत्तादिक.

लौविजे, । अन्यथा परस्पराध्यासें आरोपिजे । येरयेरांच्या नाथें. ॥ ५७ ॥ याचा विवेकु तोही ऐसा, । अन्वयव्यतिरेकें सहसा । पाहतां उरे तो भरंवसा । यथार्थ निश्चयो. ॥ ५८ ॥ आत्मा द्रष्टेपणें भिन्न. । कुड्यादि जडें दृश्यमान, । ऐसेंनि विवेकें परस्पराध्यासभान । कदा नव्हे. ॥ ५९ ॥ जैसें सचीवत्व दूर केलियावरि, । तो सत्ताविरहित होय निकरीं. । त्याची सत्ता जरि तरि कां पुरीं । वसेना तेथें? ॥ ३६० ॥ अथवा देशाधिपति जो असे, । त्याचीच सत्ता देशीं भासे. । स्वामीतें नेणोनि लोक पिसे। त्याचीच मानिती. ॥ २६० ॥ अ तेंचि देशाधिपत्य गेलिया. । ते सत्ताविरहितें राहे एकलिया, । ते सत्ता काय म्हणोनियां । त्यासि तेव्हां नाहीं? ॥ ६१ ॥ तैसीं मनादि जडें परिच्छिन्न, । त्यांसि स्वता केंचें सत्ताभान, । साक्षप्रकाशें प्रकाशमान । मनातें म्हणती. ॥ ६२ ॥ अयस्कांताचेनि संयोगें । जड लोह चेष्टतसे आंगें. । तो वेगु लोहीं सर्वांगें । मानिती भ्रमित जन. ॥ ६३ ॥ दिनमणीचा प्रकाशु । सूर्यकांतीं होय बहुवसु, । अज्ञानी मानी स्वप्रकाशु । सूर्यकांतासि. ॥ ६४ ॥ स्वच्छ जें कांस्यपात्रादिक । तेथें सूर्यप्रकाश दिसे अधिक, । तें तेज भिंतीवरि विशेष अधिक । अतिशय होय. ॥ ६५ ॥ तेथें नेणते ऐसें मानिती, । ताटींच असे प्रकाशक शक्ति, । तया ताटाचीही दीप्ति । कुड्यादिकांवरि.[२] ॥ ६६ ॥ परंतु ताट जड परि स्वच्छ असे, । तेणें अधिकचि तेज भिंतीवरि प्रकाशे । सूर्यप्रकाशु हें नेणोनियां पिसे । कांस्याचा मानिती. ॥ ६७ ॥ तैसें जड परि स्वच्छ मन, । तेथें आत्मप्रभा पडे जाण, । तेणें विषय प्रकाशमान । अत्यंत होती. ॥ ६८ ॥ तो प्रकाश मनाचा मानिती, । आत्मयातें सर्वथा नेणती, । म्हणोनियां हे भ्रांति । बोलण्याची. ॥ ६९ ॥ तैसें साक्षियाचें साक्षीपण । मनादिकांसि मानून, साक्षी नाहींच करून । ठेविला तेहीं. ॥ ३७० ॥ परि मनादिकांतें प्रकाशिता । तो तुर्यगु कूटस्थ तत्वता, । तोचि साक्षी विचारितां । आन नाहीं. ॥ ७१ ॥ ऐसा साक्षी तो आपण, । हें तंव अनुभवसिद्धचि जाण, । प्रपंचितां संपूर्ण, ग्रंथ विस्तारेल. ॥ ७२ ॥ एवं साक्षिरूप जो आपण, । तो आपणचि साक्षित्वें राहोन । कर्म करिजे, तें ईश्वरार्पण । होय स्वयें. ॥ ७३ ॥ कर्मीचि ब्रह्म होय, । तें कर्मपणा कधींही नये, । केलेंचि केलें नव्हे । साक्षीपण ॥ ७४ ॥ कर्मीचा स्वयें

---

१. ब. बोलिजे. २. ब. कुड्यकावरि.

साक्षी होतां, । तरि केलिया कर्मांचा होय अकर्ता, । कर्मबाधु नपवे तत्वता । द्रष्टेपणें. ॥ ७५ ॥ जो साक्षी होऊनि कर्में करीं, । तो कर्ता नव्हे सर्वांपरी, । कर्तृत्व नसतां न लिंपे हें परि । बोलणेंचि नलगे. ॥ ७६ ॥ स्वरूपस्थितीनें कर्म करणें, । तेंचि ईश्वरार्पण श्रुति म्हणे, । हें मुख्य ईशनिवेदन खुणे सांगितलें. ॥ ७७ ॥ आतां भक्तपणें निवेदन । तेंही सांग सांगेन, । आयकावें चित्त देऊन । सर्वज्ञें तुम्हीं. ॥ ७८ ॥ विनियोगपूर्वक निवेदन । तयाचें ऐसें लक्षण, । कर्मारंभापासून । ईश्वरबुद्धि ॥ ७९ ॥ जें पायूविरहित इंद्रियांचें । सात्विक कर्म निपजे साचें, । तें श्रद्धापूर्वक ईशाचें । भजनरूप. ॥ ३८० ॥ कोण्ही ऐसें म्हणती । सर्वेंद्रियें कर्में कैसेनि आर्पिजेती ? । जीं युक्तेंद्रियं कर्में असती । तींच निवेदावीं. ॥ ८१ ॥ शिश्नादिक व्यापार । कैसा करावा निवेदन प्रकार ? । हा दोषचिं[1] महाथोर । उफराटा होय. ॥ ८२ ॥ तरी दोष नाहीं येथें सर्वथा, । सर्व अर्पावें ऐसें बोले विश्वपिता, । संमति बोलिजेल आतां । चित्त दीजे. ॥ ८३ ॥

कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा बुद्ध्यात्मना वानुसृतस्वभावात् ।
करोमि[2] यद्यत्सकलं परस्मै नारायणायेति समर्पयामि[3] ॥ १ ॥
यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ।
यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम् ॥ २ ॥
इष्टं दत्तं तपो जप्तं वृत्तं यच्चात्मनः[4] प्रियं ।
दारान् सुतान् गृहान् प्राणांस्तत्परस्मै निवेदनम् ॥ ३ ॥

किंबहुना इत्यादि अनेक संमति । येथें लिहिजेतील किती, । सर्व अर्पावें हें श्रीपति । स्वमुखें बोले. ॥ ८४ ॥ कायेनें जें जें कर्म करणें । तेंही ईश्वरींच अर्पणें, । तेथें शिश्नादिव्यापार वेगळेपणें । कैंचा उरे ? ॥ ८५ ॥ आणि जें कीं आपणासि । प्रिय वाटेल अतिशयेसीं । तें भावेंकरूनि ईश्वरासि । समर्पावें. ॥ ८६ ॥ शिश्नव्यापार मैथुन । तें जरी आपणासि प्रिय पूर्ण, । तरी तेंही ईश्वरार्पण । करावें कीं. ॥ ८७ ॥ 'यत्करोषि' म्हणोन । जें कीं बोलिला श्रीभगवान्, । सर्वेंद्रियें जें कीं निष्पन्न । तें मदर्पण करावें. ॥ ८८ ॥ चालणें बोलणें इत्यादि क्रिया । समर्पावी त्या देवराया, । असो व्यवहारें या । किती बोलावें ? ॥ ८९ ॥ सर्व अर्पावें हा मथितार्थु, । अन्यथा अर्थ नाहीं येथ, । आतां निवेदनार्थ । तोचि ऐका; ॥ ३९० ॥

---

१ ब. परि महाघोर. २. ब. करोति. ३. ब. समर्पयेत्तत्. ४. ब. यत्.

तरी आदिमध्यावसानीं । कर्म करितां ईश्वरानुसंधानीं, । इंद्रियवाक्कायमनीं । करणीय जें. ॥ ९१ ॥ यदर्थीं सर्वात्मा आपण। स्वयें पार्था सांगे श्रीकृष्ण, । तेंचि ऐका संपूर्ण । गीतावाक्य. ॥ ९२ ॥

ॐ तत्सदिति निर्देशो ब्रह्मणस्त्रिविधः स्मृतः ।
ब्राह्मणास्तेन वेदाश्च यज्ञाश्च विहिताः पुरा ॥ १ ॥

इत्यादि ॐतत्सत् ऐसें । ब्रह्माचें नाम त्रिःप्रकार असे, । तें विभागूनि ध्यानांशें । विनियोगावें कर्मीं. ॥ ९३ ॥ ॐकारें कर्म आरंभावें, । तेथें ईश्वराचें ध्यान करावें, । तेणेंचि अनुसंधानें धरावें । कर्म सकळ. ॥ ९४ ॥ मुखीं ॐकार नामाचा उच्चार, । कायेनें करावा अनुकार, । देवमय प्रचुर । काया करावी. ॥ ९५ ॥ मनें करावें तैसेंचि ध्यान, । तेणेंचि अनुसंधानें कर्माचरण, । मध्यें तच्छब्दें अवसान । मनाचें जें. ॥ ९६ ॥ तच्छब्दें ब्रह्म बोलिजे, । ध्यानें तदाकारता कीजे, । तेंचि ब्रह्म जाणिजे । सगुण अथवा निर्गुण. ॥ ९७ ॥ सत् शब्दें संतता, । विशेषण तत्काराचें तत्वता, । कर्मसमाप्ति विचारितां । जेथ होय. ॥९८॥ पूर्व ध्यानेंचि करूनि । कर्म हातीं द्यावें सगुणीं, । फळत्यागें निर्विकार निर्गुणीं । निर्गुणाचि होय. ॥ ९९ ॥ सत्कारें सत्कर्म होय. । सच्छब्द तो ब्रह्म आहे, । कर्मेंचि ब्रह्म होय । येणें विनियोगें. ॥ ४०० ॥ सकळ कर्मारंभीं पाहतां । ईश्वरनिष्ठाचि फावे तत्वता, । वेद बोले मतता । विचारिजे. ॥ १ ॥ मुख्य प्रणवु सर्व कर्मारंभीं । उच्चारितु असे निगमीं. । तयाचा अर्थ सर्वज्ञीं तुम्हीं । जाणितला असे. ॥ २ ॥ ॐकाराचीं तीनपदें असती, । अकार, उकार, मकार, व्यक्ति. । वर्णहीन चिच्छक्ति, । अर्धमात्रा असे. ॥ ३ ॥ याचें उत्तर श्लोकीं व्याख्यान, । "ब्रह्मैकाक्षरमभ्यर्थता" पद धरून । केलें असे विवरण । पदीं तैसें. ॥ ४ ॥ तिहीं पदांसीं अनुगत । अर्धमात्रा व्यापूनि संतत, । त्रिपदाभावीं उरत । अवर्णपणें. ॥ ५ ॥ 'अकार' स्थूळ कार्यपणें । स्वयें विराटरूप होणें, । स्थूळ शरीर सर्वेश्वरें येणें । धरिलें विश्वाकार. ॥ ६ ॥ तयाचें कार्य जीव शरीर, । अकार विश्व अभिमानी थोर, । जागृति अवस्था निरंतर । वर्ते स्थूळीं. ॥ ७ ॥ नेत्रस्थानीं जागृति स्थूळभोगु । इत्यादि अकारविस्तार अव्यंगु, । स्थूळसूक्ष्म श्रीरंगु । विस्तारला एकु. ॥ ८ ॥ उकार तयाचें कारण । लिंगदेह प्रभूचें निर्वाण. । हिरण्यगर्भ नाम जाण । जया बोलिजे. ॥ ९ ॥ विश्वस्थिति जेथें वर्ते, । तें लिंगशरीर प्रभूचें

म्हणिजेतें, । स्थूळदेहीं विश्वोत्पत्तीतें । स्वतःसिद्धचि. ॥ ४१० ॥ हिरण्यगर्भ तें लिंगशरीर, । तेंचि जीवाचेंही कारण थोर, । लिंगशरीर प्रचुर । जेणें निपजे. ॥ ११ ॥ तेथें स्वप्नावस्था वर्तत, । तैजसु अभिमानी बोलिजेत, । कंठस्थान निश्चित । प्रविविक्त स्वप्न भोगाचें. ॥ १२ ॥ ' मकार ' तो अव्यक्त ईश्वरु, । जयासि मूळविद्यासंबंध थोरु, । सकळ भूतांचा संहारु । वर्ते प्रळयरूपें. ॥ १३ ॥ ' प्राज्ञ अभिमानी, हृदयस्थान, ' । तेथें आनंद भोग वर्ते संपूर्ण, । मकार मात्रेचा जाण । विस्तारु हा. ॥ १४ ॥ तेंचि जीवाचें देह कारण । जें मूळाविद्या म्हणिजे जाण, । जेणें होय स्वरूपआवरण, । तेंचि तें अज्ञान. ॥ १५ ॥ तेथें सुषुप्ति अवस्था निरंतर, । प्राज्ञ अभिमानी सर्वेश्वर, । हृदयस्थान महाथोर । आनंदाचें. ॥ १६ ॥ या सकळांसि जे अनुगत, । ते तुर्या अर्धमात्रा बोलिजेत, । अज्ञानें विभाग करिजेत । त्रिपुटीचा. ॥ १७ ॥ इत्यादिकांचीं नामरूपें । टाकूनि उपाधि अमुपें, । उरे तेंचि निजस्वरूप । परब्रह्म. ॥ १८ ॥ तेथें चतुर्थ जें तुर्यग, । तेंचि शुद्ध ब्रह्म अव्यंग, । लक्षावया विभाग । त्रिपुटीचे केले. ॥ १९ ॥ अव्यक्त, हिरण्यगर्भ, विराज, । यांचें उपलक्षात्रया व्याज, । करूनि बोलिला निगमराज । सकळां जीवांप्रति. ॥ ४२० ॥ निरुपाधिक बोलावें । तेव्हां सोपाधिक दावावें, । तयावरूनि लक्षावें । निरुपाधिक. ॥ २१ ॥ केवळ निरुपाधिक बोलावया । सामर्थ्य नाहीं गिरा सर्वेंद्रियां, । यालागीं सोपाधि दावूनियां । निरुपाधि लक्षवी. ॥ २२ ॥ जैसा चंद्र दावणें पडे, । तेव्हां शाखा दावावी घडे, ॥ शाखेवरूनि निवाडें । चंद्र लक्षावा. ॥ २३ ॥ बीजेची सूक्ष्म चंद्रकळा । केवळ न भासतां डोळां. उपलक्षणें दाविला । शाखाविशेषु. ॥ २४ ॥ तेणें तें तत्काळ लक्षिलें, । चंद्रबिंब अपरोक्ष जालें, । येरवीं सर्व धांडोळिलें । दशदिशा गगन. ॥ २५ ॥ अथवा कोण्ही एक देवदत्त, । त्याचें गृह नाहीं एकासि विदित. । तो ग्रामस्थांसि पुसत । गृह कोण ? ॥ २६ ॥ गृहें बहुतें असती, । आणि सर्वे सारिखीं भासती, । केवळ दाखवितां प्रतीति । नये त्याचे. ॥ २७ ॥ मुख्य गृह जरी दाविलें, । तरी भ्रांतीनें आणिकेंचि बोले, । कोण-गृह हें न कळे । भ्रमास्तव. ॥ २८ ॥ गृह तरी देखिलें आहे, । परि निश्चय नाहीं तेंचि होय, । भ्रमें व्याकुळ होय । जयापरी. ॥ २९ ॥ मग सांगणार खूण बोले, । म्हणे अमकिया पैलेकडिलें ॥ तेंचि गृह निराळें । काकोपलक्षित, ॥ ४३० ॥ ज्यावरि काक

बैसला आहे, । तेंचि देवदत्ताचें गृह होय, । मग तिये खुणेस्तव लाहे । यथार्थपणें. ॥ ४३० ॥ उपलक्षणें भ्रमु गेला, । गृहाचा साक्षात्कारु जाला, । मग न चुके कांहीं केल्या । यावज्जीव. ॥ ३१ ॥ मागुता काक नलगे दावावा, । मार्ग नलगे पुसावा, । साक्षात्कारु बरवा । दृढतर जाहाला. ॥ ३२ ॥ अमकिया पैलेकडील हे खूण, । काकाचेंही उपलक्षण, । दोन्हीं गेलीं निर्वाण, । गृह फावलें. ॥ ३३ ॥ काक निरंतर नाहीं बैसला, । तो पुन्हा नलगे लक्षणाला, । अथवा संबंध कोण जाहला । काका गृहासि. ॥ ३४ ॥ गृह काकासारिखें नाहीं, । काकें गृह कलें काई ? । काकाचें साम्य एकही । नाहींच गृहासि. ॥ ३५ ॥ काक आणि गृह दोन्ही. । विजातिय, पहा विचारूनि, । एकही साम्य दावावयालागूनि । न दिसे तेथें. ॥ ३६ ॥ परी गृह लक्षावया उपयोगु केला, । तेणें साक्षात्कारु जाहला, । तोही न मोडे कांहीं केल्या, । भ्रांति ही नव्हे. ॥ ३७ ॥ तैसें दार्ष्टांतिकीं सांगेन, । ऐकावें चित्त देऊन, । जेणें बुझिजे खूण । गुरुमुखेंचि. ॥ ३८ ॥ येथें आशंका एकाची । नाहो गृहें अनेकें एकसारखींचि, । होतीं म्हणूनि भ्रमाची । मातु घडे. ॥ ३९ ॥ आत्मा एकविध आणि एकु, । दुसरा कैंचा अनेकु ? । तेथें उपाधीचा अवलोकू । करूनि कां पहावा ? ॥ ४० ॥ गृह जरी एकचि असिलें, । तरी प्रत्यक्ष तेंचि दावावें भलें, । काकोपलक्षित उगलें । दावणें कासया ? ॥ ४१ ॥ तैसा आत्मा एकु असे । दुसरें त्यासारिखें कांहीं नसे । तरि उपाधि उपलक्षणाचें पिसें । कासयालागीं ? ॥ ४२ ॥ येथें उत्तर आयिका, । यथार्थ वादु तुमचा निका, । परि आत्मयासि अनेकता होकां । निरोपिजेल. ॥ ४३ ॥ अज्ञानदृष्टीकरूनि । आत्माही नाना मानी, । हें अनुभवसिद्ध मनीं । विचारिजे. ॥ ४४ ॥ जैसें आत्मयाचें सत्ता, प्रकाश, सुख, । तें सर्वत्र व्यापिलें असें देख, । अनात्मा आणि तें एक । मिश्रीभूत जाहलें ॥ ४५ ॥ ते ते गुण अनात्मयासि दिसती, । म्हणोनि त्यासीच आत्मा म्हणती, । एक देहाचि आत्मा मानिती, । एक लिंगदेह, ॥ ४६ ॥ एक इंद्रियें आत्मा म्हणती, । एक मन एक बुद्धिच मानिती । एक अहंकारासि कल्पिती । आत्मा ऐसें. ॥ ४७ ॥ एक बाह्य पुत्रादिकांसि आत्मा म्हणती, । एक मुख्य प्राणासि आत्मत्व कल्पिती, । ऐसे नानापरीच्या युक्ती घेती । आत्मा नेणोनियां. ॥ ४८ ॥

---

१. अ. साक्षात्कारु. २. **ब**. मग तो. ३. **ब**. पावलें. ४. **अ**. न दिसे. ५. **अ**. होतां. ६. **अ**. मिश्रित. ७. **अ**. लिंगदेहीं. ८. **ब**. इंद्रिय. ९. **अ**. युक्ति प्रयुक्ति.

यालागीं पंचकोश उपसंहारे, । अनात्मा सर्वेही हें खरें, । मुख्य आत्मयासि आत्मत्व थारे । येरां न घडे. ॥ ४९ ॥ जे आत्मयाचे सत्तादिक, । ते कोठेंचि नाहीं सम्यक, । हें सांगतां एकएक । विस्तारु होईल. ॥ ४५० ॥ प्राणादि आत्मयाचेनिप्रकाशें । प्रकाशती सावकाशें, । येऱ्हवीं इंद्रियें जडें अप्रकाशें । आत्मा केवीं होती? ॥ ५१ ॥ तैसेंचि विराट आत्मा म्हणती, । तरी तो स्थूळ देह जडस्थिती । आत्मा नव्हे. येथ युक्ति । सांगणेंचि नलगे. ॥ ५२ ॥ तैसेंचि हिरण्यगर्भ लिंगशरीर[२] । तो आत्मा नव्हे साचार, । तें दृश्य सविकार । म्हणोनियां. ॥ ५३ ॥ अव्याकृत अज्ञानोपाधि । तो ब्रह्म नव्हेचि त्रिशुद्धि, । अज्ञाननिरासेंचि[३] सुखाब्धि । परब्रह्म जोडे. ॥ ५४ ॥ या तिहींचें प्रकाशक । साक्षी जें कीं सम्यक, । तें परब्रह्म निर्विशेष । जाणावें कीं. ॥ ५५ ॥ नाना आत्मा मानिती । म्हणोनि उपाधि निरसितसे श्रुति, । केवळाची उक्ति । करितां नये. ॥ ५६ ॥ केवळ निरुपाधिक बोलावें । तरी उपाधि करूनि लक्षावें, । येऱ्हवीं बोलणें न संभवे । निरुपाधिकीं. ॥ ५७ ॥ या त्रिपुटिव्यतिरिक्त । तेंचि परब्रह्म निश्चित, । ऐसें सांगावया बोलत । उपाधी आधीं. ॥ ५८ ॥ उपाधि करूनि लक्षावयाकारणें । श्रुतीनें उपाधि आधीं बोलणें, । एरवीं एक ब्रह्मचि साचपणें[४] । दुसरें नाहीं. ॥ ५९ ॥ ना तयासारिखें दुसरें नाहीं, । परि परस्परानुध्यासें मानिलें पाहीं, । तें निरसावया सर्वही । बोलणें पडिलें. ॥ ४६० ॥ परंतु अनात्मा जो प्राणादिक, । तयासि आत्मेनसीं नाहीं साम्य एक, । कां तयावेगळें तें प्रकाशक । आत्मस्वरूप. ॥ ६१ ॥ परंतु आत्मा अनात्मा एकत्वें । भासताती प्रकाशत्वें, । तेंचि निवडावया उपलक्षणत्वें । दावावें पडिलें. ॥ ६२ ॥ सर्वदा अनात्मवर्गु असावा, । तरि आत्मा प्रकाशेल बरवा, । येऱ्हवीं नेणवे हें म्हणावया । कारण नाहीं. ॥ ६३ ॥ अनात्मा मिथ्याभूत असे, । ब्रह्मेसि काय संबंध वसे? । हें लक्षावया दोषें । दावणें पडे. ॥ ६४ ॥ ग्रहकाकदृष्टांतावरूनि[६] । जाणावें आत्मानुवेदनीं, । मागुतें लक्षावयालागूनि । उपाधि नलगे. ॥ ६५ ॥ उपाधीवरूनि[७] लक्षिलें, । मग उपाधीचें प्रयोजन सरलें; । स्वयें ब्रह्मचि प्रकाशिलें । निरुपाधिक. ॥ ६६ ॥ मग अतव्द्यावृत्ति नलगे करावी, । ना

---

१. अ. पंचकोशविवरण लिहिणें २. अ. हिरण्यगर्भशरीर. ३. याचेनि.
४. अ. साचोकारें. ५. ब. असे. ६. अ. दृष्टांतें करूनि. ७. अ. करूनि.

उपाधीनें ब्रह्मता लक्षावी, । [1]हे कांहीं नलगे ठेवाठेवीं । ब्रह्म-प्रकाशीं. ॥ ६७ ॥ तयाचा जरीं पाडी विसरू, । तरि तयाचा चमत्कार थोरु, । स्वयेंचि प्रकाशे विचारु, । न करितांचि. ॥ ६८ ॥ जरी तयाचा चमत्कारु थोरु । स्वयेंचि प्रकाशें विचारु, । न करितांचि अलभ्य लाभ थोरु । होतसे तें ऐका, ॥ ६९ ॥ जरी त्याचें स्मरण न करी । तरि अनुभवारूढचि अंतरीं । बाह्यांतर सर्व प्रकारीं । कोंदलें असें; ॥ ४७० ॥ तें नाठवितांचि आठवे । न चिंतितांचि सर्व फावे । नेणपणचि अनुभवें । अपरोक्षपणें. ॥ ७१ ॥ तें कोणा नलगे पुसावें, । उपलक्षण नलगे दावावें, । स्वतःसिद्धचि स्वभावें । अपरोक्ष असे. ॥ ७२ ॥ यालागीं ॐकारु ब्रह्म-प्रतिष्ठि, । ॐकारुचि ब्रह्मसमाष्टि, । उपाधिनिरासें सृष्टि । ब्रह्मचि एक. ॥ ७३ ॥ अंतर्बाह्य ऐसें बोलिलेंती, । तरी येथें जाहाली भेदाची व्यक्ति, । अंतर्बाह्य म्हणतां स्थिति । पदार्थाची होय. ॥ ७४ ॥ घट साच पदार्थ आहे, । त्याचे अंतरीं आकाश आहे, । बाह्यही व्यापिलें आहे । जया-परी. ॥ ७५ ॥ घटा अंतर्बाह्य आकाश असे, । म्हणूनि अंतर्बाह्य बोलिजे-तसे, । तैसेंचि विश्वही सत्य भासे, । ब्रम्ह असे अंतर्बाह्य. ॥ ७६ ॥ विश्वाचा बाह्य अंतरीं । ब्रम्ह व्यापिलें सर्वांपरी, । यालागीं [2]बाह्यांतरीं । बोलिजे ब्रम्ह. ॥ ७७ ॥ तरी ऐका येथें परिहार, । ऐसा नव्हे येथील विचार, । ब्रम्हावेगळें साचार । कांहींही नाहीं. ॥ ७८ ॥ विश्व ब्रह्माचा विवर्त, । तो ब्रह्मज्ञानें असे भासत । नामरूपात्मक निश्चित । मिथ्या-पणें. ॥ ७९ ॥ जैसें सुवर्णाचे अळंकार । ते नामरूप प्रकार, । परि दुजा कोणी पदा[3]र्थ साचार । हेमावेगळा असे. ॥ ८० ॥ कुंडलाबाह्याभ्यांतर । सुवर्णचि जैसे साचार, । मध्यें कोण पदार्थांतर ? । भासला सांगा. ॥ ८१ ॥ तैसें[4] जग नामरूपें असत्य । एक ब्रह्मचि अंतर्बाह्य सत्य । [5]अंतर्बाह्याचें यथातथ्य । ऐसें असे. ॥ ८२ ॥ यालागीं आरंभीं सर्व कर्मांचा । मंत्र मूळ ॐकारु साचा, । ब्रह्मचि अंतीं विचाराचा । तयाचिये. ॥ ८३ ॥ नाहीं विचारितां ब्रह्म होय, । अविचारें ॐकारवर्ण आहे, । ऐसें वर्ण किती नित्य पाहे । वाचा उच्चारी. ॥ ८४ ॥ वर्ण उच्चारें कोण प्राप्ति ? । तेथें विचार

---

१. अ. हे कांहींच नलगे तेवीं.

२. ब. विश्वांतरीं. ३. अ. प्रकार. ४. अ. जैसे तैसे. ५. ब. अंतर्बाह्यांतरें.

कांसया करिती ? । ते बलात्कारें आणिती । ब्रह्मत्व तेथें. ॥ ८५ ॥ तरी ऐका येथ उत्तर, । संसारासि कारण अविचार, । विचारें वस्तु साचार । लाभे सिद्ध. ॥ ८६ ॥ अविचार तेंचि अज्ञान । विचार तें ज्ञान संपूर्ण. । अविचारें संसृति दारुण । विचारें पूर्ण ब्रह्मानंदु. ॥ ८७ ॥ विचार न करी तो आंधळा, । विचारवंत डोळियाचा डोळा, । परमानंदाचा पुतळा । आन नाहीं. ॥ ८८ ॥ अविचारें जगभ्रांति, । विचारें विश्वीं[1] ब्रह्मप्राप्ति. । सज्ञान ते विचार करिती, । अविचार अज्ञानी, ॥ ८९ ॥ श्लोक । ऋचा ।

अविचारकृतो बंधो विचारेण विलीयते, ।
तस्माज्जीवपरात्मानौ सर्वदैव विचारयेत्. ॥

यालागीं विचार तोचि मुख्य, । अविचार तो अमुख्य; । अविचारें संसारदुःख, । परमसुख विचारें. ॥ ९० ॥ ना येथें आशंका येकीं, । तुम्ही वस्तुविचार मंत्रादिकीं । बोलिलेति, आणि ॐकारविखीं । प्रवर्तलेती, ॥ ९१ ॥ तरि ॐकार ब्रह्म होय, । हें सर्वत्र संमति आहे, । परि मंत्रार्थ तैसा होय, । हें तो अघटमान. ॥ ९२ ॥ जनप्रसिद्ध ॐकारब्रह्म, । आणि ज्यापासाव सर्व निगम, । वेदमूळ परम । तो ब्रह्म होय. ॥ ९३ ॥ परि मंत्र ते तंव देवतापर, । तेणेंचि करिजे कर्माचार, । ब्राम्हणाचा निर्धार । सूर्याग्नि उपासिती. ॥ ९४ ॥ ऐसी ये मंत्रीं ब्रह्मता, । हें तंव न घडे तत्वता, । सर्व कर्मारंभीं विचारितां । ब्रह्मप्राप्ति हें कैसें ? ॥ ९५ ॥ सर्व कर्मारंभीं मंत्रमूळ । ब्रह्म बोलिलें असे तें केवळ । तरि ब्रह्मनिष्ठचि लोक सकळ । होते कां ना ? ॥ ९६ ॥ मंत्रें[2] ब्रह्मप्रतिपाद्य असते । तरि लोकीं ते कां उपेक्षिजेते ? । कांसया कर्म करिते । ब्रह्म नेणोनि ? ॥ ९७ ॥ ब्रह्म नेणोनि कर्म करणें, । कां ब्रह्मार्पणही न करणें, । तें फळभोगाचें घेवोनि धरणें । सुखःदुःख देत असे ॥ ९८ ॥ परलोकीं नाना नरक, । इहलोकीं योनि अनेक, । भोगी अत्यंत दुःखोद्रेक[3] । विसांवेविण. ॥ ९९ ॥ एवढा अनर्थ कां होता ? । जरि वेदु कर्मारंभीं ब्रह्म प्रतिपादिता; । तो स्वर्गादि सुखें अनेकता । भोगफळें सांगे. ॥ १०० ॥ जरि कर्मारंभीं ब्रह्म प्रतिपादिलें असतें, । तरी जन तयातें जाणते, । ब्रह्मानंदेंचि असते । निरंतर. ॥ १ ॥ आतां येथ ऐका उत्तर, । देईजेल अतिप्रचुर, । जेणें कर्मा-

---

१. ब. विश्व २. ब. मंत्रीं ब्रह्म प्रतिपाद्य असतें, । तरि लोकीं तें कां उपेक्षिजेतें ?
३. अ. दुःखोदर्क.

रंभींच ब्रह्म साचार । लाहे जेणें. ॥ २ ॥ तरि सर्व कर्मींमंत्रीं । ब्रह्म प्रतिपादिलें सर्वत्रीं, । परि जनां न कळोनि, स्वर्गपुरी । इच्छितातीं. ॥ ३ ॥ ऐहिक भोगु नाना । इच्छितातीं पुत्रवित्तअंगना. । भोगिती नरकपतन । पावती सुखें. ॥ ४ ॥ वेद ब्रह्मप्राप्त्यर्थेंचि बोलिला. । रोचनार्थ स्वर्गादिफळ दाविला, । लोक नेणोनि विषयभोगाला । लुब्धोनि ठेले. ॥ ५ ॥ तैसा पिता पुत्रासि निंब पाजी, । रोचनार्थ दावी नानाखार्जी. । तो मुख्य उपयोगु नेणोनि भुंजी । खंडलड्डुकातें. ॥ ६ ॥ तैसें मुख्य उपयोगु नेणोनि. । वेद चाळवणीसी भुलेनि, । भोगेच्छा करुनि नानायोनि । भोगिताती. ॥ ७ ॥ मुख्य वेदांचें मनोगत । पूर्वीं केलें असे विस्तृत । आतां मंत्रार्थ प्रस्तुत । काहीं सांगो. ॥ ८ ॥ सर्व कर्मीं ब्रह्म प्रतिपादिलें, । हें तुम्हांसि प्रतीतीसि पाहिजे अर्थे । म्हणूनि पाहिजे सांगितलें । ईषत् तऱ्हीं. ॥ ९ ॥ बहु सांगतां विस्तार होईल. । तेणें[2] संतजन कोपतील, । म्हणूनि एकमंत्रार्थ प्रांजळ । सांगो आतां ॥ १० ॥ ब्रम्ह निरूपण तो विस्तारु नव्हे, । येथें प्रपंचु बोलणें काय असे ॥ ब्रह्म-सुखाचि चाड पाहें । विपश्चितासि ॥ ११ ॥ म्हणोनि मंत्रार्थ काहीं एक । जो भाष्यकारें बोलिला सम्यक, । तोचि अन्वयपूर्वक । ऐका स्वामी. ॥ १२ ॥ तुम्ही ऐसें बोलिलेती, । ब्राम्हणासि मुख्य सूर्याग्नि उपास्ति. । तेथें ब्रह्म काय प्रतिपादिती । तिये मंत्रीं ? ॥ १३ ॥ तरि सूर्यपराचि मंत्र ऐक, । याचा अर्थ घेऊनि निका, । मग तरी आवांका । ब्रह्मनिष्ठता स्वयें. ॥ १४ ॥ तोही सर्वांसि प्रकटभूत । बह्वादिक असती जपत । जया वेगळीं किंचित । संध्याचि न चले. ॥ १५ ॥

श्रुतिः—हंसः शुचिषद्वसुरंतरिक्षसद्धोता वेदिपदतिथिर्दुरोणसत् ॥
नृषद्वरसदृतसद्व्योमसदब्जा गोजा ऋतजा अद्रिजा ऋतं बृहत् ॥

“ गच्छतीति हंसः ” । जाय तो बोलिजे हंस. । ऐसा एक सूर्यचि जाणा हंस । तो प्रकाशकु. ॥ १६ ॥ शुचिषत् शुचि सकळां पवित्रासी । पवित्रपणाची रासी, । तें मंडळ सर्वासी । बोलावें कीं. ॥ १७ ॥ त्याच्या ठायीं प्रवेशोनि राहतां, । ऐसा सूर्य बोलिजेल तत्वता, । तैसाचि वसुस् वायु तत्वता । निश्चि-येंसी. ॥ १८ ॥ तो अंतरिक्षाच्या ठायीं वर्ततु. । सर्वव्यापक सर्वगतु. । तैसोचि होता म्हणिजतु । यज्ञकर्यासी. ॥ १९ ॥ तो वेदीच्या ठायीं वर्ततु । तैसाचि अतिथि वसतु, । दुरोणीच्या ठायीं संततु । अतिथित्वें. ॥ २० ॥

---

१. अ. भोगांतीं. २. ब. तयास.

दुरोणिशब्दें गृह जाणिजे, । गृहीं अतिथि नेइजे, । मनुष्याच्या ठायीं जाणिजे । सत्तारूपें. ॥ २१ ॥ वर म्हणिजे प्रतिमादिक । द्वारका, काश्यादिक, । त्यांच्या ठायीं अधिक । देवपणें. ॥ २२ ॥ व्योमाच्या ठायीं व्यापकपणें । सर्वदा व्योमपणें असणें, । उदकापासाव होणें । शंख, मकरादिकीं. ॥ २३ ॥ ऐसी जळांतर्वर्ति सकळें । गाईच्या ठायीं दुग्धादि मेळे । जें कीं असें सर्व काळें । तेंही बोलिजे. ॥ २४ ॥ 'ऋतजा" ऋतशब्दें वाचा, । तेथें नटनाचु सत्यादिकांचा, । सकळ पुंज वाक्यांचा, । जो स्वरवर्णादिक. ॥ २५ ॥ "अद्रिशब्दें" वृक्ष, पर्वत, । तेथें तृणपर्णादि वर्तत, वृक्षीं फळमूळ समस्त । जें कांहीं असे. ॥ २६ ॥ इत्यादि समस्तही पूर्वोक्त । तें " ऋत " शब्दें सत्य वर्तत, । सत्य तें ब्रह्म सदोदित । आन नाहीं ॥ २७ ॥ असत्य सकळ प्रपंचजात । याचा भास जेथ वर्तत, । तें सत्यशब्दें विस्तृत । परब्रह्म ॥ २८ ॥ " बृहच्छब्दें " थोर । ज्याहूनि गणना अवर, । तेंचि तें परांपर । परब्रह्म ॥ २९ ॥ महत्परिमाण हें गगन, । तयाचेंही जेथ अवसान, । जयाचें आधारें भासमान । खद्योततुल्य. ॥ ३० ॥ जें थोराचेंही थोर, । जें सर्व ब्रह्मांडाचें आधार, । ज्याच्या ठायीं चराचर । मृगजळ भासे. ॥ ३१ ॥ तेंचि तें परब्रह्म जाण, । सर्वत्र सर्वां वर्तमान, । पूर्वोक्त प्रकारें पूर्ण । सूर्यादिरूपें. ॥ ३२ ॥ तें सर्वही सर्वाठायीं । परिपूर्ण ब्रह्मचि आनपाईं. । ऐसें श्रुति बोले पाहीं । मंत्रवादें. ॥ ३३ ॥ यालागीं श्रुतीचे शब्दजात, । ते सर्वही ब्रह्मचि प्रतिपादित, । म्हणोनि ब्रह्माव्यतिरिक्त । कर्मादिही नाहीं. ॥ ३४ ॥ यालागीं ब्रह्मीं ब्रह्मपणें । कर्म ब्रह्मार्पण करणें, । तेणें ईश तोषलेपणें । ज्ञान देतु. ॥ ३५ ॥ " ज्ञानावेगळी मुक्ति " । ऐसी कोणाचीही नाहीं उक्ति, । यास्तव ज्ञानालागीं करिती । कर्म ब्रह्मार्पण ॥ ३६ ॥ ऐसें निष्काम कर्म कीजे, । तेंचि ईश्वरार्पण सहजें, । तेणेंचि ईश तोषिजे । सर्वापरी. ॥ ३७ ॥ हें नेणोनियां वर्म, । जें जें करिजे कर्म, । तें कर्मचि विकर्म । होऊनि ठाके. ॥ ३८ ॥ ऐसें हें द्विःप्रकार निवेदन । करूनि, करावें ईशतोषण; । तेणें तोषें अनुग्रह पूर्ण । ईश्वर करी. ॥ ३९ ॥ ज्या अनुग्रहासाठीं । ब्रह्मज्ञान लागे पाठीं । स्वस्वरूपीं अपरोक्ष भेटी । असतांचि होय. ॥ ४० ॥ निवे-

---

१. ब. जळांत वर्तती. २. अ. वृक्षादि. ३. क. परात्पर. ४ ब. तें.

५. ब. ऐसोनि कर्म.

दनपद थोडें असे, । परि विस्तारु जाहला बहुवसें, । ऐसें म्हणावया दोषें । कारण नाहीं. ॥ ४१ ॥ पद अल्प जरी जाहलें, । तरी व्याख्यान पाहिजे प्रत्यया आलें; । तुम्हां शास्त्रज्ञांसि रुचलें । पाहिजे अनुभवें. ॥ ४२ ॥ हा अनुभवसिद्ध ग्रंथु, । पाहतां तंव अनुभवघातु, । अनुभव सिद्ध भूतु, । परि भोगावा येणें ॥ ४३ ॥ तरी तुम्ही संत कोपाल, । ग्रंथविस्तार होईल, । म्हणूनि परिमित बोल । उद्देशें मात्र बोलिजेती. ॥ ४४ ॥ येरवीं व्याख्यान पूर्ण करितां । । हें तंव बहुत असें बोलतां । सद्गुरुसारिखा वक्ता । तेथ न्यून तें काय. ॥ ४५ ॥ परि ग्रंथु विस्तारेल अति, । राहिली दूरि पदसंगति, । यालागीं परिमितस्थिति । बोलिली असे. ॥ ४६ ॥ आतां ग्रंथार्थु निका । चित देऊनि ऐका, । ईश्वरार्पण कर्म करितां फुका । ज्ञान साधे. ॥ ४७ ॥ जरी निष्कामपणें ईश्वरार्पण । केलिया फावे ब्रह्मज्ञान, । ब्रह्मज्ञानें समाधान । पूर्णानंदु होय. ॥ ४८ ॥ येवढेंवरी नें कामितां लाभु । कामितां सर्व अलाभु । काम्यकर्मीं समारंभु । कदा न करावा. ॥ ४९ ॥ काम्यकर्मांच्या ठायीं मति । कदा न व्हावी कल्पांतीं, । मनें करुनि निवृत्ति । कामनेची करावी. ॥ ५० ॥ जे कां यागादि काम्यकर्में । तीं तीं त्यजावीं मनोधर्में, । आणि परलोका गमे । कोण चाड ? ॥ ५१ ॥ स्वर्गादि लोक नश्वर । ते कामूनि काय लभ्यसार ? । पुण्यांतीं पतन थोर । न चुके कदा. ॥ ५२ ॥ तेथेंही ईर्षा, असूयादिक । लागलेंचि आहे सकळिक, । जैसेंचि इहलोकीं दुःख । तैसेंचि तेथें. ॥ ५३ ॥ आणि पुण्यांतीं मागुतें पडावें, । ऐसें साधिलिया काय फावे ? । ऐसें पूर्ण विचारावें । सूक्ष्म-दृष्टी ॥ ५४ ॥ इहलोकसुख वांछावें । तें तंव मिथ्याभूतचि अवघें, । व्यर्थ देहालागीं शिणावें । गोमटें व्हावया. ॥ ५५ ॥ देहासि गोमटे भोग इच्छिणें । तेंचि तें उवड नागवणें; । देह हा नैश्वर्यपणें । वृथा श्रमु, ॥ ५६ ॥ यालागीं काम्यकर्म टाकूनि, । नित्यनैमित्तिकांचें फळ न अपेक्षूनि । केवळ निष्कामनेंकरूनि । ईश्वरीं अर्पावें. ॥ ५७ ॥ काम्यकर्म निःशेष टाकावें, । नित्यनैमित्तिकांचें फळ न वांछावें, । केवळ नैराश्यें अर्पावें । ईश्वरीं कर्म. ॥ ५८ ॥ येणें त्याग, संन्यास असे । प्राप्त होत असती अनायासें, । ऐसें गीतेसी विश्वेशें । बोलिलें असे. ॥ ५९ ॥

---

१. अ. पाहतां आणि अनुभवार्थु. २. अ भोगावया. ३. अ. उपदेश. ४. अ. निःकामत ५. यालागीं. ६. अ. परलोकीं गम्य. ७. अ. न पेक्षावें.

काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः ।
सर्वकर्मफलत्यागं प्राहुस्त्यागं विचक्षणाः ॥

यालागीं काम्यकर्म आणि फळत्याग । याचा त्याग अंगिकार करूनि सांग, । निवेदन अभ्यंग । द्विःप्रकार करावें; ॥ ६० ॥ काम्यकर्माचें परिवर्जन, । फळापेक्षेचें विमुखपण । करूनि, कर्म निवेदन । ईश्वरीं करावें ॥ ६१ ॥ तेणें सकळ पापौघाची धुणी । जें कीं अघ काय वाङ्म-नांपासूनि, । होय तें भरंवसोनि । जळोनि जाय. ॥ ६२ ॥ मुख्याद्यकाम्य निषिद्धाचरण । तें निषिद्ध केलें करितां सत्कर्माचरण, । काम्य त्यागें कामना जाण । त्यजिली होय. ॥ ६३ ॥ काम्य आणि फळ-त्यागें करून । कामनाचि उपडिली जाण, । कामना तेचि पाप दारुण । प्रत्यक्ष सिद्ध. ॥ ६४ ॥ ते कामना सांडिलिया, । कर्म ईश्वरार्पण केलिया, । पापौघ जाती जळोनियां । अतिशुद्ध होय. ॥ ६५ ॥ शुद्ध जालियानंतरें । भवसुखीं दोषचि स्फुरे, । हें चित्तशुद्धीचें पुरें । लक्षण जाणावें. ॥ ६६ ॥ जंव हें चित्त मळिन असे, । तंव भवसुखीं रागें संतोषे; । विषयचि सुख ऐसें । परम मानी. ॥ ६७ ॥ स्त्रीपुत्रादि विषयजात । तेंचि जया परमामृत, । दोषुचि अदोष देखत, । दुःख तेंचि सुख. ॥ ६८ ॥ जे जे विषय दुःख-रूप, । तेचि होती सुखरूप; । चित्तशुद्धि जालिया अमूप । दुःखरूप होती. ॥ ६९ ॥ हेंचि शुद्धाशुद्धीचें लक्षण, । अशुद्धीनें विषयीं सुखबुद्धि जाण, । शुद्धीनें दोष पूर्ण । त्या सुखींच[1] देखती. ॥ ५७० ॥ सकळही संसारसुख । तेंचि तया होय विख, । यालागीं सर्व दोषोन्मुख । चित्त करावें. ॥ ७१ ॥ स्त्रीपुत्रादि जें सुखरूप, । तेंचि जालिया दुःखरूप, । मग आत्मेच्छा अमुप[2] । असावें कीं. ॥ ७२ ॥ जो स्त्रीपुत्रांचे इच्छेकरूनि । परतंत्र वर्ततां जनीं । तेथ जालिया दोष दर्शनीं । स्वतंत्र होय. ॥ ७३ ॥ स्वतंत्र जालियावरि । क्षणभरि न राहवें घरीं, । शीघ्र निघावें वैराग्यभारीं । वनाप्रती. ॥ ७४ ॥ अथवा “ आत्मेच्छा व्यवसीयताम् ” । म्हणिजे आत्मा ब्रह्म तत्त्वता, । तेंचि स्वयें अनुभावितां । अति प्रीति, ॥ ७५ ॥ हें दुसरें व्याख्यान । आत्मेच्छा करावी प्रीतीकरून, । शुद्ध जालिया अंतः-करण । आत्मेच्छा स्वयेंचि होय. ॥ ७६ ॥ अंतःकरणशुद्धीचें पूर्ण लक्षण । विषयसुखीं दोषदृष्टि पूर्ण, । आणि ब्रम्हप्राप्तीची जाण । इच्छा

१. अ. सुखेंचि देखती । २. ब. उमप.

उपजे. ॥ ७७ ॥ हेंचि दोन्हीं वाढवावीं, । विषयीं आसक्ति न धरावी, । ब्रह्मप्राप्तीची असावी । गोडी पूर्ण. ॥ ७८ ॥ संसारसुखीं दोषदर्शन । होय, तेंचि वैराग्य पूर्ण. । दुःखरूपीं आरोपितां गुण, । तेचि विषयासक्ति. ॥ ७९ ॥ ऐसें[1] वैराग्य जालिया, । कारण नाहीं गृहीं वसावया, । शीघ्रचि ज्ञान साधावया । वनासि जावें. ॥ ५८० ॥ गृहीं असतां, स्त्रीपुत्रादिमेळे । आसक्ति होईल कोणेही वेळे, । यालागीं वैना शीघ्रकाळें । जावें लागे. ॥ ८१ ॥ येक मुखें वैराग्य बोलती, । विषयीं दोष न देखती, । ते चित्र वाचिक बोलिजेती । वैराग्यहीन. ॥ ८२ ॥ वैराग्य दाविती दंभार्थ, । विषय सेविती प्रारब्धार्थ, । ऐसें बोलती, व्यर्थ । प्रलापी जाणावे. ॥ ८३ ॥ संतानाच्या ठायीं । सर्वदा दोषदृष्टिच पाही, । समीप अपरें आणितांही । चिळसि घेतु. ॥ ८४ ॥ ऐसें विषयीं दोषदर्शन । होय तेंचि वैराग्य जाण, । झालिया संन्यासग्रहण । तत्काल करावें. ॥ ८५ ॥ त्या संन्यासाचा प्रकार । तोही सांगिजेल सविस्तर, । चित्त करूनियां सादर । परियेसिजे. ॥ ८६ ॥ येथें प्रथम श्लोक संपला, । श्लोकार्थुचि महाराष्ट्र बोलिला; । द्वितीय श्लोक आरंभिला, । तोही परिसिजे. ॥ ८७ ॥

संगः सत्सु विधीयतां भगवतो भक्तिर्दृढा धीयतां
शांत्यादिः परिचीयतां दृढतरं कर्माशु सन्त्यज्यताम् ।
सद्विद्वानुपसृप्यतामनुदिनं तत्पादुके सेव्यतां
ब्रह्मैकाक्षरमर्थ्यतां श्रुतिशिरोवाक्यं समाकर्ण्यताम् ॥ २ ॥

" वेदो नित्यमधीयतां " । येणें द्योतिली ब्रह्मचर्यता, । गृहस्थाश्रमु तत्वता । बोलिला तो सांगों. ॥ ८८ ॥ " तदुदितं कर्म स्वनुष्ठीयतां " । येणें बोलिली गृहस्थता, । कर्मानुष्ठानाची तत्वता । भूमिका ते. ॥ ८९ ॥ यज्ञादिकें कर्मं करणें । त्यासि गृहस्थाश्रमु अवश्यकपणें । पाहिजे, वचनें येणें । सिद्ध केलें. ॥ ५९० ॥ तेही जालिया पूर्णता, । " गृहात्तूर्णं विनिर्गम्यतां " । येणें द्योतिली वानप्रस्थता । जाणावी कीं. ॥ ९१ ॥ वानप्रस्थाची कर्तव्यता । आणि संन्यास उपदेशितां, । सांगिजेल तत्वता । येणें श्लोकें. ॥ ९२ ॥ तेंचि व्याख्यान कीजेल, । श्रोतां चित्त द्यावें प्रांजळ, ।

१. अ. ओंवी ५८० च्या पुढें ओव्या ५७८ व ५७९ अ प्रतींत आहेत २. ब. तेणें काळें ३. ब. वनासि. ४. अ. प्रलाप. ५. ब. अपसरें. ६. ब. शांत्यर्थाः
६. अ. चाले. ७. ब. आवश्यकपणें.

" संगः सत्सु विधीयतां " हा बोल । काय सांगों. ॥ ९३ ॥ वना जाऊनियां पुरुषें, । सत्संग करावा विशेषें, । संताचां ठायीं संतोषें । सर्वदा असावें. ॥ ९४ ॥ सत्संगें असतां निरंतर । शुद्धांतःकरणीं तो साचार, । भवबुद्धीसि मार । सहजचि होय. ॥ ९५ ॥ सत्संगें विषयवासना तुटे, । अति वैराग्य चित्तीं प्रगटे; । जयापरी ईश्वरु भेटे । तैसी बुद्धि होय. ॥ ९६ ॥ विषयीं अति वीटु उपजे, । ईश्वरीं प्रेमें[2] वाढे सहजें; । तेणें प्रेमें सर्वदा कीजे । ईश्वरीं भक्ति. ॥ ९७ ॥ साधुसंगापरतें कांहीं । सर्वथा पैं गोमटें नाहीं, । साधुसंगें सर्वही । लाभेचि कीं. ॥ ९८ ॥ यालागीं साधुसंग[1] करावा, । तेथेंचि आश्रम अवलंबावा, । अनन्यपणें भजावा । भगवंतु सदा. ॥ ९९ ॥ भगवंताची दृढ भक्ति । निरंतर करावी अनन्यगति, । जे कीं बोलिजेती । अव्यभिचारिणी. ॥ १०० ॥ हेंचि[3] दृढतेचें व्याख्यान । जें एकांत भक्तिसेवन, । तेणें परमात्मा तोषोन । ज्ञान देतु. ॥ १ ॥ अथवा दृढतेचें व्याख्यान । सर्व कामना सांडून, । आत्मप्राप्तिच लागून । अतिप्रीति जे कां. ॥ २ ॥ आत्मप्राप्तीवांचूनि जाण । सर्वथा गोमटें न मनीं मन, । तिये प्राप्तीलागीं साधन । नाना तपें. ॥ ३ ॥ चित्तशुद्धीचिये प्राप्तीकारणें । जे कीं नानातपें करणें, । शीतोष्णादि साहणें । अनेक क्लेश. ॥ ४ ॥ तीं[4] तीं तपें बोलतां, । विस्तार होईल ग्रंथा, । श्रुतचि आहे विपाश्चितां, । तींचें[5] तपें. ॥ ५ ॥ कंदमुळादिकें भक्षावीं, । उदकीं उदकवासादि करावीं, । शीतोष्णें सहावीं । ब्रह्मचर्यपूर्वक. ॥ ६ ॥ ऐशीं नानातपें करणें, । तींचि दृढभक्तीचीं लक्षणें, । तीं करूनि तोषवणें । भगवंतासि[6]. ॥ ७ ॥ तेणें उपजेल शांति, । शांतीनें बुद्धि परिचर्याची निगुति, । जेणें बुद्धि पक्क[7] होऊन स्थिति । राहे जेणें. ॥ ८ ॥ शांति करूनि परिशीलन । करावें बुद्धीचें संपूर्ण, । जेणें विषयवासना जाण । कदा नुपजे. ॥ ९ ॥ बुद्धि शांतिरसें घोळलिया, । भववासना जाय लया, । विषयबुद्धि उपजावया । कारण नाहीं. ॥ ११० ॥ शांतिरसें घोळलिया बुद्धि, । तेचि जाणावी कर्मावधि, । कर्म करावयाची सिद्धि । ते व्यर्थ होय. ॥ ११ ॥ ऐसी जाहलिया स्थिति, । मग कर्माची कांसया संगति, । त्यागु करावा निगुति । यथान्यायें. ॥ १२ ॥

---

१. ब. सत्संग. २. अ. प्रेमा. ३. ही ओवी अ. प्रतींत नाहीं. ४. अ. ते ते. ५. अ. तेचि. ६. अ. भगवंतातें ७. ब. पक्क.

जंववरि अंतःकरण शुद्ध होय । तंव कर्म करणें आहे, । भक्ति जालिया काये । कर्में करूनि ? ॥ १३ ॥ भक्ति अथवा विरक्ति । जालिया न लगे कर्मसंगाति, । विशेषें ज्ञानियांप्रति । असेचिना. ॥ १४ ॥ यदर्थीं श्रीभागवतीं । बोलिली आहे संगाति, । सर्वात्मा उद्धवाप्रति । जे कीं बोलिला. ॥ १५ ॥

ज्ञाननिष्ठो विरक्तो वा मद्भक्तो वाऽनपेक्षकः ।
सलिंगानाश्रमांस्त्यक्त्वा चरेदविधिगोचरः ॥ १ ॥

यालागीं [1]दृढभक्ति जालिया, । तत्काळ त्यजावें कर्मा यया, । जें कीं न टाके टाकिलिया, । कल्पांतींही. ॥ १६ ॥ सांडितां न त्यजे सर्वथा, । म्हणौनि कर्मासि बोलिली दृढता. । दृढतर यया अर्थां । हेंचि मूळ. ॥ १७ ॥ त्यजितां कर्म न त्यजे । म्हणौनि दृढतर बोलिजे; । ज्ञान जालियाही सहजें । न राहे कर्म. ॥ १८ ॥ पूर्वसंस्कारवशें । संस्कारानुरूप कर्म होतसे, । परि कर्मावेगळा न दिसे । योगी कोण्ही. ॥ १९ ॥ यालागीं गीतेसीं भगवंतें । बोलिलें आहे पार्थातें, । अकर्मी जाण सर्वार्थें । कोणी न राहे. ॥ ६२० ॥

“ **न हि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत्** ” इत्यादि ।

ययालागीं दृढतर । कर्मातें बोलिजे साचार, । अथवा द्वितीय प्रकार । दृढतेचा. ॥ २१ ॥ दृढतर कर्मत्याग । करणें जो कां सांग, । निःशेष, । अव्यंग । सर्वस्वेसीं. ॥ २२ ॥ निपटूनि कर्म सांडणें, । त्या नांव दृढतर त्याग म्हणणें, । कर्म टाकालिये टाकणें । जळजळ ते. ॥ २३ ॥ ऐसा दृढतर त्यागु । कीजे तत्काल कर्माचा सांगु, । तोचि जाणावा अव्यंगु । संन्यासु कीं. ॥ २४ ॥ “ दृढतर ” शब्दें मागुतेनि, । करणें कर्म नाहीं भरंवसेनीं. तें दृढतर म्हणोनि, । संन्यासु बोलिला. ॥ २५ ॥ त्या संन्यासालागीं । सद्गुरु सेवावया वेगीं, । “ सद्विद्वान् ” पद भंगी । बोलिलें कां पां ? ॥ २६ ॥ “ विद्वान् ” शब्दें ज्ञानी होय । सच्छब्दें काय आहे ? । हा आशंकेचा ठावो होय, । परि आयकावें कीं. ॥ २७ ॥ “ सत् ” शब्दें जाण ब्रह्म-वेत्ता, । “ विद्वान् ” तो शास्त्रवेत्ता । ऐसा दोहींपरी पुरता । सद्गुरु सेवावा. ॥ २८ ॥ येथें आशंका ऐसी । शास्त्रवेत्ता काय करिसी ? । येकु ज्ञानीच बोधासी । कारण असे. ॥ २९ ॥ सकळ शास्त्रांचा मथितार्थ ।

१ अ. सर्वदा.

ज्ञान प्राप्तीसि निश्चितार्थ, । ज्ञान जालिया व्यर्थ । शास्त्रें चाड. ॥ ६३० ॥ आणि ज्ञानियाचां ठायीं । शास्त्रार्थ प्रतिबिंबती सर्वही, । ऐसें स्वमुखेंही । श्रीकृष्ण बोले. ॥ ३१ ॥

यावानर्थ उदपाने सर्वतः संप्लुतोदके ।
तावान्सर्वेषु वेदेषु ब्राह्मणस्य विजानतः ।

तरि याचा ऐसा भावो । जें कीं बोलिला देवाधिदेवो, । सर्व कीं जो वेदार्थभावो । तो ज्ञानियाचां ठायीं. ॥ ३२ ॥ हें यथार्थचि असे । सर्वही अर्थ ज्ञानींच असे, । तेथें शास्त्राचेनि सोसें । काय काज ? ॥ ३३ ॥ हें उपयोगा ज्याचें त्यासि, । परि उपयोगा नये शिष्यासि; । तेणें शरण जावें गुरूसी । जो उभयवेत्ता. ॥ ३४ ॥ आधीं शास्त्र श्रवणेंकरून । सिद्ध होय परोक्षज्ञान, । मग अपरोक्ष पूर्ण । होयेचि कीं. ॥ ३५ ॥ येणें मार्गें जो जाला, । तोचि पूर्ण ज्ञानियां भला; । येरु तो जाणा उगला । दंभिया कीं ॥ ३६ ॥ पूर्ण अपरोक्षसाक्षात्कारु, । दुसरें शास्त्रीं अति चतुरु, । तोचि जाणावा सद्गुरु । निर्धारेंसीं. ॥ ३७ ॥ तो अनुभवें साक्षात्कारु करी । परि असंभावना उठती भारी । विपरीत भावना सहस्रवरि । उठती शिष्य-चित्तीं ॥ ३८ ॥ तरि असंभावना तें काये ? । विपरीत भावना काय आहे ? । हेंही सांगों पाहें । निंवळ[1] करूनि. ॥ ३९ ॥ तरि असंभावना द्विविध, । विपरीत भावना येकविध, । येरवीं सर्वथा होय बाध । ज्ञानासि पैं. ॥ ६४० ॥ द्विविध असंभावना कैसि ? । ते ही सांगिजेल आपैसि; । "प्रमाणाऽसंभावना" येकियेसि, । नाम दुजीसि "प्रमेया" ॥ ४१ ॥ जेणें "प्रमेय" जाणिजे, । त्यातें "प्रमाण" म्हणिजे, । ब्रह्मवेदनीं प्रमाण सहजें । वेदांसि असे. ॥ ४२ ॥ ज्या महावाक्यीं ब्रह्म[2] जाणिजे, । म्हणूनि उपनिषदा प्रमाण म्हणिजे, । तया वेदांसिचि उपजे । असंभावना. ॥ ४३ ॥ वेदुचि प्रमाण होय, कीं नव्हे ? । ऐसा जो मनीं संदेह होय । त्या नांव "प्रमाणाऽसंभावना" पाहें । संशय-रूप. ॥ ४४ ॥ महावाक्यें ब्रह्मसाक्षात्कार, । उपनिषदा प्रतिपादिती साचार, । औपनिषद पुरुष थोर थोर । ब्रह्मासि म्हणती. ॥ ४५ ॥

"उपनिषद्गम्यं औपनिषदं"

उपनिषदीं पाहिजे[3] विशद, । म्हणोनि ब्रह्मासि औपनिषद । ऐसेंही जाणोनि मंद । संशय धरिती. ॥ ४६ ॥ महावाक्यें साक्षात्कार । होतसे हें

१. अ. विवळ. २. अ. ब्रह्म. ३. ब. पाविजे.

निर्धार. । अनुभवें[1] सिद्ध असतां विचार, । आन[2] मानी. ॥ ४७ ॥ पूर्वजन्मसंस्कारें । असंभावना मनीं स्फुरे, । जाल्याही ज्ञानें न सरे । संसारु हा. ॥ ४८ ॥ असो वेदासिचि अप्रमाणता । उगीचि स्फुरे जयाच्या चित्ता, । ते प्रमाणाऽसंभावना तत्वता । आन नाहीं. ॥ ४९ ॥ जेणें ब्रह्मप्राप्ति होय, । तेथेंचि जरि संशय होय, । तरि ब्रह्मप्राप्ति कैसी आहे ? । विचारिजे. ॥ ६५० ॥ दीपें वस्तु दिसत आहे, । हें स्वतःसिद्ध असें पाहें; । येकास दीपींचि संशय होय । हा दीपुचि नव्हे. ॥ ५१ ॥ म्हणून दीपातेंचि उपेक्षितु, । दीपें न पाहे सर्वथा वस्तु । त्यासि कैसा प्राप्त अर्थु ? । विचारिजे. ॥ ५२ ॥ दीप होय ऐसें जें बाणे, । दीपें वस्तु जरि पाहणें, । तरिच वस्तूसि पावणें, । येऱ्हवीं नाहीं. ॥ ५३ ॥ तैसें उपनिषदीं प्राप्त वस्तु, । ते उपनिषदींच तर्क उपजतु, । तेव्हां[3] तेणें विचारावी हे मातु । दूरि दुऱ्हावे. ॥ ५४ ॥ हे " **प्रमाणाऽसंभावना** " ऐसी, । " **प्रमेयाऽसंभावना** " परियेसीं, । प्रमेय तें ब्रह्म ऐसी । वेदवाणी. ॥ ५५ ॥ ऐसें ब्रह्म जें प्रमेय, । तेथचि उपजे संशय; । " इत्यादि बहु साधनीं जें साधनीय । तें आपण कैसें ? ॥ ५६ ॥ " जें कीं संन्यासादि साधनीं, । शास्त्राभ्यासु अनुदिनीं, । गुरुसेवा आणि आश्रमाचरणीं । नाना क्लेश; ॥ ५७ ॥ शमदमादि नाना साधनें । ज्यालागीं प्रवर्तलीं दारुणें, । तोंचि ब्रह्म मी पूर्णपणें । घडे कैसें ? ॥ ५८ ॥ इत्यादि क्लेशीं जें असाध्य, । तें मीच, कैसें सुखसाध्य ? । ऐसा संशय आति निंद्य । उपजे मनीं. ॥ ५९ ॥ जें स्वयें ब्रह्म गुरूनें दाविलें, । तेंही मीच कैसें बोले ? । विस्मयकरितु चळे । स्वरूपापासाव. ॥ ६६० ॥ हे " **प्रमेयाऽसंभावना** " । सर्वथा नाडी सज्ञानां, । या दोन्ही जालिया असंभावना । स्वरूपच्युति. ॥ ६१ ॥ ऐसें स्वरूपच्युत जालिया, । विपरीत भाव होय आपसया, । स्वरूपाव्यतिरिक्त जें कीं यया । सत्यत्वें बाणे ॥ ६२ ॥ स्वरूपाहूनि विपरीत । जे कां देहादि प्रपंचजात, । तदाकार जालिया चित्त, । ते " **विपरीत भावना** " ॥ ६३ ॥ देहादि प्रपंच सत्यत्वें घेतु । स्वरूपीं संशय मानितु; । ते विपरीत कल्पना हे मातु । करणेंचि नलगे. ॥ ६४ ॥ हे भावनाद्वय जालिया, । सर्वथा चळे स्वरूपापासूनियां; । जालेंही ज्ञान जाय वायां । प्रतिबंधें येणें. ॥ ६५ ॥ स्वरूप प्राप्तीसि प्रतिबंध । भावनाद्वयें केला सिद्ध, । मग जाल्या ज्ञान विरुद्ध । यथापूर्व होय. ॥ ६६ ॥ जालेंही ज्ञान गेलें वायां ।

---

१. **ब**. अनुभवसिद्ध. २. **ब**. अनमानी ३. **ब**. तेव्हां नेणों विचारावें हे मातु ।

जाला प्रतिबंध स्वरूप प्रकाशावया; । ज्ञानी राहे नागवोनियां । तळमळीत. ॥ ६७ ॥ ज्ञान जालयाहीवरि । ज्ञान होतांचि दूरी । भावना प्रतिबंध कैसा करी ? । अज्ञान जाय. ॥ ६८ ॥ कथि सिद्ध जालया । काय करी प्रतिबंध होऊनियां ? । ऐसी आशंका होय, परि यया । उत्तर आहे. ॥ ६९ ॥ ज्ञानाची शक्ति पुरी । तत्काळ अज्ञान दूर करी, । परि प्रतिबंध जालयावरी । सामर्थ्य कुंठे ॥ ७० ॥ अग्नि दाहकु होय, । हा जनीं अनुभवही आहे; । मणिमंत्रप्रतिबंध आहे, । जाळूं शकेना. ॥ ७१ ॥ मणिमंत्रप्रतिबंधेंकरूनि । दाहकुचि जाळूं न शके अग्नि, । तैसें असंभावना प्रतिबंधें करूनि । ज्ञानप्रभाव कुंठे. ॥ ७२ ॥ शस्त्र छेदक होय, । परि धाराबंधेंचि छेदक नव्हे, । त्याच्या प्रभावा प्रतिबंध होय, । प्रतिबंधें करूनि. ॥ ७३ ॥ तैसें ज्ञान प्रभाववंत. । अज्ञानातें छेदी निश्चित । परि प्रतिबंधें यथास्थित । अज्ञान राहे. ॥ ७४ ॥ प्रथम जें ज्ञान जालें, । तें असंभावनापूर्वकचि उपजलें । तेथें अज्ञान राहिलें । जैसें तैसेंचि. ॥ ७५ ॥ जरि भावनाविरहित होतें, । तरि अज्ञान तत्काळ नासतें । म्हणोनि भावनाद्वय तेथें । उठतीच कीं. ॥ ७६ ॥ जरी न तुटे अज्ञान । तरि जालया ज्ञानें कार्य करणें ? । जालयाही व्यर्थपणें । आलेंच कीं. ॥ ७७ ॥ जेथें अज्ञान न तुटे, । तेथें स्वस्वरूप कैचें भेटे ? । भवबंधही न फिटे । स्वरूपप्राप्तीवीण. ॥ ७८ ॥ येव्हडा घात देखोनि, । सद्गुरु कृपाळु जननी, । असंभावना शास्त्रेंकरूनि । तोडी वेगीं. ॥ ७९ ॥ भावनाद्वय तोडावयालागून । केलें पाहिजे शास्त्रश्रवण, । तिये शास्त्रीं प्रवीण । सद्गुरु पाहिजे. ॥ ६८० ॥ शास्त्रश्रवणेवांचून । न तुटती असंभावना पूर्ण, । यालागीं गुरुमुखें शास्त्रश्रवण । करावें कीं. ॥ ८१ ॥ श्रवणानंतरें मनन, । तदनंतर निदिध्यासन, । तेणें साक्षात्कारु संपूर्ण । अति दृढ होय. ॥ ८२ ॥ जेथ पुनरपि संदेह नुपजे, । तेंचि ज्ञान शुद्ध बोलिजे, । ज्ञानें आत्मप्राप्ति सहजें । असतांचि होय. ॥ ८३ ॥ तोचि मोक्षु, तेचि स्वरूपस्थिति, । जेथें असंभावनादि नुपजती, । ते शास्त्रश्रवणाची शक्ति । सद्गुरुमुखें. ॥ ८४ ॥ एक अविपन्न गुरूतें सेविति, । ते तया लक्ष्यादिकें उपदेशिति, । तेणेंचि ते श्लाघ्यता पावती । ज्ञातेपणें. ॥ ८५ ॥ आपलियानि ज्ञानें । त्रैलोक्य करिती ठेंगणें, । म्हणती वेदु ब्रह्मप्रमाणें । काय जाणें ? ॥ ८६ ॥ वेदु " नेति " म्हणोनि परतला, । शास्त्रांसि

१. ब. दुसरा चरण ब प्रतींत तिसरा आहे. २. अ. विपरीत. ३. ब. कारण.

आत्मा नाहीं कळला, । अनुभव तो वेगळा । वेदशास्त्रांसि पैं. ॥ ८७ ॥ आपुलिया ज्ञानाहूनि । ज्ञान नाहीं ब्रह्माआदि करूनि, । कोणां ज्ञान नाहीं हें मनीं । सदा त्यांचे. ॥ ८८ ॥ म्हणे हें कोणां नाहीं कळलें, । माझां गुरूनें मजचि दिधलें, । तेणेंही सांगीतलें । कर्णीं मज. ॥ ८९ ॥ हें कोणांसि न सांगावें बोलें, । हें वेदशास्त्रां नाहीं जाणवलें, । लोक सर्वही भूलले । यातें नेणती. ॥ ६९० ॥ ऐसें गुरुशिष्यपरंपरा । छेंदिती[1] शिष्या अपारा । विचारितां, ज्ञानाचा वारा । त्यां स्पर्शलाही नाहीं. ॥ ९१ ॥ ऐसियांसि शास्त्रेंवांचून । काय राहिलें त्यांचें कारण ? । त्यांची परंपराही जाण । अति अज्ञानी.॥ ९२ ॥ ते ज्ञानाभिमानें करूनि । भ्रमें पावती संसारश्रेणि, । आत्मसख तें स्वप्नीं । न देखती. ॥ ९३ ॥ अखंड विषयीं प्रीति, । गिरा ज्ञान प्रतिपादिति, । ते अति निंद्य सर्वार्थीं । कळाविद जैसे. ॥ ९४ ॥ ते बहिर्मुख सर्वथा । नेणती स्वरूपकथा, । दंभेंकरूनि उदरार्था । पसारा हा. ॥ ९५ ॥ ऐसें नव्हे ब्रह्मज्ञान, । तेथें होवावें वैराग्य पूर्ण, । विषय ते विष जाण । सर्वदा जया. ॥ ९६ ॥ गुरुचरणीं अति प्रीति, । अनिंदकु; जिज्ञासु; माति, । तोचि जाणावा सर्वार्थीं । अधिकारी येथें. ॥ ९७ ॥ सद्गुरूची स्वरूपस्थिति, । जया शास्त्रीं, स्वरूपीं प्रतीति[2], । त्यांतें सद्विद्वान् म्हणती । विबुध जन. ॥ ९८ ॥ ज्ञान उपदेशी अपरोक्ष । शास्त्रें दृढनिश्चय प्रत्यक्ष । असंभावनादि अलक्ष. । उपजलियाहीं करी. ॥ ९९ ॥ जे कीं गुरुशास्त्र नेणती, । ते शिष्यांसि कैसें बोधिती ? । असंभावना उठतां चित्तीं, । कैसे न तोडिती ? ॥ ७०० ॥ असंभावना तोडावयालागून । येक शास्त्रशास्त्रचि दारुण । तेंचि सद्गुरुमुखें श्रवण । करावें कीं. ॥ १ ॥ अन्यमुखें केलिया श्रवण । असंभावना न तुटती जाण, । संदेहचि परिपूर्ण । अधिक वाढे. ॥ २ ॥ असंभावना नुपजेचि म्हणसी । तरि देखिल्याति थोरथोरांसि, । तयावेगळें ज्ञानासि । देखिलें नाहीं. ॥ ३ ॥ असंभावनादि दोष । होताति हिरण्यगर्भ प्रमुख्य, । ते तोडावया मुख्य । शास्त्रश्रवण. ॥ ४ ॥ असंभावनादि तोडावया । वेदु बोले साधनत्रया, । श्रवण, मनन, निदिध्यासन, या । साक्षात्कारासि ॥ ५ ॥ असंभावनादि नुपजती, । तरि श्रवणादि साधन कां बोले श्रुति ? । याज्ञवल्क्य मैत्रेयीप्रति । उपदेश करी. ॥ ६ ॥

---

१. ब धंदिती. २ ब. प्रीति.

आत्मा वाऽरे द्रष्टव्यो मन्तव्यो निदिध्यासितव्यः ।

श्रोतव्य म्हणिजे श्रवण, । मंतव्यशब्दें मनन, । निदिध्यासें निदिध्यासन । अनुक्रमें बोले. ॥ ७ ॥ द्रष्टव्य तो साक्षात्कार, । ऐसा श्रुतीचा निर्धार, । ऐसा असोनि पामर । न मानिती हें ॥ ८ ॥ ज्याच्या उपदेशकाळींच असंभावना । गेल्या श्वेतकेतूच्या जाणा । तऱ्ही नवविया[1] आवर्तना । निःशेष गेल्या. ॥ ९ ॥ श्वेतकेतु[2], साधनचतुष्टयसंपन्न, । श्रद्धाळु, जिज्ञासु, सादर, पूर्ण । ऐसाही परि असंदिग्ध ज्ञान । न लाहेचि. ॥ ७१० ॥ समूळ छांदोग्यीं ययाची कथा । विचारावी पैं तत्वता, । मग सत्य अनुभवपंथा । येईल तुमच्या. ॥ ११ ॥ तें साधनचतुष्टय कोण ? । तरि सांगों नामाभिधान, । त्याचेंही सांगतां लक्षण । विस्तार होईल. ॥ १२ ॥ तरि प्रथम नित्यानित्यवस्तुविवेक, । इहामुत्रादि फळभोग विराग[3], । तिसरें शमदमादिषट्क, । मुमुक्षुता चौथी. ॥ १३ ॥ आत्मा आनात्मा वेगळे जाणणें । तया आत्मानात्मविवेक म्हणणें; । इहलोक परलोक भोगीं उपजणें । अप्रीति सदा, ॥ १४ ॥ याचें नाम इहामुत्रादि फळभोगविराग, । शमादिषट्क आईका सांग, । नाममात्राचे अव्यंग । सांगेन त्यांचीं. ॥ १५ ॥ येक शम, दम, उपरति, । तितिक्षा, समाधान, श्रद्धा चित्तीं; । यांतें शमादि षट्क म्हणती । योगीश्वर. ॥ १६ ॥ " शम " शब्दें इंद्रियनिग्रह[4] । मन बुद्धि हा समूह । यांचा करणें निग्रह । तो शम बोलिजे. ॥ १७ ॥ मनाचा विषय संकल्प, । बुद्धीचा विषय निश्चयरूप, । वरवा सेव्य विवेकदीप । बुद्धीचा हा. ॥ १८ ॥ हें वृत्तिद्वय नियमावें, । शम ऐसें यातें म्हणावें, । " दमें " ही नियमावें । बाह्य[5] इंद्रियवृत्ति. ॥ १९ ॥ बाह्येंद्रियनिग्रह कीजे, । त्यातें दम ऐसें म्हणिजे, । तरि काय नेत्र कान झांकून राहिजे ? । तैसें नव्हे. ॥ ७२० ॥ जऱ्ही इंद्रियें झांकिती । तऱ्ही इंद्रियवृत्ति विषय घेती । ते कोंडोनियां कोण प्राप्ति ? । व्यर्थचि कीं. ॥ २१ ॥ यालागीं मुख्य इंद्रियांच्या वृत्ति, । ज्या ज्या विषयोन्मुख होती, । तयां[6] विषयांची परावृत्ति । करणें सर्वदा. ॥ २२ ॥ नेत्रांची रूपोन्मुख वृत्ति, । तेचि रूपापासाव निवृत्ति, । नेत्र उघडे जरी असती, । तरी कोण बाध ? ॥ २३ ॥ श्रव-

---

१. अ. नवावर्तना. २. अ. केतु ३. ब. सम्यक. ४. ब अंतरिंद्रिय ॥ ५. ब. बाह्येंद्रियवृत्तीतें ॥ ६. ब. त्या त्यांची.

णांची श्रवणोन्मुख वृत्ति, । असच्छब्द घेवों पाहती, । तेचि नियमावी सर्वार्थी । पैरि बोलन न घडे. ॥ २४ ॥ ऐसा उवडांचि श्रवणीं । ईश्वरकथाचि प्रतिदिनीं । केलियाँ नियमनीं । दमु होय. ॥ २५ ॥ ऐसींच सकळ इंद्रियें । नियमावीं वृत्त्यान्वयें, । असत्व्यापारु इंद्रियां नये, । तें तें करणें. ॥ २६ ॥ याचें नाम "दमु" बोलिजे, । सर्व विषयांपासाव विमुख होइजे, । तेचि "उपरति" सहजें । जाणावी कीं. ॥ २७ ॥ सर्वथा विहित कर्माचा त्यागु । विधीनें कीजे अव्यंगु । तेचि "उपरति" सांगूं । जाणावी कीं. ॥ २८ ॥ दुःखाचें जें सहन । काळानुक्रमें शीतोष्ण, । तया समस्तांचें सहन । ते "तितिक्षा" बोलिजे ॥ २९ ॥ सहनें कुतुमुस मोडे, । इंद्रियदमें सुखचि वाढे, । सुखाबाहीर न पडे । तें "समाधान" ॥ ७३० ॥ गुरुवेदवाक्यीं विश्वास उपजे, । तियेचें नाम "श्रद्धा" म्हणिजे, । हें शमादि षट्क जाणिजे । तृतीय साधन. ॥ ३१ ॥ आपुली बद्धता तुटावी, । ब्रह्मता प्राप्त व्हावी; । ऐसी आवडी उपजे जीवीं, । ते "मुमुक्षुता" जाण. ॥ ३२ ॥ ऐसें चतुष्टय साधन, । येणें श्वेतकेतु संपन्न, । ऐसयावरि लक्षण । त्रिःप्रकार पाहिजे. ॥ ३३ ॥ " " श्रद्धा " सद्गुरूचां ठायीं । जिज्ञासा ब्रह्मविषयीं, । जिज्ञासा असोनि उदासता दावी । तेही व्यर्थ. ॥ ३४ ॥ जिज्ञासा तरी मनीं वसे, । ध्यावया आदर जरी न दिसे, । तरी इतुकेनि सायासें । कोण काज ? ॥ ३५ ॥ यालागीं मुख्य सादरता असावी, । हे श्वेतकेतूसि बरवी, । ऐसियासि ब्रह्मविद्या दावी । उद्दालक मुनी. ॥ ३६ ॥ उद्दालकु उपदेश करी, । परि असंभावना उठती भारी, । महावाक्य नवांवरी । उपदेश केला. ॥ ३७ ॥ तेणें निःशेष गेली असंभावना । ज्ञानियांमाजी श्रेष्ठ जाणा । परि ऐसियाही पूर्णा । उठती कीं. ॥ ३८ ॥ हिरण्यगर्भासि साधन जालें, । परि ते भावनादि नाहीं निरसले, । श्रवणादि केलें । परि गेल्या नाहीं. ॥ ३९ ॥ तेणें ब्रह्मपदाकारणें । उपासनादि तपें दारुणें । केलीं म्हणोनि पावणें । विधातिपण. ॥ ७४० ॥ प्रयत्न करितां न जातीची, । मग प्राप्त झाली हिरण्यगर्भाची, । तेव्हां असंभावना आपणचि, ।

१. ब. शब्दोन्मुख. २. ब. पर बोल नेघे. ३. अ. करावी साधकेंनि. ४. ब. सर्वही दुःखाचे. ५. ब. शमदामदि· ६. ब. ऐसा पाही. ७. ब. ज्ञान झालें. ८. श्रवणादिही साधन.

लया गेल्या. ॥ ४१ ॥ प्रथम नाना तपें आचरतां, । " श्रवणा " दि साधनें करितां, । न जातीची तत्वेता[2] । असंभावना. ॥ ४२ ॥ मग धातृत्व झालें प्राप्त, । असंभावना झाल्या भस्मांत । स्वयेंचि तो स्वरूपस्थ । जाला तेव्हां. ॥ ४३ ॥ तपोबळें जाला भोग प्राप्त, । साधनें असंभावनांचा अंत, । ब्रह्म जाहलें स्वयेंचि प्राप्त । आपणया. ॥ ४४ ॥ इत्यादि तया हिरण्यगर्भासि । काय न्यूनता होती साधनासि । किंवा अपूर्ण गुरूसि । भेटी जाली. ॥ ४५ ॥ परि ज्ञान होतां समयीं । असंभावना उठती पाहीं, । पूर्व धर्माधर्म तेही । संस्कारें जाणिजेति. ॥ ४६ ॥ बहुता काळाचा अभ्यासु । तो अन्यथा नव्हे विश्वासु, । तेणेंकरूनि भावनांशु । उठी ज्ञानीं. ॥ ४७ ॥ जरि पूर्वींच साधन बहुत जालें, । तरी प्रथमाचि असंभावनादि नाशले, । मग शुद्ध ज्ञान जालें । आत्मप्राप्तीचें. ॥ ४८ ॥ वामदेवें स्वयें आपण । श्रवणादि केलें साधन, । परि असंभावना पूर्ण । न जातीचि. ॥ ४९ ॥ उपदेश जालाही असतां । आपाद ज्ञानोंचि विचारतां । श्रवणादि साधनें करितां । गर्भप्राप्ति ॥ ७५० ॥ वामदेव जन्मकाळीं । असतां उल्बाचां मेळीं, । असंभावनांची खोली । निवोनि गेली. ॥ ५१ ॥ गर्भींच शुद्ध जालें ज्ञान, । जाला ज्ञानविज्ञानसंपन्न, । ऐसें श्रुतीचेंही वचन । वेदशीर्षीं असे. ॥ ५२ ॥ " गर्भेव वामदेवः प्रपेदे । ऐसीं बोलती उपनिषदें, । जेथें ज्ञान तेथें विरुद्धें । असंभावनादि नाहीं. ॥ ५३ ॥ यालागीं थोरांसि[3] । असंभावना अभिनव[4] निश्चयेसीं, । म्हणोनियां शास्त्राभ्यासीं । सद्गुरु पाहिजे. ॥ ५४ ॥ जेथें थोरांसि हे गति, । तेथें इदानींतन काय असती ? । निश्चयें असंभावना उपजती । संशय नाहीं. ॥ ५५ ॥ यालागीं दोहींपरी पुरता । सद्गुरु पाहिजे तत्वता, । तरिच स्वरूपनिश्चितार्थी[6] । पावतील शिष्य. ॥ ५६ ॥ यालागीं " सद्विद्वान् " म्हणणें । गुरूसि तें येणेंचि कारणें, । ऐसया गुरूतें सेवणें । निश्चयेसीं. ॥ ५७ ॥ तया गुरूप्रति जाऊन, । करावें पादुकासेवन, । अत्यादरें भजन । अनन्यगति. ॥ ५८ ॥ केवळ शास्त्रेंचि जाणती, । ते शास्त्रज्ञचि म्हणिजेती, । ते स्वरूप बोधूं नेणती । अपरोक्ष जें. ॥ ५९ ॥ यालागीं दोहींपरी पुरता, ।

---

१. ब. सावधानें. २. ब. सर्वथा. ३. ब. थोरथोरांसि. ४. ब. अभिभवी.
५. ब. थोरथोरांची. ६ स्वस्वरूप.

तोचि सद्गुरु तत्वता, । "सद्विद्वान्" ऐसें ताता । त्या तेंचि म्हणिजे. ॥७६०॥ ऐसया गुरूतें सेविती, । तेचि शुद्र ज्ञानी म्हणिजती । येर ते वाचाळ स्थिति । दंभार्थ त्यांची. ॥ ६१ ॥ बोलतसे गुरुस्थिति । श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठं इति श्रुति ॥ यदर्थीं स्वयें श्रुति । बोलतसे. ॥ ६२ ॥ दोंहींपरी जो पुरता, । तोचि सेवावा गुरु तत्वता, । ऐसें उद्धवाप्रति जगत्पिता । श्रीकृष्ण बोले. ॥ ६३ ॥ जो कीं षड्गुणैश्वर्य संपन्न, । तोचि भगवंतु श्रीकृष्ण । उद्धवाप्रति गुरु खूण । श्रीभागवतीं बोले. ॥ ६४ ॥

तस्माद्गुरुं प्रपद्येत जिज्ञासुः श्रेयमुत्तमम् ।
शाब्दे परे च निष्णातं ब्रह्मण्युपसमाश्रयम् ॥ ६ ॥

उत्तम श्रेय जें कल्याण । जें सर्व कल्याणांचें निधान । ऐसें परब्रह्म निर्गुण । तें जो इच्छी, ॥ ६५ ॥ अथवा उत्तम श्रेय जें म्हणिजे, । जो[3] मोक्षु ऐसें जाणिजे, । तो इच्छा तेणें कीजे । गुरूपसदन. ॥ ६६ ॥ ब्रह्मप्राप्तीची इच्छा आहे, । त्यास्तव गुरूप्रति जैंवें पाहें, । जो दोंहींपरी पूर्ण होय, । तोचि तो सद्गुरु ॥ ६७ ॥ शब्दब्रह्मीं निष्णात, । शब्दब्रह्म वेद निश्चित, । वेद-तत्व असे जाणत । परिपूर्ण जें. ॥ ६८ ॥ न जाणतां वेदतत्व, । असं-भावनादि संशय पदार्थ । न तोडिविति यथार्थ । शास्त्रसिद्ध. ॥ ६९ ॥ तैसाच परें[6] ब्रह्मणि निष्णात ऐसें । अपरोक्षानुभव समरसें । यावांचूनि अपरोक्षानु-भव कैसें । शिष्यासि करील ? ॥ ७७० ॥ तो ब्रह्मनिष्ठ कैसा जाणिजे ? । जो उपशमासि आश्रय साजे, । तोचि तो सहजें । ब्रह्मनिष्ठ. ॥ ७१ ॥ ऐसा दोंहींपरी पुरता, । तोचि तो सद्गुरु तत्वता । ऐसें बोले विश्वपिता । नारदमुखें. ॥ ७२ ॥ तैसेंचि भगवद्गीतेसींही श्रीभगवंतु । अर्जुना प्रति असे सांगतु । जो दोंहीं ठाईं निश्चितु । तोचि गुरु सेवी. ॥ ७३ ॥

तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन, सेवया, ।
उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ॥ १ ॥

ज्ञानी आणि तत्वदर्शी । दोनी पदें बोले हृषीकेशी, । वेदतत्वज्ञ तो ज्ञानी, ऐसी । प्रसिद्धि असे. ॥ ७४ ॥ तत्वदर्शी म्हणिजे ब्रह्मनिष्ठ, । अपरोक्षानुभवें वरिष्ठ, । तो सेवावा ऐसें स्पष्ट । श्रीकृष्ण बोले. ॥ ७५ ॥ तया गुरूप्रति

---

१. ब. ही ओंवी नाहीं. २. ब. पक्षीं. ३. ब. तो. ४. ब. जाऊं. ५. अ. तोडवेसि. ६. ब. पर. ७ ब. तत्व.

विधीकरून । साष्टांग करावें नमन । आणि निःकपट सेवन । सर्वदा भावें. ॥ ७६ ॥ अति नम्रता करावा प्रश्न, । जेणें न क्षोभे अंतःकरण, । मग कृपा करूनि ब्रह्मज्ञान । उपदेशितील. ॥ ७७ ॥ ते उपदेशिती तें [1]ब्रह्म-ज्ञान । ऐसें बोले नारायण । येणं वचनें अर्जुन । बोधिला स्वयें. ॥ ७८ ॥ ऐसें स्वमुखें श्रीपति । बोले स्वभक्त पार्थाप्रति, । हाचि सिद्धांत सर्वार्थी । वेद-शास्त्रांचा. ॥ ७९ ॥ म्हणूनि दोंहींपरी परिपूर्ण, । तोचि सद्गुरु संपूर्ण । दोन्हीं पदें बोले यदुनंदन । येणेंचि अभिप्रायें. ॥ ७८० ॥ अपरोक्षानुभवाकारणें । तत्वज्ञ असावा सर्वस्वपणें, । असंभावनादि निरसणें । म्हणोनि वेदज्ञ बोले. ॥ ८१ ॥ तोचि अभिप्राय आचार्यांचा । म्हणोनि " सद्विद्वान् " म्हणे वाचा, । यदर्थी संशयाचा । लेशुही न धरणें. ॥ ८२ ॥ ऐसिया गुरूप्रति जाऊनि । निरंतर भजावें अनुदिनीं । शुद्ध भावेंकरूनि । कायवाङ्मानसें. ॥ ८३ ॥ यया कारणें सर्वथा । सद्गुरु पक्षद्वयें पुरता । सेविलिया तत्वता । शिष्य तैसाचि होय. ॥ ८४ ॥ ऐशिया गुरूप्रति जावें, । त्याचें भजन एकाग्र करावें, । अनुदिनीं सेवावें । चरणद्वय. ॥ ८५ ॥ अंतरीं ध्यान सद्गुरूचें, । मंत्ररूप नामोच्चारण त्याचें, । व्यापार जे जे मनाचे । तद्रूपेंचि करणें. ॥ ८६ ॥ सर्वदा अनुराग चित्तीं, । गुरु सेवे परम प्रीति, । गुरूवांचूनि विश्रांति । जयासि नाहीं. ॥ ८७ ॥ साक्षात् [2]गुरु ब्रह्ममूर्ति । येणं येकत्वें अनन्य गति, । गुरुचरणीं विरामती । मनादिकें ज्यांचीं. ॥ ८८ ॥ जो जो पदार्थ दृष्टीं पाहे, । तो तो जया सद्गुरुचि आहे, । सर्वांचे वास्तव स्वरूपचि होय । अंतर्यामी-पणें. ॥ ८९ ॥ ऐसें हें सांगतां बहुत, । गुरुसेवा असे अपरिमित. । ते श्रद्धाचि उपजवित । अनेक भजन. ॥ ७९० ॥ तैसेचि बाह्य सेवा करी, । उगा न राहे क्षणभरि, । तें एकैक सांगतां विस्तारीं । जाईल ग्रंथ. ॥ ९१ ॥ गुरु जननी, गुरु पिता, । गुरु सर्वस्व, कुळदेवता, । गुरूपरता सर्वथा । मंत्रादि जो नेणें ॥ ९२ ॥ कर्म, धर्म, देवतार्चन, । अग्निहोत्रादि यज्ञदान । जप, तप, तीर्थाटन, । गुरुचरण ज्यांसि. ॥ ९३ ॥ जयाचा मनोधर्म । नेणे गुरूवेगळें काम, । गुरुभजनें निष्काम, । सर्वदा जो. ॥ ९४ ॥ गुरूपरतें देवतांतर । न स्पर्शे जयाचें अंतर, । स्पर्शलिया व्यभिचार । परम मानी ॥ ९५ ॥ जैसें पतिव्रतेचें अंतर । कदापि न स्पर्शे पुरुषांतर, ।

---

१ ब. ब्रह्म जाण. २. ब. साक्षाद् ब्रह्म गुरुमूर्ति.

स्पर्शलिया व्यभिचार। तिये जैसा. ॥ ९६ ॥ नाना प्रेमाथिलेनि भक्तें। न स्पर्शे देवतांतरातें, । कीं औरस आणिकातें। पितृत्वें न भजे. ॥ ९७ ॥ ऐसा जो अनन्यगति, । अनिंदकु, अनुरूप सर्वार्थीं, । हेचि गुरुसेवेचि स्थिति, । सर्वदा जया. ॥ ९८ ॥ ऐसें हें गुरुचरणभजन। घडे, तोचि कृतकृत्य जाण, । अवांतर फळ ब्रह्मज्ञान। तें न अभ्यासितां साधे. ॥ ९९ ॥ आणिकही शिष्याचें लक्षण। श्रीभगवंतू बोले आपण, । जें एकादशीं निरूपण। तेंचि आइका; ॥ ८०० ॥ गुरु ज्ञानद्वयीं पुरता। जो उपशमाश्रयत्वें[1] तत्वता । येहीं लक्षणीं आळंकृतता। द्योतिली त्याची ॥ १ ॥ तैसेंचि शिष्याचें परि लक्षण। संक्षेपें कीजेल कथन. । श्लोकद्वयें निरूपण। केलें असे. ॥ २ ॥ तोचि तें श्लोकव्याख्यान। एकाग्र कीजे [2]श्रवण, । उद्धवाप्रति श्रीभगवान्। जें कीं बोलिलें. ॥ ३ ॥

अमान्यमत्सरो दक्षो निर्ममो दृढसौहृदः ।
असत्वरोऽर्थजिज्ञासुरनुसूयुरमोघवाक् ॥ १ ॥
जायापत्यगृहक्षेत्रस्वजनद्रविणादिषु ।
उदासीनः समं पश्यन् सर्वेष्वयमिवात्मनः ॥ २ ॥

"अमानी" म्हणिजे मान शून्य, । न पाहे कवणाचा मानापमान, । आणि सर्वांसीं मत्सरहीन। समता बुद्धि. ॥ ४ ॥ "दक्ष" शब्दें अनलस। ज्यांसि सर्वदा[3] नाहीं आळस, । गुरुसेवेसि सावकाश। श्रद्धाळूपणें. ॥ ५ ॥ जायापुत्रादिकांचां ठाईं। जया सर्वथा ममता नाहीं, । येणें वैराग्यें निश्चयीं। ब्रह्मत्वालागीं ॥ ६ ॥ जायादिकांचा स्नेह धरी, । तो एकाग्र गुरुसेवा काय करी ? । गुरुसेवे शैथिल्य अंतरीं, । तेव्हां ज्ञान कैचें ? ॥ ७ ॥ यालागीं जो अति विरक्तु। तोचि गुरुसेवे दृढव्रतु। गुरुसेवोनी प्राप्त्यर्थु। स्वस्वरूपाचा. ॥ ८ ॥ यालागीं वैराग्यें अति पुरता। त्यासीच ब्रह्मविषयीं योग्यता। ऐसीच संमति आतां। सांगिजैल. ॥ ९ ॥

अयमधिकारी संसारानलसंतप्तः प्रदीप्तशिरा जल।
राशिमिव उपहारपाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठं गुरुमुपसृत्येति ॥

गुरुचां ठायीं स्नेह पूर्ण, । त्याव्यतिरिक्त नेणें सुहृद जन, । माता, पिता, सर्व सज्जन। सद्गुरु जया. ॥ ८१० ॥ गुरूपरतें स्नेहालागीं। जया दुजें नुरेचि

१. ब. उपश्रय तत्वता. २ ब. चित्तें. ३ ब. सर्वथा. ४ ब. वेगळें.

जगीं, । तोचि दृढ सौहृद यया भोगीं । बोलिला कीं ॥ ११ ॥ असत्वर म्हणिजे सावधान । जया नाहीं व्यग्रपण, । अर्थ शब्दें ब्रह्म पूर्ण । त्याची जिज्ञासा जया, ॥ १२ ॥ तो बोलिजे अर्थजिज्ञास, । इतर विषंई सर्वदा उदास । अनुसूय सावकाश । आयका आतां; ॥ १३ ॥

" परगुणदोषाविष्करणमसूया " ॥

इतरांच्या गुणांचां ठायीं । जो नसता दोष आरोपी पाहीं, । ते असूया सर्वत्र सर्वांहीं । बोलिली असे. ॥ १४ ॥ ते नसे जयापाशीं, । गुणचि आरोपी दोषांसि. । तो अनसूय निश्चयेसीं । जाणावा कीं. ॥ १५ ॥ अमोघवाक् म्हणिजे सत्यभाषी, । अनृत नाहीं वाचेसि, । व्यर्थालाप एकेही दिवशीं । असेचिना. ॥ १६ ॥ येहीं लक्षणीं पुरता । तोचि सच्छिष्य तत्वता, । इतर लक्षणें बोलतां । विस्तारु होईल. ॥ १७ ॥ ऐसिया शिष्यें अनन्यगति । निरंतर सेवावी गुरुमूर्ति, । तेणेंचि फळेल सर्वार्थीं । ब्रह्मविद्या. ॥ १८ ॥ ऐसा प्रसन्न करूनि सद्गुरु । यांचावा प्रसाद थोरु । एकाक्षरब्रह्मविचारु । अर्थावा कीं. ॥ १९ ॥ याचें व्याख्यान ऐसें; । एकाक्षरब्रह्म ॐकारु असे; । तो प्राप्त होय जेणें मिसें । तो उपाय कीजे. ॥ ८२० ॥ संन्यासधर्मु ऐसा, । ॐकारु जपु सहस्त्रद्वादश । करावा सावकाश । प्रतिदिनीं. ॥ २१ ॥ यालागीं यांचूनियां सद्गुरूसि, । प्रणवु प्रात सायासीं । करूनियां प्रतिदिवशीं । जपु करावा. ॥ २२ ॥ यांचूनियां प्रणवासि । संन्यासग्रहणवाक्येसीं । करावें यया भावासि । अर्थ येतसे. ॥ २३ ॥ दुसरा अर्थु ऐसा । एकाक्षर ब्रह्म ॐकारु भरंवसा । अर्थविचारु मानसा । आणावा कीं. ॥ २४ ॥ तया ॐकाराचा अर्थांश । मागां निरूपिला सावकाश । तो येथ लिहावयास । प्रयोजन कायि ? ॥ २५ ॥ अथवा एकचि जें ब्रह्म । अक्षर, अविनाशी, परम । व्यापक, पूर्ण, विश्राम । यांचावें गुरूसि ॥ २६ ॥ ब्रह्म यांचिलियानंतरें । प्रसन्न होऊनि सद्गुरुवरें । महावाक्य निर्धारें । उपदेशिजे. ॥ २७ ॥ जें चतुर्वेदांचा मस्तक, । तें उपनिषद् सम्यक । तयामाजी महावाक्य । मिरवे जें कां. ॥ २८ ॥ जें कीं पडतांचि श्रवणीं । अपरोक्षानुभवें तत्क्षणीं । स्वयेंचि ब्रह्मत्व आणी । श्रवणमात्रें. ॥ २९ ॥ येथें कोणी ऐसें ह्मणताति । शब्दें कैसी अपरोक्ष प्राप्ति ? । शब्दें परोक्षज्ञानगति । होय

---

१ अ. भंगीं. २. अ. यांचा हा. ३. अ. वांचूनियां. ४. द. सम. ५. ब. परम.

हें साच. ॥ ८३० ॥ तरि याचें आयका उत्तर. । जें बोलिजेल अति सुंदर. । जेणें संदेह जाऊनि सार । तत्वप्राप्ति. ॥ ३१ ॥ तरि जे वस्तूचें नाम येतां । तदाकारता होय चित्ता. । दूरस्थियाही पदार्था । स्मरण देतसे. ॥ ३२ ॥ नाहो हें ऐसें कैसें? । नानाकारें स्मृति होतसे. । स्मृति ते परोक्ष ज्ञान ऐसें । न म्हणतां सिद्ध. ॥ ३३ ॥ हा नव्हे अपरोक्षानुभव । हे स्मृति परोक्ष भाव. । काशी म्हणतां ती स्वयमेव । स्मृतिचि होय. ॥ ३४ ॥ जैसी असे वाराणसी, । तैसीच स्मृति होय मानसीं. । तरि प्रत्यक्ष दिसे ऐसी । सिद्धता नव्हे. ॥ ३५ ॥ तरि महावाक्यें अपरोक्षता. । हें तंव न घडे तत्वता । स्मृतिमात्रें परोक्षता । ज्ञान होय. ॥ ३६ ॥ अपरोक्ष शब्दाचा मुख्यार्थ । जे दुसरा नाहीं पदार्थ, । तेथें कैचें होईल दूरस्थ! । व्यवधानही नाहीं. ॥ ३७ ॥ आपणावेगळें दुसरें । परोक्षत्वें जेथें नस्फुरे । तेंचि अपरोक्ष सर्व प्रकारें । जाणावें कीं. ॥ ३८ ॥ येक अपरोक्ष जें इंद्रियग्राह्य । तेंचि प्रत्यक्ष म्हणती सबाह्य, । गोचर नव्हे तें गुह्य । दूरस्थपणें. ॥ ३९ ॥ परि मुख्य अपरोक्ष ऐसें । जें कीं पूर्वीं निरोपिलें असे । तें आत्मस्वरूप नावकाशें । जाणावें कीं. ॥ ८४० ॥ ऐसें जें स्वयें आपण । प्रत्यक्ष अव्यवधानीं दुजेनवीण । जया पाहणें न लगे स्मृतीविहीन. । जें, तें अपरोक्ष. ॥ ४१ ॥ यदर्थींही वाक्य असे, । तेंही परियेसा सावकाशें, । अपरोक्षानुभव ऐसें । जें कीं बोलिलें. ॥ ४२ ॥

अनुभवो नाम स्मृतिव्यतिरिक्तं ज्ञानम् ।

स्मृतिव्यातिरिक्त जें ज्ञान । सर्वदा अखंडदंडायमान. । तेंचि अनुभव वृत्ति अपरोक्ष जो. ॥ ४३ ॥ तरि शब्दें स्मृतिमात्र होय. । परि ऐसा अनुभव नव्हे; । यालागीं शब्दें परोक्षज्ञान हें । घडेचि कीं. ॥ ४४ ॥ हो वरवें बोलिलेति । शब्दें होय परोक्ष प्राप्ति । तद्रूपेंचि होय स्मृति । मनासि पैं. ॥ ४५ ॥ मनें देखिला जो पदार्थ, । अथवा श्रवणें जो श्रवणार्थ, । स्मृति तदाकारें यथार्थ । तैसीच होय. ॥ ४६ ॥ जेथें मनाचें खुंटे जाणणें । तेथें अपरोक्षानुभवें कोणें भोगणें ? । शब्दें अपरोक्षचि हें स्वस्वपणें । अवटमान. ॥ ४७ ॥ येथ एक असे विचार । तोहि आयका सविस्तर, । यथार्थ होय तुमचें उत्तर । परि परिहार ऐसा. ॥ ४८ ॥ जो जो

---

१ अ. न म्हणतां सिद्ध ? । २. ब. कोण भणें ?

मनें जाणिजे पदार्थ, । तो तो जाणावा बाह्य अर्थ । पदार्थनामें तत्स्मृति यथार्थ । घडेचि कीं. ॥ ४९ ॥ मनासि नाहीं अंतर जाणणें । बाह्य पदार्थचि सर्वस्वपणें । स्फुरे आणि अनुभवें जें येणें । सत्य जाण. ॥ ८५० ॥ नाहीं मनें अंतर्बाह्य जाणणें । ऐसी प्रसिद्धि बोलिजे जनें । अनुभवेंही विचारितां मनें । प्रत्यया येतसे. ॥ ५१ ॥ आणि तुम्ही म्हणतां बाह्यचि जाणे, । अंतरीं सर्वथा कांहींच नेणे, । ऐसें घडे प्रयोजनें कोणें ? । तें निरूपिजे. ॥ ५२ ॥ तरि आयका याची संमति, । जे कीं स्वयें बोले श्रुति, । जे इंद्रियें बाह्याचि जाणती । परि अंतर नेणें. ॥ ५३ ॥

पराञ्चि खानि व्यतृणत्स्वयंभूस्तस्मात्पराङ्पश्यति नांतरात्मन् ॥

स्वयें स्वयंभू आपण । मनादि सकळ इंद्रियें जाण । बहिर्मुखचि निर्माण । करिता जाला. ॥ ५४ ॥ म्हणोनि अंतर नेणती सर्वथा । यालागीं ब्रह्मसाक्षात्कारु तत्वता । मनादि इंद्रियां समस्तां । न घडे कीं, ॥ ५५ ॥ यालागीं मनाची जे स्मृति; । ते नव्हे अपरोक्षानुभवप्राप्ति । मनादि अंतर नेणती । आत्मस्वरूप. ॥ ५६ ॥ जें कीं गौण अपरोक्ष । तें इंद्रियांसि होय प्रत्यक्ष, । तें बाह्य पदार्थचि अक्ष । ग्रहण करिती. ॥ ५७ ॥ यालागीं मनें [3]जें घेइजे । ते बाह्य पदार्थ अपरोक्ष जे । ते तंव अपरोक्ष नव्हिजे । यथार्थीचि. ॥ ५८ ॥ जें मनादि इंद्रिय-गृह्यमाण । तें मायामनोमय नश्वरें जाण । ऐसें उद्धवाप्रति श्रीकृष्ण । बोलती स्वयें, ॥ ५९ ॥

यदिदं मनसा वाचा चक्षुर्भ्यां श्रवणादिभिः ।
नश्वरं गृह्यमाणं च विद्धि मायामनोमयम् ॥ २ ॥

म्हणोनि शब्दें परोक्ष घडे, । परि अपरोक्ष कदा न घडे । तरि तें परोक्ष परोक्षासिच घडे । आत्मयासि नव्हे. ॥ ८६० ॥ जे जे कीं बाह्य पदार्थ । ते ते सर्वही परोक्ष अर्थ, । म्हणोनि मुख्य अपरोक्षत्व । आत्मयासिच घडे. ॥ ६१ ॥ आत्मा अपरोक्ष, सर्वदा संत, । व्यापक, परिपूर्ण, अखंडित, । त्यासि वाक्य करी अपरोक्षत्व । काय अपूर्व ॥ ६२ ॥ शब्दें परोक्ष वस्तूची होय स्मृति, । अपरोक्षवस्तूची अपरोक्ष प्राप्ति, । येथेंही वेदसंमति । परियेसिजे; ॥ ६३ ॥ शब्दादेव अपरोक्षधीः । ऐसें श्रुति सदा बोधी । यालागीं मनाव्यतिरिक्त

---

१. ब. हें. २. अ. ऐसी प्रसिद्ध. ३. ब. जें जें जाणिजे । ४. ब. ग्राह्यमाण. ५. ब. नश्वर.

सिद्धि । आपेंआपणेंची. ॥ ६४ ॥ म्हणोनि शब्दें अपरोक्ष आत्मा । ऐसें बोले वेदु महात्मा, । अपरोक्षानुभव हे महिमा । शब्दासि साजे. ॥ ६५ ॥ तेंचि शब्दरूपें वेदशिर, । जेथें महावाक्याचा विचार, । जेणें आत्मा गोचर । आपणाचि होय. ॥ ६६ ॥ तो अपरोक्ष सदा असे, । परि अज्ञानें परोक्ष जाला दिसे, । तें अज्ञान महावाक्यासरिसें । देशधडी होय. ॥ ६७ ॥ जेणें केलें व्यवधान । तें नाहींच होय अज्ञान, । मग स्वयें अपरोक्ष आप-आपण । सिद्धचि होय. ॥ ६८ ॥ ऐसें जें श्रुतिशिर महावाक्य । तें आइकावें सम्यक । हेंचि गुरुसेवेचें सार्थक । फळलें होय. ॥ ६९ ॥ तरि तें महावाक्य कोण?[1] । त्याचें कैसें स्वरूपलक्षण? । तयाचेंही विवरण । प्रसंगें करूं. ॥ ८७० ॥ तरि चहूं वेदीं महावाक्यें बोलिलीं । तीं पाहिजेति यतीस उपदेशिलीं जो ज्या शाखेचा तो तेथिलीं. । वाक्यीं आधीं बोधावा. ॥ ७१ ॥ इतरें हीं वाक्यें शाखानुसारें । प्रथम श्रवण करावें आदरें । मग दृढतरबोध इतरें । आकर्णावीं. ॥ ७२ ॥ बोधूनियां इतर । वाक्यीं प्रबोधावा दृढतर । चहूं वाक्यांचा प्रकार । सांगों कांहीं. ॥ ७३ ॥ परंतु सर्वत्र प्रगट सामवेदींचें । "**तत्त्वमसि**" वाक्य जें साचें । हें आयकावें गुरुमुखींचें । अत्यादरें. ॥ ७४ ॥ येथें तार्किक ऐसें म्हणताति । हें महावाक्य नव्हे सर्वार्थी; । तयाची लक्षणोक्ति । आइका आतां. ॥ ७५ ॥ महावाक्य तयातें म्हणती । जेथें सामग्रीत्रय वर्तती. । **आकांक्षा, अनुकूलता, संनिधि** इति । पदार्थत्रय. ॥ ७६ ॥ या त्रयांचें काय लक्षण? । तेंही सांगों विशद करून । "**आकांक्षा**" पद संपूर्ण । आधीं आइका. ॥ ७७ ॥ **आकांक्षा** म्हणिजे ऐसें । दुसरिया पदाची अपेक्षा असे, । तरिच अर्थु सावकाशें । येतसे ऐकूं. ॥ ७८ ॥ **तत्पद** प्रथम बोलिलें. । तेणें कोणे अर्थातें सूचविलें? । कांहीं न कळत गेलें । येकलेंचि पद. ॥ ७९ ॥ तेणें दुसरिया पदाची । आकांक्षा केली साची; । तेथें **त्वं**पदप्राप्तचि । जालें सहजें. ॥ ८८० ॥ "**तत्त्वं**" पदें दोनी । प्राप्त जालीं अर्थ दोनीं, । तथापि अर्थु वाणी । बोलतां नये. ॥ ८१ ॥ दोहीं पदीं मिळोन । होवात्रया अर्थ ग्रहण, । तिसरें पद आपण । अपेक्षिलें. ॥ ८२ ॥ जेव्हां असिपद तिसरें । प्राप्त जालें येकसरें, । तेव्हां अर्थ-

1. ब. आपणासिचि.

पुरःसरें। वाक्य जालें. ॥ ८३ ॥ येक पद उच्चारितां । अर्थ सिद्ध नव्हे तत्वता, । तें करी अपेक्षता । दुसरियाची. ॥ ८४ ॥ दोहीं नव्हे अर्थसिद्धि । ते तिसरियाचि अपेक्षा साधी. । तिहीं पदीं कार्यसिद्धि । होत असे. ॥ ८५ ॥ हेंचि दृष्टांतमुखेंकरून । सांगिजेल विशद जाण; । करूनी एकाग्र अंतःकरण । परियेसा बापा. ॥ ८६ ॥ "**गामानय शुक्लां दण्डेन**" । ऐसें वाक्य असे संपूर्ण, । याचा अर्थ शुक्ला धेनूचें आनयन । दंडें बोलिलें. ॥ ८७ ॥ तेथें एकचि पद "**गां**" ऐसें । बोलिलिया काय साधतसे ? । म्हणोनि तें अपेक्षा करीतसे । दुसरियाची. ॥ ८८ ॥ दुसरें पद "**दंडेन**" । उच्चारितां काय प्रयोजन ? । म्हणतां **गां दंडेन** । काय साधे ? ॥ ८९ ॥ दोन्हीं पदें मिळून । अपेक्षितीं तृतीय स्थान । "**आनय**" पदें संपूर्ण । अर्थसिद्धि. ॥ ९० ॥ याचें नाम "**आकांक्षा**" होय. । तयावेगळें वाक्यचि नव्हे, । "**अनुकूलता**" पाहें । सांगों आतां. ॥ ९१ ॥ अनुकूलता नसतां जाण । वाक्यचि तें अप्रमाण, । तेंचि तें अनुकूलतालक्षण । सांगिजेल. ॥ ९२ ॥ मागिलिया पदासि अनुकूळ । तेंचि अनुकूळता सफळ । तैसें सामर्थ्य सकळ । असावें कीं. ॥ ९३ ॥ दंडें गोचें आनयन । हें पूर्व पदासि अनुकूल पूर्ण, । आणि आणावया लक्षण । सामर्थ्य असे. ॥ ९४ ॥ अग्निकरूनि आणीं म्हणतां । यासि नाहीं सामर्थ्यता, । पूर्वपदेसि अनुकूलता । तेही नाहीं. ॥ ९५ ॥ **आनय** शब्द तरी होय, । परि अग्नीसि सामर्थ्य काये ? । हें अनन्वित आहे । म्हणोनि वाक्य नव्हे. ॥ ९६ ॥ "**वृक्षमग्निना सिंचत**" म्हणतां । येथ काय वडे अनुकूलता ? । म्हणोनि वाक्यासि प्रमाणता । कदा न वडे. ॥ ९७ ॥ "**जलेन सिंचत**" म्हणतां । सामर्थ्य वाणे तत्वता, । तसें दंडेन आनयनता । सामर्थ्य वडे. ॥ ९८ ॥ याचें नांव अनुकूलपण; । "**संनिधि**" तेही सांगेन, । पदा उपरि उच्चारण । दुसरियाचें करावें. ॥ ९९ ॥ एका पदाजवळि । दुसरें उच्चारावें तत्काळीं । तरिच परस्पर पदमेळीं । वाक्य होय. ॥ १०० ॥ प्रथम "**गां**" ऐसें उच्चारिलें । वरि मौन, कां आणिक बोलिलें; । मुहूर्तानंतरें उच्चारिलें । "**दण्डेन**" म्हणोनि. ॥ १ ॥ मागुता प्रलाप करूनि । "**शुक्लां**" वोले वचनीं; । प्रलापूनि घटका दोन्ही । "**आनय**" म्हणे. ॥ २ ॥ येणें काय वाक्य होईल ? । किंवा

अर्थ दुसरियासि कळेल ? । तें वाक्यचि नव्हे, फोल । बोलणें तें. ॥ ३ ॥ यालागीं "**आकांक्षा**," "**अनुकूलता**," । "**संनिधि**" तृतीय तत्वता । असलिया, वाक्यता । घडे तयासि. ॥ ४ ॥ हें महावाक्याचें लक्षण, । तैसेंचि **तत्त्वमसि** जाण । **तत्पदें आकांक्षा** पूर्ण । दुसरियाची केली. ॥ ५ ॥ **त्वं**पदहीं जाहलें प्राप्त । तरी नये तयाचा अर्थ, । **असि**-पदें झालें सार्थ । वाक्य पूर्ण. ॥ ६ ॥ म्हणोनि सामग्रीत्रय असे; । तिहीं महावाक्य होय सर्वांशें । तें आयकावें सावकाशें । सद्गुरुमुखें. ॥ ७ ॥ चतुर्वेदांचीं वाक्यें लिहिजेति । परि महाराष्ट्र असे भारती । यतिधर्म उच्छेदिती १ सर्वा श्रुतपणें. ॥ ८ ॥ यालागीं जें बहु प्रगट असे । तेंचि वाक्य लिहिलें असे. । चतुर्वेदींचीं वाक्यें विशेषें । श्रवण करावीं. ॥ ९ ॥ द्वितीय श्लोक संपलियावरी । तृतीय कैसा प्रबोध करी । तेंही व्याख्यानरूपें परि । प्रकट कीजेल. ॥ १० ॥

> वाक्यार्थश्च विचार्यतां श्रुतिशिरःपक्षः समाश्रीयतां
> दुस्तर्कात्सुविरम्यतां श्रुतिमतस्तर्कोनुसंधीयताम् ।
> ब्रह्मास्मीति विभाव्यतामहरहर्गर्वः परित्यज्यतां
> देहोऽहंमतिरुज्झतां बुधजनैर्वादः समुत्सृज्यताम् ॥ ३ ॥

आइकिलें जें महावाक्य । तयाचा अर्थ सम्यक् । विवरावा पदार्थपूर्वक । स्वानुभवें. ॥ ११ ॥ ना हो वाक्यार्थ असे मुळीं । तेथ पदार्थज्ञानाची कैची बोली; । तरि हा अर्थ समूळीं । निरूपिजो. ॥ १२ ॥ तरि तयाचा अर्थ आइका । सांगिजेल अति निका । पदार्थ ज्ञान आंवाका । ऐसा असे. ॥ १३ ॥ महावाक्याचीं तीन पदें । तीं आयकावीं अतिविशदें । अर्थेंसहित बिंदूगदें (?) । सांगिजेति. ॥ १४ ॥ येणें ब्रह्मविद्याच कीजेल उघडी । तियेचि आयका परवडी । वेंचितांही लक्षकोडी । प्राप्त जे नव्हे. ॥ १५ ॥ तेंचि सद्गुरुप्रसादलब्धें । प्रगट कीजेल तेणेंचि बोधें । तें परिसावें आनंदें । संतजनीं. ॥ १६ ॥ "**तत्**" "**त्वं**" आणि "**असि**" । पदत्रयांची बोळखी ऐसी । पदद्वय अर्थिलिया ऐसी । वाक्यार्थप्राप्ति. ॥ १७ ॥ हें पदद्वय अर्थिलियावांचून । वाक्यार्थ न ब्राणे जाण. । याव्यतिरिक्त तो दुराभिमान । वाक्यज्ञ म्हणविती. ॥ १८ ॥ नाहीं पदार्थाचें ज्ञान, । म्हणती वाक्य

सज्ञान, । त्यांचें ज्ञान तें अनुमान । परि अपरोक्ष नव्हे. ॥ १९ ॥ अगा पदार्थज्ञानेंविण । सर्वथा वाक्यार्थ बिंबे न जाण; । पदत्रयांचें अनुसंधान । तेंही न कळे. ॥ ९२० ॥ पदार्थज्ञान कासया म्हणिजे? । वाक्यार्थ कासया बोलिजे? । अनुमानें दोन्ही नेणिजे । सर्वथा पैं. ॥ २१ ॥ तरि तें आयका याचें उत्तर । सार्थ बोलिजेल परिकर । तेंचि तें मनोहर । बोधलेपणें. ॥ २२ ॥ **तत् त्वं** या पदद्वयासि । पदें बोलिजति परियेसीं, । ययांचा अर्थ तो पदार्थ ऐसी । संज्ञा जाली. ॥ २३ ॥ **असि** पद तें मुख्य वाक्य । हा जाणावा येथींचा विवेक, । पदद्वयांचा अर्थ सम्यक् । जाणणें आधीं. ॥ २४ ॥ पदार्थ अनुभवें जाणणें । पदार्थज्ञान त्यातें म्हणणें । हें बोधिलिया वाक्यार्थखुणे । बुझे आपैसया. ॥ २५ ॥ तरि तच्छब्दें ईश्वर बोलिजे । जो कीं सर्वांचा साक्षी सहजें । मायोपाधि चैतन्य कीं जें । तें तत्पदें वाच्य. ॥ २६ ॥ **त्वं**शब्दें जीव बोलिजे, । जो तत्प्रतिबिंबचि सहजें, । जीवोपाधि सुजे । जयांचा ठाईं ॥ २७ ॥ **त्वं**पद तत्पदाचें लक्षण । पूर्वग्रंथीं केलें जाण, । साक्षी बोलिला चिद्‌घन । तये प्रसंगीं. ॥ २८ ॥ जो कीं प्रतिबिंबाभास । बुद्धिउपाधि सावकाश । अंतःकरण समरस । जाला जो कां. ॥ २९ ॥ **त्वं**पदें जीवु बोलिजे, । त्यातेंचि तूं ऐसें म्हणिजे; । ऐसा हा निर्धार कीजे । महावाक्यें. ॥ ९३० ॥ नाहो हें विपरीत कैसें । "तें तूं" चि बोलिलें ऐसें? । परि तूं तें कां सावकाशें । न बोलेचि? ॥ ३१ ॥ जो ब्राह्मण भ्रष्टला असे । तयातें बोधित असे ऐसें । तूं ब्राह्मणचि अनारिसें । नव्हे जाण. ॥ ३२ ॥ परि ब्राह्मण जो तूं आहेसि । ऐसें कोणी न उपदेशी, । तरि येथें विपरीत ऐसी । गोठी कां केली? ॥ ३३ ॥ तरि ऐका याचा चमत्कार । येथें सूक्ष्म असे विचार । बोलिला असे अतिचतुर । निगमरावो. ॥ ३४ ॥ तूं तें म्हणतां परोक्ष होईल, । बुद्धि परोक्षाची स्फुरेल, । अनुसंधान निराळें पडेल । आपणाहूनि. ॥ ३५ ॥ "तूं तें" चि म्हणतां परदृष्टि । वेगळी पडेल परोक्षभेटी । आपणचि ध्यातां ध्येय व्यक्ति । होय म्हणोनि. ॥ ३६ ॥ म्हणोनि वेदु ज्ञातयां रावो । ऐसा चिंतिला घटका । जेणें स्वयें अपरोक्षभावो । आपणेशींच होय. ॥ ३७ ॥

तें तूं ह्मणतां आपणेशीं । स्थिति बाणे अपरोक्ष ऐसी, । वेगळेपणें बुद्धि कैसी । प्रतिस्फुरेल ? ॥ ३८ ॥ जेणें आपणच्चि ब्रह्म ऐसें जाणणें । तैसेंचि बोधिती वेदवचनें । परि परोक्षत्वें दूरि पडणें । ऐसें न करीचि. ॥ ३९ ॥ आणिकही येथींचा विचार । तोही ऐका चमत्कार थोर । प्राप्त जाला जो आणिक प्रकार । तोचि तो निवडला. ॥ ९४० ॥ व्यापक होऊनियां परोक्षपण । ईश्वरासि स्वयें मानिलें जाण । आणि जीवासि आलें परिच्छिन्नपण । अविद्यासंबंधें. ॥ ४१ ॥ आपलें जीवित्व अपरोक्ष भासे, । [1]आपणा आपण परिच्छिन्नत्व दिसे, । तें परिच्छिन्नत्व तुटावया ऐसें । वाक्य बोले. ॥ ४२ ॥ जीवाचें परिच्छिन्नत्व तुटावया, । व्यापकपण आणावया, । अपरोक्षत्व जीवासि यावया, । ऐसें बोधी. ॥ ४३ ॥ "मीचें[2] तें" ह्मणतां व्यापकत्व येईल । [3]परि परोक्षत्व अंगा जडेल । म्हणोनियां वेद कृपाळ । ऐसें बोधी. ॥ ४४ ॥ यालागीं ऐसीं पदें बोलिला । तरिच अपरोक्षबोध होय भला; । आन नाहीं यया बोला । अनुभवसिद्ध. ॥ ४५ ॥ ऐसेंच्चि यजुर्वेदींचें महावाक्य । अर्थ बोधितसे सम्यक् । तेंही सांगेन कृपापूर्वक । परियेसावें तुम्हीं. ॥ ४६ ॥ "**अहं ब्रह्मास्मि ब्रह्माहमास्मि**" । याचा पूर्वार्ध [4]**ब्रह्मास्मि** । येणें परोक्ष होईल म्हणोनि । **अहमस्मि**[5] बोले उत्तरवाक्य. ॥ ४७ ॥ पूर्ववाक्यें परिच्छिन्नत्व निषेधिलें, । [6]आणि व्यापकत्व बोधिलें, । उत्तरवाक्यीं अपरोक्षत्व साधिलें । सामरस्येंकरूनि. ॥ ४८ ॥ येणें साधिली[7] अपरोक्षता, । हेचि वाक्याची वाक्यता, । ऐसिया संमति आतां । किती लिहावया. ॥ ४९ ॥ परि मुख्य वाक्यतात्पर्य ऐसें । हेंचि जया बोधलें असे, । तोचि अपरोक्षानुभव संतोषें । परमानंदीं ॥ ९५० ॥ येथ संतोषती अनुभवी । शब्दज्ञानियां पडे गोवी । नानायुक्ति ठेवाठेवी । करितील ते. ॥ ५१ ॥ एवं पदार्थद्वयाचें ज्ञान ऐसें । जेणें उभयतां उपाधि निरसे, । तेंही गुरुवाक्यें सावकाशें । निरसावें कीं. ॥ ५२ ॥ प्रथम त्वंपदाचें शोधन । संक्षेपें कीजेल कथन । करूनि एकाग्र मन । आकर्णिजे. ॥ ५३ ॥ स्थूल

१. ब. परि आपणा. २. ब. तें मीच. ३. अ. परोक्षत्व आंगा. ४. ब. ईश्वरचें अहं ब्रह्म मी. ५. ब. ब्रह्म मी ॥ बोले उत्तर. ६. ब. आपण व्यापकत्व प्रबोधिलें. ७. ब. शोधिली.

देह आत्मा होय । तरि देह माझा कोण ह्मणत आहे? । जीव गेलिया निचेष्ट राहे । शवरूप देह. ॥ ५४ ॥ देह येथ भस्म केला । स्वर्गी भोग कोणें भोगिला? । मागुता जन्म पावला । तो कोण आहे? ॥ ५५ ॥ यालागीं देहचि आत्मा ह्मणणें । तें तंव न घडे वेगळेपणें, । आणि देह दृश्य होय येणें । आत्मा द्रष्टा. ॥ ५६ ॥ दृश्य तव द्रष्टेनसीं भिन्न । या बोला तंव नाहीं आन, । द्रष्टाचि दृश्य कैसेन । होईल सांगा? ॥ ५७ ॥ द्रष्टा द्रष्टेपणें साच होय । दृश्य दृश्यत्वें मिथ्या पाहें । मिथ्या तें साच नव्हे । कोणेपरी. ॥ ५८ ॥ हे उपपत्ति चालिजेल किती? । आत्मा देह नव्हे सर्वार्थी, । देहातीत हे आत्मस्थिति । अनुभवसिद्ध. ॥ ५९ ॥ येणें न्यायें सर्वांशीं । भिन्नत्व आहे आत्मयासि; । आत्मा कोणे उपाधीसीं । एकत्वा न ये. ९६० ॥ परलोकींच्या सुखाकारणें । स्थूल देह त्यागीं म्हणे, । तरि देहचि तेणें होणें । हें कैसें घडे? ॥ ६१ ॥ स्थूल देहाची "जागृदवस्था" । तो आत्मा नव्हे पैं सर्वथा; । आत्माचि अवस्था होता, । जाणता कोणपां? ॥ ६२ ॥ अवस्था जयातें होय । तो तव तिसीं वेगळा आहे, । अवस्था जाणता कोण पाहे । तेणेंविण? ॥ ६३ ॥ यालागीं अवस्थांचा द्रष्टा । आत्मा जाणिजे निकटा, । तसाचि अभिमानी निकृष्टा । "विश्व" जो कीं, ॥ ६४ ॥ "विश्व" तोही आत्मा नव्हे । आत्मा विश्वातें जाणतु आहे, । तोचि तो सर्वथा आत्मा होये । जो प्रकाशी यातें. ॥ ६५ ॥ आत्मा नव्हे लिंगशरीर । तें तंव जड सविकार, । षोडश कळांचें विवर । दृश्य जें कां; ॥ ६६ ॥ तेंही दृश्य आत्मयासि । आत्मा तेंचि नव्हे निश्चयेंसी । आत्मत्व न ये प्राणासि । जडस्वपणें. ॥ ६७ ॥ प्राणें शरीरासि घडे जिणें । परि नाहीं सुखदुःखादि जाणणें । प्राण वर्ते अप्रकाशपणें । आत्माधीन. ॥ ६८ ॥ आणि सुषुप्तीचिये वेळे । प्राण जागतांही कांहीं न कळे, । तस्करोपद्रवेंही ज्ञान कळे । नयेचि प्राणु. ॥ ६९ ॥ आणि प्राणांचाही ज्ञाता । आत्मा हें तंव तत्त्वता, । यालागीं द्रष्टाचि दृश्यत्वा । कदा न ये. ॥ ९७० ॥ यदर्थी इतिहास सांगेन । आइकावें चित्त देऊन, । जें कीं अजातशत्रु ब्राह्मण । बृहदारण्यकीं बोले. ॥ ७१ ॥ गार्ग्य कोणी ब्राह्मण । बाह्लिकीहीं म्हणती जाण, । अतिगर्वी उद्धतपण । ज्ञानगर्वे. ॥ ७२ ॥

जनक ज्ञानी आइकला । आणि वदान्य अतिशय भला । गोसहस्त्र एका प्रश्नाला । देतु असे. ॥ ७३ ॥ तरि त्यासि ज्ञान उपदेशिजेल । आपणां गोसहस्त्र हातां येईल । ह्मणोनि जनकाप्रति तत्काळ । येता जाला. ॥ ७४ ॥ म्हणे राया येक परिसिलें । तुज ब्रह्म मी सांगेन भलें । येरें उठोनियां नमन केलें । अत्यादरें. ॥ ७५ ॥ म्हणे तुच गोसहस्त्र देईन, ब्रह्म सांग मज झडकरून, । तेणें सोळा पुरुष ब्रह्म म्हणोन । सूर्यादि सांगितले. ॥ ७६ ॥ मग सूत्रात्मा जो प्राण । तेंचि ब्रह्म जाण; । राजा निरसी नव्हे म्हणोन । सांगणियाप्राति. ॥ ७७ ॥ इतुकेन गार्ग्य लाजिला । अवाङ्मुख होवोनी बैसला । ब्रह्म सांगेन यया बोला । असत्यपण आलें. ॥ ७८ ॥ इतुकेनि बोले रायासि । मी तंव आलों तुजपाशीं, । ब्रह्माची इच्छा मानसीं । ते पूर्ण करीं. ॥ ७९ ॥ तो म्हणे तूं उत्तम ब्राह्मण । आपण राजन्य क्षत्री हीन । उपदेश करूं नये जाण । सर्वार्थी तुज. ॥ ९८० ॥ गार्ग्य शास्त्र बोले तयासि । हें तंत्र उत्तम बोलिलासि, । परि आपत्तिकाळीं हीनापाशीं । अवश्य जावें. ॥ ८१ ॥ जिज्ञासा उपजली चित्तीं, । नाहीं ज्ञानिया विप्राची प्राप्ति, । तरि क्षेत्री वैश्यादिकांप्रति । अवश्य जावें. ॥ ८२ ॥ परि सर्व यत्नें ज्ञान साधणें । ऐसें बोलती श्रुतिवचनें; । जेथें दोन्ही पदार्थ वर्जणें । एक अंगीकारावें. ८३ ॥ श्रीभगवंतु त्रिःप्रकारीं । गुरूसि शरण जावें म्हणे हरि, । तेंही आयका बरव्यापरी । सांगेन तुज. ॥ ८४ ॥

तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया

नित्य सेवा आणि प्रणिपात । प्रश्न करावा अतिविनीत. । येही साधनत्रयीं निश्चित । प्रसन्न गुरु. ॥ ८५ ॥ त्यांमध्यें सेवा आणि नमन । त्यांचें हीनाप्रति करावें वर्जन । तयाप्रति एक प्रश्न । करावा कीं ॥ ८६ ॥ तरि तुजप्रति मी प्रश्न । करितों राया हाचि जाण, । सांगें मज ब्रह्म पूर्ण । आन न करीं. ॥ ८७ ॥ राजा ह्मणे सांगेन । म्हणोनि उठिला हातीं धरून, । सुप्त पुरुषाप्रति जाऊन । बैसले दोघे. ॥ ८८ ॥ राजा म्हणे ब्राह्मणासि । तुवां ब्रह्मत्व बोलिलें ज्यांसि, । घेऊनि त्याचियें नामासि । बोभातों आतां. ॥ ८९ ॥ येणें जरि देईल । उत्तर प्रबोध पावेल हा नर, ।

तरि तें होय साचार । ब्रह्म तुझें. ॥ ९९० ॥ म्हणोनि षोडश पुरुषनामें ॥ राजा पाचारी संभ्रमें, । तो प्रबुद्ध नव्हे भ्रमें । कोणेपरी, ॥ ९१ ॥ ऐसिया लिंगदेहाच्या सोळा । राजा बोधितांही कळा । परि नाहीं प्रबोधला ॥ कोण्हेपरी. ॥ ९२ ॥ मग राजा म्हणे कां उठेना ? । तो म्हणे लय जाला कां देखाना ? । राव म्हणे आतां प्राणां । बोभातों मी. ॥ ९३ ॥ प्राणांचा लय नाहीं जाला । हा तंव जागत असे भला । मुख्य तुवां सूत्रात्मा बोलिला ॥ तो तंव हाचि. ॥ ९४ ॥ म्हणोनि प्राण नामें पाचारी । परि तो नुठे सर्वांपरी; ॥ राजा म्हणे तुझी वैखरी । कैसें वदली ? ॥ ९५ ॥ हा जरी आत्मा होता । तरि शब्दादिकांचा भोक्ता असता । आणि आम्हांसिही जाणता । आपलेनि ज्ञानें. ॥ ९६ याालागीं देहादि सर्वही । हें जडें अतिशयें पाहीं । हीं आत्मा नव्हतीं हें काई । बोलावें लागे ? ॥ ९७ ॥ मग राजा थापटी तयातें । तो प्रबोधोनि पाहे त्यांतें, । रावो म्हणे आत्मा कोणातें । म्हणतोसि आतां ? ॥ ९८ ॥ ज्याच्यानें हीं सर्वही प्रकाशती, । किंबहुना ज्याचेनि जिती, । ज्याचे सत्तेवेगळें न पावती । प्रबोधातें. ॥ ९९ ॥ तो आत्मा कोण येथें ? । कोठूनि आला सांग मातें ? । आणि गेला होता तें । स्थान सांग. ॥ १००० ॥ तेंही तुज सांगेन आइक । जेणें स्वस्वरूप बुझसी सम्यक् । तेंचि अति थोर कौतुक । परिस आतां ॥ १ ॥ तरि येथें प्रमाता जो असे । तो आपुला प्रकाश अंशें, । इंद्रियावरि घालित असे । प्रकाशपणें. ॥ २ ॥ जैसा सूर्य प्रकाशपणें । सूर्यकांतादिकीं प्रभा घालणें, । त्यासन्निधि असती अप्रकाशपणें, । त्यांतें सूर्यकांत प्रकाशी. ॥ ३ ॥ मग सूर्य जातां अस्तंगिरीआंत, । आपली प्रभा असे आवरित । तेणेंसहित राहत । निजस्वरूप. ॥ ४ ॥ मग सूर्यकांतादिकें सकळें । कोणा न प्रकाशितीं कोणे वेळे । सर्व सूर्याचेनि उजाळे । वर्तत होतीं. ॥ ५ ॥ जैसा पक्षी श्रमलियावरि । स्वगृहाप्रति गमन करी, । पक्षादि आंवरून कोट्याभीतरीं । विश्रांति पावे. ॥ ६ ॥ तैसा प्रमाता जागृतीं स्वप्नीं । इंद्रियांचेनि व्यापारेंकरूनि , । श्रम पावोनि निर्वाणीं । विश्रांतीसि जातु ॥ ७ ॥ जो आपला आभास इंद्रियावरि । होता, तो काढी झडकरि । बुद्ध्याभ्यासें येकसरीं । आंवरिलीं. ॥ ८ ॥ ते घेऊनियां प्रमाता । आपुलेनि स्वरूपें

तत्त्वता । कूटस्थ स्वरूप नेणता,। परि तेथें राहे. ॥ ९॥ परमानंदेंकरूनि । निश्चेष्ट राहे स्वरूपनिर्वाणीं; । नेणेचि, म्हणूनि संसारश्रेणी । न चुकेचि त्याची. ॥ १० ॥ जरि वास्तव्य स्वरूप जाणता । तरि संसृति कासया पावता ? । असो. अज्ञानस्वरूपीं तत्त्वतां । स्वरूपें असे. ॥ ११ ॥ इंद्रियां-वरील प्रभा गेली म्हणूनि । विषयग्रहण नव्हे त्यांचेनि; । तरि तींच आत्मा कैसेनि । सांग, बापा. ॥ १२ ॥ यालागीं जो यांचा प्रवर्तकु । तोचि आत्मा जाण निष्टंकु । ऐसा करितां विवेकु । लाभे स्वतःसिद्ध. ॥ १३ ॥ येणें इतिहासप्रसंगें । त्वंपद शोधिलें सर्वांगें. । स्थूळलिंगादि अनेगें । इंद्रि-येंही नव्हती. ॥ १४ ॥ देहत्रयादिविरहित । आत्मा जाहला निश्चित. । आतां प्राणाचि आत्मा येथ । कैसा घडे ? ॥ १५ ॥ येणें न्यायें सर्वांसीं । भिन्नत्व आहे आत्मयासि. । आत्मा कोणे उपाधीसि । येकत्वा नये. ॥ १६ ॥ ऐसेंचि मनबुद्ध्यादि उपाधि । आत्मा नव्हे; तो निरवधि. । तो प्रकाशकु; प्रकाश-सिद्धि । तेणेंचि सर्वांची. ॥ १७ ॥ तैसेंचि अंतःकरणचतुष्टय । आत्मा नव्हे, गुणत्रय । यांच्या वृत्ति आंकळिता सर्व— । व्यापकपणें. ॥ १८ ॥ म्हणूनि बुद्ध्यादि इंद्रियांसि । येकचि आहे आत्मा प्रकाशी. । तीं प्रकाश्यें, जडें, कैशीं । आत्मा होतील ? ॥ १९ ॥ जो जया पदार्थातें जाणे, । तेंचि तो, तया कोण म्हणे ? । हें वर्म अनुभवेंचि जाणणें, । येऱ्हवीं नकळे. ॥२०॥ या सर्वांचा प्रकाशकु । तोचि स्वयें आत्मा येकु. । तोचि इंद्रियांचा नायकु । ओळखावा कीं. ॥ २१ ॥ लिंगदेहाची स्वप्नावस्था । ते आत्मा नव्हे तत्त्वतां, । आत्मा अवस्थेतें जाणता । तेचि तो कैसेनि ? ॥ २२ ॥ तैजस स्वप्नाचाचि ज्ञानी, । इथवा तैजस अभिमानी, । तोचि आत्मा होईल कैसेनि । परि नेणे जागृतीसि. ॥ २३ ॥ विश्व हा नेणे स्वप्नासि; । तैजस नेणे जागृतीसि; । उभयतां सुषुप्तीसि । कधीं नेणती. ॥ २४ ॥ जागृतिसुषुप्तींतें नेणे । तयातें आत्मा कोण म्हणे? । तो परिछिन्न किंचितज्ञपणें । अभिमानी बोलिजे. ॥ २५ ॥ इतरा अवस्थेचें जाणणें । अभिमानी सर्वथा नेणे । आत्मयासि तेणें सहित प्रकाशणें । अवस्था ते. ॥ २६ ॥ म्हणूनि आत्मा नव्हे तैजसु. । तो इतर अवस्थेसि उदासु । आणि असे परप्रकाशु । म्हणौनियां. ॥ २७ ॥ आत्मा स्वप्रकाश, चिद्घन, । अभिमानिया, अवस्थाप्रकाशी जाण. । तो सकळांसही भिन्न । स्वतंत्रपणें. ॥ २८ ॥ देहद्वयाचें कारण । जें कीं मूळभूत

अज्ञान, । तें आत्मा नव्हे, प्रसिद्ध जाण; । सांगणेंचि नलगे. ॥ २९ ॥ सद्गुरूचे कृपेकरून । अज्ञानाचें भस्म पूर्ण. । तेथें तयाचें खंडण । करणेंचि नलगे. ॥ ३० ॥ अज्ञान म्हणिजे निःशेष नेणणें । तेंचि तें आत्मेनें कैसें होणें? । आत्मा स्वप्रकाशपणें । अज्ञान कैसेनि? ॥ ३१ ॥ मी आपणयातें नेणें, । ऐशिया अज्ञानातें कोण जाणे? । आत्मा अज्ञान, तैं असणें । नेणेंचि होऊनि. ॥ ३२ ॥ मी नेणें ऐसें अज्ञानातें जाणतु । वृत्तिज्ञानें अज्ञान निरसितु, । तोचि अज्ञान, म्हणिजेतु । कोण्हा हेतू? ॥ ३३ ॥ अज्ञानातें प्रकाशिता । अज्ञानाश्रय तो तत्वतां । तोचि अज्ञान म्हणतां । परम हानि. ॥ ३४ ॥ अज्ञान अवस्था सुषुप्ति । तोचि आत्मा नव्हे निश्चिती । प्राज्ञ अभिमानी म्हणती । तियेचा कीं. ॥ ३५ ॥ तिन्ही अवस्था तिन्ही अभिमानी । ते आत्मा नव्हती भर्वसेनि । आत्मा इतुकियांतें प्रकाशूनि । राहिला असे. ॥ ३६ ॥ तिन्ही अवस्थांतें जाणता । तिहीं अवस्थांचा भोक्ता । यालागीं तत्वतां । आत्मा निश्चयें. ॥ ३७ ॥ सुषुप्तीसि कांहींच नेणिजे । तरि आत्मेनें कैसें जाणिजे, । ऐसें म्हणसी तरि जागरव्याजें । जाणतुचि असे. ॥ ३८ ॥ सुखमहमस्वाप्स्वं । न किंचिदवेदिषं । ऐसें म्हणतसे जो स्वं । तो कोण सांगा. ॥ ३९ ॥ तिन्ही अवस्था हिंडतु, । सेवटीं तयांसि अलिप्तु; । जैसा महामीन समुद्रांतु । कुळाप्रति जाये. ॥ ३९ अ ॥ मध्यें कोण्ही न करी आघातु । स्वेच्छेनें असे हिंडतु । परि कुळासि नाहीं लिंपतु । जयापरी. ॥ ३९ ब ॥ हे मत्स्यब्राह्मणीं बृहदारण्यकीं । केली असे उखी विखी आत्मा तिहींचा पारखी । अवस्था जाणें. ॥ १०४० ॥ या लागीं जर्ड प्रकाश्यें । तींच आत्मा हें घडे कैसें? । सर्वांशिं आत्मा भिन्न असे । अनुभवसिद्ध ॥ ४१ ॥ अवस्थांचें स्थान भान भोगु । तयासि आत्मा निःसंगु । तो सर्वातीत अव्यंगु । सत्तारूपें ॥ ४२ ॥ ऐसा उपाधी निरसुनि । आत्मा वेगळा जाणोनि । तैसाचि ईश्वरोपाधीही ईक्षणीं । निरसावा पैं ॥ ४३ ॥ हें त्वंपदार्थ शोधन । तत्पदार्थ तैसाचि जाण । निरसणें तें पदार्थज्ञान । हेंचि जाणिजे ॥ ४४ ॥ विराट जें कीं स्थूल शरीर । ईश्वराचें सविकार । पंचीकृताचें विवर । तो ईश्वर कैसा ॥ ४५ ॥ या स्थूल देहातें जाणता । तो ईश्वर नव्हे तत्वता । तेथें वर्ते उत्पत्ति अवस्था । तेंही तो नव्हे ॥ ४६ ॥ येणें न्यायें देहत्रयासि । ईश्वर भिन्नचि परियेसीं । तें सांगतां विस्तारासि ।

जाईल ग्रंथ ॥ ४७ ॥ जेथें जीवासी देहत्रयासीं । संबंध नाहीं निश्चयेसीं । तेथें सर्वज्ञ ईश्वरासीं । कैसेनि घडे ॥ ४८ ॥ यालागीं तो शुद्धचि असे । उपाधीकृत ऐश्वर्यें भासे । तिये उपाधीनिरासें । शुद्ध बुद्ध ॥ ४९ ॥ दोहींचें शुद्धत्व निवडोनि । मग वेगळें कैसें विचारी मनीं । ऐक्यता पावति भरंवसेनि । न साधितांचि ॥ १०५० ॥ वाक्यार्थज्ञान तें असिपद । तें प्रत्ययासि येतसे सिद्ध । न करितां अर्थविवाद । लाभेचि स्वयें ॥ ५१ ॥ आपुलें शुद्धत्व सर्वांतता । आणि ईश्वराची व्यापकता । दोन्हीं येवो पुरें जो ज्ञाता । तंव दुसरें जगीं न देखे ॥ ५२ ॥ तेंचि तूं होसी म्हणणें । तें विलंब॰पावे वाणलेपणें । तें आपणेंचि येतसे खुणें । शुद्धपणाचिये ॥ ५३ ॥ शुद्ध आणि उपाधी वेगळा । तोचि तो आपण निराळा । न देखे दुजा आपणा वेगळा । आपणाचि ॥ ५४ ॥ आहो उपाधीहून नष्टलें । म्हणोनि परिछिन्न अव्यापक जालें । अप्रकाशत्व पावलें । अज्ञानेंकरूनि ॥ ५५ ॥ तें अज्ञान सद्गुरुकृपेनि । नाहींचसें जाहलें तत्क्षणीं । उपाधी-विरहित ईक्षणीं । ज्ञानाचिये ॥ ५६ ॥ उपाधी तो आपण नव्हे । हें नेति-मुखें विचारूनि पाहवें । तंव शुद्ध वेगळेपण आहे । व्यापक आपणचि ॥ ५७ ॥ आपुलें व्यापकपण । आणि शुद्ध उपाधिविहीन । [1]बाणोनि राहे परिपूर्ण । आपणचि जगीं ॥ ५८ ॥ तेथें होसी या वाक्यार्थज्ञानें । अनुभव कीजे जंव वचनें । तंव भेटिजे आपणा आपणें । पदार्थज्ञान करितांचि ॥ ५९ ॥ हें अनुभवें पाहतां कळे । शाब्दिकें कदापि न कळे । यालागीं संदेह-कल्लोळें । बुडताति लोक ॥ १०६० ॥ सांगता पदार्थपूर्वक ज्ञान । वाक्यार्थ साधला आपण । हाचि वाक्यार्थ संपूर्ण । बोलिला मुळीं ॥ ६१ ॥ हा वाक्यार्थ अनुभवितां । "श्रुतिशिरः पक्ष" ये ज्ञाता । जें ब्रह्मचि स्वयें होय तत्वता । ऐसें जें वदलें. ॥ ६२ ॥ तूंचि ब्रह्म हा वाक्यार्थ । तोचि महा वाक्यार्थ यथार्थ । तोचि आश्रया वा पक्ष स्वार्थ । येर त्यजावा कीं ॥ ६३ ॥ श्रुतिशिरःपक्ष आश्रयतां । जें मीच ब्रह्म तत्वता । ऐसेंचि जंव म्हणतां । दुस्तर्क उठति ॥ ६४ ॥ श्रुतिशिरोवाक्यं समाकर्ण्यतां । येणें वाक्यें उप-देश तत्वता । बोलिला निश्चितता । आन नाहीं ॥ ६५ ॥ तेणें ज्ञालें संदिग्ध ज्ञान । असंभावनादि प्रतिबंधन । यास्तव करावें श्रवण । " वाक्या-

---

१ उपाधीनें उरलें.

र्थे " श्व येणें वाक्यें ॥ ६६ ॥ गुरुमुखें करावें श्रवण । तेथें दुस्तर्क उठती जाण । त्यांचें द्विविध लक्षण । परि सांगों ॥ ६७ ॥ दुष्ट तर्क ते ऐसे । पदार्थ करिती अनारिसे । तार्किक मतिप्रकाशें । व्याख्यान करिती ॥ ६८ ॥ महावाक्य " तत्वमसि "। याचीं पदें " तत् " " त्वं " " असि " । याची पदवित्पत्ति ऐसी । करिती युक्तिबळें ॥ ६९ ॥ तस्य त्वं तत् त्वं म्हणति । त्याचा तूं ऐसें करिती । तच्छब्दें ईश्वर बोलति । त्याचा तूं जीवासि पैं ॥ १०७० ॥ जीवासि म्हणती त्याचा तूंची। परि नव्हेसी सत्स्वरूपचि। ऐसीं नानापरीचीं । व्याख्यानें करिती ॥ ७१ ॥ तस्मिन् त्वं तत् त्वं ऐसें । त्याच्या ठायीं तूं अनारिसें । अथवा तत्सादृश्य ऐसें । व्याख्यान करिती ॥ ॥ ७२ ॥ ऐसे जे नाना तर्क उठति । त्यांपासाव विरमावें सर्वार्थी । याचा ऐसा अर्थ केलिया कोण गति । इतर वाक्यांची ॥ ७३ ॥ " ब्रह्माहमस्मि " ये श्रुतीतें । काय वाखाणील इयेतें । " अयमात्मा ब्रह्म " इयेतें । काय ह्मणाल ॥ ७४ ॥ तैसेंचिही असे महावाक्य । जीवासि ब्रह्मत्व बोधी सम्यक । सर्वा श्रुतींचें सार्थक । ऐक्य बोधितां ॥७५॥ " स एष एव तत् " "मामपश्यत्" । ऐसीं श्रुतिवाक्यें अनंत । लेहावीं किति येथें । इतकेनि काय नव्हे ॥ ७६ ॥ ऐसा हा श्रुतिशिरःपक्ष असे । जो महावाक्यीं बोलिला असे। तोचि आश्रयावा अनारिसे । दुस्तर्क न धरीं ॥ ७७ ॥ अथवा असंभावना विपरीत भावना । होचि दुस्तर्क उठति जाणा । त्यांलागीं तीहीं साधना । करावें कीं ॥ ७८ ॥ असंभावना द्विविध । विपरीत भावना येकविध । हें सांगितलें विशद । पूर्वग्रंथीं ॥ ७९ ॥ तथापि स्मरणार्थ मागुतें । बोलिजेल परियसा तें । प्रमाणासंभावना ते । येकी जाणा ॥ १०८० ॥ प्रमेयासंभावना दुसरी । विपरीत भावना तिसरी। यालागीं साधनत्रयकुसरी। करावी कीं ॥८१॥ श्रवण मनन निदिध्यासन। हें साधनत्रय प्रसिद्ध जाण। आता कोणे कोणाचें निरसन। करिजे तें सांगतों॥ ८२ ॥ श्रवणें जाय प्रमाणासंभावन। जें कीं वेदास मानी अप्रमाण। महावाक्यीं संशय दारुण। उठिला जो कीं ॥ ८३ ॥ तो श्रवणमात्रेंचि जाय । यासि आणिक नाहीं उपाय । तरि श्रवण करितांहि न जाय । कवणा हेतू ॥ ८४ ॥ तरि वरिवरि जें आईकिलें । तें तंव श्रवण नव्हे भलें । तें काळक्षेपण संचलें । अवाथा दंभार्थी ॥ ८५ ॥ लौकिक दंभ अथवा कीर्ति । यालागिं श्रवण करिताती । मनें करुनी येक

चित्तीं । हस्तव्यापारु आन ॥ ८६ ॥ वाचा आणिक बोले । नेत्रें पाहे दृश्य भलें । ते वेदांतही आयकले । कोण उपयोगी करी ॥ ८७ ॥ नाना पुराणें आइकती । आम्ही बहुश्रुत असें मिरवती । तेथील या कथा धरिति । आणिकां सांगावया ॥ ८८ ॥ येणेंचि बहु श्लाघ्यती । स्वयें पंडितमानी होती । असो तयांची । किति गोठी बोलावी ॥ ८९ ॥ जो संसारतापें तापला । अनन्य सद्गुरूसीं शरण गेला । त्यासीच श्रवणादि उपयोगा आला । साधन-समूह ॥ १०९० ॥ श्रवण मनन निदिध्यासन । यांचें सांगों सम्यक लक्षण । जेणें बुझसी संपूर्ण । उपयोगु यांचा ॥ ९१ ॥ जे कीं असे वेदांतीं बोलिलें । तेंचि येथें सांगेन भलें । चित्त देऊनि आइकिलें । पाहिजे संतीं ॥ ९२ ॥

सर्वेषां वेदांतवाक्यानामद्वये ब्रह्मणि तात्पर्यावधारणं श्रवणम्

सर्वहि जीं वेदांतवाक्यें । त्यांचें ब्रह्मीं तात्पर्य निकें । त्यांचें अवधारण कौतुकें । करावें एकाग्र मनें ॥ ९३ ॥ आणि ऐसें करावें । नेत्र सद्गुरुमुखीं लावावे । त्याचे वचनीं ठेवावे । श्रवण दोन्ही ॥ ९४ ॥ शब्द जंव न निघे बाहेरी । तंव श्रवणें घ्यावा वरिचावरी । मन ठेवावें अर्थांतरीं । शब्दा-चिया ॥ ९५ ॥ बुद्धि निश्चयाकारणें तेथेंचि । ठेवावी एकाग्रतेची । हस्त जोडूनि गुरूची । उपासना करावी ॥ ९६ ॥ ऐसेनि जें ऐकणें । तया नांव सी श्रवण म्हणें । ब्रह्मनिश्चय करणें । वेदांततात्पर्य ॥ ९७ ॥ याचें नांव श्रवण म्हणिजे । येणें प्रमाणासंभावना सहजें । नासोनि जाय सहज व्याजें । श्रवणाचेनि ॥ ९८ ॥ मननें प्रमेयासंभावना जाये । त्याचें कैसें लक्षण आहे । तेंही सांगों पाहें । विवेकनेत्रें ॥ ९९ ॥

युक्तिभिरनुचिंतनं मननम्

वेदांत तर्कयुक्तीकरून । आपुलेनि विचारें पूर्ण । ऐकिले त्यांचें चिंतन । करावें कीं ॥ ११०० ॥ ब्रह्मासि सत्यत्व कैचें घडे । ब्रह्म व्यापक परिपूर्ण कुडें । या वेगळें विचारितां उघडें । प्रपंचासि ॥ १ ॥ ब्रह्मा वेगळें अस्तित्व । प्रपंचासि न घडे सत्यत्व । ऐसे युक्तीनें यथातत्व । चिंतणें जें कां ॥ २ ॥ याचें नाम बोलिजे मनन । जें युक्तीनें ब्रह्माचें अनुचिंतन । येणें ब्रह्मीं संशयपण । कदा नुपजे ॥ ३ ॥ युक्तीनें सत्यासत्य कळलें । मग प्रमेया-

संभावन सहज गेलें। ब्रह्मीं संशय कदाकाळें । नुठि तेणें ॥ ४ ॥ मग विपरीतभावनेकारणें । निदिध्यासन सर्वदा करणें । तेणेंचि करूनि बोळवणें । देहादि अध्यासु ॥ ५ ॥ निदिध्यासन तें कैसें । तेंही सांगों येणें मिसें । चित्तेकाग्रें सावकाशें । परिसा बापा ॥ ६ ॥ विजातीयप्रत्ययतिरस्करण । सजातीयप्रत्ययप्रवाहीकरण । याचें नाम निदिध्यासन । सत्य जाण ॥ ७ ॥ सद्गुरुमुखें जें ब्रह्मस्वरूप । आकर्णिलें अति निष्कंप । तद्रूपें राहतां उमप । अंतराये होती ॥ ८ ॥ ब्रह्म वेगळें देहादिक । मन बुद्धी इंद्रियें सकळिक । किंबहुना सम्यक । प्रपंच हिंव ॥ ९ ॥ ते सर्व जाण विजाती । स्वरूपस्थितीसि आड येती । ते दृश्य अंतराय स्थिति । करीत असे ॥ ११० ॥ हें अनुभवी तोचि जाणे । जेणें हीं केलीं असती साधनें । येरा तें कांहींच नमने । म्हणे हें कांहिंच नाहीं ॥ ११ ॥ स्वरुपाचिया घरा जातां । विजातीय आड टाकती तत्वता । साक्षात्कार पुरता । होऊं नेदी ॥ १२ ॥ अनेका जन्मींचें उपार्जिलें । तेंचि सबळ होऊनि आड ठेलें । तें दूर करावें आभ्यासबळें । निदिध्यासनें ॥ १३ ॥ शब्दज्ञानी न मानिती । हें व्यर्थ ऐसें म्हणती । सांगणारासि उपहासिती । साधक म्हणोनि ॥ १४ ॥ आपण सिद्ध ऐसें मानिती । वस्तु ते स्वप्नींही नेणती । तेथें साधनाची गति । कासयालागीं ॥ १५ ॥ अवघें दृश्यासगट ब्रह्म असे । हें मानुनि राहवें ऐसें । इतुकेंनि साधनसायासें । कोण काज ॥ १६ ॥ ऐसीया अनेका युक्ति बोलती । जगीं सिद्धत्व मिरवती । गोष्टी सिद्धावस्थेचा करिती । परी पोकळ ते ॥ १७ ॥ असो जें विजाती येईल समोर । त्याचा करावा धैर्यें तिरस्कार । सजातीय ब्रह्म निर्विकार । प्रवाहीक करावें ॥ १८ ॥ चित्तवृत्ति बाहेर येती । पदार्थाकार स्फुरे स्फूर्ती । किंवा मनोरथ उठति । नानाविध ॥ १९ ॥ ते सर्वहि मिथ्यापणें टाकणें । मागुते सर्वथा उपजों नेदेणें । ब्रह्माकार चित्तवृत्ति करणें । बलात्कारें ॥ ११२० ॥ तैलधारातुल्य अखंड । अपरिछिन्न वृत्तीनें निवड । स्थिर रहावें अखंड । परब्रह्मीं ॥ २१ ॥ ययाचें नांव निदिध्यासन । सर्व शास्त्रीं असे प्रमाण । करितां अनुभव पूर्ण । सहज कळे ॥ २२ ॥ विजाती निःशेष आड येती । क्षणहिंभरी राहे जरी स्थिति । तैलधारातुल्य प्रवृत्ति । अपरिछिन्न होय ॥ २३ ॥ यया नांव साक्षात्कार । तोचि समाधि निर्विकार । ध्येयध्याताध्यानप्रकार । न

स्फुरे तेथें ॥२४॥ होचि सप्तमी भूमिका बोलती। जेथें विरे देहादि दृश्य मूर्ती। येथूनि पुढें उत्तरस्थिति। असेचिना ॥ २५ ॥ हें ध्येयादि-त्रय जेथें न भासे। तेंचि निर्विकल्प समाधि ऐसें। वेदांतीं बोलिलें असे। आणि स्वानुभवसिद्ध ॥ २६ ॥ जेथ ध्येयादि त्रिपुटी स्फुरे। ते संप्रज्ञात समाधि हें खरें। येथें विवादु न सरे। कोणाचाही ॥ २७ ॥ याकारणें ऐसिया दुस्तर्कापासाव। विरमावें स्वमेव। श्रुतीसीं मानला जो ब्रह्मभाव। तोचि अनुसंधावा ॥ २८ ॥ येणें बोलिलें निदिध्यासन। जें श्रुतिमत तर्कानुसंधान। त्याचें सांगितलें लक्षण। माने तैसें ॥ २९ ॥ "श्रुतिशिरःपक्षः समाश्रीयतां"। आणि "दुस्तर्कात्सुविरम्यतां"। येणें द्योतिली मननता। अर्थें जाण ॥ ३० ॥ याचा जो सांगितला अर्थ। तो मननचि द्योती सार्थ। श्रुतिमतस्तर्क येणें स्वार्थ। निदिध्यासन बोलिलें ॥ ३१ ॥ "ब्रह्मास्मीति विभाव्यतां"। येणें साक्षात्कार तत्वता। बोलिला विचारितां। अर्थसिद्धि ॥ ३२ ॥ ब्रह्म मी आहें प्रतीति। विभा-वना शब्दें तदाकारस्थिति। जालिया साक्षात्कार म्हणती। निश्चयेसीं ॥ ३३ ॥ ना हो भावना शब्दें अर्थ ऐसा। एका पदार्थआभासा। दुसरा भाविजे तया ऐसा। भावनाअर्थु ॥ ३४ ॥ पाषाण प्रत्यक्ष दिसे। त्यासि विष्णवा-दिकां भाविजे जैसें। मृत्तिकेसि गणेश गौरी जैसें। म्हणती लोक ॥ ३५ ॥ कुड्य आणि स्तंभावरी। चंदनरेखा वक्रा करी। नागनृसिंह अनेकाकारीं। भावीं तेथें ॥ ३६ ॥ शालिग्रामाचां ठायीं। विष्णुभावना कीजे पाहीं। ऐसेंचि काष्टपाषाणवृक्षादिकींही। जे कीजे देवभावना ॥ ३७ ॥ प्रत्यक्ष मृत्तिकादि पदार्थ देखिजे। त्यांसी देव ऐसी भावना भाविजे। त्यासीच भावना म्हणिजे। शास्त्रसिद्ध ॥३८॥ तयाचेंचि नाम भावना। तैसी येथें नाहीं जाणा। गेलिया असंभावना। तत्वचि उरे ॥ ३९ ॥ तेथें पदार्थ नाहीं दुसरा। वि-जातीय म्हणोनि गेला तिरस्कारा। तेथें दुसरीयाचा वारा। तोही नाहीं ॥ १४० ॥ दुसरें सहेतुक मावळलें। तेथ वस्तु वेगळें काय उरलें। तेथ पदार्थ आणि भावीले। कोणें कोणाचे ॥ ४१ ॥ जें कीं दुसरेपणातें व्यालें। तें अज्ञान कार्येसहित विरालें। तेथें दुसरें ब्रह्म वेगळें। काय सांग ॥ ४२ ॥ तेथ भावना भावित गेले। पदार्थमात्र हारपले। मग आपणा वेगळें राहिलें।

काय तेथें ॥ ४३ ॥ जें ब्रह्मात्मैक्य अखंड प्रपंचजात । जो कीं होता अज्ञानासहित । तो विरालीया काय तेथ । उरेल सांगा ॥ ४४ ॥ जेणें केलें होतें व्यवधान । तें कार्येंसिं गेलें अज्ञान । मग ब्रह्म मी हें पूर्ण । प्रत्ययासि ये ॥ ४५ ॥ पूर्ण ब्रह्म ऐसी प्रतीति । साक्षात्कार स्वरूपास्थिति । ऐसें जें जें बोलति । तेचि प्राप्ति तयासी ॥ ४६ ॥ ना हो स्वयें हा ब्रह्मचि होता । तरि प्राप्ति कां बोलली आतां । तरि ऐका उत्तर आतां । सांगेन तुम्हां ॥ ४७ ॥ तरि अंतरायें केलें व्यवधान । तेणें भ्रमें जाणें नाहींपण । भ्रम गेलिया आपण । आपण पावला ॥ ४८ ॥ यालागीं ऐसे बोलति । यदर्थीं स्वयें बोले श्रुति । "ब्रह्मैव सन् ब्रह्माप्येति" । ऐसें बोले ॥ ४९ ॥ "विमुक्तः सन् विमुक्तेति" । ऐशा किती लिहाव्या श्रुति । ब्रह्मचि परि होय प्राप्ति । ब्रह्माची पैं ॥ ११५० ॥ ऐसें ब्रह्मत्व जालिया । अहं नुपजावें थोरपणा या । त्या गर्वासी दिवसादिवसाप्रति या । त्यजावें कीं ॥ ५१ ॥ मीं ब्रह्मभूत जालों ऐसा । गर्व उपजों न द्यावा सहसा । रंक राणीव पातलिया अपैसा । अतिगर्व पावे ॥ ५२ ॥ हे उपमा न घडे येथ । परिभ्रमें आलें होतें रंकत्व । ययालागीं निश्चित । घडोचि कीं ॥ ५३ ॥ तैसा भ्रमें अति रंक दीन । जें अनादि होतें जीवपण । परिछिन्न अज्ञान । अप्रकाशपणें ॥ ५४ ॥ अति निंद्य पराधीनता । ते सर्व जाऊन वरी ब्रह्मता । ब्रह्मस्वराज्य स्वसत्ता । परिपूर्ण स्वप्रकाश ॥ ५५ ॥ सच्चिदानंदस्वरूप । स्वयें ब्रह्मचि उमप । जालिया विस्मय गर्वरूप । होईल जरी ॥ ५६ ॥ यालागीं थोरपणाचा गर्व । नित्य नित्य सांडूनि सर्व । स्वात्मसुखें स्वमेव । राहवें कीं ॥ ५७ ॥ अथवा ब्रह्मभाव जालिया । देहाहंकारें होता गर्व तया । तो दिवसा दिवसा सांडूनियां । राहणें जें कीं ॥ ५८ ॥ ब्रह्मत्वाची पूर्णता । तेणें गर्व येईल हाता । तो टाकूनियां राहतां । तरी देहबुद्धि येइल ॥ ५९ ॥ तरि देहाचा ठायीं अहंबुद्धि । तें स्वरूप नेणोनियां अनादि । लागली ते सर्वथा आधि । त्यजावी कीं ॥ ६० ॥ तरि देहाचा ठायीं अहंबुद्धि । जे आत्मयासी लागली क्षयव्याधि । ते सर्वथा टाकावी आधीं । निपटुनियां ॥ ६१ ॥ आणि बुधजनेशीं वाद । न करावा देखोनि बाध । जेणें त्यांसी विषाद । उपजे तें न करणें ॥ ६२ ॥ वाद करितां सुख

अंतरेल। वादें स्वरूप बाहीर पडेल । यालागीं वादातें त्यजिजेल । तरीच भलें ॥ ६३ ॥ आणि वाद शब्दाचें व्याख्यान । त्रिप्रकार असे जाण। तेंही सांगों लक्षण । यथोक्त प्रकारें ॥ ६४ ॥ "तत्वबुभुत्सोः कथा वाद" ऐसें। सर्व शास्त्रीं बोलिलें असे। याचाही अर्थ सावकाशें । आतां सांगों ॥ ६५ ॥ तत्व जाणावयाचिये इच्छेकरूनि। कथा कीजे नम्र वचनीं। हा वाद बुधजनीं । ठेविला ठायीं ॥ ६६ ॥ गुरुशिष्यसंवाद म्हणिजे। त्याचें नाम वाद बोलिजे। हा बुधजनेंसि टाकिजे । जालेपणें ॥ ६७ ॥ अपरोक्ष जाहला साक्षात्कार । तेंचि कृतकृत्यता साचार । कृतकृत्यता जालिया विचार। मागुता किमर्थ ॥ ६८ ॥ सद्गुरुचेनि प्रसादें । स्वसुख भोगावें परमानंदें। भोक्ता भोग्य भोगणें आनंदें । गिळीजे जेथें ॥ ६९ ॥ तें आत्मस्वरूपीं स्थिरावोनि । राहे परमानंदें भरोनि। जियेतें म्हणिजे उन्मनी। असंप्रज्ञात ॥ ११७० ॥ तेथ वाद कासया करणें। स्वस्वरूपेंचि सदा राहणें। ब्रह्मानंदें अनन्यपणें। असतां वाद कायी ॥ ७१ ॥ ऐसेंनि पडिलेंचि जरी पुसणें। तें संशयीं घालिल दुणें। विधीही नव्हे सर्वपणें। व्यतिक्रम होय ॥ ७२ ॥ अथवा वाग्वाद साधूंसीं। न करावा पैं सर्वस्वेंसीं। तेणें क्षोभति ते तयासि। व्यर्थालापें ॥ ७३ ॥ दुसरीयाचें लक्षण । तेंही आतां सांगेन। ऐकावें चित्त देऊन। सर्वज्ञ तुह्मीं ॥ ७४ ॥

विजिगीषोः कथा जल्पः ।

दुसरीयासी जिंकावयाची इच्छा। ते बोलिले विजिगीषा। तेणें पुसणें तो वाद तुच्छा। अति निंद्यपणें ॥ ७५ ॥ दुसरीयासी जिकावे ऐसें। मनींच धरावें कैसें। ज्ञानियाचें कर्म कैसें। सर्वथा नव्हे ॥ ७६ ॥ आपणासी युक्ति तरी न संभवे। दुसरीयाची नमनी स्वभावें। दोष आरोपी अनुमानगर्वें। दुसरीयासी ॥ ७७ ॥ यासि वितंटवाद बोलति। हा तव निंद्य सर्वार्थीं। याची उक्ति संतांप्रति। करूंच नये ॥ ७८ ॥ या वादभयाचें लक्षण। सांगितलें संपूर्ण। हें बुधजनासीं एक क्षण। करूं नये ॥ ७९ ॥ संवादरूपा जिया युक्ति। त्याच कराव्या सज्जनांप्रति। परिवादरूपें आपली मति। प्रगटावींना ॥ ११८० ॥ इतुकेनि ब्रह्मस्वरूप पावला। स्वयें ब्रह्मचि असोनि जाला। आतां कर्तव्यतेचा ठेला। उपाय सर्वही ॥ ८१ ॥ आतां पूर्णपणें जें करणें। जेंहीं

चिन्हीं वर्तणें । तें सांगिजेल अंतःकरणें । एकाग्रें ऐका ॥ ८२ ॥ तृतीय श्लोकें प्राप्यता । जाली इतुकेनि पूर्णता । चतुर्थ श्लोकें कर्तव्यता । जालेनिही कैसी ॥ ८३ ॥ तें सांगिजेल चतुर्थ श्लोकें । तें चित्त देऊनि ऐका निकें । स्मरोनियां सद्गुरुपादुके । व्याख्यान करीन ॥ ८४ ॥ सद्गुरुध्यानाचेनि बळें । व्याख्यान जाईल पाल्हाळें । तेंचि ऐकावें प्रांजळें । करणें करूनि ॥ ८५ ॥

इति तृतीयश्लोकटीका समाप्ता.

क्षुद्व्याधिश्च चिकित्स्यतां प्रतिदिनं भिक्षौषधं भुज्यतां
स्वाद्वन्नं नतु याच्यतां विधिवशात्प्राप्तेन संतुष्यताम् ।
औदासिन्यमभीप्स्यतां जनकृपानैष्ठुर्यमुत्सृज्यतां
शीतोष्णादि विसह्यतां न तु वृथा वाक्यं समुच्चार्यताम् ॥ ४ ॥

ऐसें ब्रह्मपणें असतां । करणें नलगे कांहीं आतां । परि सांगिजेल कर्तव्यता । ते परियेसीजेल ॥ ८६ ॥ ब्रह्मप्राप्तीकारणें । आतां नलगे कांहीं करणें । परि सांगिजेतील लक्षणें । पूर्णाचीं कैसीं ॥ ८७ ॥ जरि समाधिस्थचि असिला । तरि कर्तव्यतेचा उपयोगु ठेला । व्युत्थान जालिया आइका वहिला । समारंभु त्याचा ॥ ८८ ॥ तरि क्षुधालक्षणव्याधि । जे किं लागली अनादि । प्राणधर्म परि बाधी । शरीरासि थोर ॥ ८९ ॥ क्षुधा लागतांचि क्षणीं । तेज शक्ति बळ क्षयासी आणी । निःसत्व करूनि प्राणि । ठेवि कैसी ॥ ११९० ॥ तेथें कैंचा परमार्थ । नाठवे समाधिपर्यंत अर्थ । शरीरचि व्याकुळ तेथ । सर्वार्थ कोण साधी ॥ ९१ ॥ यालागीं क्षुधाधीची चिकित्सा । करावी पैं प्रतिदिवसा । जेणें प्रवर्ते सावकाश । परमार्थासी ॥ ९१ ॥ क्षुधाधि निरसावयालागीं । भिक्षौषध मेळवावें अंतरंगीं । प्रतिदिनीं अन्नालागीं । भिक्षा मागावी ॥ ९३ ॥ प्रतिदिनीं हें कां बोलिलें । येणें संग्रह करणें वर्जिलें । आणि प्रातःकाळीं जें मागीतलें । ते सायं भक्षूं नये ॥ ९४ ॥ सायंकाळींचें प्रातःकाळीं । भक्षूं नये क्षुधाकल्लोळीं । मागतांचि तात्काळीं । भक्षावें विधी ॥ ९५ ॥ संन्यासियाचा धर्म ऐसा । आमंत्रण आलियाहि सहसा । येक गृह भिक्षा सहावसा । करूं नये ॥ ९६ ॥ अगत्य आलें आमंत्रण । तरी करावें अवश्य भोजन । न येतां भिक्षान्न ।

मेळवावें कीं ॥ ९७ ॥ आमंत्रण न येतां । गोमुखकर पात्र कर्तव्यता । तेहीं नसतां माधुकरी सर्वथा । करावी कीं ॥ ९८ ॥ तेणें भिक्षान्नें करून । करावें प्राणांचें धारण । तेणें परमार्थसाधन । न साधितां साधे ॥ ९९ ॥ हें अन्नेंचि परमार्थसाधन । येणें साधे ब्रह्मज्ञान । म्हणोनि सेवावें भिक्षान्न । परमार्थोलागीं ॥ १२०० ॥ सिद्धासही अन्नप्राशन । करावें प्राणाचें रक्षण । तेणें परमानंद पूर्ण । सदा असे ॥ १ ॥ समाधिचीये वेळे । क्षुधा तृषा निःशेष पळे । तेथें आनंदाचेनि कल्लोळें । तृप्त सदा ॥ २ ॥ जेथें देहादिकांचें विस्मरण । तेथें क्षुधा तृषा ते कोण । दंशादिकींही भक्षिलीयाहि संपूर्ण । बाहीर नये ॥ ३ ॥ असो तें व्युत्थान काळीं करावें । क्षुधेतें अन्नें जिंकावें । परी मिष्टान्न न अपेक्षावें । सर्वथा पैं ॥ ४ ॥ मिष्टान्नाकारणें । सर्वथा प्रयत्न न करणें । प्राणमात्र रक्षणें । तेथें इष्टानिष्ट काये ॥ ५ ॥ याहिमध्यें जरि मिष्टान्न । अयत्नें दैवयोगें जाण । प्राप्त जालया संतोष पूर्ण । असों द्यावा ॥ ६ ॥ कदान्नचि भक्षावें । मिष्टान्न सर्वथा त्यजावें । या आग्रहा न वाढवावें । विपश्चितें ॥ ७ ॥ मिष्टान्न आणि कदान्न । मिळाल्या दोन्ही समसमान । भुंजावें संतोषेंकरून । परमार्थोलागीं ॥ ८ ॥ प्राणधारण जालया पूर्ण । तो सर्वथा न पीडी जाण । मग स्वस्वरूपीं सावधान । अनीह रहावें ॥ ९ ॥ अन्नाचिये प्राप्ती । इष्टानिष्ट न करावें यती । भक्षावें अति प्रीति । प्राणधारणार्थ ॥ १२१० ॥ परि इष्ट कां अनिष्टचि होआवें । इतर सर्वथा न सेवावें । ऐसी हें चित्त हावें । भरों नेद्यावें ॥ ११ ॥ येणेंकरूनि उदासीनता । सर्वथा असों द्यावी चित्ता । तेणें बाधु परमार्था । कदा नव्हे ॥ १२ ॥ औदासिन्यें असतां । अतिसुख कोंदलें चित्ता । औदासिन्या परता । साधनार्थ नाहीं ॥ १३ ॥ विषयअन्नवस्त्रादिकीं । उदासीनता सर्वांविखीं । उदासपण अनेकीं । विषयजाति ॥ १४ ॥ हे अखंड उदासीनता । वरी जयाचिया चित्ता । हें चिन्ह ब्रह्मवेत्त्याचेंचि तत्वता । जाण असे ॥ १५ ॥ आणि उदासीनपणें । जनीं कृपानैष्ठुर्य टाकणें । दोन्ही त्यजूनी असणें । उदास सदा ॥ १६ ॥ जनीं नैष्ठुर्य टाकूनि कृपा करावी । हे तंव सात्विक गुणाची पदवी । साधकासी हे ठेवा ठेवी । कृपेचि असे ॥ १७ ॥ जनीं जनार्दनु आहे । ऐसें दृढतर कळलें होय । यास्तव निष्ठुरता पाहें । टाकी जगीं ॥ १८ ॥

जीव शिणले देखोनी । अति कळवळी कृपेकरूनी । परोपकारालागूनी प्राणही वेंची ॥ १९ ॥ हें दयादिरूप जें कीं सत्व । सत्वें निवर्तावें सत्व । रजतम सत्वें करूनि निःसत्व । सत्व सत्वें निवर्तावें ॥ १२२० ॥ दयादिक जो जो सत्व गुण । तो उपशमात्मकत्वें सत्वें निर्दाळून । ऐसे तिन्ही गुण जिंतोन । निर्गुण होवावें ॥ २१ ॥ यालागीं कृपानैष्ठुर्या टाकूनी । सर्वदा असावें उदासपणीं । हेचि पूर्णाची करणी । निश्चयेसीं ॥ २२ ॥ नैष्ठुर्य धरितां तमोगुण होय । विषम जगीं भासताहे । नैष्ठुर्य टाकितांचि पाहें । समत्व साधे ॥ २३ ॥ सर्व भूतीं जें समत्व । तेंचि शोधावें शुद्ध तत्व । यालागीं नैष्ठुर्यत्व । दुरी टाकावें ॥ २४ ॥ आणि कृपा धरितां जनाच्या ठाईं । ममतेसि उणें नाहीं. । ममता तेथें अनर्थ पाहीं । असंख्यात ॥ २५ ॥ यालागिं यतीनें ऐकत्र वासु । न करावा जनेंसिं सहवासु । येके ग्रामीं दिनत्रयवासु । न करावा कीं ॥ २६ ॥ चातुर्मास्य एके ठाईं । येकेचि ग्रामीं राहवें पाहीं । या व्यतिरिक्त दिवस येकही । न राहवें कीं ॥ २७ ॥ सर्वदा तीर्थाटन करावें । येके ठाईं सर्वदा न राहवें । राहिलीया स्वभावें । चित्ता स्नेह बाधेल ॥ २८ ॥ या चित्ताचा स्वभाव ऐसा । देखिली या पदार्था सहसा । जळू बाधतां मानसा । क्षणु नलगे ॥ २९ ॥ स्नेहाची जळू बाधे । मग ते न सोडी तोडीतां आधें । मासिये उडवितां मधें । अधिकचि गुंपे ॥ १२३० ॥ यदर्थी इतिहास सांगेन । आइकावें संतीं चित्त देऊन । कृपा आणि निष्ठुरपण । घातकें दोन्ही ॥ ३१ ॥ निष्ठुरतेनें घातकता । आणि जनामध्यें परमार्थ निवर्ता । ते कल्पनचि आहे समस्ता । जनासि पैं ॥ ३२ ॥ तथापि कांहिं सांगिजेल । तें तुम्हीं आयका कृपाळ । इतरांचें सांगता नवल । काय असे ॥ ३३ ॥ जे रजतमप्रधान जन । त्यांचा ठाईं निष्ठुर्यता नाहीं शून्य । त्यांचे सांगेन प्रयोजन । काय असे ॥ ३४ ॥ नहुष राजा महाथोर । स्वधर्मनिष्ठ साचार । एक शत अध्वर । अश्वमेध केले ॥ ३५ ॥ तेणें इंद्रपद जालें प्राप्त । इंद्राणी जाली गुप्त । नरवाहन प्राप्त्यर्थ । तिचीया केलें ॥ ३६ ॥ तेही थोरथोर ऋषीश्वर । केले शिबिका वाहणार । त्यांसी अरेनि करी प्रहार । अनि निष्ठुरपणें ॥ ३७ ॥ "सर्प" बोले मुखेंकरूनि । तिहीं शापिला दुखवोनि । सर्प होय म्हणोनि ॥

शापिला रागें ॥ ३८ ॥ तो तत्काळ सर्प जाला । ऐसा निष्ठुरतेचा महिमा वाखाणिला । आतां कृपेचा कळवळा । बाधि कोणा ॥ ३९ ॥ तऱ्ही सांगों प्रसंगेंकरून । ऋषभदेवाचा ज्येष्ठ पुत्र जाण । जयाचें भरत नामाभिधान । विख्यात जगीं ॥ १२४० ॥ राज्य केलें येक ध्वर । लक्ष्मीं सदां इच्छी पुरंदर । ते सांडिली सपरिवार । भांडारेंसहित ॥ ४१ ॥ वैराग्याची अति दृढता । साधन चतुष्टयीं पुरता । सद्गुरु सेविला ब्रह्मवेत्ता । आणि शास्त्रज्ञही ॥ ४२ ॥ जालें अदृढापरोक्ष ज्ञान । स्वरूपीं निष्ठा न बाणे पूर्ण । देश सोडूनि विजन । परमानंदें वर्ते ॥ ४३ ॥ तंव कोणे येके समईं । हरिणी आली तिये ठाईं । हरिणी पळाली लवलाहीं । गर्भ टाकूनि ॥ ४४ ॥ सिंहभयें गर्भ टाकितां । नदीमाजी पडलें भरता देखतां । तें बुडों पाहे मरणावस्था । त्यासी प्राप्त जाली ॥ ४५ ॥ तें देखोनिया तो महंत । अति स्नेहें व्याकुळित । बाळ काढी कृपायुक्त । होऊनियां ॥ ४६ ॥ मग तयासी लालनपालन । ऋषी करी कृपेकरून । तोचि निजध्यास अंतःकरण । बाधतें जालें ॥ ४७ ॥ काळें भरतासि जाला देहांत । परि मनीं हरणाध्यात । तेंचि शरीर प्रावत । स्वयें हरीण जाला ॥ ४८ ॥ देहांतीं जे उभें राहे । तोचि त्यास देह प्राप्त आहे । म्हणोनि देहाची सोय । कोठें न करावी ॥ ४९ ॥ इतर कपोतादिकांचा ठाईं । अज्ञानी बोलतां संख्या नाहीं । परि ज्ञातयाहि पाहीं । घात येसणा ॥ १२५० ॥ यालागिं यतीनें येकत्र वासु । न करावा जनेसीं सहवासु । येके ग्रामीं दिनत्रय वासु । न करावा कीं ॥ ५१ ॥ तैसी ते मासी उतराई होय प्राणें । परि ते मधूतें सोडूं नेणे । तैसेंचि विषयीं अंतःकरणें । वेइंजे गोडी ॥ ५२ ॥ ते गोडीचेनि समरसें । गुंतलीयाही मानसें । संसृतिअनर्थाचे वळसे । प्राप्त होती ॥ ५३ ॥ स्वरूपापासूनी च्यवे । भवदुःखीं सर्वदा भोंवे । नाना योनी पावे । मरे जन्मे ॥ ५४ ॥ ब्रह्मापासाव जालया च्युत । जीवत्वें अभिभवीजे निश्चित । मग अनर्थकोटी पावत । ते किती बोलावे ॥ ५५ ॥ यालागिं सर्वदा सर्वीं उदासीन । न करावें ममतेचें अवस्थान । तेथें गुंतलें अंतःकरण । मग कांहीं न चले ॥ ५६ ॥ म्हणोनि कृपाही सांडावी । स्नेहाची जव्ह न बाधावी । उदासीनता अवलंबावी । सर्वदा पूर्ण ॥ ५७ ॥ तैसीचि शीतोष्ण

जालिया प्राप्त । ते उगीच साहवी निवांत । ऐसें सर्वद्वंद्वसहिष्णुत्व । अवलंबावें ॥ ५८ ॥ धर्माचरण करितां । यज्ञस्नानादिकीं शीतोष्णता । तेचि साहवी प्रयत्नता । अवलंबावी ॥ ५९ ॥ देहाचेनि वेगळेपणें । शीतोष्णादि द्वंद्व साहणें । परि देहबुद्धीनें धरणें । गाजाबज्य ॥ ६० ॥ तैसेंचि वृथा वाक्य न उच्चारावें । सर्वदा मौनेंचि असावें । व्यर्थ बोलतां स्वभावें । अनर्थ ऐसा ॥ ६१ ॥ व्यर्थ उच्चारितां वाक्य । घडे स्वरूपच्युति सम्यक् । बहिर्वृत्ति सकळीक । येवों पाहे ॥ ६२ ॥ जें कां वृत्तिरूप ज्ञान । त्याचें अंतर्मुखचि अवस्थान । करावें परि बाह्य उड्डान । करूं नेदावें ॥ ६३ ॥ चित्त बाहीर यावयाचीं द्वारें । हें करणेंचि जाणावीं निर्धारें । म्हणोनि स्वविषयीं पुरें । प्रवर्तों नेदावीं ॥ ६४ ॥ यालागीं शब्द हा वाचेचा । तो वाचेस घेऊं नेदावा साचा । शब्द बोलतां चित्स्वरूपाचा । विसरु पडे ॥ ६५ ॥ ऐसेंचि सर्वेंद्रियांसि । विषय घेऊं नेदावे त्यांसी । जेणें स्वरूपाशीं । व्यवधान पडे ॥ ६६ ॥ यालागीं सर्वदा अनीह असावें । निरंतर स्वसुखचि भोगावें । इंद्रियवर्गातें नियमावें । व्यापारविषयीं ॥ ६७ ॥ जरी बोलणेंचि पडेल । तरी ब्रह्मविचार बोलावा सरळ । परि लौकिकविड्डल । कांहीं न बोलावें ॥ १२६८ ॥ ऐसें चतुर्थ श्लोकाचें व्याख्यान । यथामति जालें संपूर्ण । पंचम श्लोकाचें ज्ञान । ऐसें असे ॥ ६९ ॥ सद्गुरुचरणप्रसादें । व्याख्यान कीजे आनंदें । ते परिसिजे निजानंदें । श्रोते जनीं ॥ १२७० ॥ सद्गुरुचेनि स्मरणें । अर्थ प्रतिष्ठिले सर्वपणें । श्लोकश्लोकार्थु खुणे । पावत जाये ॥ १२७१ ॥

> एकांते सुखमास्यतां, परतरे चेतः समाधीयतां,
> पूर्णात्मा सुसमीक्ष्यतां, जगदिदं तद्बाधितं दृश्यताम्, ।
> प्राक्कर्म प्रविलाप्यतां, चितिबलान्नाप्युत्तरैः श्लिष्यतां,
> प्रारब्धं त्विह भुज्यतामथ परब्रह्मात्मना[1] स्थीयताम्. ॥ ५ ॥

ऐसा नियमूनि इंद्रियवर्ग । येकांतीं राहवें निःसंग । तेथें आत्मसुख अव्यंग । अनुभवावें ॥ ७२ ॥ एकांताचा द्विविध अर्थ । तो सांगिजले यथार्थ । जेणें बुझिजे परमार्थ । अव्यंग जाणा ॥ ७३ ॥

1 परब्रह्मात्मनि.

सुख जैसें होय तैसा रीती । आसन घालूनी बैसावें येकांतीं । शुचि प्रदेश मनोरम्यगति । जेथें असेल ॥ ७४ ॥ कामुकाचेंहि मन । विश्रांति पावे देखोनि स्थान । जळसांनिध्य रम्य वन । अथवा देवालय ॥ ७५ ॥ इत्यादि अति प्रशस्त । स्थान पाहवें भयवर्जित । तेथें आसन यथायुक्त । घालावें कीं ॥ ७६ ॥ कुशचैलाजिनादिक । आसन घालावें सम्यक । जेणें सुख पावे मानसिक । तैसें करावें ॥ ७७ ॥ आसन आणि स्थान । जेणें संतोष मानी मन । तेसें तैसेंचि योजन । करावें कीं ॥ ७८ ॥ जे स्थळीं आसनीं बैसतां । तत्काळ मनासि होय निश्चळता । तैसें योजूनि एकाग्रता । बैसावें कीं ॥ ७९ ॥ तेथें बैसोनि निश्चळ । स्वयें परब्रह्म निर्मळ । तेथें चित्त निश्चळ । समाधावें ॥ १२८० ॥

अतिशयेन परमिति परतरं तस्मिन् परतरे

अतिशयेसिं जें पर । तयासिं बोलिजे परतर । तेंचि तें ब्रह्म निर्विकार । सकळां वरिष्ठ ॥ ८१ ॥ अतिशयेसीं पर म्हणिजे । ज्याहूनी पर न देखिजे । तेंचि परतर सहजें । वोळखिजे ॥ ८२ ॥ परशब्दें ब्रह्मादिक देवमेळ । त्यांचेनि सत्ते वर्तति सकळ । तें परतर निर्मळ । परब्रह्म ॥ ८३ ॥ अथवा सकळांहूनियां पर । विराट हिरण्यगर्भ ईश्वर । जो प्राज्ञ विशिष्ट सर्वेश्वर । तोचि ईश्वर बोलिजे ॥ ८४ ॥ ते जयापासाव होति । जयाचा ठाईं प्रतिबिंबति । तें परतर सर्वार्थीं । ब्रह्म बोलिजे ॥ ८५ ॥ अथवा परशब्दें माया बोलिजे । जिचेनि आत्मा अनात्मा सुजे । भेदाभेद जाणिजे । जिच्यानि पैं ॥ ८६ ॥ परब्रह्म आणि जीव ईश्वर । हे जीचेनि भासति प्रकार । आणि विश्व चराचर । जिचेनि भासे ॥ ८७ ॥ ऐसी जे मूळ माया म्हणिजे । तेचि तें पर ऐसी वोळखिजे । ते जेथें आभासे सहजें । परतर बोलिजे ॥ ८८ ॥ जो मायेचा प्रकाशकु । मायेचा जो नियामकु । जो मायादिकांचा नायकु । तो परतर म्हणिजे ॥ ८९ ॥ अथवा देहद्वय पर म्हणिजे । त्यातें अधिष्ठूनि जेणें राहिजे । तेंचि परतर सहजें । जाणावें कीं ॥ १२९० ॥ अथवा देहद्वयाहूनि । प्राणेंद्रियें पर त्याहूनी । त्यांतें राहे जें प्रकाशूनी । तें परतर बोलिजे ॥ ९१ ॥ अथविया इंद्रियांपासाव । त्याहूनी बुद्धि पर हे स्वमेव । तीतें प्रकाशि तो अनुभव । परतर बोलिजे ॥ ९२ ॥ जो कीं बुद्धिसीं प्रकाशि । बुद्धिचा प्रवर्तकु सत्ताविशेषि । तेंचि स्वरूप परतरासि । जाणावें कीं ॥ ९३ ॥ ऐसेंचि अर्जुनासि श्रीभगवंतु । बोलिला

असे मातु । पराहूनी पराचा अर्थु । बोधि स्वयें ॥ ९४ ॥ एका परिस येक पर । तयाहूनी तें इतर । सकळांचें परतर । तें परब्रह्म ॥ ९५ ॥ तेंचि आइका भगवद्वाक्य । जेणें सकळशास्त्रार्थऐक्य । होय ते सम्यक । श्रुति आइका ॥ ९६ ॥

इन्द्रियाणि पराण्याहुरिन्द्रियेभ्यः परं मनः ।
मनसस्तु परा बुद्धिर्यो बुद्धेः परतस्तु सः ॥

जे जे आत्मलब्धीसि संनिध । तें तें बोलिजे अंतर शुद्ध । स्थूळ तें बाह्य प्रसिद्ध । बोळखावें ॥ ९५ ॥ म्हणे पार्था परियेसी । देहाहुनी परत्व इंद्रियांसी । इंद्रियांहूनी मनासीं । परत्व बोले ॥ ९८ ॥ बाह्याचां निषेवमिषें । ब्रह्म तें अंतर असे । तया सांनिधी जें जें वसे । तें परतर जाणावें ॥ ९९ ॥ मनाहूनी बुद्धि अंतर । जें शुद्धत्वें मनोवृत्ति साचार । शुद्ध सूक्ष्म ह्मणोनि पर । उपलब्धिस्थान ॥ १२०० ॥ तियें बुद्धीहूनी पर । ज्याहूनी नाहीं स्वप्रकाश इतर । तेंचि तें परतर । ब्रह्म जाण ॥ १ ॥ बुध्यादिकें परप्रकाश्यें । म्हणोनि स्वयें प्रकाशत्व नसे । आत्मा स्वप्रकाश असे । सर्वा प्रकाशकु ॥ २ ॥ तयातें परतर म्हणिजे । जो बुद्धीचा साक्षी सहजें । तेथें शुद्ध मनातें ठेविजे । सम्यक् प्रकारें ॥ ३ ॥ पहिले सांगितली पूर्णता । सप्तमी भूमि निर्विकल्पता । आतां अपरोक्ष जीवमुक्तता । अवस्था सांगों ॥ ४ ॥ सप्तमीं भूमीकेचें लक्षण । पूर्वीं सांगितलें संपूर्ण । तें साधलें तरि साधनीय जाण । कांहींच नाहीं ॥ ५ ॥ जरि अपरोक्ष ज्ञान बरवें । जालें तरि नलगे कांहीं साधावें । जीवन्मुक्तें असावें । ब्रह्मस्थिति ॥ ६ ॥ जीवन्मुक्ताचि असे । त्यास कांहीं करणीय नसे । परि सुखदुःखाचे वळसे । प्रारब्धें होती ॥ ७ ॥ अज्ञान त्याचें जळालें असे । तें तरि न बाधी कोणे मिषें । परि अज्ञानशेष उरलासे । तेणें असे प्रारब्ध ॥ ८ ॥ अज्ञानाचिया दोनी शक्ति । आवरण आणि विक्षिप्ति । आवरण गेलें ज्ञानदीप्ती । विक्षेप उरलें ॥ ९ ॥ आवरण गेलियावरी । स्वस्वरूपप्राप्ति पुरी । मागुती संसृतिपुरीं । घालूं न शके ॥ १३१० ॥ शेष उरलें जें विक्षेपण । तेणें देहद्वया नव्हेचि पतन । येऱ्हवीं कारण नाशलीया कार्य जाण । कैचें उरे ॥ ११ ॥ देहद्वयाचें मुख्य कारण । तें तव प्रसिद्ध अज्ञान । तें नाशलिया कैचें ज्ञान । देहद्वया ॥ १२ ॥ कारण तंतु जेथ सरे । तेथें कार्यपटत्व कैचें उरे । यास्तव प्रारब्ध न सरे ।

शेषें करूनी ॥ १३ ॥ प्रारब्ध जेथ असे । तेथें देहद्वयन नासे । दग्ध-पटन्याय वशें । असतांचि असे ॥ १४ ॥ प्रारब्ध आणि देहद्वय आहे । तेथें सुखदुःखादि भोग पाहें । याऽागीं अभ्यास करणें आहे । निर्विकल्पवरी ॥ १५ ॥ जीवन्मुक्तासि सुख दुःखें होती । परि अज्ञाना ऐसीं न बाधिती । द्रष्टेपण टाकिजती । नश्वर म्हणोनि ॥ १६ ॥ अज्ञानी सुखदुःखामाजी । बुडोनी जाय समजी । तैसा ज्ञानी तयांमाजी । अलिप्तपणें असे ॥ १७ ॥ तेंही न व्हावें ऐसें मनीं । आणि स्वसुखाची घ्यावी धनी । दुसरेनिविण जें निर्वाणीं । तें परम सुख ॥ १८ ॥ तेथें देहादिविषयजात । विजातीय प्रपंच समस्त । जेथें न स्फुरे किंचित । तो परमानंद ॥ १९ ॥ सुषुप्तीचिया-परी । अंतरबाह्य नेणें शरीरीं । तैसी परमानंदाची परी । जाणावी किं ॥ १३२० ॥ तेथें सुषुप्तीसि अज्ञानें आंवरले । म्हणोनि सुख नेणें आपुलें । परि नेणोनिही अनुभवलें । तैसें असे ॥ २१ ॥ कां प्रमदासंयोगीं जैसें । अंतर्बाह्य नेणिजे तैसें । बाह्यगृहीं काय वर्ततसे । तें नेणें सुखें ॥ २२ ॥ हा येक देशी दृष्टांत । सांगिजेत असे लौकिकांत । तैसें सुख तें अनंत । निर्विकल्प ॥ २३ ॥ तें दुसरेंनि मिश्रित सुखऐसें । तें विशिष्ट बोलिजत असे । येकांत भोगिलेंनि समरसें । चित्त स्मृति ॥ २४ ॥ परिछिन्नासि स्मृति बोलिजे । अपरि-छिन्न तें तेचि सहजें । ब्रम्हसुख निर्विकल्प जाणिजे । म्हणोनियां ॥ २५ ॥ जें निर्विकल्प सुख भोगिलें । तेंचि व्यवहार दशे प्रगट जालें । जैसे रात्रीचें अनुभवलें । दिवसा स्मरे ॥ २६ ॥ यदर्थीं रघुनाथा प्रति । वसिष्ठ सांगती सुखजीवन्मुक्तीं । तेंचि आईकावें संति । येकाग्रचित्तें ॥ २७ ॥

> परव्यसनिनी नारी । व्यग्राऽपि गृहकर्मणि ॥
> तेदवास्वादयंत्यंतर्नवसंग रसायनं ॥
> एवं तत्वे परे शुद्धे धीरो विश्रांति मागतः ॥

पर पुरुषारत योषिता । व्यग्रअसे गृहकर्म करितां । परि रात्रीचे नवसंगरसा तत्वता । भोगित असे ॥ २८ ॥ रात्रौ अनुभवलें जें सुख । त्याचा स्वादु रसनिःशेष । भोगितसे सुख । अनुभवलेपणें ॥ २९ ॥ परिनिर्विकल्प सुख जैसें । प्रत्यक्षरात्रीं अनुभविलें असे । तैसें दिवसा व्यापारमिषें । अनुभवेचिना ॥ १३३० ॥ तें निर्विशेष सुखभारी । हें सविशेष न्यूनपरि । तदंश येकचि सुखपरि । न्यूनता जालि ॥ ३१ ॥ तैसे निर्विकल्पदशे । जे ब्रम्हसुख भोगिलें असे ।

तोंचि व्यापारदशे । आस्वाद न करी ॥ ३२ ॥ जरी बाहीर करी व्यवहार । तरी आस्वाद न करी सुखसार । तेणें तृप्त निर्विकार । सदा असे ॥ ३३ ॥ पारि निर्विकल्प सुखकाळीं । नाहीं दृश्य दुसरेपणाचि कजळीं । या लागीं तें उपमामेळीं । कदाचि नये ॥ ३४ ॥ हें दुसरेपणाचेनि मेळे । म्हणोनि मंदपण यासि आलें । मैथुनसुख परिछिन्न जालें । म्हणोनि स्मरण घडे ॥ ३५ ॥ आत्मसुख व्यापक । अपरोक्ष निर्विशेष । यासीं उपमा न सम्यक । कैसें घडे ॥ ३६ ॥ येथें आइका उत्तर । जें बोलिजेल परिकर । आत्मसुख अपरोक्ष साक्षात्कार । होये हें साच ॥ ३७ ॥ पारि दुसरेपणें समरसें । यासि मंदत्व आलें असे । जे नीहार युक्त ऊष्ण जैसे । मंदपण आणी ॥ ३८ ॥ नाना सीताचिया झुळका । मंदपण आलें ऊष्णादेखा । द्वितीय मिश्रितें येका । मंदत्व आणी ॥ ३९ ॥ दुसरीयाचे संबंधेंविण । जैसें वैशाखमासीचें उष्ण । हिमवात विहीन । अतितीव्र जैसें ॥ १३४० ॥ व्यासंगपणें जें सुख । तें तव मंदचि देख । म्हणूनि निरूपाधिक सुख । भोगूं इच्छी ॥ ४१ ॥ जो दृश्य आनंदू । तो तंव स्वभावता मंदू । ह्मणोनि दृश्य विहीन परमानंदू । भोगूं इच्छी ॥ ४२ ॥ जेथें कर्ता कर्म करण । जेथें होय त्रिपुटी क्षीण । तें परमानंदसुख गहन । उपाधि अतीत ॥ ४३ ॥ आणि दृष्टा दृश्य दर्शन । हें जेथें नाहीं जाण । तें परमानंदैक घन । निरुपाधि सुख ॥ ४४ ॥ जेथें भोक्ता भोग्य भोगणें । जिये ठाई नसती क्षयपणें । तें सुख निरुपाधिक जाणणें । निश्चयेसीं ॥ ४५ ॥ ऐसिया सुखाकारणें । भोगूं इच्छिजे त्याचेनि मनें । सर्वदा समाधिस्थ असणें । निर्विकल्प ॥ ४६ ॥ हें सुख सर्वदा भोगणें । विषयसुख दुःखावरीही न येणें । देहादि विस्मृती होय जेणें । तेंचि करावें ॥ ४७ ॥ ऐसें जयाचिये मनीं । तेणें प्रवर्तावें ये साधनीं । सर्वदा बैसोनि एकांत स्थानीं । मन निर्वाणीं ठेवावें ॥ ४८ ॥ परतर जें ब्रह्म असे । आपणेसि अभिन्न ऐसें । तेथें वासना त्यागें निर्विशेषें । मन ठेवावें ॥ ४९ ॥ सम्यक ठेवावें ऐसें ह्मणे । तें शुद्ध आणि वासनादि टाकणें । सर्वही टाकिलेपणें । मळ त्यांचें ॥ १३५० ॥ मागुते विक्षेप नपवे । तैसें ठेवणें बरवें । ठेवितांचि मनपण आघवें । हारवी आपुलें ॥ ५१ ॥ मनाचा ठाव । कैसें तें । येक परब्रह्म सदोदित असे । दुसरें कांहीं ना भासे । आपणेंविण ॥ ५२ ॥ दुसरा अर्थ ऐसा असे । येकांत कासया ह्मणिजेत असे । जेथें सर्वदा दुसरें न भासे । तो एकांत जाणा ॥ ५३ ॥

प्रपंचाचा निराशी । येक उरे अवशेषी । तोचि एकांतू परियेसी । आन नाहीं॥ ५५॥
तें एकांतब्रह्मचि असे । तेथेंचि रहावें यथा समरसें। दुसरेंपणाचें पिसे । जेथें नलगे ॥
जऱ्ही प्रपंचूस्मरे । दर्शनें बाधित द्वैतस्फुरे । तऱ्ही बैसका न पुरे । ऐकांती
हानि ॥ ५६ ॥ जेथें न मोडे स्वरूपस्थिति । तो लौकिकींही एकांत-
स्थिति । सर्वत्र वस्तूचे गळे नेणती । तेथें लोकांतु कैचा ॥ ५७ ॥ येकांत
म्हणोनी पर्वतदरी । जीव वनवासू करुनि भारी । मन स्वरूपीं क्षणभरी । न
राहे ज्याचें ॥ ५८ ॥ संकल्प विकल्पाच्या लहरी । दुसरी सृष्टी निर्माणकरी ॥
तो कोटिप्रपंचा माझारी । बुडाला असे ॥ ५९ ॥ त्याचें बैसणें ते व्यर्थ ॥
तो येकांत नव्हे लोकांत । जयाचे निमिषभारी चित्त । परमानंदें॥ १३६० ॥
सकळाजनामध्यें आहे । आणि ब्रह्मावेगळें दुजें न पाहे । तो सर्वदा येकां-
तींच आहे । परमानंद भोगे ॥ ६१ ॥ जनामाजीं तरी असती । परी परमा-
नंदें डुल्लती । करणें व्यवहार तो गती । वेडियाची जैसी ॥ ६२ ॥ जो कीं
गृहस्वामी असे । तो द्रव्यादि संभार संतोषें नेंत असे । वेठीया दुःखें जातसे ॥
भोगें बांधला ॥ ६३ ॥ वोझें नेणें हे नाहीं मनीं । खंतिदुःख मानी प्रतिक्षणीं ॥
परि प्रारब्धाची करणी । भोगीतू जाय ॥ ६४ ॥ तैसा स्वसुखें असे कोंदला ॥
परिप्रारब्धें असे बांधला । तेणें प्रपंचु उगला । चालवीतं असे ॥ ६५ ॥ परि
तो मनोदये चालवी । जैसी वेठियाची ठेवाठेवी । प्रारब्धें असे गोवि । परि
गुंतला नाहीं ॥ ६६ ॥ सोम जळीं कांपतु आहे । ऐसा जळसंबंधें जना भ्रमु
जाये । परि तो तेथींचा तेथें निश्चल आहे । बिंबीं कांपणें मिथ्या ॥ ६७ ॥
तैसा अलिप्त देह द्वयासी । तेथ तत्संबंध कैंचा पाहासी । तोचि निर्मुक्त
सर्वांशीं । ज्ञानबलें ॥ ६८ ॥ असो चित्त ब्रह्मीं ठेविलीया । ठेवितांच जाय लया ।
मग ब्रह्मावेगळें दिसावया । कारण नाहीं ॥ ६९ ॥ जेणें हें दुसरें ऐसें माझे ।
तें मन स्वरूपी विराले.असे । मग तया वेनळें न दिसे । अणुमात्रही ॥ १३७० ॥
येक आत्माचि परिपूर्ण । सबाह्याभ्यंतरीं जाण । जैसें कुंडला अंतर बाह्य सुवर्ण ॥
तयापरि ॥ ७१ ॥ जिकडे जिकडे पाहों बैसे । तिकडे पाहो ते नासि-
तया ब्रह्मचि असे । अन्यथा कांहिं न भासे । दुसरे पणें ॥ ७२ ॥ हेंचि
पूर्णब्रह्म स्थिती । ब्रह्मरूप त्रिजगति । हें बोलणेंचि नव्हे व्यक्ती । सर्व म्हण-
तां ॥ ७३ ॥ पूर्णानंद पूर्णपणें । ऐसेंचि त्रिआशंन्याचे ईक्षणें । ब्रह्मावेगळें
सर्वथा नेणे । दृश्यजात ॥ ७४ ॥ येथें ' ' ॥ का थोर असे । जरी ब्रह्मावे-

गळें कांहीं न दिसे । तरि विश्व हें कैसें आसे । सांगा वेगीं ॥ ७५ ॥ ऐसी आशंका उपजेल । म्हणोनि आचार्य बोलिला बोल । जे विश्व संबाधित सकळ । भासेल तया ॥ ७६ ॥ बरवे रीती बांधिलें । बरवें असोनी नाहीं जालें । जैसें स्वप्न पदार्थ देखिले । जागृती दशे ॥ ७७ ॥ स्वप्नीं देखिजे जे पदार्थ । ते तेंचि अवस्थेसि भासती यथार्थ । जागृतीसीं अयथार्थ । नाहींच होती ॥ ७८ ॥ जें जें देखिलें अनुभविलें । त्याचे भोक्तृत्व प्रत्यक्ष जाले । साच ऐसें मानलें । स्वप्नामाजी ॥ ७९ ॥ तेचि जागृतीसिं आ-ल्यावरी । येकही न दिसे क्षणभरी । मां भोक्तृत्वा काय कोण करी । होइल साच ॥ १३८० ॥ केवळ स्मृती मात्रेंचि राहे । परि साचा सारखी होये । स्मरोनि कोण्हा उपयोगा नये । कोणे परी ॥ ८१ ॥ कोण्हि कार्य विशेष होतां । कां हानि वाटति न स्मरतां । कोण्ही उपयोगू पावता । ऐसें नव्हेचि ॥ ८२ ॥ जे स्वप्नावस्थेची स्मृती । भासे साचा सारिखी चित्तीं । त्याची नांव बाधित स्थिति । बोलिजे पैं ॥ ८३ ॥ तैसें अज्ञान दसे । विश्व साचासारिखें दिसे । ज्ञान जालिया आपैसें । नाहींच होय ॥ ८४ ॥ परिदिसें पूर्विल्या ऐसें । परितें संबाधित असे । स्वप्न पदार्थ दिसती जैसे । जागृतीसीं ॥ ८५ ॥ तेसें प्रपंचाचें यथार्थ तत्व । गेलें व्यवहारीक सत्व । दिंसे तें संबाधित्व । सत्व विहीन ॥ ८६ ॥ अपरोक्षानुभव जालिया । वधित विश्व होय आपैसया । सांगेन कारण होवावया । बाधित विश्व ॥ ८७ ॥ यदर्थीं संमती महाथोर । जें कीं बोलिला वार्तिककार जो कीं श्रीमंतु सुरेश्वर । ईश्वर मूर्ति ॥ ८८ ॥

शास्त्रेण नश्यत्परमार्थतत्वं । व्यवहारिकं नश्यति चापरोक्षात् ॥
प्रारब्ध नाशात्प्रतिभासनाशो । एवं त्रिधा नश्यति विश्वमाया ॥

विश्व लक्षण जे त्रिविध माया । ये त्रिःप्रकारे जाय लया । तें सांगेन निश्चया । त्रिः प्रकारातें ॥ ८९ ॥ शास्त्र श्रवण करितां । परमार्थ सत्वनाशे तत्वतां । परमार्थ ह्मणिजे वास्तव्यता । जे कीं मानली ॥ १३९० ॥ आज्ञानीचे ये दशे । प्रपंचु यथार्थचि दिसे । सर्वथा मिथ्या ऐसें । न मनी कदा ॥ ९१ ॥ नाना परी सांगतां । देखे जरी क्षय पावतां । तऱ्ही याचि असत्यता । नमनी कदा ॥ ९२ ॥ तोचि दृढ अध्यास बैसला असे । कांहीं केलिया तो न नाशे । तोचि शास्त्रेंविण अभ्यासे । मिथ्या ऐसा कळे ॥ ९३ ॥ शास्त्रें दृढ केले नश्वर । प[ण] जेथें मनी नये साचार । करितां शास्त्र विचार ।

युक्तीनें तरी कळे ॥ ९४ ॥ युक्ती विचारे नश्वरता । कळे प्रपंचाची तत्वतां । परि नये अनुभव पंथा । अपरोक्षें विण ॥ ९५ ॥ परी वस्तु बुद्धि गेली । अवस्तूत्वें प्रतीति जाली । परि ते अनुभवा वेगळिं । शास्त्र सिद्ध ॥ ॥ ९६ ॥ युक्तीनें नश्वर ऐसें कळलें । परि व्यवहारत्वें असे उरलें । प्रत्यक्षत्वें देखिलें । व्यवहार क्षेम ॥ ९७ ॥ अन्नोदकें करुनीं । क्षुधा तृषा हरे तत्क्षणीं । तैसेचि घटादिकापासोनि । जळा नयन देखिलें ॥ ९८ ॥ ऐसा व्यवहार यथोचित । देखिला आहे प्रत्यक्षभूत । यालागीं व्यवहारीक सत्व । उरलें असे ॥ ९९ ॥ जेव्हां अपरोक्ष साक्षात्कार । स्वरूपेसीं होय निर्धार । तेव्हां व्यवहारीक सत्वसार । तत्काळ जाय ॥ १४०० ॥ मग प्रतिभासकचि उरे । परमार्थिक व्यवहारिक विरे । जैसीं मृगजळ लहरें । आभासमात्र ॥ १ ॥ ते जरी सत्यासारिखें दिसे । तरी असत्य ऐसें कळलें चि असे । देखलिया देख संतोषें । न घेयिजे मनें ॥ २ ॥ या विश्वाचें त्रिविध सत्व । भासावया मूळ अज्ञान तत्व । परमार्थ व्यवहारिक सत्व । आणि प्रतिभासक ॥ ३ ॥ या त्रिविध सत्वा करून । विश्वभास दृढतर जाण । बाणला तो न फिटे पूर्ण । दृढावलेपणें ॥ ४ ॥ यासी नाना उपाय करितां । न नाशेहा सर्वथा । अधिकेचि वर दवडितां । फारचि होय ॥ ५ ॥ हा नाशावयालागिं । दोनी उपाय जगीं । येक शास्त्र आणि अंतरंगी । अनुभवें करुन ॥ ६ ॥ शास्त्रें सत्यत्वनासे । अपरोक्षानुभवें व्यवहारिक भ्रंशे । प्रातिभासिकही नाशे । प्रारब्धक्षयें ॥ ७ ॥ व्यवहार साचा सारिखा करी । नैश्वर जाणे शास्त्रभरोवरी । ते व्यवहारीकसत्व क्षणाभितरीं । अपरोक्षें जाय ॥ १४०८ ॥ अनुमाना वेगळें । अपरोक्षानुभवें केवळें । व्यवहारीक सत्व मावळे । निश्चयेसीं ॥ ९ ॥ मग प्रातिभासिक उरे । तें जीवन्मुक्ति वर्ते साचारें । प्रतिभासिक निर्धारें । कैसें ते सांगो ॥ १० ॥ जरि सर्वथा साच न वटे । ना कोणी हि प्रयोजनें न घटे । तथापि ज्ञातयाप्रति प्रगटे । मृगांभ जैसें ॥ ११ ॥ मृगांभ जळाची सारिखें दिसे । परि प्रबुद्धा साच ऐसें न भासे । ना घ्यावया न प्रवेशे । मृगांभ डोहीं ॥ १२ ॥ अथवा गगनीं गंधर्वनगर । अज्ञानासी दिसे साचार. । सज्ञानांहि दिसे परि साचार न मनि कदा ॥ ३ ॥ त्याच्या भासण्यानें संतोषे ना भासतां न असंतोषे । मिथ्या काय येक भासे । परि आदरू नाहीं ॥ १४ ॥ नाना वोडंवरीचा व्यवहारू ।

अज्ञाना दिसे साचारु । ज्ञातया कोणीच व्यवहारू । उपयोगूं न मनी ॥ १५ ॥ नाना स्वप्नींचें पदार्थजात । जागृतीसीं असती भासत । पारि क्रूर सौम्यादिक चित्त । हर्ष विषाद न मनी ॥ १६ ॥ तैसा उपयोगाविण । जे कीं भासमात्रचि जाण । हर्ष विषाद दैन्य । नुपजे ज्याचेनी ॥ १७ ॥ ऐसा जो केवळ भासमात्र । आणि दृष्टि तरी दिसे विचित्र । तेंचि प्रतिभासिक सूत्र । निश्चयेसीं ॥ १८ ॥ नाहो ऐसें प्रतिभासीक असे । तरि ज्ञानियासिही कर्म करितां दिसे । तें कवणा कारणा मिषें । तें सांगीजो कीं ॥ १९ ॥ मृगांभ देखिलीयावरी । ज्ञाता काय तेणें व्यवहार करी । तैसें विश्वबाधित शरीरावरी । प्रवर्ते का ॥ २० ॥ येथ आईका उत्तर । तुम्हीं बोलीले साचार । ज्ञानियासि व्यवहार । सर्वथा नाहीं ॥ २१ ॥ तो कर्ता ऐसा दिसे । परि कांहींच करितू नसे । अज्ञानी लोक पिसे । कर्तृत्व मानिती ॥ २२ ॥ शुद्ध वस्तूचा ठाईं । कर्तृत्व भोक्तृत्व कैचें काई । तो सर्वदा अविकारी पाही । निर्गुणपणें ॥ २३ ॥ ऐसानि कर्ता ह्मणाल । तें तव सर्व नायिक बोल । तो तव अकर्ता केवळ । चिद्धनैकरस ॥ १४२४ ॥ आपुले निजज्ञानें करुनी । कर्ता भोक्ता ऐसें मानी । वास्तव्य तया कर्तव्यकरणी । काहिंच नाहीं ॥ २५ ॥ पूर्वसंस्कार वशें । राहिलेनि अज्ञानशेषें । ज्ञानियाचे देह तेणें मिषें । व्यापारत असे ॥ २६ ॥ तो व्यापार होय देहादिकीं । तो अलिप्त जैसा चंद्र उदकीं । अज्ञानी कूपादिकीं । चंद्रची घे ॥ २७ ॥ असो तो लोकसंग्रहार्थ जाण । करितु कर्मे आपण । पारि विधिनिषधपूर्ण । नसोनि करी ॥ २८ ॥ विधि आचरता गुण आहे । दोषोपशम आणि फळ प्राप्त होये । इयेबुद्धि पाहे । विधि पाळीत नाहीं ॥ २९ ॥ निषेध करितां नरक होती । पाप होय नाहीं फळप्राप्ति । इयेबुद्धि निषेध वृत्ती । त्यजीत नाहीं ॥ ३० ॥ या दोहीं विलक्षण । जैशी अर्भक चेष्टा जाण । नसोनि गुण दोष दर्शन । अहेतुक करी ॥ ३१ ॥ लोकाचारी कर्ता दिसे । येऱ्हवी तो अकर्ता असे । यदर्थी उद्धवाप्रति विशेषें । बोलिले असे ॥ १४३२ ॥

दोषबुद्ध्या भयातीतो निषेधान्न निवर्तते ॥
गुण बुद्ध्याच विहितं न करोति यथाभर्कः ॥ १ ॥

याालागीं अज्ञानशेषें करून । ज्ञानी कर्म करी जाण । परी तया कर्ता न ह्मण । सर्वथैव ॥ ३३ ॥ जें इंद्रियाचें कर्म असे । तें तव जीवन्मुक्ताच्या

ठाईं वसे । तेंचि निर्विकल्पसमाधिदशे । निःशेष नाहीं ॥ ३४ ॥ परि कर्म केलिया वेगळें । सर्वथा न राहि जें उगलें । ऐसें श्रीकृष्णही बोलिले । पार्थाप्रति ॥ ३५ ॥ जें जालेनिही ज्ञानें । सर्वदा असतां स्वरुपानुसंधानें । परि कर्माचें करणें । संस्कार वशें ॥ ३६ ॥ तेंचि श्लोकार्थू बुझिजे । जेंकीं बोलिलें यदुराजें । जेंकीं धनंजय व्याजें । निरूपिले असे ॥ ३७ ॥

नहि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत् ।
कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणैः ॥ १ ॥
सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेर्ज्ञानवानपि ।
प्रकृतिं यांति भूतानि निग्रहः किं करिष्यति ॥ २ ॥

ऐसें होवावया कारण । पुसाल जरि निदान । तरि तेंही सांगों; चित्त देऊन । परिसिजे ॥ ३८ ॥ अज्ञानाच्या दोनी वृत्ती । आवरण विक्षेपात्मक स्थिति । ज्ञान होताचि होय निवृत्ती । आवरणाची ॥ ३९ ॥ तें आवरण गेलिया नंतरे । सर्व सरे संसार भे उतरे । जन्मामागें जन्मांतरे । जळोनिच गेलीं ॥ १४४० ॥ जेंहीं होवावें जन्मांतर । तें कर्मचि सरलें क्लेशाकार । संचित क्रियमाण प्रकार । जयातें बोलति ॥ ४१ ॥ याचीहि सर्व विवंचना । पुढें सांगिजेल जैसें ये मना । तैसें निरूपण सज्ञाना- । प्रति कीजेल ॥ ४२ ॥ देहद्वयासहित संसृति । जळाली जेथ सर्वार्थी । तेथें जन्ममरणगति । राहिली काय ॥ ४३ ॥ हें सर्व आपणासि न जाणतां । घडत असे सर्वथा । ते आपणासी जाणत खेवो तत्वता । नाशोनि जाये ॥ ४४ ॥ तंवचि स्वप्नाभासू असे । तेथें उत्पत्ति मरणही दिसे । पुत्रभार्यादि संतोषें । समारंभू करी ॥ ४५ ॥ स्वयें लक्ष्मीवंत होय । राज्यपद भोगितू जाय । तें गेलिया अनुभवितु आहे । दरिद्र आपण ॥ ४६ ॥ पुत्रादिकांची नाशप्राप्ति । तेणें सुखदुःखाची आप्ती । सकल भोगी जंव जागृति । प्राप्त होये ॥ ४७ ॥ जागृतीचे ये दशे । आपणा वोळखे वास्तव ऐसें । तेव्हां स्वप्न भ्रम पिसे । नाशोनि जाय ॥ ४८ ॥ जंव जंव जागृति उदिपें । तंव तंव पावे आपणापे । आपणा पावे तवतव स्वरूपें । स्वप्ननाशे ॥ ४९ ॥ निश्चित आपणापे पावे । तेव्हां निःशेष स्वप्न न अभिभवे । मग राहिलें अनुभवें । आपुलेनी ॥ १४५० ॥ तैसें जंव जंव अज्ञान जाये । तंव तंव

आपणा तें आणवू आहे । जंव जंव जाणे तों तों क्षय होय । भवभ्र-माचा ॥ ५१ ॥ आपणातें असंदिग्ध जाणे । तेंचि अज्ञानाचें भस्म होणें । संसारस्वप्ना मालवणें । तेंचि होय ॥ ५२ ॥ मागुता भ्रमून पावे । अज्ञान सर्वथा न उद्भवे । आवरण न करवे । स्वरूपाचें ॥ ५३ ॥ परि विक्षेपात्मक वृत्ती । उरली असे जीवनमुक्ती । जेणे देहादि प्रपंचस्थिति । भासे अभासरूप ॥ ५४ ॥ पारि विधि निषेध नियमें । कर्म कारितूं नाहीं संभ्रमें । तें पूर्वीच निरूपणा उपमे । अर्भकाचे केलें ॥ ५५ ॥ पारि आभास उरला आहे । तेणें विक्षेपात्मके कर्म करी तूं जाये । पारि तेथींचा सर्वथैव नव्हे । प्रतीति बळें ॥ ५६ ॥ नाहो अज्ञानाची या परी कर्म करी । भासे विश्वा-चिही भरोवरी । आणि तो सुनिश्चळू अंतरीं । प्रतीतिबळें कैसा ॥ ५७ ॥ जेव्हां विश्वभासत असे । आणि अज्ञानाचेनि उरले निःशेषें । कर्मही कारितू दिसे । तरी द्वैत कैसें गेलें ॥ ५८ ॥ जेव्हां देहादि द्वैत स्फुरे । तेव्हांच विश्वाभास भासे खरे । कर्म कारितो हेंही खरें । द्वैत बुद्धिस्तव ॥ ५९ ॥ जेव्हां द्वैत स्फुरत आहे । तेव्हां अद्वैत कैचे काय । अद्वैत तेंचि ब्रह्म होय । निश्चियेसीं ॥१४६०॥ जेव्हां द्वैत निःशेष हरपे । तेव्हांच अद्वैत ब्रह्म उद्दिपे । तेंचि अद्वैत सुख स्वरूपें । जाणावें कीं ॥ ६१ ॥ ज्ञानाचें फळ हेंचि असे । जें दुःख सर्व निःशेष नासे । निर्विशेष सुख उल्हासे । तेंचि फळ ॥ ६२ ॥ तरि तेथें द्वैताची स्फूर्ति असे । तेथें दुःख सर्वदा वसे । दुःख तेथें सुख नसे । निशेःष जाणा ॥ ६३ ॥ हें शास्त्रें आणि अनुभवाशीं । स्वयें येतसे प्रतीतिसीं । ऐसें असतां तुमच्या निरूपणासीं । दोष येतसे ॥६४॥ तरि येथ आईका उत्तर । सांगिजेल अति सुंदर । चित्त करुनी येकाग्र । परिसेजे संति ॥ ६५ ॥ तरि द्वैताच्या विनाशे । दुःखही निःशेष नाशे । दुःख नाशे सुख उल्हासे । निर्विशेष ॥ ६६ ॥ दुख निवृत्ति सुखाची प्राप्ति । हेंचि ज्ञानफळाची व्यक्ती । हें युक्तचि बोलिले ति । आन नाहीं ॥ ६७ ॥ विक्षेपात्मक अज्ञानांशे । प्राति-भासिक विश्व दिसे । आणि द्वैतात्मक कर्मही दिसे । विधिनिषेधपूर्वक ॥ ६८ ॥ हें असतां ज्ञान कैसें । अद्वैतानंद सुख कोठें असे । जीवन्मुक्ती हे तव नसे । ऐसा संदेह तुमचा ॥ ६९ ॥ तरि ज्ञान जालया नंतरें । अपरोक्षानुभवे साचारें । द्वैताभास कैसा उरे । जीवन्मुक्ती ॥ ७० ॥ अपरोक्षानुभवासरिसें । द्वैत पळे दाही दिशे । मग द्वैत कोणा मिषें । राहिलें तेथ ॥ ७१ ॥

अपरोक्षानुभव कळलियावरी । मग लौकिक द्वैताचि भरोवरी । तरि तोहि येका दों उत्तरी । परियेसि जे ॥ ७२ ॥ स्वरूप जैसें अद्वयानंद । सुख संविति निजबोध । परिपूर्ण अगाध । अनंतपणें ॥ ७३ ॥ बुद्धिची शुद्ध वृत्ती । स्वस्वरूपाकार असे होती । तेन्हांचि बुद्धिपणें पुढती । नुधवीच माथा ॥ ७४ ॥ बुद्धि स्वयें जेथें बुडे । तेथें मनासि आधींच उघडे । पाहतां चहुकडे । न देखिजे नागु ॥ ७५ ॥ जेथें बुद्धिच विरे स्वरूपीं । तेथे द्वैतातें कोण आरोपी । द्वैत चित्र बुद्धीपटरूपी । लिहिलें असे ॥ ७६ ॥ जैसा येक पट अति शुभ्र असे । तेथें डीक देऊनी करिती अनारिसें । तयावरिहि ठसे । कृष्णवर्ण करिती ॥ ७७ ॥ तया कृष्णवर्णामाझारीं । रंग भरिती नानापरी । अश्वरथ गज कुसरी । उष्ट्र पक्षी ॥ ७८ ॥ गो वृषभ मेष तिर्यक याति । राजा परिवार मंत्री पदाती । स्वामि सेवक पर्यंक गति । छत्रचामराचि ॥ ७९ ॥ एक सेव्य येक सेवक असती । येक सुंदरपणें निकटवसती । पुत्रभार्यादि व्यवहार करिती । येक निजती रात्रि ह्मणोनि ॥ १४८० ॥ येक दिवसाचें कर्म करिति । येक पाकादि निष्पत्ती । येक गोदोहनमंथन करिती । येक जेविती प्रीति करी ॥ ८१ ॥ येक सींबिकेसीं बैसती । येक तया ते वाहाती । किंबहुना जैसी स्थिति । प्रपंचाची ॥ ८२ ॥ तैसेंचि तयें लिहिती । नाना वेष भूषणें वस्त्रें करिती । ते यथार्थ मानिती । पदार्थ मूर्ख ॥ ८३ ॥ तोचि पट जरी नाशला । कां विपरीत घडी करुनी ठेवला । तरि चित्राभास जाला । सांगावें कीं ॥ ८४ ॥ तैसें विश्वचित्र बुद्धिपटीं । भासतसे अज्ञान दृष्टीं । ते बुद्धि विरालिया सृष्टी । कैचि भासे ॥ ८५ ॥ जेणें भासे तें अज्ञान गेलें । तेथे भासे तिसीं डबडबलें । या दोहीं वेगळें । कोठें सांगा ॥ ८६ ॥ सद्गुरुचिया कृपा दृष्टी । अज्ञान नासे उठाउठी । बुद्धि जंव स्वरूपेसि ने हटि । तंव ते नाहींच होय ॥ ८७ ॥ बुद्धिसहित मन विरे । विरोनि स्वप्रकाशें जें उरे । तेंचि स्वरूप निर्धारें । ब्रह्मात्मैक्य ॥ ८८ ॥ तिये स्वरूपीं स्थिरावलेपणें । नाहीं मन बुद्ध्यादिमान । परमानंद चिद्घन । केवळ जें असे ॥ ८९ ॥ तें ओळखोनि स्थिति । वोळखी बुद्ध्यादि मावळती । परमानंदाची ये निबिड गति । नाहीं उसंति जाणूनियां ॥ १४९० ॥ त्या नाम अपरोक्ष साक्षात्कार । जाणति अनु-

भविये चतुर । तेये हें विश्व चराचर । कोठें भासे ॥ ९१ ॥ हे निर्विकल्पसमाधि । येथें कैचि देहादि उपाधि। परिव्युत्थान काळीं बाधि । प्रपंचाभासू ॥ ९२ ॥ ऐसें तुम्ही म्हणाल । तरि तेही आईका बोल। व्युत्थान काळींहि जगड्याळ । सत्यत्वें नसे ॥ ९३ ॥ समाधिच्चिये वेळे । बुद्धिनिः-शेष मावळे । म्हणोनी मृगांभ सांजवेळे । न भासे जैसें ॥ ९४ ॥ व्युत्थान-काळीं बुद्धि असे । परि ते पाठिमोरि घडी केली असे । ते मागुन चित्त आभासे । कांहीं बाही ॥ ९५ ॥ परि समोर साचपणें होतें । तैसें नव्हेचि मागुतें । भासे परि अवयवाकृतें । तैसें नाहीं ॥ ९६ ॥ प्रपंचेसि समो-रपणें । तेंचि बुद्धिचें बुद्धिपण । पाठमोरिया ज्ञान । वृत्तिरूपतेंच्चि ॥ ९७ ॥ बुद्धि सर्वदा स्वरूपीं असे । पारि बहिर्मुखें बाहीर येतसे । ते बाह्यवृत्ती निरोधि लीया अपैसें । ब्रह्मींच वसे ॥ ९८ ॥ या लागिं इतुकेचि करावें । बहिर्मुखपण बुद्धीचें टाकावें । मग गुरू खुणे स्वभावें । स्वरूपींच असे ॥ ९९ ॥ प्रपंचासीविमुख जाण । तेंचि बुद्धीचें पाठमोरे-पण । तेथें स्वरूपीं अवस्थान । परि प्रपंचू नेणे ॥ १९०० ॥ जाणे तो आभासमात्र । जैसे वोडंबरींचे विचित्र । परि साच सर्वत्र । नभासे कीं ॥१॥ इतुकेनिकाय अद्वैतासि हानी । देखतांहि मृगांभ नयनीं । दुसरी गंगा ऐसें मनीं । स्वप्नींहि नेघे ॥ २ ॥ स्फुरतां हि मृगजळ । परितें न म्हणें गंगा-जळ । द्वैत बुद्धि केवळ । नुमटे तेथें ॥ ३ ॥ येखादेनि बळात्कारु केला । तऱ्ही जळबुद्धि नेघे मृगांभाला । अथवा गंगेसि वेगळा । दुसरा गंगा-ओघु ॥ ४ ॥ भासतां हि बुद्धि न भ्रंशे । येक सूर्यचि जाणत असे । साच दिसतां न दिसे । मिथ्या भ्रमु. ॥ ५ ॥ अथवा नौकस्था पुरुषासि । चळण भ्रमे तीरस्थ वृक्षासीं । तेणें ते सत्यचि ऐसी । बुद्धि तो नकळे ॥ ६ ॥ तो भ्रमला नसतां । वृक्षा ज्ञान न प्रकटतां । वृक्षीं चंचळता । देख-तूचि असे ॥ ७ ॥ नाव भ्रमे आपण । तिचा संगू पुरुषासीजाण । तेणें संगेचि वृक्षीं भ्रमण । देखतू स्वयें ॥ ८ ॥ तैसें साच स्वरूपीं अवस्थान । जाल्या बुद्धिचें निर्वाण । मिथ्या आभास प्रपंच भान । सत्यत्वें कैचें ॥ ९ ॥ जेथें प्रपंचु मिथ्या भासे । बुद्धिसीं स्वरूपीं अवस्थान नसे । तेथें समाधिच्च अनारिसे । नाहीं जाण ॥ ९११० ॥ तो निर्विकल्प समाधि । हा सविकल्प

निरवधि । द्रष्टा दृश्य उपाधि । स्फुरे म्हणोनी ॥ ११ ॥ पारि प्रपंच साच-पणें नेघे । तेणें द्वैतबुद्धि कदा न वळघे । द्वैता भावें दुःख अवघें । नाशोनि जाये ॥ १२ ॥ दुःख भावें सुखप्राप्ती । हि तव न चुके कल्पांतिं । यालागि जीवन्मुक्ती । सुख संविती असे ॥ १३ ॥ अद्वैत स्थिर जाल्या । द्वैतांहि लया गेलियां । पारि जीवन्मुक्तकर्म करावया । संस्कार असे ॥ १४ ॥ जग देखे स्वप्नापरी । तन्ही संस्कारें कर्म करी । ऐसें श्रीवसिष्ट विश्वेश्वरीं । निरूपित असे ॥ १५ ॥ जोकीं विश्वाचा ईश्वरू रामू । जो योगियांचा पूर्ण कामू । तो आईके ऋषी उत्तमू । सांगतू असे ॥ १६ ॥ ते योगवासि-ष्टिचि संमती । चित्तदेउनी आईकावी संतीं । जे श्री वसिष्ट रघुनाथाप्रती । बोलते जाले ॥ १७ ॥

अद्वैत स्थैर्यमायाते द्वैते च प्रशमं गते ।
योगिनः कर्म कुर्वंति पश्यन्ति स्वप्नवज्जगत् ॥

ह्मणोनि ज्ञान जालयाहि वरी । भोगितांही परमानंदु अंतरीं । विश्व भासे मिथ्यापरी । प्रातिभासिक ॥ १८ ॥ विश्व प्रतिभासकहिं भासतां । संस्कारें वर्ते कर्मकर्तव्यता । परि द्वैत न स्फुरे ना सुखहानता । नघडे त्यासी ॥ १९ ॥ तेही प्रतिमासिक प्रारब्धनाशें । निःशेष नासतचि असे । परमानंदें योगी असे । ब्रम्हात्मैक्यें करुनी ॥ १९२० ॥ हें पुढें कीजैल निरु-पण । प्रस्तुतीं विश्वसंबंधित देखणें जाण । त्या मूळपदाचें व्याख्यान । ऐसें केलें ॥ २१ ॥ ऐसें संबाधित विश्वजालया । पूर्णात्माचि येकू ये प्रत्यया । दुसरें नाहीं तेथ तया । तेंचि बोलिजे ॥ २२ ॥ आपणाविण पाहतां कोडे । दूजे न भासे चहूंकडे । येकला एकूचि वाडे कोडें । आपण आपला ॥ २३ ॥ अपूर्ण भासे दुसरेपणें । तें दुसरीया नाहींच होणें । आतां परिछेद कवणें गुणें । होईल सांगा ॥ २४ ॥ जन्ही बाधित विश्व दिसे । तन्ही पूर्णत्व नभ्रंशे । मुळी दृष्टी त्यासी नसे । त्या असती प्रेमू ॥ २५ ॥ हें विश्व तव नाम रूपात्मक । ऐसें जाणें सम्यक् । विवर्ततो नव्हे बाधक । अधिष्टानज्ञानें ॥ २६ ॥ अधिष्टानज्ञान जालें असे । तेथें विवर्त संस्कार जन्हि भासे । तन्ही सत्यत्वाचें पिसें । नलगे तया ॥ २७ ॥ अधिष्टान शुक्तिका कळली । तेथें संस्कारे रजतरूपे वर्तली । तरी साचपणें भूली । कदानये ॥ २८ ॥

अधिष्ठान कळलें नसतां । रजत बुद्धि धावें अवाचिता । सत्यत्वें अभास चित्ता । हर्ष शोकाचा ॥ २९ ॥ ज्ञातया ज्ञेय साच नवटे । तेथें अदय बुद्धि कैंचि प्रगटे । भासतांही बुद्धि न उठे । अधिष्ठानीहुनी ॥ १५३० ॥ तैसें अधिष्ठान ज्ञानें । बुद्धि उठे उपादेयपणें । भासतांहि निश्चित जाणें । भ्रमू ऐसा ॥ ३१ ॥ जो कीं आभास भासे । तो तंव नामरूपात्मक असे । नामरूप टाकलीया आपैसें । वस्तूचि लाभे ॥ ३२ ॥ जैसें घटाचे घटपण । तें नामरूपात्मकचि जाण । केवळ विकारत्वाचारंभण । परि पदार्थ नाहीं ॥ ३३ ॥ सत्यत्वें मृत्तिकाची असे । घटाभास मिथ्याचि आभासे । तें नामरूपात्मक पिसें । परि वस्तूसि नाहीं ॥ ३४ ॥ आदिं तव मृत्तिकाची असे । अंतिंही दुसरें न दिसे । तरी मध्यें जें आभासे । तें तव मिथ्या ॥३५॥ आधिं मृत्तिकेच्या ठांई । घटपण तरि साच नाहीं । शेवटीं मृत्तिके वांचुनी नाहीं । दुसरें साच ॥३६॥ मृत्तिकेसीं घट न ह्मणती । फुटलीयाही आन न बोलती । तरि मध्येंही तेचि स्थिति । आन नाहीं ॥ ३७ ॥ घटाआदि मृत्तिकाचि असे । तरि मध्यें काय जाले अनारिसें । मध्येंही तेंचि असे । आन नाहीं ॥ ३८ ॥ मध्यें जे आन बोलणें । तें नामरूपाचेंचि मिरवणें । तें जाणावी वाचारंभणें । परि वस्तु नाहीं ॥ ३९ ॥ प्रथम तव मृत्तिकाची असे । तिसीं घटपण कधींच नसे । कपाल केलियाहि वसे । मृत्तिकाचि साच ॥ ४० ॥ परी मृत्पिंडासीं घट ऐसें । कोणीहि म्हणतां न दिसे । अंतीं तरि नसे हें प्रसिद्धचि कीं ॥ ४१ ॥ तरी आदि अंतीं नसतां । कपालीं घटत्व न दिसतां । तरी मध्येंचि आलें तें तत्वतां । वाचारंभू ॥ ४२ ॥ कपालपर्यंत घटपण नाहीं । तरि मध्येंचि आलें कोठोन काई । तेंही सांगा सोई । घटपणाची ॥ ४३ ॥ तेंचि कपाल पृथुबुध्ना कार । जालेया घटत्वाचा विचार । त्या आकाररूप निर्धार । ऐसें बोसती ॥ ४४ ॥ मत्पिंड घट नव्हे म्हणती । पृथुबुध्नाकारातें नाम ठेविति । घट ऐसी प्रतीति । सर्वांसि होय ॥ ४५ ॥ मृत्तिकेसीं घट न ह्मणतां । पिंडही घट नव्हता । आकारींच घटपण तत्वता । म्हणताति लोकु ॥ ४६ ॥ तया पृथुबुध्नाकारा । नाम आलें घट निर्धारा । ते दुरी करुनी पाहातां खरा । घट कें दिसे ॥ ४७ ॥ नापरूपाचि साटी । मृत्तिका दवडिली बारेवाटी । तिचा आभावोचि दृष्टी । देखतांहि जना ॥ ४८ ॥ तें नाम रूप वेगळें कारितां । रूपातीत विचारुनी

पाहातां । मृत्तिकाचि दिसे तत्वता । घट नाहींच होय ॥ ४९ ॥ आदि अंतीं मळाचि दिसे । मध्येंही मृत्तिकाची असे । मध्यें जें नाम रूप भासे । ते वाचा रंभण मात्र ॥ १५५० ॥ बोल बोलाचे इतुकाचि अर्थु । मृत्तिके वेगळा कोणीही पदार्थु । वेईजे ऐसा स्वार्थु । न सांपडे तेथें ॥ ५१ ॥ यदर्थीं श्रुतिवाक्यही असे । अनुभवे तरि प्रत्यक्ष दिसे । श्रुतिवाक्य तेंही कैसें । तें अवधारिजे ॥ ५२ ॥

वाचारंभणं विकारो नामधेयं मृत्तिकेत्येव सत्यम् ॥

केवळ वाचेचें आरंभण । विकारनामधेय जाण । परि मृत्तिके वेगळा पदार्थ कोण । वेईजे ऐसा ॥ ५३ ॥ तैसें देहादि विश्वजात । हें नामरूपात्मक समस्त । ते वाचा रंभणमात्र । परि पदार्थ सत्य नाहीं ॥ ५४ ॥ हें जें जें भासे दिसे । श्रवणीं आईके त्वचा स्पर्शे । तें तें नामरूपात्मक असे । वाचा रंभण ॥ ५५ ॥ वांचुनी सत्यकोणी पदार्थ आहे । ऐसें तो विचारूनी पाहे । तें नामरूप टाकूनी आहे । काय प्राप्त लाभे ॥ ५६ ॥ विश्वाचें नामरूप टाकुनी । विचारें पाहिजे न्याहाळुनी । तंव दुसरें वस्तु वांचुनी । नलभे कांहीं ॥५७॥ आदि अंती ब्रह्मचि असे । मध्येंचि विश्वाभासू भासे । हें तव नव्हे अनारिसे । तें काय सत्य ॥५८॥ सत्या वांचूनी असत्य नाहीं । हें तव प्रत्यक्ष सिद्धिचि पाहीं । ब्रह्म सत्य तरी सापाई । विश्व तेथें भासें ॥ ५९ ॥ जरी साचेंचि शुक्तिका असे । तरीच मिथ्या रजत भासे । शुक्तिका नसतां कोठें असे । रजताभासू ॥ १५६० ॥ त्या रजताचें नामरूप टाकुनी । विचारें पाहतां नयनीं । न दिसे शुक्ति वांचुनी । विचारि तो ॥ ६१ ॥ नाना अंधकारीं साच रज्जु असे । तरी तेथें नाना भ्रमु भासे । सर्पधारा माळा इत्यादि ऐसें । असत्य भासे ॥ ६२ ॥ तेंचि रज्जु साच नसतां । कौंचि सर्पधारादि भासकता । तेंचि आकार नाम टाकुनी पाहातां । रज्जुचि लाभे ॥ ६३ ॥ तैसें साच आत्मरूप आहे । तें अज्ञानांधकारें अज्ञात आहे । यास्तव नाना भ्रम होये । मिथ्यारूप ॥ ६४ ॥ तैसा हा विश्वाकार भ्रम । अज्ञान ब्रह्मी संभ्रम । तें टाकुनी पाहातां आकारनाम । वस्तूचि लाभे ॥६५॥ यदर्थीं वार्तिक संमति । सांगिजेल तुह्माप्रती । परियेसावें ऐकाग्र चित्तिं । संतजनीं ॥ ६६ ॥

अनिश्चिता यथारज्जुरंधकारें विकल्पिता ॥
सर्पधारादिभिर्भावैस्तद्वदात्मा विकल्पितः ॥ १ ॥
निश्चितायां यथा रज्ज्वां संकल्पो विनिवर्तते ॥
रज्जुरेवेतिचाद्वैतं तद्वदात्मा विनिश्चितः ॥ २

यालागिं सत्यचि जरी आत्मा असे । तरीच मिथ्या तेथें विश्वभासे । तें नामरूप त्यजितां अनारिसें । न दिसे कदां ॥ ६७ ॥ नामरूप टाकिल्याची साटी । होय अपरोक्ष वस्तूसि भेटी । प्रपंच आभासाचि गोठी । समूळ मावळे ॥ ६८ ॥ विश्व हें तव सत्य नसे । केवळ नाम रूपात्मकेंचि असें । तें त्यजिलीया आपैसें । ब्रह्मचि लाभे ॥ ६९ ॥ प्रपंच जरि मिथ्या भासे । तऱ्ही वस्तू वस्तूपणें असें । नामरूप त्याग मिसें । लाभेचि की ॥ १५७० ॥ विश्व ब्रम्ह मिश्रित जालें । ऐसेंचि अज्ञानपणें भासलें । जैसें जळ मिसळलें । पयेसिं येक ॥ ७१ ॥ तेथ चतुर राजहंस असती । तेचि क्षीरा नीरा निवाडती । तैसे ज्ञानीये जे होती । तेचि करिती निवाडू कैसा ॥ ७२ ॥ पंचांशें विश्व ब्रम्ह हें असें । याची सत्ता पंच मिळणी वसे । ब्रम्ह आणि प्रपंचांचें । येक जाले ॥ ७३ ॥ तेचि अंश कोण किती । येककाचे कीति असती । हेंही सांगेन निगुती । येकाग्र आईका ॥ ७४ ॥

अस्ति भाति प्रियं रूपं नाम चेत्यशंपंचकं ।
आद्य त्रयं ब्रह्मरूपं जगद्रूपं ततोद्वयम् ॥ १॥

अस्ति भाति आणि प्रिय । हे ब्रह्माचे जाणा अंशत्रय । नाम आणि रूप हे द्वय । जगाचें रूप ॥ ७५ ॥ ब्रह्म रूप अंशत्रयें । बोलिलेसे पदान्वयें । ते कैसें हें काय । तेहि सांगो ॥ ७६ ॥ अस्ति म्हणिजे अस्तित्व सत्ता । भाति तो प्रकाश सर्वथा । प्रिय शब्दें सुख रूपता । बोलिली असे ॥ ७७॥ आकार आणि नाम दोन्हीं । जगाची रूपें जाणा मनीं । या वेगळें जग ऐसें नयनीं । दाखवाया ॥ ७८ ॥ आकार नाम त्यागे । कोठें सेवसी जें जगें । तें आणुनीया वेगें । दावापां नयनीं ॥ ७९ ॥ जो तो पदार्थ देखा नयनीं । त्याचें नाम रूपधा टाकूनी । मग पाहिजे विचारूनी । काय असे॥ १५८०॥ आतां उभय अंश सर्वत्र । मिळोनि जाले येकत्र । दोनी ते प्रगटचि विचित्र । नामरूप ॥ ८१ ॥ त्या माजी ब्रम्हाचे अंश तीनी । मिळाले ते दाउं नयनी । तया वेगळे जग

अंश दोन्हीं । कोठेंचि नसती ॥ ८२ ॥ शुक्तिकें वेगळें नामरूप । रजताचें कोठें भासे अमुप । ते दावा पां सरूप । होउनि तुम्हीं ॥ ८३ ॥ येक पुष्प देखिले पदार्थ । त्याचे अस्तित्व ते तंव यथार्थ । हें पुष्प आहे ते सत्ता तेथ । कोणाची पां ॥ ८४ ॥ सत्ता तें ब्रम्ह असे । सत्ते वेगळें आहेपण नसे । वंध्या पुत्रासि काय असे । अस्तित्व सांगा ॥ ८५ ॥ खपुष्प सर्वदा असत । तेथें चैतन्य नाहीं अनुगत । यास्तव तेथें अस्तित्व । कदाचि नाहीं ॥ ८६ ॥ या लागिं पुष्पीचें आस्तित्वपण । तेंचि निश्चयें जाणा चैतन्य । दुसरी भासकता जाण । चैतन्यांशु ॥ ८७ ॥ खपुष्पीं भासकता नाहीं । तरि सर्वथा तेथें चैतन्य नाहीं । जेथ चैतन्य तेथं पाहीं । भासु असे ॥ ८८ ॥ जडीं चैतन्य आहे । तरि प्रकाशु होत जाय । चैतन्य नसतां नव्हें । भासकदा ॥ ८९ ॥ आपली जे ज्ञानवृती । जे पुष्पातें असे जाणती । ते तव चैतन्यचिच्छक्ति । आन नाहीं ॥ १५९० ॥ वृत्ति माजी चैतन्य नसतां । पदार्थ न प्रकाशी तत्वतां । चैतन्येविण योग्यता । ज्ञानाची कैंची ॥ ९१ ॥ म्हणोनि वृत्यंतर चैतन्य । आणि जें पुष्पांतर चैतन्य । दोन्हि येक जालया जाण । पदार्थ स्फुरे ॥ ९२ ॥ चैतन्यें व्यापिलें नाहीं । ऐसा येकूही पदार्थ नाहीं । आकाश व्यतिरिक्त काई । पदार्थ कोण ॥ ९३ ॥ जो जो पदार्थ निपजे । तो गगनें आधींच व्यापिजे । आणि गगनाच्याचिठाईं सहजे । उत्पन्न जाला ॥ ९४ ॥ आणि स्थिति ही व्योमींच असे । अंतर्बाह्य व्योमचि प्रकाशे । तैसें चैतन्यविण नसे । कोण्ही पदार्थ ॥ ९५ ॥ चैतन्याचाचिं ठाईं भासे । चैतन्यें करुनीच होत असे । चैतन्येंचि करून वसे । आणि दिसे चैतन्यें ॥ ९६ ॥ अंतरबाह्य चैतन्यचि असे । चैतन्येवीण कांहींच नसे । या लागिं चैतन्यांशें । व्यापिले सर्व ॥ ९७ ॥ यालागिं पुष्प मळ जे चैतन्य । आणि चक्षुवृत्ती मळ जो चैतन्य । येक जाली या जाण । ज्ञान प्रगटे ॥९८ ॥ येन्हवीं पदार्थ स्फुरावया लागिं । सामर्थ्य असे कोणाच्या अंगी । चैतन्य वांचूनी भंगी । आन नाहीं ॥ ९९ ॥ या लागीं भासती येणे करुनी । प्रकाशता घातिली सुमनीं । हा चैतन्यांशु विचक्षणीं । जाणावा कीं ॥ १६०० ॥ तैसेंचि पुष्प दर्शनें आनंदु होय । अनघ्राणें कोठेंचि न माय । हे तिन्ही अंश पाहे । पुष्पीं

असती ॥ १ ॥ हें अंशत्रय तें चैतन्य जाण । आकारु नाम ते पदार्थ भान । हें टाकुनी पाहातां चैतन्य घन । पर ब्रह्म लाभे ॥ २ ॥ तैसें आम्रादि फळीं पूष्पीं । नामरूपाच्या अनुक्रमीं । भेटी होय परब्रह्मीं । अनुभव सिद्ध ॥ ३ ॥ तैसीच मनुष्यादि आकार । जेंकी नाम रूप प्रकार । तें त्यजुनि पाहतां निर्विकार । वस्तुचि लाभे ॥ ४ ॥ भ्रमें आकारनाम साच मानिती । हें तंव अविचारतां संसिद्धी म्हणती । विकारें पाहतां विचारा प्राप्ती । कांहींच नाहीं ॥ ५ ॥ मृत्तिकेचा हस्ती केला । जनिं कुंजरत्वेंचि मानिला । तयाच्या अवयव समूहाला । वेगळालींच नामें ॥ ६ ॥ मृत्तिका देखितांचि लोपली । नसती कुंजर बुद्धी उपजली । येक येक अवयवीं गुंतली । दृष्टीसाचपणें ॥ ७ ॥ स्वयें राहे तदाकारपणें । द्वीपचि दिसे साचपणें । मृत्तिका नाहीं ॥ ८ ॥ तैसें नाम आणि आकार । हे तंव मिथ्या भलतेचि प्रकार । पाहतां विचारें अंतर । तंव सत्येचि लाभे ॥ ९ ॥ तेसीच आकाशादि महाभूतें । नामरूपें असति अंकितें । तीं टाकोनि पाहतां आत्मयातें । पाविजेकीं ॥ १६१० ॥ तेहीं येक वर्तऊन दिधलिया वरि । तैसीच जाणावी सर्वांची परी । ते ऐकिजे चतुरीं । परमार्थचेनिं ॥ ११ ॥ ये आकाश असे । ऐसें अस्तित्व तेथें भासे । आणि अवकाशही प्रकाशे । चैतन्य भासे ॥ १२ ॥ त्या आकाशाचे आकाशपण । टाकूनी दृढ करी निरीक्षण । मग जें भासे ते खूण । सांग बापा ॥ १३ ॥ ऐसें निरिक्षुनी पाहतां । नाम रूपातें त्यजितां । सर्व अभावो शून्यता भासत असे ॥ १४ ॥ तें शून्यही टाकुनि पाहे । काय तुज दिसत आहे । म्हणे शून्याभावें आहे आनंदुची ॥ १५ ॥ ऐसें पाहतां सत्य प्रकाश । आणि जोडला आनंदाभास । हाचि जाण चैतन्यांश । अंशत्रयी ॥ १६ ॥ नामरूप तो उपाधी । तो सर्वदा टाकूनी निरवधी । शोधी सत्व निरुपाधी । वोळखतूं ॥ १७ ॥ ऐसेचि पंचभूताच्या ठायीं । येणेचि विचारें सर्वदां पाहीं । वस्तूचि जोडे सर्वही । आन नाहीं ॥ १८ ॥ येरवीं चैतन्याविण । भूतांशि कैचें अवस्थान । आकाशा अवकाशपण । कोणें दिधलें ॥ १९ ॥ व्यापक आणि निःसंग पण । स्वता त्यासी नाहीं जाण । तैसेचि वायुसी चलण । ते चैतन्येचिकीं ॥ १६२० ॥ देहीं अंतर्बाह्य चळे । भासत असे स्पर्श मेळें । सुख देवोनी सकळें । जीववी भूतें ॥ २१ ॥ येरव्हीं जीवना चलन शक्ती कैची । सर्वदां असतें जड

रूपांचि; । यालागीं बुद्धि नामरूपाची । टाकूनि पहा. ॥ २२ ॥ तैसेंचि तेजीं तेजतत्व कैचें ? । पचनपाचनसामर्थ्य ब्रह्मींचें । प्रकाशपण तेथिंचें । सत्य जाणा. ॥ २३ ॥ तापें जीववीतसे जन, । ते शक्ति ब्रह्मेविण । सांगा तियेची खुण । कोणाची तेथें ? ॥ २४ ॥ जेंळीं आर्द्रपण आणि जीवन, । स्वच्छता आणि निबिडपण, । तापलिया तापशमन । कोणाचें तेथें ? ॥ २५ ॥ पृथ्वीच्या ठायीं घनत्व, । बीजाचें प्ररोहकत्व, । अवस्थान, सर्वसहत्व । हें कैचें तेथें ? ॥ २६ ॥ तैसेंचि सूर्यादिकांचा ठायीं । प्रकाश कुवणाचा कायि ? । जीववणें, निववणें पाहीं । शक्ति ते काय ? ॥ २७ ॥ गंगेसि पापतापहरण, । आणि सर्वदा दिसे चळण; । किंबहुना सर्व चैतन्य । दुजें नाहीं. ॥ २८ ॥ तैसीचि इंद्रियांची ग्रहणशक्ति, । इंद्रियांसि सुखोद्भवें तृप्ति, । इत्यादि सर्वही ज्ञप्ति । चित्कळा जाणा. ॥ २९ ॥ आतां कैक सांगों किती ? । जे जे जयाची असे शक्ति । ते ते चैतन्य; आन गति । असेचिना. ॥ १६३० ॥ तैसोंचि साक्षित्वें अंतरीं । प्रकाशत सर्वांपरी, । परि नेणिजे इंद्रियव्यापारीं । सर्वथैव. ॥ ३१ ॥ ते परस्पर व्यभिचरती, । येरयेरांचा विषयो नेणती, । ते सर्वही येके ठायीं गति, । हें अपूर्व पहा ! ॥ ३२ ॥ श्रवणांची श्रवणोन्मुख शक्ति । ते तंव चक्षुरिंद्रियें नेणती; । तेथें ते अप्रयोजक होती । सर्वथा जाण. ॥ ३३ ॥ चक्षु रूपातें प्रकाशी । तें तंव न प्रकाशे श्रवणांसि; । श्रवण नेणे रसासि, । रसना स्पर्शासि कदा नेणे. ॥ ३४ ॥ एंवं येरयेरांची ग्रहणशक्ति । परस्परें सर्वथा नेणती, । ते येके वेळे अभिव्यक्ति । साक्षी आणी. ॥ ३५ ॥ संमति. **नानाछिद्रघटोदरस्थितमहा** इ० ॥ जागृति, स्वप्न, सुषुप्ति, । सर्व साक्षी जाणे व्यक्ति । विश्वतैजसादि व्यभिचरती । अवस्थाभेदें. ॥ ३६ ॥ एवं आकार, नाम, अवस्था । यांसि अनुस्यूत आत्माचि तत्वता; । इतर ते आभासमात्रता । मिथ्या भासु. ॥ ३७ ॥ म्हणोनि पंच अंश मिळाले-पणें, । आलें आत्मयाचें नेणणें, । अंशद्वय टाकूनि पाहणें । तरि लाभे आपणचि. ॥ ३८ ॥ दुसरेपणेंविण येकला । पूर्णात्माचि असे संचला, ।

---

१. ब. जडरूपेंचि. २. अ. पचंतव ३. अ. तेथें. ४. अ. जरी. ५. ब. महत्व. ६. अ. विषयांसि. ७. ब. शब्दोन्मुख. ८. ब. त्याचेनि न प्रकाशवे. ९. ब. ऐसी. १०. ब. सर्वदा. ११ अ. हा चरण अप्रतींत प्रथम आहे.

विश्वाभासु संबोधला । अधिष्ठानज्ञानें. ॥ ३९ ॥ अधिष्ठानज्ञान नसतां । निषेध केलियाही तत्वता । विश्वाभासु सर्वथा । न निवर्तेचि. ॥ १६४० ॥ नानापरीचीं ज्ञानें बोलती, । अनुभवी आपणा म्हणविती, । शिष्यांतेंही बोधिती । तेणेंचि ज्ञानें. ॥ ४१ ॥ स्वरूप नेणोनि, मननिरोध । करावा प्राणांचा संरोध, । मननिरोध तेंचि सिद्ध । परब्रह्म. ॥ ४२ ॥ ब्रह्म कळलेंचि आहे, । मन निरोधूनि तेंचि आहे; । येक ह्मणती जैसें विश्व दिसताहे, । तैसेंचि ब्रह्म; ॥ ४३ ॥ "सर्वं खल्विदं ब्रह्म" म्हणती, । हें ऐसीच वाखाणिती श्रुति । जैसें आहे तैसीच व्यक्ति । परब्रह्माची. ॥ ४४ ॥ तरि तें मिथ्या खंडज्ञान । तो ज्ञानाभासु ऐसें जाण. ॥ येक म्हणती आम्ही सज्ञान, । संपूर्ण आहों. ॥ ४५ ॥ नेतिमुखें संकल्पांचें निरसन । करूनि तटस्थ राहणें जाण, । तेंचि गुरुमुखें ब्रह्म पूर्ण । होय साच. ॥ ४६ ॥ तरी याचीही सांगेन विवंचना; । तरी श्रुतीनें केलें जें निरसन । नेतिमुखें स्थूळ, सूक्ष्म, जाण, । सकळ प्रपंचु. ॥ ४७ ॥ आमच्या गुरूनें हेंचि निवेदिलें, । म्हणोनि हेंचि ब्रह्म संचलें; ॥ सकळांचें निरसन केलें, । तरी तेचि वस्तु. ॥ ४८ ॥ 'नेति नेति' ऐसें म्हणोनि, । प्रपंचु निरसी भरंवसेनि, । तरि 'नेति नेति' ऐसीं दोन्ही । पदें कां बोलिलीं? ॥ ४९ ॥ तरि येक मूर्त, येक अमूर्त; । ऐसें ब्रह्माचें रूप निश्चित. । ऐसें स्वयें असे बोलत । तें परियेसा. ॥ १६५० ॥

द्वे वा ब्रह्मणो रूपे मूर्तं चामूर्तं च ।

ब्रह्माचीं दोनी रूपें असती, । येक मूर्त, येक अमूर्त स्थिति; । मूर्त तें स्थूळ भूतीं । जें विस्तारिलें. ॥ ५१ ॥ तेंचि कार्य बोलिजे, । सूक्ष्म कारण सहजें, । अपंचीकृत बीजें । कार्याचीं जें. ॥ ५२ ॥ ऐसे द्विःप्रकार; मूर्ति । ब्रह्माच्या व्यक्ताव्यक्त असती. । इति शब्दें परामर्ष करी श्रुति । स्थूळाचा पैं. ॥ ५३ ॥ नकारें तयाचा निषेध केला, । दुसरा इतीनें सूक्ष्म सूचिला, । तोही तयानें निषेधिला । सर्वथैव. ॥ ५४ ॥ यालागीं दोनी पदें बोले, । आणि वीप्सा जाणावी तेणेंचि बळें । आदर सूचिला मेळें । पदद्वयें. ॥ ५५ ॥ हें येकचि पद असे, । येणें आदर

---

१. अ. बाधला. २. ही ओंवी अ प्रतींतच आहे. ३. ही ओंवी अ प्रतींतच आहे. ४. ब. सकळांचें. ५. ब. राहे. ६. अ. श्रुत. ७. अ. बोले? ८. अ. ब्रह्मणे द्वे रूपे. ९. अ. जें सूक्ष्म.

सूचिलासे, । हे वीप्सा ऐसें दिसे । आन नाहीं. ॥ ५६ ॥ येकेचि इति पदें सर्व परामर्ष केला, । मूर्तामूर्त प्रपंच सूचिला, । तो सर्व नकारें निषेधिला। येथें आदर कोशा? ॥ ५७ ॥ तरि आदराचें कारण ऐसें । स्थूळसूक्ष्मप्रपंचु दूषिला असे, । या वेगळें आणिक भ्रमपिसें। होईल तेंही निषेधी. ॥ ५८ ॥ अथवा निषेधिलियावरि । काय आहे ऐसें जारि। संदेह होईल, तरि । स्वरूप बोधी. ॥ ५९ ॥ यालागीं वीप्सा बोलली असे । हें तव सर्वथा सकारण असे, । बोधिलियावीण सर्वस्वें । [1]निषेधें काय? ॥ १६६० ॥ केवळ सर्व-निषेधु केला, । आणि स्वरूपबोध नाहीं जाला, । तरि निषेध वायां गेला। केलियाही. ॥ ६१ ॥ शुक्तिचि रजतरूपें भासे, । तें रजत नव्हे म्हणिजे ऐसें; । तरि काय तेथ असे । ऐसा संदेह उरला. ॥ ६२ ॥ संदेह जंव निरसला नाहीं, । तंव निषेधें केलें कायि? । वस्तुसाक्षात्कार नाहीं । तेथ सकळ व्यर्थ. ॥ ६३ ॥ रज्जूचां ठायीं सर्प भासे । तो जरि नव्हे म्हणिजे ऐसें, । तरि तो मौळा म्हणोनि अनारिसें । भावीलचि कीं? ॥ ६४ ॥ मौळा-ही जरि निषेधिजे । तरि धारा म्हणेल सहजें; । धारा निषेधिलिया बुझे। जैसें भासे तैसें. ॥ ६५ ॥ रज्जुसादृश्यें जें भाहेल । तेंचि तो तया नाम ठेवील, । सर्व निषेधिलिया पडेल । संदेहसमुद्रीं. ॥ ६६ ॥ परि अधिष्ठानज्ञानेंवीण । निषेध तो संदेहापन्न । संदेहपूर्वक तें व्यर्थ जाण, । वृथा श्रमु. ॥ ६७ ॥ वरि वरि निषेध करणें । तें तंव प्रत्यक्ष विडंबणें; । अधिष्ठान न कळतां बोलणें, । वृथा श्रमु. ॥ ६८ ॥ अधिष्ठान-साक्षात्कारु नसतां, । वर्षांचीं शतें जरी निषेध करितां । प्राप्त्यर्थीं योग्यता । कदा नये. ॥ ६९ ॥ अधिष्ठानसाक्षात्कारें । सहज निषेध होय निर्धारें; । मग नाना भ्रमद्वारें । आच्छादती. ॥ १६७० ॥ जो साक्षात्कारपूर्वक निषेधु, । तोचि जाणावा होय सिद्धु; । येर तो जाणा प्रमादु । संदेह-रूप. ॥ ७१ ॥ येक ऐसें स्थापितातीं । जे निषेधेंचि होय वस्तुप्राप्ति, । ऐसेचि नेणों ठकले किती । ते काय बोलावे? ॥ ७२ ॥ वस्तुसाक्षात्कार जालाचि आहे, । तेथें वस्तु जाणणें तें काय? । वोळखी कैंचा काय? । ऐसे वाद करिती. ॥ ७३ ॥ काय करील? नेणे बापुडा, । नाहीं सेविला

१. ब. काय? २. ब. निषेध. ३. ब. निमाला. ४. ब. निमाला. ५. ब. विटंबणें. ६. ब. करिताती.

सद्गुरु धडफुडा, । यास्तवचि वेडा । लागले आहेति. ॥ ७४ ॥ सर्वथा हितवचन न मानिती, । बुध्यानुसारें वाद करिती, । असो; ज्याची जितुकी मति । तितुकेंचि सुजे. ॥ ७५ ॥ अधिष्ठानज्ञानेंवीण । केवळ निरसनें नव्हे प्रयोजन; । यदर्थी स्वयें भगवान् । सुरेश्वर बोले. ॥ ७६ ॥ ते आइका वार्तिकसंमति । जे पदान्वयें अपर श्रुति, । श्लोकाकारें गमती । सुंदरपणें. ॥ ७७ ॥

रज्जुयाथात्म्यविज्ञानात्सर्पस्तत्कारणात्मनोः ।
निषेधो नान्यतः शक्यः कर्तुं वर्षशतैरपि ॥

रज्जुचा यथार्थज्ञानेंवांचून । सर्प आणि रशनेचें अज्ञान । न जाय, करितां निरसन । वर्षांचीं शतेंवरि. ॥ ७८ ॥ तसेंचि वस्तुज्ञानेंवांचून । विश्वभ्रम, आणि वस्तूचें अज्ञान । न नाशे अपरोक्षज्ञानेवीण । कल्प कोटि. ॥ ७९ ॥ जैसें सर्पाचेनि निषेधनें । गेलें भयकंपादि पळणें, । तें गेलिया तेंचि सुखपणें । मानूनि राहे. ॥ १६८० ॥ भ्रमें भयकंपादि होय । सर्प निरसलिया तें जाय, ॥ तेंचि सुख मानूनि राहे । भ्रांत जैसा. ॥ ८१ ॥ परि नवें काय जोडिलें? । गांठीस काय पडलें? । इतुकेनि काय सरले । संसारपंथ? ॥ ८२ ॥ नसतेंचि सर्पत्व मानिलें । तेणें कल्पित नाथिलें भयादि गेलें; । नाथिलेंचि गेलिया सुख पावलें । आपण यातें. ॥ ८३ ॥ जैसें मूर्छिताचें सुख, । अथवा आळसियाचा परितोख, । तैसें याचें सुख । ज्ञानमानियाचें. ॥ ८४ ॥ दाहा पुरुष ग्रामांतरा । सुखें चालिले एका नगरा. । मध्यें नदीचिया पुरा । उतरोनि गेले. ॥ ८५ ॥ पैल तीरीं जाऊनि पाहती । आम्हीं अवघे आहों किती सांगाती? । मोजूनि जंव पाहती, । तंव नऊ जण. ॥ ८६ ॥ प्रत्येकें गणूनि पाहती, । गणितां आपणातें न गणिती, । एक बुडाला म्हणोनि करिती । शोक दारुण. ॥ ८७ ॥ रडती, पडती, आक्रंदती, । परि दाहवा आपण ऐसें नेणती; । इतर येऊन त्यांप्रति । पुसता जाला. ॥ ८८ ॥ ते सांगती, 'दाहवा नाहीं । म्हणूनि शोक करितों पाहीं.' । तो म्हणे, 'दाहवा आहे' हेंही । वाचा बोले. ॥ ८९ ॥ इतुकेनि ते रडूं राहिले, । परि आप-

१. अ. नेणती. २. ब. सरे. ३. ब. खुणपणें. ४. अ सर्व. ५. ब सांगतां.

णातें नहीं देखिलें, । आक्रंदन निवारलें । इतुकेंचि जालें. ॥ १६९० ॥ अहो अज्ञानाच्या दोन्ही शक्ति, । नास्ति, न प्रकाशे इति;¹। आत्मा नाहीं ना प्रकाशु चित्तीं । नव्हे त्याचा. ॥ ९१ ॥ त्यामध्यें आहे म्हणतांचिसाठीं । नास्तित्व जाय उठाउठी; । पारि² न प्रकाशे, नव्हे भेटी, । हें उरलेंचि कीं. ॥ ९२ ॥ तयासाठीं भ्रम उरला । पारि प्रकाश नव्हे भला, । म्हणोनि पाहों लागला । दाही दिशा. ॥ ९३ ॥ तरी दाहवा कोठें, कोण ? हें सर्वथा नेणवे जाण. । कोणा देखे दुरून । त्यासींचि संदेहें³ म्हणे. ॥ ९४ ॥ दुरूनि वृक्षादिक देखे, । दशम होईल म्हणोनि तोखे,⁴ । परि स्वयें आपण असतांच न देखे । सांगणारेवीण. ॥ ९५ ॥ परि दशम आहे म्हणणें यासाठीं । शोक टाकूनियां उठी, । तितुकेनिच सुखभेटी । मानी कोणी ? ॥ ९६ ॥ आपणां आपण अपरोक्ष असतां । परि सांगणारेवीण नेणे तत्वता; । हे ऐसी अनुभवकथा । अपूर्व असे. ॥ ९७ ॥ तेंचि 'दशम कोठें आहे ?' । म्हणोनि सांगणारास पुसतांचि पाहें । तो दावी दशम आहे, । तूंचि म्हणोनि. ॥ ९८ ॥ मग तेव्हां आपणा देखे, । पावलों म्हणोनि तोखें, । पावलियाचेनि सुखें । कोठें न माये. ॥ ९९ ॥ आक्रंद जाऊनि परमानंद । तयासि जाणा अति अगाध; । हेंचि अपरोक्षपण प्रसिद्ध । जाणा तुम्ही. ॥ १७०० ॥ म्हणे कैसा भ्रम होता जाला,⁵ । जेणें मज मीच चोरला, । दावणार भला भेटला । तेणें भेटविलें. ॥ १ ॥ तैसें स्वस्वरूप अपरोक्षचि असे; । परि अज्ञानें व्यवधान केलें असे. । तेणें असतांचि नसे । आपआपणां. ॥ २ ॥ यालागीं अपरोक्ष जें वस्तुज्ञान । तेंचि भ्रमनिवृत्तीसि कारण; । भ्रम निर्वर्तनें⁶ बोध पूर्ण । विश्वाभासा होय. ॥ ३ ॥ विश्वाभास बोधलिया । स्वभावें पूर्णत्व आत्मया, ॥ पूर्णपणेंचि स्थिति तया । आन नाहीं. ॥ ४ ॥ हेवांचूनि केवळ निरसनेंकरून । नव्हे अपरोक्षसाक्षात्कार जाण; । केवळ नव्हे आनंद तो मानून । काळक्षेप करिती. ॥ ५ ॥ येक रूढीनें प्रतिष्ठा पावले, । सद्गुरु सेवितां लाजा कोंडले; । म्हणती शास्त्रें काय नाहीं

१. अ. न प्रकाश इति. २. ब. परि. ३. अ. संदेह. ४. अ. तोषे. ५. ब. जाला. ६. अ. निवृत्तें.

बोलिलें । ज्ञानविषयीं ? ॥ ६ ॥ आत्मा आणि तत्प्राप्तिसाधन, । महावाक्य आणि विवरण, । पदार्थज्ञान आणि लक्षण, । जहज्जहद. ॥ ७ ॥ हें सकाळ शास्त्रीं[१] आहे । तोचि आमुचा गुरु पाहें; । उपनिषदांचा संग्रह आहे । आमुच्या घरीं. ॥ ८ ॥ इतर गुरूचें कार्य कोण ? । म्हणोनि गुरुवंताही निंदिती जाण, । परि ते नेणते अज्ञान । सर्वथैव. ॥ ९ ॥ शास्त्र युक्ति शिकती, । तेणें अपरेसीं वाद करिती; । परि आपणा पाविजे हे[२] स्थिति । असेचिना. ॥ १७१० ॥ शास्त्रीं सर्वही आहे, । उपनिषदें गर्जती उभूनि बाहे, । परि सद्गुरूवेगळें नोहे[३] । ब्रह्मज्ञान. ॥ ११ ॥ त्याच उपनिषत्सद्गुरुमुखें । महावाक्यउपदेशवेषें, । सद्गुरु सांगतांचि देखे । आपआपणा. ॥ १२ ॥ सद्गुरूच्या अनुग्रहेंवीण । जरी केलें वेदांतादि शास्त्रश्रवण, । वेदवेदांग संपूर्ण, । पढला जरी, ॥ १३ ॥ उपनिषदांचें पारायण, । महावाक्याचें नित्य पठण[४], । केलियाही नव्हे ब्रह्मज्ञान । येके सद्गुरूवांचूनि. ॥ १४ ॥ सद्गुरूवांचूनि जाणिजे । तरि वेदेंचि कां ऐसें बोलिजे? । "**आचार्यवान् पुरुषो वेद**" सहजें । कां पां बोले? ॥ १५ ॥ तैसेंचि **श्रीव्यास** वचन, । **श्रीभागवतीं** बोले प्रमाण; । शास्त्रज्ञान जालें जऱ्ही[५], गुरूविण । साक्षात्कारु नव्हे. ॥ १६ ॥

नैषा मतिस्तावदुरुक्रमांघ्रिं स्पृशत्यनर्थापगमो यदर्थः ।
महीयसां पादरजोभिषेकं निष्किंचनानां न वृणीत यावत् ॥

यालागीं गुरूवेगळें अपरोक्षज्ञान । सर्वथा नाहीं, नाहीं; जाण. । तैसेंचि **आचार्य**[६] आपण । बोलिले असती. ॥ १७ ॥

ऐक्यपरैः श्रुतिवाक्यैरात्मा शश्वत्प्रकाशमानोऽपि ।
देशिकतया विहीनैरपरोक्षन्तुं न शक्यते पुरुषैः ॥

म्हणे ऐक्य जें ब्रम्हस्वरूप । ब्रम्हात्मयाचें जें ऐक्यरूप । तत्पराचि वाक्यें अमूप । आहेत कीं. ॥ १८ ॥ आणि आत्मा नित्य प्रकाशमान । उघड उदंड चिद्धन । ऐसें असोनिही सद्गुरूवीण । अपरोक्ष न करवे. ॥ १९ ॥ यालागीं अपरोक्षकर्ते सामर्थ्य । असे गुरूचे ठाईं यथातथ्य; । ते गुरुही

---

१. अ. शास्त्राशीं. २. ब. ते. ३. अ. नव्हे. ४. ब. जपन. ५. ब. तऱ्ही. ६. ब. **आचार्यें** आपण । बोलिलें असे.

युक्तसामर्थ्य । पूर्वी बोलिला. ॥ १७२० ॥ ऐसेन येखादा गुरु करिती, । जया अत्यंत विषयासक्ति; । शिष्य द्रव्याचिये प्रीती । करिताति बहु. ॥ २१ ॥ अध्यात्मपरा गोष्टी शिकती । तेचि शिष्यांसि उपदेशिती, । उभयांची येकचि गति । प्रसिद्ध कीं. ॥ २२ ॥ यदर्थी असे व्यासवचन, । तें परियेसा चित्त देऊन, । जेणें संशय निरसन । होय आपैसें. ॥ २३ ॥

न ते विदुः स्वार्थगतिं हि विष्णुं दुराशया ये बहिरर्थमानिनः ।
अन्धा यथान्धैरुपनीयमाना वाचीशतंत्यामुरुदाम्नि बद्धाः ॥

अंधें अंध नेइजे, । दोघां मार्गी मार्गु न सुजे, । अंधकूपीं पडिजे । उभयतां जैसें; ॥ २४ ॥ तैसा अपूर्णा गुरूचा उपदेश । करी सबाह्याभ्यंतरीं वोस, । संसारमार्गी असोस । पाडितु असे. ॥ २५ ॥ येक गुरु लय लक्ष्यें सांगती, । असो ते सांगावे किती? । येक इंद्रियें आणि मन रोधती । वायुनिरोधें. ॥ २६ ॥ आत्मा कोण, काय आहे, । हें अपरोक्षें ठावें नोहे, । आणि बाह्य अभ्यासु करितु जाये । मनादिरोधु. ॥ २७ ॥ गुरु तरि सेविला असे, । परि तो तत्वनिष्ठु नसे; । "गुरु" शब्द मुख्य तो वसे । ब्रह्मनिष्ठांच्या ठायीं. ॥ २८ ॥ गुकार तो अज्ञानांधकारु । तयाचा निःशेष निरास तो रुकारु, । करी तोचि सद्गुरु । श्रुति बोले. ॥ २९ ॥ सकळ आभास लपे जयाचां ठायीं, । तेंचि गुरुत्वें परब्रह्म पाहीं, । गुरुरूपें परब्रह्म समग्रहीं । स्वयें प्रगटे. ॥ १७३० ॥ असो गुरुपदव्याख्यान करितां । युक्ति कुंठती सर्वथा. । असो सद्गुरूसि ब्रह्मरूपता । ब्रह्मचि बोले. ॥ ३१ ॥ श्रीकृष्णनामांकित परब्रह्म जें । उद्धवाप्रति सांगे व्याजें, । श्रीगुरु तो रूप माझें, । मीच जाण. ॥ ३२ ॥

आचार्यं मां विजानीयान्नावमन्येत कर्हिचित् ।
न मर्त्यबुद्ध्या सेवेत सर्वदेवमयो गुरुः ॥

तैसेंचि बोलतसे श्रुति । "**यस्य देवे परा भक्तिर्यथा देवे तथा गुरौ**" इति । असो सद्गुरु तो ब्रह्ममूर्ति; । आन नाहीं. ॥ ३३ ॥ येर गुरु नव्हति, गुर्वाऽ-

---

१. अ. कथिती. २. अ. मार्गा. ३. ब. इंद्रियें. ४. ब. तें उद्धवाप्रति.

भास, । ते सेवूनि करिति सायास; । सांडून परब्रह्मसद्गुरूस । इंद्रियें नेमिती. ॥ ३४ ॥ आणि जैसा कपटी अश्वयाती । दंशी, उडे, चरणें लाती; । दमलियाही मार्गगति । न दावी पदहीभरि. ॥ ३५ ॥ स्थिर केलियाही स्थिर नव्हे, । तैसें हें अदांत मन आहे, । तें पवननिरोधें पाहें । निरोधिती. ॥ ३६ ॥ तें निरोधिलिया प्रपंच ओहटे,[1] । मन मुरालिया वासना कुंठे,[2] । तेंचि सुख ऐसें वाटे । निश्चय करिती. ॥ ३७ ॥ परि तेथें कोटि अपाय होती, । जैसी वणिकाची वृत्ति । महासमुद्रीं पावती[3] । कर्णधारेंवीण. ॥ ३८ ॥ कर्णधारेंवीण तारूं । बुडवील हा तो निर्धारु, । कोटि पावे अपायप्रकारु । तो किती सांगों ? ॥ ॥ ३९ ॥ तैसें संसारसमुद्रामाझारी । चित्त दमितां पावे क्लेश भारी,[4] । परि येके देशिकावांचूनि अपायपुरीं । बुडेचि कीं. ॥ १७४० ॥ मनोनिग्रहो ऐसें तारूं । जेणें होय साक्षात्कारु, । तयाचा जाला केरु । सद्गुरूवांचूनि ॥ ४१ ॥ ऐसें श्रुति स्वयें आपण । वेदस्तुतीसीं बोले पूर्ण, । तें आइका अनुसंधान । संमतीचें. ॥ ४२ ॥

विजितहृषीकवायुभिरदांतमनस्तुरगं य इह यतन्ति यन्तुमतिलोलमुपायखिदः व्यसनशतान्विताः समवहाय गुरोश्चरणं वणिज इवाज संत्यक्तकर्णधारा जलधौ. ।

इत्यादि सांगणें किती ? । नाहीं गुरूवेगळी अपरोक्ष स्थिति, । ते लागलिया, पूर्णात्मा हे प्रतीति । स्वयेंचि ये. ॥ ४३ ॥ पूर्णात्मा आलिया प्रतीती, । न स्फुरे तया अन्य गति; । जे जे इंद्रियांची गति । ते तन्मूलक. ॥ ४४ ॥ इंद्रियें जेणें विषय घेति, । चरणांची जेणें चळे गति । पोहणें[5] पाहते व्यक्ती । जेणें येतसे, ॥ ४५ ॥ चालणें, बोलणें, करणें, । पाहणें, आइकणें, चाखणें, । सर्वही होय जेणें । तेंचि तें कीं. ॥ ४६ ॥ देखणें, दृश्य, देखता, । सर्वही आत्मयाची सत्ता, । आत्मया परता तत्वता । अर्थेचि नाहीं ॥ ४७ ॥ जें मनादिकांचें चालक, । जें बुद्धिवृत्तींचें[6] बोधक, । किंबहुना सम्यक । सर्वांचें जें सर्व. ॥ ४८ ॥ कर्म जेणें करी । कर्मा बाह्य अभ्यंतरीं,[7] । किंबहुना सर्व व्यापारीं । साक्षी जें कीं. ॥ ४९ ॥

---

१. ब. आटे. २. ब. खुंठे. ३. ब. महंती समुद्रीं तारूं पावती. ४. ब. चित्त दमित क्लेशें तारू पारीं. ५. ब. पाहवें. ६. ब. सुखें करी. ७. अ. बाह्यंतरीं.

ऐसें ब्रह्म वेगळें कांहीं । जया दुजेपणें उरलें नाहीं, । तेंचि पूर्ण आत्मयाचें पाहीं । सम्यक् निरीक्षण. ॥ १७९० ॥ ज्ञान, ज्ञाता, ज्ञेय, । जेणें स्फुरे हें वृत्तित्रय, । कर्ता, करणें, कार्य, । इत्यादि सर्व. ॥ ९१ ॥ आतां बहु काय बोलणें ? । ब्रह्मेंवीण दुजें नेणें, । पूर्णात्मा ऐसें म्हणणें । यातेंचि कीं. ॥ ९२ ॥ तया करणें नाहीं कांहीं, । करिता, न करिता, तोचि पाहीं, । करील तरि कायी । लाभु आथी ? ॥ ९३ ॥ न करितां तुटि नये, । असिजे स्वानुभवन्यायें, । आपणावीण इये । जगीं न देखे. ॥ ९४ ॥ पूर्णपणें नित्य तृप्त । सर्वदा असे सदोदित, । केवळ शारीर कर्म करीत । अलिप्तपणें. ॥ ९५ ॥ केवळ शारीर कर्में करूनि । किल्बिष नपवे भिर्वसेनि । "किल्बिष" शब्दें काय म्हणोनि । बोलिलें तें सांगों. ॥ ९६ ॥ शारीर कर्म म्हणिजे काय ? । जें शरीरनिर्वाहार्थ करिजेत आहे, । तयासिच यदृच्छा म्हणिजेत आहे । भगवदुक्ति. ॥ ९७ ॥ संन्यासियें दंडें, कौपीन, । आच्छादन, कंथा, उपानह, आसन, । अन्नार्थ करावें भिक्षाटन, । शास्त्रन्यायें. ॥ ९८ ॥ अधिक स्पृहा न करावी, । शरीरनिर्वाहणा संपादावी, । हेचि यदृच्छा जाणावी । श्रीभगवंतु बोले. ॥ ९९ ॥ आणि कायवाक् मानसिक तपें । गीतेसीं बोलिलीं सक्रूपें, । तेंही भौविकें निःपापें । कर्में होतीं. ॥ १७६० ॥ आणि गृहीं स्वधर्माचरणें । जें कीं शरीरनिर्वाहार्थ करणें, । अन्नाच्छादन संपादणें । तेंही यदृच्छा. ॥ ६१ ॥ ऐसें केवळ शारीर कर्म करितां, । नव्हे किल्बिषाचा भोक्ता, । किल्बिष तेंही तत्वता । सांगों प्रसंगें. ॥ ६२ ॥ पुण्यपापांचें फळ । जें कीं पावणें देह केवळ । सुखदुःखस्थान अमंगळ । तेंचि किल्बिष. ॥ ६३ ॥ तें देहं मीच म्हणतां, । कोटि गोवध तयाच्या माथां, । तें कथन कथितां । विस्तारु असे. ॥ ६४ ॥

देहाभिमानजं पापं न तद्गोवधकोटिभिः ।

इत्यादि वचनें किती । लिहावीं इये ग्रंथीं, । किल्बिष ऐसें सर्वार्थी । देहनामें. ॥ ६५ ॥ ऐसीं सर्वोत्तमाचीं वचनें । बोधिलीं पार्थाप्रति श्रीकृष्णें । तेंचि सांगीजति, येकाग्रमनें । परिसिजे. ॥ ६६ ॥

---

१. ब. शरीर कर्म. २. अ. कोपीनाच्छादन. ३. ब. कायिकें. ४. ब. शरीर. ५. ब. हें मीच ऐसें.

त्यक्त्वा कर्मफलासंगं नित्यतृप्तो निराश्रयः ।
कर्मण्यभिप्रवृत्तोऽपि नैव किंचित्करोति सः ॥ १ ॥
निराशीर्यतचित्तात्मा त्यक्तसर्वपरिग्रहः ।
शारीरं केवलं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ॥ २ ॥
यदृच्छालाभसंतुष्टो द्वंद्वातीतो विमत्सरः ।
समः सिद्धावसिद्धौ च कृत्वाऽपि न निबध्यते ॥ ३ ॥

कांहीं न करितांचि आत्मोपास्ति, । सर्वदा घडे सेवार्थी, ॥ पाहणें, आइकणें, इत्यादि गति । करितांही. ॥ ६७ ॥ आत्मस्थितीवीण । अणुमात्र नाहीं जयाचें वर्तन, । ते सर्वदा आत्मस्थिति जाण । न करितांही. ॥ ६८ ॥ अंतर्बाह्य जितुकें जाणे खरें, । बाह्य पदार्थ जितुका स्फुरे, । तें आत्मेनवीण न सरे । जाणणें ज्याचें. ॥ ६९ ॥ आत्मसत्तेवीण जाण । वृत्ति बाहीर[1] नये हें प्रमाण; । आत्माऽलिंगनें स्फुरण[2] । बाह्याचें होतसे. ॥ १७७० ॥ तें नेणोनि न कळे मूढा, । ज्ञानी अनुभवी धडफुडा; । ऐसा[3] सुरेश्वर गाढा । बोले सिद्धांतु. ॥ ७१ ॥

प्रत्यगर्थमनालिंग्य न पराग्वर्ति किंचन ।
विज्ञानं जायते यस्मादात्मोपास्ति सदा ततः ॥ १ ॥

असो त्यांची[4] स्थिति न मोडे । जऱ्ही विश्व हें घडे, मोडे, । तऱ्ही आत्मसुख निवाडें । भोगीत असे. ॥ ७२ ॥ आत्मा सर्वदा अपरोक्षचि असे, । भ्रमें परोक्ष केला दिसे[5], । म्हणोनि श्रुति सांगित असे । बाहे उभऊनि. ॥ ७३ ॥ प्रत्यक्ष आपणापें आपण असतां, । दुर्भाग्य नेणें हा तत्वता; । दूरि कें्ही न जातां, । लाभे आपणपांचि. ॥ ७४ ॥ तेही सांगों श्लोकसंमति[6] । जे कीं बोलिला सुरेश्वर चक्रवर्ती । तें कृपा करोनि संतीं । आइकावें कीं. ॥ ७५ ॥

अध्यात्मादिपदार्थेभ्यो विविक्तं स्वात्मनि स्थितं ।
तन्न पशत्यहो कष्टं दौर्भाग्यं दुष्टचेतसाम् ॥ १ ॥

अहो दुष्टचित्ता पुरुषाचें । दौर्भाग्य आइका साचें, । अहो थोर[7] वोखटें तयाचें । ऐसें श्रुति बोले. ॥ ७६ ॥ आत्म्यातें अधिकरूनि वर्तती, ।

१. ब. बाहेरि. २. अ. स्फुरणें. ३. ब. ऐसें सुरेश्वरु गाढा बोलिले. ४. अ. त्याचे.
५. अ. व क. असे. ६. अ. व ब. संगति. ७. ब. व क. अहो हें थोर.

ऐसीं इंद्रियें[1] आणि देह असती, । हे आदिकरूनि दृश्य व्यक्ति । समस्तही. ॥ ७७ ॥ तया समस्तांहूनि वेगळा । बुद्धीचा साक्षी निराळा, । तया देखती हे; वेळोवळां । किती बोलावें ? ॥ ७८ ॥

प्रत्यक्षगोचरं देवं लोकं चातिप्रमादिनं ।
दृष्ट्वा श्रुतिशिरस्ताडमनुक्रोशन्ति दुखिताः ॥ १ ॥

प्रत्यक्ष आणि गोचर । आत्मा असे निर्विकार, । तयातें नेणती लोक गंव्हार । अति प्रमादिये; ॥ ७९ ॥ ऐसें देखोनियां श्रुति । दुःखें शिर असे पिटिती, । आक्रंदतसे स्थिति । देखोनि जनांची. ॥ १७८० ॥

प्रत्यक्षतममप्येनं वितमस्कं[2] स्वयं स्थितम् ।
अहो कष्टं न पश्यन्ति कं यामः शरणं वयम् ॥ १ ॥

प्रत्यक्षाहूनियां प्रत्यक्षतम । स्वप्रकाश तमविहीन परब्रह्म. । तेंचि स्वयें[3] आपण आत्माराम । निश्चयेसीं. ॥ ८१ ॥ ऐसिया आपणातेंचि न देखती । म्हणोनि अंतीं[4] अतिदुःखी बोले श्रुति, । कवणा शरण जावें ? काकूळती । येवों कवणा ? ॥ ८२ ॥ जो ऐसियातें बोजें लावी, । यासि यातेंचि दाखवी, । ययासि सद्गुरु भेटवी । ऐसा कोण असे ? ॥ ८३ ॥ ऐसें श्रुति असे बोलती । तेथें इतरांची कोण गति, । प्रत्यक्ष न देखती । आत्मयातें. ॥ ८४ ॥ नाहो येथें आशंका असे थोर । ते[5] सांगा पां सविस्तर, । ऐसा आत्मा प्रत्यक्ष गोचर । ते नेणती कां पां ? ॥ ८५ ॥ तरि पुण्यपापाचेनि फळें[6] । अंतःकरण अतिशय मैळे[7], । तेणेंकरूनि अज्ञानबळें । अधिकाचि होय. ॥ ८६ ॥ अज्ञान अनादि लागलें । यास्तव प्रत्यक्ष आपण आपणां नकळे, । आणि कारणचतुष्टय[8] येके वेळे । यांचां ठांई. ॥ ८७ ॥ तें चतुःप्रकार कारण । तेंही आतां सांगेन । जें कीं बोलला श्रीभगवान । सुरेश्वरु. ॥ ८८ ॥

---

१. ब. ऐसे इंद्रिय आणि देहें असती. २. ब. व क. विरजस्कं. ३. ब. व क. स्वयें आत्माराम ४. ब. प्रतींत 'अंतीं' हा शब्द नाहीं. ५. ब. ते सांगावया विस्तार क. ते सांगोंया विस्तार. ६. ब. व क. बळें. ७. ब. मैळे. ८. ब. व क. कारणचतुष्टयें केवळें.

परीक्ष्य[१] यो न गृण्हाति गृण्हाति च विपर्ययात् ।
दृढपूर्वश्रुतत्वाच्च प्रमादाच्चापि लौकिकात् ।
चतुर्भि:[२] कारणैरेतैर्यथातथ्यं न विन्दति ॥

सारासार परीक्षूनियां । सार तें नेघती आत्मया; । जरि घेती तरि विपर्ययां । देहादिकां घेती. ॥ ८९ ॥ आत्मत्वें[३] देहादि मानिती, । प्रपंचु सत्यत्वेंचि घेती । आणि आइकिलें देखिलें कोटिजन्मांतीं । तेंचि दृढ जालें, ॥ १७९० ॥ आणि लौकिक जो प्रमाद । सर्वथा नाहीं स्वरूपीं सावध, । असो हे चारिच बाध । यथार्थ जाणावया. ॥ ९१ ॥ जैसें वास्तव तैसें जाणणें । हें न घडे कारणचतुष्टयें येणें । सद्गुरुप्रसादें निमणें । चतुष्टयाचें होये. ॥ ९२ ॥ असो हें बोलावें किती ? । बोलिलों तें सहावें[४] संतीं, । "पूर्णात्मा सुसमीक्ष्यतां" ये पदार्थीं । इतुकें लागे. ॥ ९३ ॥ "सुतरां" म्हणिजे अतिशयेसीं, । "सं" म्हणिजे दृढ निश्चयेसीं, । "पूर्णात्मा" पूर्ण स्थिति ऐसी । बोलिली मूळीं. ॥ ९४ ॥ त्याचें सांग करावया व्याख्यान । आणि संशयनिरासन उपादान;[५] । हें सांग करावया निरूपण । इतुकें जालें. ॥ ९५ ॥ जयां अनुभव ये स्थितीचा असे, । ते परिसती अति संतोषें, । त्यांसि परमानंदु विशेषें[६] । दुणावला होय. ॥ ९६ ॥ येरां न कळे याची स्थिति । ते बहु निरूपणीं उबग मानिती, । परि हें निरूपण संतांचिप्रति । केलें असे. ॥ ९७ ॥ मलयचंदनाचे भोक्ते । येक श्रीमंत परीक्षक ते; । भिल्लीं तया चंदनातें । इंधन कीजे. ॥ ९८ ॥ अरण्यक शाकपाकालागीं । सुगंध चंदन घालिती आगीं, । श्रीमंत ते सर्वांगीं । लाविती आपणां. ॥ ९९ ॥ तैसें हें संतांचें जीवन, । येरां अति विस्तीर्ण पण, । असो पुढां निरूपण । करणें असे. ॥ १८०० ॥ यालागीं मागें चालिलिया[७] उपपत्ती, । केवळ मनोलयें नव्हे प्राप्ति, । ऐसेंचि हठयोगी[८] करिती । मनोलय. ॥ १ ॥ बहु मनोनिग्रह करी, । स्थिर राहे[९] अनेक अब्देंवरि, । सेवटीं याचितचि उभा भिकारी । जैसा तैसा. ॥ २ ॥

१. ब. परीक्षया न गृण्हन्ति, गृण्हन्ति च विपर्ययात्. २. ब. प्रतींत हा चरण नाहीं. ३. अ. आत्मत्व देहीं मानिती. ४. अ. उपहासावें. ५. ब. संशयनिरासहान. ६. ब. अति विशेषें. ७. ब. चालिल्या. ८. ब. हठयोगी. ९. अ. वाहे.

स्वरूप जाणोनि मनोनिग्रह। तोचि सुखप्राप्तीचा उपावो,। नेणतां सर्व अपावो। निश्चयेसीं. ॥ ३ ॥ ऐसी मनाची जे येकाग्रता। तेचि स्वरूपप्राप्ति तत्वता;। या वेगळी ते गाथा। बोलणयाची. ॥ ४ ॥ येक येकाग्रें बैसों जाती,। सर्वेचि पावे सुषुप्ति,। तरि तया स्वरूपस्थिति। कार्य[1] बोलों येईल ? ॥ ५ ॥ लौकिकही येकाग्रता। जप, तप, अनुष्ठान करितां;। सुषुप्ति होतसे तत्वता। अति जाड्यपणें. ॥ ६ ॥ श्रवणालागीं पुराणीं बैसती,। मायिक कथा तरि उत्तमा करिती,। आचार्य मंगलाचरण जंव आरंभिती[2]। तंव त्या सुषुप्ति बाधित. ॥ ७ ॥ हरिकथेचांही ठाईं। सुषुप्तीवांचूनि आन नाहीं,। मग स्वरूपोन्मुख करूनि काई। निश्चळ होती ? ॥ ८ ॥ निश्चळतेवांचून। नव्हे प्रपंचउपशमन;। दृश्यशमेंविण स्वरूपभान। कदा नव्हे. ॥ ९ ॥ "भान" शब्दें अपरोक्षता। स्वसुख भोगणें तत्वता,। "भोग" शब्दें तद्रूपता। आन नाहीं. ॥ १८१० ॥ ऐसें असोनि येकाग्रपण। कधीं नेणे ज्याचें मन। तोही[3] म्हणे आंम्ही सज्ञान[4]। हा तंव विटंबु कीं. ॥ ११ ॥ विटंबना हेचि थोर। कदापि नेणती सुख अंतर,। आणि आत्मकथाप्रचुर। मुखें बोलती. ॥ १२ ॥ असो तयाची स्थिति.। सद्गुरुअनुगृहीत तो सुखसंपत्ति। सर्वदा पूर्णात्मस्थिति। वर्ततसे. ॥ १३ ॥ असो ऐसा जो जाला। तया कर्मभोगु तो नाहीं सुटला,। कर्मभोगास्तव जन्ममरणाला। पावेलाचि कीं. ॥ १४ ॥ संचित, प्रारब्ध, क्रियमाण,। ऐसें हें त्रिविध कर्म जाण। ययाचा भोगु दारुण। तो तंव न चुके. ॥ १५ ॥ जेथें कर्मभोग बैसला असे। तेथें संसृति कैसी नासे?। तरि ज्ञानाचेनि सोसें। कोण कार्य ? ॥ १६ ॥ तरि त्याची ही सांगों विवंचना,। ज्ञानिया कर्म बाधीना,। तो अलिप्त सर्वस्वपणा;। तेथें कर्म काये ? ॥ १७ ॥ तयाचें कर्म दग्ध जालें;। आतां बाधील कोणा ? बोलें.। तें कोण? कैसें निराळें?। ते परियेसा पां. ॥ १८ ॥ प्रारब्ध, संचित, क्रियमाण,। ऐसें त्रिविध कर्म जाण,। याचा क्षय संपूर्ण। होय तें कैसें सांगों. ॥ १९ ॥ "प्राक्कर्म प्रविलाप्यतां"। म्हणिजे ज्ञानाग्नीनें जाळावें तत्वता। ऐसें श्रीभगवंतें पार्था। बोलिलें असे. ॥ १८२० ॥ "ज्ञानाग्निदग्धकर्माणि" ऐसें। बोलिलें असे विश्वेशें,। जेथें ज्ञानाग्नि, तेथें कायसें। संचित कर्म ? ॥ २१ ॥

१. ब. काय? काय? २. ब. करिती. ३. अ. तेही. ४. ब. आम्हांसि ज्ञान.

संचित कर्मा आंतु । ज्ञानाग्नि पडोनि जाळितु । आन नाहीं इयें मातु । निश्चित जाण. ॥ २२ ॥ नाहो बोलिलेति हें सत्य असे; । परि अनुभवा कैसें येतसे? । अनुभवा येईल तें अनारिसें । म्हणतां नये. ॥ २३ ॥ तरि आइका तेंहि सांगिजेल । तें तुमच्या अनुभवा येईल, । संचित कैसें जळेल । ज्ञानाग्नीकरूनि. ॥ २४ ॥ संचित कर्म आणि इतर । सर्व मनाचेचि प्रकार, । मनींच सर्व संसार । थांबला असे. ॥ २५ ॥ तें मन असे **लिंगदेहीं;** । **लिंगदेह** अज्ञानाचें कार्य पाहीं; । अज्ञानीं वस्ती सर्वांसहीं । आन नाहीं; ॥ २६ ॥ तें अज्ञान समूळ नासे, । मग **लिंगदेहादि** कोठें वसे ?। ज्ञानाग्नि भडके. यासरसे । जळोनि जाती[1]. ॥ २७ ॥ अज्ञान जेथें जळे, । तत्कार्य लिंग, मन, कर्म, निराळें । उरोनि कोठें राहे सगळें ? । विचारिजो. ॥ २८ ॥ चित्रपट जळोनि गेला । तेथें चित्राभास कोठें उरला? । कुड्याचा ठावो पुसला । तेथें चित्र कें असे ? ॥ २९ ॥ बीजनाशें सस्य कैचें? । देहनाशें अवयव साचे ? । तंतु नाशलिया पटाचें । वसणें कोठें ? ॥ १८३० ॥ सकळ अज्ञानाचे सरिसीं । जळोनि जाती अपैसीं । दिसे जे सत्या ऐसी । दग्धपटन्यायें. ॥ ३१ ॥ अष्टशल्येचि वाण । जळोनि न सांडी आपलेपण । बळें-सहित संपूर्णपण । दावी आपणा. ॥ ३२ ॥ तैसे जळालिया देहद्वय । साभास तसे सावयव । अज्ञानी साच स्वमेव । मानिती त्यांसि. ॥ ३३ ॥ जें आपुलें कार्य न करी । तें नाहींच कीं सर्वांपरी, । दिसे तें भरोवरी । भासमात्र. ॥ ३४ ॥ गंधर्वपुर साच भासे, । तरी कोणी तेथ काय वसे ? । मृगांभाचेनि वोव्हासें । न्हाला कोण ? ॥ ३५ ॥ वोडंबरीचेनि अळंकारें । कोण पां दिसतसे साजिरें ? । लेऊनि मनोहरें । तेथिलीं लेणीं. ॥ ३६ ॥ असो. अज्ञानासरिसें । संचित जळालें ज्ञानाग्निलेशें; । मागुतें संसारदशे । आणीना तें. ॥ ३७ ॥ जळोनि जें[2] भस्म होय । तें आणिकातें जाळी काय ? । राखोंडी ही कापुसेंही गिवसूं ये । परि न जाळी त्यांतें[3]. ॥ ३८ ॥ यापरी संचित गेलें, । दुसरें क्रियमाण उरलें, । तेंही करूनि बाधित गेलें । स्वप्नडिंभ जैसें. ॥ ३९ ॥

---

१. ब. जाई. २. अ. तें. ३. ब. ते.

चितिबलान्नाप्युत्तरैः श्लिष्यताम् ।

ज्ञानाचेनि बळें तत्वता । उत्तर कर्म जें क्रियमाणता, । त्यासि संबंधातें न पैवतां । फळ नेदी. ॥ १८४० ॥ ज्ञानबळेंकरूनि । सर्वथा न लिंपे कर्तेपणीं । सर्वांचा साक्षी होऊनि । कर्मे करीलें. ॥ ४१ ॥ तेथें न म्हणे मी कर्मकर्ता, । सर्वथा नये अहंकारपंथा, । स्वस्वरूप तत्वता । जाणे म्हणोनि. ॥ ४२ ॥ कर्म सांग करितु जाय, । विधि, निषेध पाळित आहे, । परि भयलाभें न करी पाहें । हें त्याचें अपूर्व. ॥ ४३ ॥ निषेध करितां पाप होईल, । विधि पाळितां पुण्य जोडेल, । हें नसोनियां प्रांजळ । कर्म करी. ॥ ४४ ॥ जैसें बाळक स्वेच्छेकरूनि । खाँद्यवस्तु सेवी लीलेकरूनि । निंद्य टाकितां काय लाभ, हानि । देखिली तेणें ? ॥ ४५ ॥ पूर्व संस्कारेंकरूनि । स्तनां झोंबे स्तन्यालागूनि, । तैसा पूर्वसंस्कारेंकरूनि । कर्मे करी. ॥ ४६ ॥ जन्मजन्मांतरीं कर्मे । निषेध गाळूनि केलीं सत्कर्मे. । तेंचि चित्तशुद्धीचीं वर्मे । होऊनि ठेलीं. ॥ ४७ ॥ चित्तशुद्धिद्वारा जालें ज्ञान, । ज्ञान जालियाही संस्कार पूर्ण । राहिला, तेणेंकरून । विधि, निषेध, होतसे. ॥ ४८ ॥ तो भय, लाभ देखोनि न करी । तरि तया संस्कार भरोवरी । विधिनिषेधकुसरी । होताचि असे ती. ॥ ४९ ॥ यदर्थी संमति असे । पॅरियेसा सावकाशें । जें एकादशीं विश्वेशें । बोलिलें असे. ॥ १८५० ॥

दोषबुद्ध्या भयाभीतो निषेधान्न निवर्तते ।
गुणबुद्ध्या च विहितं न करोति यथार्भकः ॥ १ ॥

सर्वांचा साक्षी होऊन । जरि करी नाना यज्ञ । तेंण्हें तो अलिप्त कर्मविहीन । निश्चित जाणा. ॥ ५१ ॥ ऐसें परमात्मा किरीटीप्रति । बोलिले असती अति प्रीती, । ते आइका संमति श्रुति । गीतारूपें ॥ ५२ ॥

गतसंगस्य मुक्तस्य ज्ञानाऽवस्थितचेतसः ।
यज्ञायाचरतः कर्म समग्रं प्रविलीयते ॥ १ ॥

जरि यज्ञादिकें कर्मे करी । तथापि न पडे तयांभीतरीं, । साक्षित्व आपुलें सर्वांपरी । जाणोनि असे. ॥ ५३ ॥ येन्हवीं कांहीं नेणे ऐसा नव्हे, ।

---

१. ब. पावतां. २. ब. करी. ३. अ. खाद्यवस्तुचि संविध करूनि. ४. ब. असती. ५. ब. ते परियेसा. ६. ब. यत्न. ७. ब. तरि.

सर्व कर्मकलापें जाणतु आहे, । परिस चाडाच्यापरि कारैतु जाये । सांगोपांग. ॥ ५४ ॥ ऐसें करूनिही अकर्ता, । सर्व भोगूनिही अभोक्ता, । साक्षीपणेंचि वर्तता । ऐसा असे. ॥ ५५ ॥ तया केलियाही कर्मसंबंधु नाहीं, । तो ते देहींचाचि नव्हे कांहीं, । अकर्ता, अभोक्ता, विदेही, । ज्ञानबळें. ॥ ५६ ॥ तो स्वरूपनिष्ठ असतां, । **अश्वमेधादि** कर्मे आचरतां, । अथवा तत्संबंधें जीवां[१] घात होतां, । न लिंपे तो. ॥ ५७ ॥ तो ते देहींचाचि नव्हे । मनबुद्धयादि दृश्य त्यासि काय? । तत्पूर्वक[२] केलियाही नव्हे । लाभ, हानि, त्यासि. ॥ ५८ ॥ ऐसें श्रीकृष्णेंही बोलिलें । जें कीं कृष्णरूपेंचि अवतरलें । सर्व सिद्धांतें माथिलें । वाक्य ज्याचें. ॥ ५९ ॥

यस्य नाहंकृतो भावो बुद्धिर्यस्य न लिप्यते ।
हत्वाऽपि स इमाँल्लोकान्न हन्ति न निबध्यते ॥ १ ॥

जया मी कर्ता ऐसा अहंकारु । कोणे विषयीं नुपजे अंकुरु । त्याची बुद्धि न लिंपे, हा आदरु । काय करणें? ॥ १८६० ॥ " **अहं** " नुपजे कर्तेपणाची । सर्वथा नुपजे बुद्धि अलिप्त त्याची; । बुद्धि न लिंपे, तेथें कर्मांचीं । फळें काय होतीं[३]? ॥ ६१ ॥ यास्तवही विचारितां । हा कर्ता नव्हे सर्वथा, । कारण[४] तें पांचांच्या माथां । स्वयें श्रुति[५] बोले. ॥ ६२ ॥

पंचैतानि महाबाहो कारणानि निबोध मे ।
सांख्ये कृतान्ते प्रोक्तानि सिद्धये सर्वकर्मणाम् ॥ १ ॥
अधिष्ठानं तथा कर्ता करणं च पृथग्विधम् ॥
विविधा च पृथक्चेष्टा दैवं चैवात्र पंचमम् ॥ २ ॥

यालागीं परभारीं[६] ये पांचेंकरूनि । कर्म सर्व होतसे भवेंसेनि, । आत्मा अलिप्त तयांहूनि । वेगळेपणें. ॥ ६३ ॥ जैसा सर्व गृहव्यापारीं । दीपु साक्षित्वें तयांसि दूरि, । लिप्त नव्हे क्षणहीभरि । कोणेंही[७] कर्में. ॥ ६४ ॥ घरिंचीं कर्में करिती, शीणती, । दीप साक्षी अलिप्त, असंगवृत्ति[८], । तैसा आत्मा कर्मस्थिति । नातळे देहादिकां. ॥ ६५ ॥ तैसा ज्ञानी[९] जो सर्वदा असंग । तया कैंचा देहादिकर्मसंग, । जैसें सर्वव्यापक, अव्यंग, ।

---

१. ब. जीवघात. २. अ. तत्पूर्व. ३. ब. होतील. ४. ब. करणें. ५. ब. स्मृति. ६. ब. परबाहिरें पांचे. ७. ब. कोणांही कर्मी. ८. ब. संगवृत्ति. ९. ब. आत्मज्ञानी.

अलिप्त, नभ जैसें[1]. ॥ ६६ ॥ तयाविण तरि नचले कांहीं, । परि तो तेण्हें न लिंपे पांहीं[2], । असंग, साक्षी, सर्व देहीं । अकर्तेपणें. ॥ ६७ ॥ पांचांचे[3] कारणेंकरून । जालें जऱ्हि जगसंहारण, । तरि तो कर्ता नव्हे पूर्ण । ना बद्धही[4] नव्हे. ॥ ६८ ॥

"स इमान् लोकान्" इत्यादि श्रुतिवचनात्[5],

अहो, सद्गुरुमुखें जें परोक्ष ज्ञान । केवळ शाब्दिकचि परिपूर्ण । जालें जया तो कर्तेपण[6] । भोगी जेथें. ॥ ६९ ॥ तेणें बुद्धिपूर्वकेंही[7] पाप केलें । तें तत्क्षणीं भस्मीभूत झालें.[8] । जैसें वन्हीनें जाळिलें । तूळराशीतें[9], ॥ १८७० ॥ तैसें सर्व पाप जळे । येका परोक्ष ज्ञानाचेनि बळें, । तेथें अपरोक्षानुभवें[10] केवळें । काय उरे? ॥ ७१ ॥

परोक्षमपि विज्ञानं शाब्दं देशिकपूर्वकम् ।
बुद्धिपूर्वं कृतं पापं कृत्स्नं दहति तूलवत् ॥ १ ॥

शद्वज्ञानाची येवढी थोरी. । तेथें अपरोक्षाची कोण परी? तो अलिप्त सर्व व्यापारीं । शुभाऽशुभासि. ॥ ७२ ॥ यदर्थीं विजयाप्रति विश्वेशें । आहत्य (आद्यत्य) बोलिलें असे, । ज्ञानाग्नीकरूनि होतसे । भस्मसात्कर्म. ॥ ७३ ॥

ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात्कुरुतेऽर्जुन ।

संचित आणि क्रियमाण । ज्ञानाग्नीनें केलें दह्यमान, । भस्मरूप निर्वाण । होऊन ठेलें. ॥ ७४ ॥ यालागीं क्रियमाणेंही कर्में । ज्ञानियें न लिंपिजेचि सोहंभ्रमें; । अकर्ता, साक्षी, गुरुवर्में । जाला म्हणोनि. ॥ ७५ ॥ म्हणोनि संबंधातें नपवे, । शुभाऽशुभीं कर्मीं न झकवे, । अलिप्त होऊनि ब्रह्मभावें । असे परमानंदें. ॥ ७६ ॥ आतां येक प्रारब्ध उरलें, । त्याचेंही सांगेन बोलें; । चित्त देऊनि अवधारिलें । पाहिजे सतीं. ॥ ७७ ॥ ज्ञानाहूनि बळकट प्रारब्ध असे, । तें ज्ञान जालियाही न नाशे, । करितां[11] अनेकें सायासें । कोण्हेपरी. ॥ ७८ ॥ तें ज्ञानापुर्वींच देहारंभक । प्रतिफळलें[12] असे

१. ब. तें. २. क. कदाही. ३. ब. या पांचे. ४. अ. बाध. ५. अ. ही श्रुति 'अ' प्रतींत नाहीं. ६. ब. अकर्तेपण. ७. अ. बुद्धिपूर्वाही ८. अ. भस्मच पावलें. ९. ब. तृण. १०. अ. परोक्षानुभवें. ११. अ. करी. १२. अ. प्रतिस्फुरली संम्यक्.

सम्यक, । तें फळ दिधलियाविण कांहीं येक । न्यून नव्हे. ॥ ७९ ॥ प्रारब्धाहूनि अधिक योगबळ, । योगें निर्विकल्प समाधि निर्मळ । जालया, प्रारब्ध फळ । कोणां देईल ? ॥ १८८० ॥ जरि व्युत्थान पावेल, । तरिच देहावरि येईल, । देहावरि आलिया कर्मफळ । शुभाऽशुभ होय. ॥ ८१ ॥ तरि तो देहाचिवरि नये । तरि कर्मभोग होईल कवणा, काय ? । म्हणोनि योगाचें बळ आहे । प्रारब्धाहूनि. ॥ ८२ ॥ अन्यथा, ज्ञानी जरी जाला, । तऱ्ही प्रारब्धभोग पाहिजे भोगिला, । तो इहलोकीं, येचि देहीं भला । भोगावा कीं. ॥ ८३ ॥ परी इतरां ऐसा न आहळे, । शुभाऽशुभीं न पोळे, । सुखदुःखाचे उमाळे । भोगी अभोक्तेपणें. ॥ ८४ ॥ प्रारब्ध वोळखिलें आहे, । आपण वेगळा हें जाणत आहे, । देहाचा भोग देह पाहें । भोगित असे. ॥ ८५ ॥ येणें साक्षित्वेंचि असे, । आपणां नलवी भोगाचें पिसें, । आलिप्त होऊनि असे । जालेयानेंही भोगें. ॥ ८६ ॥ यालागीं अवश्य भोगावें, । प्रारब्धासि यत्न न करावे; । हे आपणा ऐसें स्वभावें । करील कीं. ॥ ८७ ॥ गंगा वाहे येके वाहणीं । आपण पोंहिजे विपरीतपणीं, । तेथें आग्रहचि उरे, परी ते आणी । आपल्या लेख्या. ॥ ८८ ॥ म्हणोनि प्रारब्धेसीं हट न कीजे, । अलिप्तपणेंचि उगेंचि साहिजे, । हर्षविषाद न मानिजे । साक्षीपणें. ॥ ८९ ॥ देहादिकां होतसे भोग; । आपण अभोक्ता, अकर्ता, निःसंग; । येणें साक्षित्वें अंतरंग । असावें कीं. ॥ १८९०॥ अहो स्वामिदर्शनाचें फळ । सप्त जन्म ब्राह्मण सुशीळ । व्हावा, ऐसें स्मृति केवळ । बोलतसे. ॥ ९१ ॥ स्वामिदर्शनाचिसाठीं । सप्त जन्में बैसलीं पाठीं,[1] । कृत्तिका कार्तिक पेटी । दर्शन जालया. ॥ ९२ ॥ सातां जन्मांचें प्रारब्ध जालें, । मध्यें भाग्योदयें जरि ज्ञान उद्भवेलें[2] । तरि तें भोगावें उगलें,[3] । आन नाहीं. ॥ ९३ ॥ ऐसींच जे प्रारब्धें असती । तेंहीं घडेल कीं संसृति, । तरि ते ज्ञानाची संपत्ति । व्यर्थचि कीं. ॥ ९४ ॥ आणि भरतसनत्कुमारादिक । ज्ञान असतां जन्म सम्यक । पावले, हें पौराणिक । बोलती, प्रारब्धें. ॥ ९५ ॥ तरि याची आयका उपपत्ति.[4] । स्वामिदर्शनें सप्त जन्म पावती, । हे तंव केली तीर्थस्तुति; । वास्तव[5] युक्त नव्हेचि. ॥ ९६ ॥

---

१. ब. पाठीं. २. अ. उद्भवे. ३. ब. उरलें. ४. ब. उत्पत्ति. ५. क. [illegible]ारतव युक्ति हे नव्हे.

अथवा असो वास्तव, । तथापि तो नव्हे अभिप्राव; । हा ज्ञानापूर्वील भाव । ज्ञानोत्तर वाव जाणिजे. ॥ ९७ ॥ बहुत जन्म प्रारब्ध असतां । तरि ज्ञानप्रतिबंधक[1] होय सर्वथा; । होऊं नेदी अपरोक्षता । सर्व[2]जन्मेंवांचूनि. ॥ ९८ ॥ [3]उपासकीं अधिकारिये जीवीं । बहुत जन्में भोगावीं; । भरत तो अपरोक्षानुभवी । तिसरिये भवीं जाला. ॥ ९९ ॥ यालागीं अवश्य प्रारब्ध भोगणें, । प्रयत्न कांहीं न करणें, । भोगितांही अलिप्तपणें । भोगु नव्हे. ॥ १९०० ॥ त्रिविध प्रारब्ध[4] असे, । तेंही योगी भोगितसे,[5] । परि तेथिंचा तो नसे । अलिप्तपणें. ॥ १ ॥ इतुकेनि बाधु तया नपवे, । दुष्ट भोगें कांहीं ज्ञानी नव्हे, । ऐसें सर्वथा न म्हणावें । बोधला असे तो. ॥ २ ॥ बोधलेपणें भोग होत । परि ज्ञान न्यून नव्हे ईषत्, । तो सर्वदा आनंद-भरित । आनंदरूप. ॥ ३ ॥ तें त्रिविध प्रारब्ध कैसें । तेंही सांगों अनायासें; । जेणें बुं[6]झिजे सर्वस्वें । प्रारब्धरूप. ॥ ४ ॥ 'स्[7]वेच्छ,' 'परेच्छ,' 'अनिच्छ,' । ऐसें[8] हें त्रिविध प्रारब्ध साच; । भोगूनियांही निर्वच[9] । ज्ञानबळें. ॥ ५ ॥ ज्ञानाचेनि बळेंकरूनि । प्रारब्ध भोगी भवसेनि, । परि लिप्त कांहीं तयाचेनि । नव्हे प्रतीतिबळें. ॥ ६ ॥ आतां येकेकें[10] विभागूनियां । सांगों कर्मा त्रिविधा यया; । 'स्वेच्छ' म्हणिजे कासया, । तें प्रथम आइका. ॥ ७ ॥ आपुलिये इच्छेकरूनि । जाणतांही करी भवसेनि, । परि न निवर्ते ते तेथूनि[11] । पूर्वकर्मबळें. ॥ ८ ॥ आपण कर्ता नव्हें ऐसें जाणे, । बरवें जाणे वेगळेपणें, । पूर्वकर्मप्रेरणा हे खुणे । बुझतु आहे. ॥ ९ ॥ जैसा तस्कराचा स्वभाव, । जाणें स्तेयपणें अपाव । तरी राजगृहीं पाव । स्तेयार्थ घाली. ॥ १९१० ॥ जाणत जाणतां स्वेच्छेकरूनि । कर्म करी भवसेनि, । तें आपुलिया फळालागूनि । देतसे सुष्टदुष्ट. ॥ ११ ॥ इत्यादि दृष्टांतें जाणिजे; । जाणोनि जें कर्म कीजे, । तें 'स्वेच्छ' ऐसें बुझिजे । निर्धारेसीं. ॥१२॥ आतां 'प[12]रेच्छ' तें कैसें? । तेंही सांगों प्र[13]संगमिषें; । तरि दुसरेनि नेवूनि पूजिजे तसे । कां अनिष्ट कीजे. ॥ १३ ॥ दुसरियाचेनि

१. ब. बद्धक. २. ब. अंत्य. ३. ब. उपासकाधिकारिये. ४. ब. प्रारब्धभोग. ५. ब. भोगित असे. ६. ब. बुद्धिजे. ७. ब. स्वेच्छा, परेच्छा. ८. क. ऐसें प्रारब्ध त्रिविध साचें. ९. ब. निर्वेच. १०. ब. एक एक. ११. ब. निवर्ते तेथूनि. १२. ब. परेच्छा. १३. ब. प्रसंगवशें.

संकोचें । जें जें कांहीं सुष्ट, दुष्ट रचे, । तें कर्म जाणा 'परेच्छे' हेंचि रूप. ॥ १४ ॥ तेथें सुष्ट, दुष्ट जो भोग होईल । तो परापेक्ष हें नवल, । योगी भोगितांही तळमळ । न करी कदा. ॥ १५ ॥ आतां 'अनिच्छ' कर्माचें फळ, । सांगों तेंही नवल; । इच्छिलिया वांचूनि तळमळ । ज्वरादि दुःखांची. ॥ १६ ॥ ज्वरादि दुःखें उपजती, । अथवा निध्यादि लाभ प्राप्त होती, । इत्यादि 'अनिच्छे'ची गति । जाणावी सर्वत्र. ॥ १७ ॥ ऐसें त्रिविध प्रारब्धाचें फळ, । अभोक्तेपणें भोगी सकळ, । परि भोगिलिया मळ । नलगे कदा. ॥ १८ ॥ ऐसे प्रारब्धभोगानंतरें । देह पडे येकसरें, । भोगातें म्हणे पुरे । योगीश्वरु. ॥ १९ ॥ जीवन्मुक्ति दशे । पंचमी, षष्ठी भूमिके जो वसे, । सुखदुःखादि जाणिजेतसे । प्रारब्धभोगु. ॥ १९२० ॥ ते द्रष्टेपणें जाणे । परि व्याकुळ नव्हे तेणें, । स्वस्वरूप अनुभवलेपणें । दृढ जाणे. ॥ २१ ॥ देहादि प्रपंच बाधित । जाला जयासि निश्चित, । तेथें सत्यपणें चित्त । काय व्याकुळ होये? ॥ २२ ॥ जया साच कळली शुक्ति । तो रजतदर्शनें न धरी भ्रांति; । हर्षविषादांची गति । कैंची तेथें? ॥ २३ ॥ जो स्वप्नींचा जागृतीसि[1] ये । तो तेथिंचे[2] दुःखें विषादा नये; । तैसा जीवन्मुक्त पाहें । प्रारब्धयोगें. ॥ २४ ॥ मग सप्तमी भूमिकेसि । नेणिजे भोग्य, भोग, भोक्ता कैसीं; । ते तंव निर्विकल्प दशा ऐसी । पूर्वीं निरूपिली. ॥ २५ ॥ प्रारब्धभोगानंतरें । प्रातिभासिक जगाचें सरे, । देह पडोनि उरे । ब्रह्मात्मैक्य. ॥ २६ ॥ पूर्वींही ब्रह्मात्मैक्य आहे । परि देहसंगें अज्ञाना नाहीसें होये । परि तें ज्ञानोदयींच जालें आहे । ब्रह्मात्मैक्य हें.[3] ॥ २७ ॥ ब्रह्मात्मपणें[4] राहणें । विदेहमुक्ति त्यातें म्हणणें. । "ब्रह्मात्मना" इये खुणे । सांगों आतां. ॥ २८ ॥ केवळ ब्रह्मपणेंचि असणें, । प्रारब्धभोग कांहीं नेणणें, । अज्ञानशेषा उवडणें[5] । निःशेष जेथ जालें. ॥ २९ ॥ जेथ आपलेनवीण दुसरें । सर्वत्र कोठेंही न स्फुरे, । मनोर्बुद्धिचित्ताहंकारें[6] । कार्यकारणें सहित. ॥ १९३० ॥ तें ब्रह्मपण सर्वथा । नाहीं वक्ता, भोक्ता, कर्ता; । येकेवीण येक तत्वता । तें परब्रह्म. ॥ ३१ ॥ ययापरतें कांहीं करणें, । न घडे

---

१. अ. जागृती. २. ब. तो तेथींचे हर्षविषादा नये. ३. ब. क. तें. ४. ब. क. ब्रह्मात्मैक्यपणें. ५. ब. क. उबगणें. ६. ब. मन बुद्धि तेथें विरे. क. मन बुद्धि.

बोलणें ना राहणें, । कीं दोन्हीं आपणा आपणें । अपूर्णपूर्णपण जें. ॥ ३२ ॥ हे अनिर्वाच्य स्थिति, । शब्दाची कुंठे गति, । तेथें वाचादि वावरती । हें काय बोलावें ? ॥ ३३ ॥ हें ज्याचें तेणेंचि जाणिजे, । जेथें भोग, भोग्य विरिजे, । तेथें भोक्ता कोण म्हणिजे ? । दुजें नाहीं म्हणोन. ॥ ३४ ॥ जेथें बोलतां शब्द विरे, । देहादि प्रपंचु सकळ सरे, । आत्मा आत्मपणें वावरे, । सुख कोण बोले ? ॥ ३५ ॥ जेथें ठावोचि पुरे शब्दाचा, । परतलिया परादि वाचा, । सुकाळ सुखावला सुखाचा । परमानंदें. ॥ ३६ ॥ नाहो तेथें आशंका असे थोर । जें बोलिजेति तुम्ही उत्तर, । जें कीं शब्दासही अगोचर । अनिर्वाच्यपणें. ॥ ३७ ॥ तरि महावाक्यें होय साक्षात्कारु, । काय मिथ्याभूत व्यवहारु ? । "**तंत्वौपनिषदं पुरुषं पृच्छामि**" उच्चारु । होय मिथ्या ? ॥ ३८ ॥ **उपनिषदें** पाविजे । म्हणोनि औपनिषद पुरुष म्हणिजे, । आणि तुम्ही म्हणतां न जाणिजे । वाक्चतुष्टयें. ॥ ३९ ॥ तरि याचा सांगा विचार. । कैसा केला तुम्हीं निर्धार ? । मज पाहतां मिथ्याचार । तुमचा असे. ॥ १९४० ॥ वाचा ब्रह्म नेणिजे । तरि महावाक्यें कैसा दाविजे ? । हें बोलावें व्याजें । प्रश्नाचेनि. ॥ ४१ ॥ म्हणे ऐका याचें उत्तर. । बोलिलेति तें साचार. । तें सांगिजे, हा निर्धार । आन असे. ॥ ४२ ॥ विशिष्टातें वाचा बोधी, । शुद्धातें कदा न बोधी, । तेथें लक्षणा करावी आधीं । तरि शुद्ध बोधे. ॥ ४३ ॥ शद्बाचेंही गुह्य ऐसें । लक्षणा करूनि शुद्ध प्रकाशे, । येऱ्हवीं विशिष्ट जैसें तैसें । परि बोधिलें नाहीं. ॥ ४४ ॥ असो हें पुढें सांगिजेल. । शद्ब कोठें प्रवेशे बोल. । तेंचि ऐका नवल । सांगों आतां. ॥ ४५ ॥ शद्बाचा गुण ग्राह्य पदार्थ. । ते चारिच जाणा यथार्थ; । ययावेगळें सामर्थ्य । शद्बासि नाहीं. ॥ ४६ ॥ जाति, गुण, क्रिया, संबंध, । हेचि चारि जेथें अर्थ विशद । असती, तेथेंचि शद्बा । प्रवेशु असे. ॥ ४७ ॥ ब्राह्मणादिकि जाति । जया पदार्थीं अस-

---

१. ब. क. कोंदोनि आपणा आपणें । अपूर्णपणें न भासे जें. २. ब. क. खुंटे. ३. ब. क. इंद्रियें. ४. ब. क. हें ज्याचें त्याणें अनुभविजे । अनुभवितां भोग्यें विरिजे । तेथें भोक्ता कोण म्हणिजे । दुजेनवीणें. ५. क. असे. ६. ब. क. लक्षणेकरूनि. ७. ब. क. शद्बग्राह्य पदार्थ. ८. अ. ब्राह्मणादि विजाती.

ती, । तेथें शद्वाची व्याप्ति । निश्चयेसीं. ॥ ४८ ॥ तैसेंचि[1] शुभ्रादि, रक्त, नीळ, गुण । असती, ते शद्वग्राह्य, जाण; । तैशीच क्रिया जेथें पूर्ण । तें शद्ववाच्य होय. ॥ ४९ ॥ पाठक, पाचक इत्यादिक । जे क्रियें[2] पडे नाम सम्यक् , । तेचि शद्वग्राहक । होय वस्तु. ॥ १९५० ॥ तैसाच संबंध जेथ असे । तेथेंचि शब्दु प्रवेशे, । धनिको[3] नाम इत्यादि ऐसें । पुत्रवंतादि. ॥ ५१ ॥ ब्रह्म अजपणें जन्ममरणशून्य, । तया जाति कैंची, कोण ? । निर्गुणासि कैंचा गुण ? । सांगा स्वामी. ॥ ५२ ॥ अक्रिय जें निर्विकार, । तया कैंचा क्रियाविकार ? । तें कैसें शब्दगोचर । होईल वस्तु ? ॥ ५३ ॥ असंग, व्यापकपणें, । संबंध न घडे उदासपणें, । तें शब्दें कैसें उच्चारणें । कोणा युक्ती ? ॥ ५४ ॥ सर्वत्र तुम्हीं पाहिजे । या चतुष्टय कारणांविण जें, । शब्दें काय घेईजे ? । हें विचारिजे. ॥ ५५ ॥ यालागीं शब्दीं ग्राह्य नव्हे. । वाचा परतती, सत्य हें. । देव स्वयें बोलत आहे । अगोचरपणें[5]. ॥ ५६ ॥

यतो वाचो निवर्तन्ते । यद्वाचानभ्युदितम् । येन वागभ्युद्यते । इति श्रुतिः

नाहो तुम्ही बोलिलेति तत्वता, । मानलें आमुचिया चित्ता, । परि प्रत्यक्ष शब्दवाच्यता । ब्रह्मासि देखिली आम्हीं. ॥ ५७ ॥ **सत्यं[6] ज्ञानमनंतं ब्रह्म** । ऐसें प्रत्यक्ष उच्चारी ब्रह्मनाम; । नाहीं म्हणतां तें कोण वर्म[7] । निरूपिजो. ॥ ५८ ॥ तें वाक्यचि तंव न घडे । पुसोनि[8] तें सांगावें वाडें । या वाक्याचीं पदें कोडें । कैसीं सांगा ? ॥ ५९ ॥ या वाक्याचीं पदें तीनि । काय येकाचि अर्थाचीं दोनी ? । कीं[9] भिन्न भिन्न वाच्य-स्थानीं । तें बोला तुम्ही. ॥ १९६० ॥ ना येकाचि पदार्थाचीं वाचकें । तरि पर्याय शब्द अनेकें । जाले[10] पाहिजेति येथकें । इतर वाच्यता. ॥ ६१ ॥ " **सत्यं ज्ञानमनंतं ब्रह्म** " ऐसी । येकार्थवाच्यचि सर्वासि, । तरि

---

१. अ. तैसेंचि. २. ब. क. जे क्रियेनें. ३. ब. क. धनी, व्योमन्. ४. १९५१ ते १९५३ या तीन ओव्या क प्रतींत नाहींत. ५. ब. क. गोचरपणें. ६. ब. क. सत्यं ज्ञानमानंदं ब्रह्म. ७. ब. क. कर्म. ८. ब. क. पुसेन तें सांगा उघडें. ९. ब. क. किंवा. १०. ब. क. जाहली पाहिजेति येथकें.

पर्याय पाहिजेति तैशीं । तें आइकिजो. ॥ ६२ ॥ पदार्थ तरि येकुचि बोलणें । परि नामभेदें उच्चारणें; । तरि घट, कुंभ, कलश, म्हणणें । घटासि जैसें. ॥ ६३ ॥ येकुचि घट उच्चारिला । परि नामाचा पर्याय केला; । तैसा वाक्यार्थ जाला । पाहिजे तुमचा. ॥ ६४ ॥ ना म्हणाल हें वाक्य भेदपर । तरि येथ सामानाधिकरण्य थोर । आहे; तें कोण प्रकार ? । असिलें न पाहिजे. ॥ ६५ ॥ **सत्या**दिक प्रथमैकवचनें । हे ऐसें कासया उच्चारणें ? । हे तंव समानाधिकरणें । भेदपर कैसें ? ॥ ६६ ॥ जेथें भेदपर वाक्य जाण । तेथें सर्वथा नाहीं समानाधिकरण, । अभेदपर तरि पर्यायपूर्ण । बोलिलें पाहिजे. ॥ ६७ ॥ ना म्हणाल भेदाऽभेद असे । कांहीं भेद कांहीं अभेद दिसे; । जैसें नीलोत्पल म्हणिजे, तसें । भेदाऽभेद. ॥ ६८ ॥ नीळा गुण तरि वेगळा; । तो तरि नव्हे कमळकळा; । भेद म्हणतां निराळा । निवडेना कीं. ॥ ६९ ॥ यालागीं तें भेदाऽभेद । अथवा मृद्धट विशद, । उच्चारितां भेदाऽभेद । नीलोत्पला ऐसें. ॥ १९७० ॥ तरि हेंही नव्हे सर्वापरी. । हे विशेषणविशेष्यभाव परी; । विशेषण नीलपणा, वरि । विशेष्य उत्पल. ॥ ७१ ॥ कमळ कैसें पुसतां ? । नीळें सांगणें तत्वता; । हा विशेषणविशेष्यभाव पुरता । वोळख तूं. ॥ ७२ ॥ तैसा नव्हे वाक्यार्थ । **सत्या**दि पदें विशेषणार्थ । विशेष्य ही कोण तेथ । बोलिला असे ? ॥ ७३ ॥ मृद्धटा ऐसें म्हणणें । तरि तें असे कार्यकारणपणें, । मृत्तिका कारण घटासि असणें । कार्य होऊनि. ॥ ७४ ॥ तैसें '**सत्यं ज्ञानमनंतं ब्रह्म**' येथें । कार्य म्हणाल कोणातें ? । कार्य तें संबंधातें । कोणाचे पावणें ? ॥ ७५ ॥ अथवा नव्हे गुणगुणीभाव; । जैसें नीलोत्पल येकें नांव, । नीळा गुण, स्वमेव । आपण गुणी. ॥ ७६ ॥ तैसें **सत्या**दि पदीं नाहीं । गुणगुणीभाव विचारें कहीं; । योजितां न घडे कांहीं । यालागीं न घडेचि. ॥ ७७ ॥ **सत्य** शब्दें जें बोलिजे ब्रह्म । त्याचें प्रतिपादक पद क्रम, । त्याचें स्वरूप निरूपम । वाक्यें बोले. ॥ ७८ ॥ 'सत्यं ज्ञान-

---

१. ब. क. सर्वदा. २. ब. सावेव.

मानंदं ब्रह्म' । ऐसें श्रुति बोले परब्रह्म । तें[1] पदें व्यतिक्रम । कैसा पावे ? ॥ ७९ ॥ तींहीं पदीं येकचि बोलिजे । तेंचि ब्रह्माचें रूप सहजें. । **सत्य, ज्ञान, आनंद,** व्याजें । येकचि तेंकीं. ॥ १९८० ॥ **सत्य** शब्दें सत्ता बोलिले, । जें सर्वदा अस्तित्व संचलें, । नाहींपणा कोणें काळें । नयेचि जें कीं. ॥ ८१ ॥ देशें, काळें, वस्तुविचारें । सत्ता जेथिंची न व्यभिचरे, । तें **सत्य** शब्दें निर्धारें परब्रह्म. ॥ ८२ ॥ **ज्ञान** शब्दें स्वप्रकाश, । जें कोणे काळीं नव्हे परप्रकाश, । [2]जेथें जडासि प्रकाश । सर्वदा वसे. ॥ ८३ ॥ जडाचिया व्यावर्तनें, । सर्वदा स्वप्रकाशपणें, । सत्तेसीं येकपणें । सर्वदा असे. ॥ ८४ ॥ सत्ता ते ज्ञानरूपेंचि असे, । परि [3]जडत्व कहीं नसे । परमानंदही वसे । येकत्वेंचि. ॥ ८५ ॥ **सत्ता, प्रकाश, सुख,** । सर्वदा सर्वपणेंचि येक; । परि कल्पांतींही अनेक । नव्हेतिचि कीं. ॥ ८६ ॥ सत्ता तोचि प्रकाश । प्रकाश तोचि आनंदाभास, । हे येकत्रचि परि विशेष । असेचिना. ॥ ८७ ॥ सत्ता ज्ञानाहूनि वेगळी म्हणतां, । तरि ज्ञान द्रष्टा, सत्तेसि दृश्यता । आलीच कीं तत्वता; । आन नाहीं. ॥ ८८ ॥ दृश्य तें तंव मिथ्या असे, । जैसा घट दृश्यत्वें भासे; । दृश्य तें मिथ्या, अनारिसें । असेचिना. ॥ ८९ ॥ आतां सत्तेहूनि ज्ञान भिन्न । तरि ज्यासि सत्यत्व नाहीं, कल्पित जाण; । कल्पित तें मिथ्या पूर्ण । रज्जु-सर्पवत्. ॥ १९९० ॥ ज्ञान आनंदाहूनि भिन्न म्हणतां । तरि सुख वेगळें प्रवर्तता । न देखिजे तत्वता । कोणे विषयीं कोणीं. ॥ ९१ ॥ जेथें सुखाचा लेश नाहीं । तेथें प्रवर्तेल कोण काई ? । सुखा वेगळी कोठेंही । प्रवृत्ति न दिसे. ॥ ९२ ॥ जिये वस्तूचां ठायीं । सुखाचा लेश नाहीं, । ते उपेक्षणीय, पाहीं, । सर्वां भूतां. ॥ ९३ ॥ जैसें विषादि भक्षणें । तें तों नावडोनि टाकिजे जनें, । सुख नाहीं तें कोणें । [4]घेइजे पां ? ॥ ९४ ॥ यालागीं ज्ञान आनंदाहूनि भिन्नपणें । असतां, सर्वथा उपेक्षणें; । यास्तव आनंदेसीं भिन्नपणें । नाहीं ज्ञान. ॥ ९५ ॥ आतां ज्ञानाहूनि आनंद भिन्न ।

---

१. ब. तें तें पदच्छेदें. २. ब. जेथें जडनिरास । सर्वदा वसे. ३. ब. परि जडत्वें कधींही नसे. ४. अ. घेपे दीजे.

म्हणतांचि आलें जडपण, । जड तेंचि मिथ्या जाण । सर्वथैव. ॥ ९६ ॥ जैसें गंधर्वनगरदर्शनें । सुख पाविजे अज्ञानें, । परि मिथ्यादृश्यपणें । ज्ञाता न पवे. ॥ ९७ ॥ आतां आनंदाहूनि सत्ता भिन्न । म्हणतांचि आलें जडपण, । आकाशाचे अस्तित्वपणें । आनंद कोणा ? ॥ ९८ ॥ तें सर्वदा संतपणें दिसे, । परि तेथ आनंद न भासे; । यालागीं जड उपेक्ष्य ऐसें । जालें जनां. ॥ ९९ ॥ सत्ते वेगळा आनंद म्हणतां । सत्ताही ते कल्पित तत्वता; । विद्युल्लतेच्या स्वप्रकाशता । सुख कोणासि ? ॥ २००० ॥ स्वप्नींचे राजविलास । कल्पितपणें नव्हती सुखाभास; । जागेपणें असंतोष, । खेदुचि होय. ॥ १ ॥ यालागीं **सत्ता** तेंचि **ज्ञान**, । **ज्ञान** तोचि **आनंद** पूर्ण; । येकाहूनि येक भिन्न । नव्हे येकात्मत्वें. ॥ २ ॥ तिन्ही मिळोनि येकाचि । ब्रह्मस्वरूप निर्धारेंचि; । नाहीं जाति अनुमानाची,[1] । अनुभवसिद्ध. ॥ ३ ॥ जो अनुभवी असे पूर्ण । तोचि जाणे येथिंची खूण; । भ्रांत होय अज्ञान । पदत्रयेंकरूनि. ॥ ४ ॥ आतां असो हें बोलणें. । हें श्रुतींसि विशिष्टाचें म्हणणें;[2] । परी शुद्धासि शब्द कोणे । प्रकारें बोधील ? ॥ ५ ॥ येथें लक्षणाचि करावी, । अन्यथा नुगवे गोंवी; । शुद्धीं शब्दठेवाठेवी । न करीं कदा. ॥ ६ ॥ शुद्धाचां ठायीं प्रवेशु । शब्द न करी सहवासु । तेथ करावा लक्षणांशु । जहदजहल्लक्षणा. ॥ ७ ॥ लक्षणाही त्रिप्रकार. । तेही सांगों सविस्तर. । ते आयिकोतु चतुर । अनुभवी जे कीं. ॥ ८ ॥ येक ते जहल्लक्षणा, । दुसरी अजहल्लक्षणा, । तिसरी जहदजहल्लक्षणा । जाणावी कीं. ॥ ९ ॥ जहल्लक्षणा निःशेष त्याग, । अजहल्लक्षणा तो अत्याग । जहदजहल्लक्षणा त्यागाऽत्याग । प्रसिद्धचि कीं. ॥ २०१० ॥ जहल्लक्षणेचें लक्षण । त्यागचि करणें पूर्ण; । तेंही उदाहरण । ऐसें असे. ॥ ११ ॥ **'गंगायां घोषः प्रतिवसति'** । ऐसें एका सांगितलें संतीं, । गंगेचां ठायीं ग्रामवस्ती । आहे म्हणोनि. ॥ १२ ॥ गंगेमध्यें वस्ती न घडे । म्हणोनि तीर लक्षणें पडे; । तीरीं वाडा वसे हें घडे । प्रसिद्धचि कीं. ॥ १३ ॥ गंगेचां उदकीं घोष निवेदिला, । न घडे म्हणोनि गंगात्याग केला; । तीरीं वाडा लक्षिला । हे

१. व. क. अनुमानुचि. २. क. श्रुतिशिरीं शिष्टाचें.

'जहल्लक्षणा'. ॥ १४ ॥ आरक्तपणें अश्व लक्षिला । तो रक्तिमा आणि अश्वही भला, । त्याग नाहींच केला । दोहींचाही; ॥ १५ ॥ हें 'अजहल्लक्षणे' चें लक्षण. । आतां जहदजहल्लक्षणा सांगेन; । कांहीं त्याग, कांहीं अत्याग मिळोन । सिद्ध जे जाली. ॥ १६ ॥ ब्रह्मसाक्षात्कारीं जाण । जहदजहल्लक्षणाचि प्रमाण; । वाच्यांशत्यागें संपूर्ण । लक्षांत घेइंजे. ॥ १७ ॥ **'सोयं देवदत्तः'** ऐसें । वाक्य जें बोलिलें असे, । वाच्यांशत्यागमिसें । लक्षांशु घेइंजे. ॥ १८ ॥ **सः** शब्दें तत्काळदेशविशिष्ट, । **अयं** शब्दें एतत्कालदेशविशिष्ट; । दोहीं देशकालत्यागें लक्ष्य स्पष्ट । शुद्ध लक्षिला. ॥ १९ ॥ तेथें अर्ध देशकालाचा त्याग केला, । अर्ध शुद्ध देवदत्त लक्षिला; । त्यागाऽत्याग ययाला । म्हणिजेत असे. ॥ २०२० ॥ तैसें **सत्यं ज्ञानमानंदं ब्रह्म** । ऐसे शब्दें उच्चारिलें ब्रह्म; । हें शुद्ध नव्हे विशिष्ट नाम । निर्धारेसीं. ॥ २१ ॥ हें लक्षणेंकरूनि जाणिजे, । शब्द बोलिला येणेंचि व्याजें; । तेंहीं कैसें ? ऐकिजे । अनुभव कर्णीं. ॥ २२ ॥ **सत्य** शब्दें आकाश बोलिजे । तद्विशिष्ट ऐसें चैतन्य जें, । तें सत्य शब्दें उच्चारिजे । निर्धारेसीं. ॥ २३ ॥ आकाशवाच्यांशु टाकूनि । शुद्धांशु घेइंजे लक्षूनि; । फावे शुद्ध निर्वाणीं । केवळ ब्रह्म. ॥ २४ ॥ तैसेंचि आइका ज्ञानः । चित्ताची वृत्ति जे प्रकाशमान, । जया जाणिजे दृश्यमान । चैतन्ययुक्त. ॥ २५ ॥ चित्तवृत्ति ज्ञानविशिष्ट, । जें ज्ञानशब्दें चैतन्य स्पष्ट; । ते वाच्याची वृत्ति टाकूनि अवशिष्ट । चैतन्य घे पां. ॥ २६ ॥ तैसाचि आनंद असे, । जो चित्तवृत्तिविषय समरसें, । जें कीं सुख होतसे । सर्व भूतां.[1] ॥ २७ ॥ आनंदशब्दें वाच्य जालें, । तें वाच्यपण विशिष्टा आलें.[2] । तें टाकून शुद्ध निराळें । लक्षूनि घेइंजे. ॥ २८ ॥ ऐसें विशिष्ट तेथें दिसे; । तेथें मुख्यार्थ अविचारित असे; । शुद्ध तें लक्षणांशें । लक्ष्य घेइंजे. ॥ २९ ॥ ऐसे सर्वदा संत । आत्मरूप सतत; । मूळ सरलिया[3] अर्थार्थ । किती, बापा ? ॥ २०३० ॥ जाला ब्रह्मसुखाचा सुकाळ, । संपतां ग्रंथ रसाळ, । अनिर्वाच्य सखोल । परिपूर्णत्वें. ॥ ३१ ॥ **रंगनाथ** म्हणे सद्गुरूचा; । तो आनंद न बोलवे वाचा ।

१. अ. सर्व भूतीं. २. अ. ते वाच्यपणें विशिष्ट आलें. ३. ब.क. मूळ संपादलिया.

अनुभवी अनुभव तयाचा । अनुभवें जाणती. ॥ ३२ ॥ **पंचरत्नाची** टीका । यथामति जाली देखा; । हे पूर्ण कृपा, आयिका, । यया सद्गुरुरायाची. ॥ ३३ ॥ टीका **पंचरत्ना**ची । यथामति जाहली साची । पूर्ण कृपा **श्रीकृष्णानंदा**ची । फळली मज. ॥ ३४ ॥ येऱ्हवीं मी वेडा सर्वभावें; । सद्गुरुसेवाही मनोभावें, । एकाग्रपणें; स्वभावें । करूं नेणें. ॥ ३५ ॥

इति श्रीपंचरत्नटीका संपूर्णास्तु.